# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# प्रभाव अभ्यास

### एम. ए. भाग २ : मराठी

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १०.२**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १४.२**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**प्रभाव अभ्यास**
एम.ए.भाग २: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ व १४.२
२०१९ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-951367-0-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : मराठी


अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

# संपादकीय

'प्रभाव अभ्यास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग–२ च्या सत्र–३ व ४ साठी आहे. सत्र–३ च्या अभ्यासपत्रिकेमध्ये १. प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती, २. प्रभाव आणि अनुकरण साम्यभेद, ३. प्रभावाची कारणे व मिमांसा, ४. प्रभाव आणि सत्तासंबंध; तसेच सत्र–४ च्या अभ्यासपत्रिकेमध्ये १. प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा, २. वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव, ३. रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास, ४. प्रभाव चिकित्सा या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत स्वयं अध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त विषय घटकांचे घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्ण रीतीने व आकलनसुलभ भाषेत केलेले आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्टे नमूद केलेली असून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रस्तुत घटक लेखनातील विषय विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटक लेखनामध्ये केलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटकलेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.


**■ संपादक ■**

**डॉ. उदय जाधव**
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
महावीर महाविद्यालय,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखक** | **घटक क्रमांक आणि शीर्षक** |
|---|---|
| **सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ : प्रभाव अभ्यास** | |
| **डॉ. सतेज दणाने**<br>नामदेवराव सूर्यवंशी बेंडके महाविद्यालय, फलटण | **१. प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती** |
| **प्रा. अनंता कस्तुरे**<br>श्रीमती मिनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी | **२. प्रभाव आणि अनुकरण** |
| **प्रा. संतोष बोंगाळे**<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड | **३. प्रभाव कारणमीमांसा** |
| **डॉ. गजानन भिंगारदिवे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **४. प्रभाव आणि सत्तासंबंध** |
| **सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १४.२ : प्रभाव अभ्यास** | |
| **डॉ. प्रभाकर पवार**<br>मुधोजी कॉलेज, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | **१. प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा** |
| **प्रा. सतेज दणाने**<br>नामदेवराव सूर्यवंशी बेंडके महाविद्यालय, फलटण | **२. वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव** |
| **डॉ. गजानन चव्हाण**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा | **३. रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास** |
| **डॉ. प्रशांत नागावकर**<br>यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर | **४. प्रभाव चिकित्सा** |

**■ संपादक ■**

**डॉ. उदय जाधव**
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
महावीर महाविद्यालय,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२
## प्रभाव अभ्यास


| | | |
|---|---|---|
| घटक १ | प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती | १ |
| घटक २ | प्रभाव आणि अनुकरण | १५ |
| घटक ३ | प्रभाव कारणमीमांसा | ३८ |
| घटक ४ | प्रभाव आणि सत्तासंबंध | ५५ |


## सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १४.२
## प्रभाव अभ्यास


| | | |
|---|---|---|
| घटक १ | प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा | ७१ |
| घटक २ | वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव | ११९ |
| घटक ३ | रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास | १४४ |
| घटक ४ | प्रभाव चिकित्सा | १७९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भ पुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्ताविक

१.२ विषय विवेचन

१.३ प्रभाव अभ्यासाचे स्वरूप

१.४ प्रभाव अभ्यासाची व्याप्ती

## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो,

'प्रभाव अभ्यास' या अभ्यासपत्रिकेमध्ये 'प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती' हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला :

- प्रभाव अभ्यासाची संकल्पना समजेल.
- प्रभाव म्हणजे काय ? ते नेमकेपणाने ध्यानात येईल.
- आशयसूत्रे, आविष्काररीती, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी व मूल्ये समजून घेता येतील.
- प्रभावाचा अभ्यास कोणत्या दृष्टिकोणातून करावा याचे ज्ञान मिळेल.

## १.१ प्रास्ताविक

व्यक्तीवर ज्या गोष्टीची छाप पडते तिचे व्यक्ती अनुकरण करते. मग ती समाजातील एखादी घटना असेल, एखादी व्यक्ती असेल, सांस्कृतिक घटक असतील, राजकीय व्यक्ती असेल, विचारधारा असतील त्यांचा प्रभाव पडतो. वाङ्मयीन क्षेत्रात विशिष्ट साहित्यकृती किंवा साहित्यिक याचा इतर साहित्य किंवा साहित्यिक यांच्यावर प्रभाव पडतो. मराठीमधील संत तुकाराम यांच्या साहित्याचा प्रभाव इतर भाषेतील साहित्यावर पडलेला आहे. शेक्सपिअरच्या नाटकाचा प्रभाव मराठी लेखकांवर दिसून येतो. महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव कृष्णराव भालेकर, रा. वि. टिकेकर यांच्या कादंबऱ्यात दिसतो. महात्मा गांधींच्या

विचाराने प्रभावित होऊन वा. म. जोशी, वि. स. खांडेकर आणि मामा वरेकर यांनी कादंबरी लेखन केले आहे. वि. वा. हडप यांनी मार्क्सवादी जीवनदृष्टीतून 'अन्नदाता उपाशी' ही कादंबरी लिहिली आहे. दया पवार यांच्या 'बलुतं'च्या प्रभावातून मराठी दलित साहित्यात आत्मकथनाचा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीच्या प्रभावात रंगनाथ पठारे, सदानंद देशमुख, रमेश इंगळे-उत्रादकर, प्रवीण बांदेकर, महेंद्र कदम, राजन गवस, सुशील धसकटे, किरण नगरकर, कमलेश वालावलकर अशी लेखकाची मोठी पिढी लिहिताना दिसते आहे. प्रभावाभ्यास ही एक व्यापक आणि गुंतागुंतीची अभ्यास पद्धती आहे. प्रभावाची व्यापकता संपूर्ण मानवी जीवन व्यापणारी आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कलाकृती अशी अभ्यासाच्या सोयीसाठी व्याप्ती दाखवता येईल. वाङ्मयीन कलाकृतीचा प्रभाव अभ्यास आशयसूत्रे, आविष्काररीती, तत्त्वज्ञान, मूल्ये या दृष्टिकोणातून करता येईल.

## १.२ विषय विवेचन

आपल्या जगण्यामध्ये आणि व्यवहारामध्ये आपण प्रभाव हा शब्द सातत्याने वापरत असतो. प्रभाव म्हणजे काय? हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी माझ्यावर आमक्या-तमक्याचा प्रभाव आहे. माझ्या जीवनावर प्रभाव पाडणारी ही व्यक्ती आहे. आपल्या जीवनात प्रभाव पाडणारी ही घटना घडली असे आपणास नेहमी ऐकायला मिळते किंवा आपणही कधी कधी अभिमानाने आपणाला प्रभावित करणाऱ्या घटना, व्यक्ती वगैरेसंबंधी बोलत असतो.

माणसाची जडणघडण, विकास हा प्रभावाचा एक भाग असतो. प्रभावाशिवाय माणसाची प्रगती होत नाही. प्रभावातूनच माणसाची घडण आणि बिघडण होते. आपणास असेही म्हणता येईल, माणसाला लहानपणी कळू लागल्यापासून बोलण्याची, चालण्याची जी धडपड असते ती प्रभावातीत असण्याची शक्यता असते. मानवी जीवनासंबंधाच्या अनेक घटना, घटिते ही प्रभावातूनच घडतात.

असे असले तरी प्रभाव म्हणजे अनुकरण असे म्हणता येणार नाही. अनुकरण ही त्यानंतरची प्रक्रिया असते. प्रभाव, प्रक्षेपक आणि स्वीकारक यांच्यातील संबंध प्रस्थापित झाल्यानंतर अनुकरण ही प्रक्रिया सुरू होते.

प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यासाठी आपणास प्रभाव या शब्दाचा अर्थ व प्रभावासंबंधीच्या व्याख्याचा विचार करावा लागेल.

**१. 'प्रभाव शब्दाचा अर्थ :**

मराठी शब्दकोशामध्ये 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ तेज, सामर्थ्य, पराक्रम, ऐश्वर्य असा पहावयास मिळतो.

२. व्याख्या

**※ आनंद पाटील**

प्रभाव एकच नसून, वाङ्मयीन व अवाङ्मयीन प्रभावाचे जाळे कसे तयार होते. याचा उलगडा महत्त्वाचा मानला जाऊ लागला. हे प्रभाव संकेत व परंपरातूनही उगम पावतात. व्यक्ती ज्या परंपरांशी जुळवून घेते त्या प्रक्रियेला प्रभाव समजले जाते.

आनंद पाटील ब्लूमच्या प्रभाव सिद्धांताचे विवेचन करताना म्हणतात :

'प्रभाव' हा परंपरेत निरोगी असावा लागतो. तो फ्लूसारखाही असू शकतो. त्याने अनुकरण परंपरा स्वीकारून मूलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता या संकल्पनांवर गैरविश्वास व्यक्त केला. त्या नाकारल्या मात्र नाहीत. प्रभाव याचा अर्थ संहिता नसतातच मुळी, पण संहितामधील संबंध असतात असा आहे.

**※ भालचंद्र नेमाडे**

एका भाषेचा दुसऱ्या भाषेवरचा प्रभाव ही घटना नेहमी दोन संस्कृतींच्या संपर्काचा भाग म्हणून अस्तित्वात येते. जगातल्या सर्वच भाषांवर अन्य भाषांचा प्रभाव कमी-जास्त प्रमाणात असतो. ते पुढे वाङ्मयीन प्रभावाच्या अभ्यासाच्या संदर्भात म्हणतात,

'भाषिक प्रभावाकडे एक सर्वसाधारण दृष्टिक्षेप टाकला तरी लक्षात येईल की, अशा मुकाबल्यानंतर भाषेच्या उपव्यवस्थांमध्ये होणारा विस्तार हा एखादा समाज नव्या परिस्थितीशी कशा प्रकारे स्वतःला जुळवून घेतो याचा निदर्शक असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अविकसित भाषांनी इतर विकसनशील भाषांच्या बरोबर येऊ पाहण्याची ही प्रक्रिया असते.

**※ व्ही. सच्चितानंदन**

'एखाद्या लेखकाचा स्वतःचा कलात्मक विकास किंवा त्यांची वाङ्मय परंपरा जे स्पष्ट करू शकत नाही, ते जे काही देशी लेखकाच्या साहित्यकृतीत सापडते, त्याला प्रभाव म्हणावे.'

(व्ही. सच्चितानंदन : व्हिटमन आणि भारतीय तौलनिक अभ्यास, १२४-५०)

मराठी शब्दकोशामधील 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ व आनंद पाटील, भालचंद्र नेमाडे आणि व्ही. सच्चितानंदन यांनी प्रभावासंदर्भात मांडलेले मत या एकत्रित चर्चेवरून 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ दाब, जोर, बल, ठसा असा घेण्यासारखा आहे.

आनंद पाटील आणि भालचंद्र नेमाडे यांच्या प्रभावासंबंधी मतानुसार अविकसित घटकांची विकसनशील घटकांबरोबरीस येऊ पाहण्याची प्रक्रिया म्हणजे प्रभाव. हा धागा दोघांच्याही मतामध्ये समान असलेला दिसतो. याशिवाय वाङ्मयीन व अवाङ्मयीन प्रभाव, प्रभाव संकेत, परंपरा, अनुकरण, मूलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता, संहितामधील संबंध, दोन संस्कृती संपर्क, भाषेच्या, समाजाच्या उपव्यवस्थामध्ये होणारा बदल, विस्तार, समायोजन, कलात्मक विकासाचे किंवा वाङ्मयीन परंपरांचे फलित अशा संकल्पना, घटक संबंध हे प्रभाव अभ्यासाची संकल्पना स्पष्ट करणारे व स्वरूप आणि व्याप्तीचे सूचन करणारे आहेत.

या चर्चेआधारे आपणास प्रभाव म्हणजे काय हे सांगता येण्यासारखे आहे.

विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव पडणे, विशिष्ट भाषिक समाज अन्य भाषिक साहित्याचे किंवा साहित्यिकाचे स्वागत करणे. त्याचा स्वीकार करणे. अविकसितांनी विकसितांचा किंवा विकसनशीलाचा आदर्श घेणे वाईट नाही. भारतीय लेखकांनी पाश्चात्य लेखकाचा प्रभाव स्वीकारणे हे पराभूतपणाचे लक्षण असत नाही किंवा भारतीय लेखकांनी भारतातील लेखकाचा प्रभाव स्वीकारणे हाही पराभूतपणा नाही. शेक्सपिअर, मोल्येर, शेली, इब्सेन, ईलियट, टॉलस्टॉय, डॉस्टोयवस्की, पुष्किन, चेकॉव्ह, हेमिंग्वे यांचा प्रभाव इतर अनेक देशात पडलेला आहे. भारतीय उपनिषदांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव पाश्चात्त्यांवर पडलेला आहे. तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या साहित्याचा प्रभाव इतर राष्ट्रात आणि देशात पडलेला आहे. या आदान-प्रदानामध्ये कुठल्याच तटभिंती असत नाहीत. साहित्यिकांचा प्रभाव पडतो तसा साहित्याचाही प्रभाव पडत असतो.

प्रभावातील नावीन्य, सामर्थ्य आणि सौंदर्य हे गुण परंपराश्रयी असतात. त्यामुळेच कालिदास, श्रीहर्ष, माघ-भारवी यांच्या काव्याचा प्रभाव मध्ययुगात देशी भाषांवर पडला आहे. पण तो संस्कृत पंचमहाकाव्याचा प्रभाव म्हणून ओळखला गेला. रचनापद्धती, आलंकारिकता, विषयाची निवड, निवेदन कौशल्ये, पांडित्य अशा अनेक गुणांनी मिळून संस्कृत महाकाव्याची म्हणून एक परंपरा तयार झाली होती. तिचा उल्लेख वसंत बापट यांनी 'संकुल प्रभाव' असा केला आहे. ग्रीक ट्रॅजेडी, फ्रेंच वास्तववादी साहित्य, जपानी 'हायकू कविता' अशा या जगातील विविध संकुलाचा प्रभाव इतर देशांमध्ये पडलेला आहे.

### १.३ प्रभाव अभ्यासाचे स्वरूप

विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकांचा प्रभाव पडतो. भिन्न-भिन्न साहित्यात समांतर अथवा समान विकास आढळतो. विशिष्ट साहित्याला नवी दिशा मिळाल्याचे दिसते. याचा शोध हा प्रभाव अभ्यासाचा विषय ठरत असतो. साहित्याचा किंवा साहित्यिकांचा प्रभाव पडतो. तो कशा स्वरूपात पडलेला असतो. प्रभाव-प्रेक्षक-स्वीकारक या प्रक्रियेतून जाणवतो. प्रभाव स्वीकारणाऱ्या साहित्यकृतीच्या संकल्पना धारणेवर अवलंबून असतो. वाङ्मयीन गोष्टी, वाङ्मयबाह्य गोष्टी, देश, काल भाषा आणि गरजा हेही घटक अंतर्भूत असतात.

साहित्य आणि साहित्यिक यांचा प्रभाव पडतो. यापुढे काही वाङ्मयबाह्य गोष्टींचा प्रभाव पडलेला असतो. त्याचाही विचार करावा लागतो. मराठी मंडळींना मराठी भाषा बोलणाऱ्यांना इंग्रजी वाङ्मय जवळचे वाटते आहे पण शेजारच्या कर्नाटक, तमीळ, तेलगू, गुजरात या भाषिक प्रदेशात काय चालते आहे, कोणत्या वाङ्मयीन चळवळी सुरू आहेत. नवीन कोणता प्रवाह, नवीन कोणता लेखक लिहितो आहे यांची माहिती असली पाहिजे. वि. स. खांडेकर तेलगूत, अण्णाभाऊ साठे रशियात प्रसिद्ध आहेत. त्यांचा तेथील साहित्यावर, साहित्यिकांवर प्रभाव आहे पण तेलगूतील साहित्य किंवा रशियातील साहित्याचा प्रभाव मराठीत तेवढा पडला नाही. एका काळात एखाद्या देशाबद्दल असणारी जनमानसातील प्रतिमा काही

काळानंतर बदलते. मध्यस्थाची भूमिका आणि परिस्थिती यावर ते अवलंबून राहते. प्रभाव स्वीकारणाऱ्याचे प्रभुत्व, कालसापेक्षता आणि नवता या गोष्टीचा संबंध प्रभावाशी असतो.

**अमिय देव यांचा प्रभावाभ्यासाचा शोध**

प्रभाव, अनुकरण, ठसा (impact), परिणाम (effect), स्वागत (receiption) आदिशेष (servival) या सहा संज्ञा वाङ्मयीन संबंधाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या आहेत. फ्रेंच पठडीच्या परंपरेला अनुसरून आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंध शोधण्याचा प्रारंभ अमिय देव यांनी केल्याचे आनंद पाटील यांनी 'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'या ग्रंथात नमूद केले आहे.

**लेखक/संहिता** : साहित्यकृती ⟶ प्रभाव प्रसार माध्यमे ⟶ स्वीकार-ग्रहण ⟶ अनुकरण-प्रभाव-ठसा (= परिणाम १) ⟵ आदिशेष (= परिणाम १)

**२. कालखंडीय प्रभावाभ्यास**

एका साहित्यिकांवरील किंवा साहित्यकृतीवरील प्रभावाचे मिश्रण तपासण्यासाठी कालखंडीय प्रभावाभ्यासाचा पाया असावा लागतो. साम्यवादी देशातील मार्क्सवादी अभ्यासकाचा आग्रह हा प्रभावांचे संबंध, कालखंड आणि वर्गकलहाच्या संदर्भात तपासणे असा असतो. सामाजिक व राजकीय संबंधाचा भाग म्हणून वाङ्मयीन प्रभावाकडे पाहणे. माहितीचे संचयन करून प्रभावाचा शोध घेणे. सामाजिक-सांस्कृतिक आंतर साम्याच्या प्रमाणात प्रभाव प्रक्षेपक किंवा स्वीकारक बनणे हे प्रभाव संबंधाचे एक चक्र असते. ए. एन. वेसेलेव्हस्की (Vesyolovsky) व व्ही. एम. झिर्मुन्स्की (Zhirmunsky) सारख्या रशियन तुलनाकारांची ऐतिहासिक काव्यमीमांसा ही भूमिका होती. कलाकृतीवर काळाचा व सामाजिक परिस्थितीचा ठसा असतो. काव्यात्म जाणिवेत सामाजिक जीवन प्रतिबिंबित होऊन ती जाणीव जीवनातील बदलांशी सुसंवादी रीतीने बदलते. हा ऐतिहासिक मीमांसेचा गाभा आहे. या दोन्हीही तुलनाकारांना प्रभावाची संकुचित व्यक्तिकेंद्रित कल्पना मान्य नाहीत.

झिर्मुन्सकीने वाङ्मयीन उसनवारी आणि ठशांचे सर्व सिद्धांत बाजूला केले. कवी हा कल्पनांची उसनवारी करीत नाही तर प्रभावी आवर्ती रूपचिन्हे (Motifs) कर्जाऊ (borrow) घेतो अशी भूमिका मांडली. खऱ्या असणाऱ्या कलात्मक प्रतिमाच प्रभाव पाडतात. कल्पना प्रभाव पाडत नाहीत. स्वीकार करण्यासाठी तो एक लढा नव्या परिस्थितीत वाङ्मयाला नवे आराखडे तयार करून देण्याच्या वळणावर घेऊन जातो. समानधर्मी प्रवृत्ती निरनिराळ्या राष्ट्रांच्या साहित्यात असतात. ही अट आंतरराष्ट्रीय प्रभाव घडून येण्यासाठी असते. त्यासाठी स्वीकारक साहित्याची गरज आणि सामाजिक परिस्थिती यांच्यात प्रभाव सुसंवादी असणे आवश्यक ठरते. अनेक ग्रंथातून त्याने प्रभावाचा संबंध सामाजिक बदलाशी जोडलेला आहे. उसने घेतलेले नमुने समाज जसेच्या तसे न स्वीकारता राष्ट्रीय स्वभाव धर्म वैशिष्ट्ये त्यांना धारण करायला लावतो.

वाङ्मयीन प्रभाव हा अनेक अवस्थांतरानंतर प्रभाव म्हणून स्थिर होतो. प्रभाव प्रक्षेपक मूळलेखक / संहिता यांना स्वीकार करणारा लेखक/संहिता यांच्याशी जोडणारे ऐच्छिक मध्यस्थ ही स्वागताला वेगळे परिणाम प्राप्त करून देणारी मांडणी आहे. पण ती परिपूर्ण नाही असे देव यांनी कबूल केले आहे.

**२. स्वपन मजुमदारांची प्रभावाच्या सौंदर्यशास्त्राची मांडणी**

प्रभावाभ्यासाचा प्रमुख हेतू लेखकांच्या निर्मिती प्रक्रियेतील विविध आकृतीबंध आणि मातृका (matrice) दाब आणि ओढाताण समजून घेणे हा असतो. प्रभावाचे कार्यक्षेत्र निश्चित असत नाही. ते स्वीकारकाच्या मानसिक प्रक्रियेत व्यापून उरणाऱ्या समानुभूतीची (empathy) ची प्रेरणा देते. एकाच वेळी मूलाधाराच्या अनेक खुणा प्रभावात सापडतात. त्यात दूरच्या चकाकीचे प्रतिबिंब असते.

प्रभाव हा अनुकरणाने सुरू होऊन स्वागत प्रक्रियेतून त्याचे ठशात पर्यवसान होते. पर्यवसान होत असताना ते शोषक किंवा गर्भपतित असते. यशस्वी उदाहरणात तेथे आदिशेष अवतरतो. तोच आराखडा साहित्यामधील संबंधात विधिग्राह्य असतो. हा निष्कर्ष मजुमदार यांनी अमिय देव यांच्याप्रमाणेच मांडलेला आहे.

**४. हॅरॉल्ड ब्लूमचे वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र**

ब्लूमने प्रभाव संकल्पना केंद्रस्थानी ठेवून काव्य परंपरेचा पुनर्विचार केला आहे. त्याच्या मतानुसार एका कवितेचा स्वतंत्र व स्वयंभू साहित्यकृती म्हणून विचार करता येणार नाही. कारण ती एकाच परंपरेत गुंतलेली असून कवीचे प्रेम, द्वेष यामध्ये स्पर्धात्मक नाते असते. त्याचा कौटुंबिक रोमान्स काव्यावर परिणाम करतो. त्याच्यातील स्पर्धा, संघर्ष आणि युद्ध म्हणजेच युरोपातील आधुनिक काव्याची परंपरा होय. हा धाडसी सिद्धांत त्याने मांडला. प्रभावाच्या सिद्धांताचे उत्तम उदाहरण तो स्वतःच होता असा मिश्किल शेराही लेंट्रिकाने मारला आहे. ब्लूमने प्रभाव सिद्धांतात बदल करून अनुकरण परंपरा स्वीकारून मुलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता या संकल्पनावर गैर विश्वास व्यक्त केला पण त्या नाकारल्या नाहीत. मानवतावाद, धर्म आणि गूढवादाच्या आधारे त्याने उत्तर संरचनावाद्यांच्या सिद्धांताना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी काव्य प्रभावाला बौद्धिक उजळणीचा भाग ठरवले. ब्लूमच्या सिद्धांतावर अनेक आक्षेप घेण्यात आले. साधर्म्य सामाजिक स्थितीतून निर्माण होते. भिन्न देशात विशिष्ट समाज स्थितीत ते आढळतात. ही सामाजिक पायरीवरील प्रभावाभ्यासाची नवी दिशा रशियन रूपवाद्याने दिली आहे.

**५. नबी इस्ताईफची प्रभावाला पर्यायी मांडणी**

नबी इस्ताईफने प्रभाव संकल्पनेला पर्याय म्हणून स्फूर्ती (inspiration) ही संकल्पना मांडली आहे. धनको व ऋणको, देणारा आणि घेणारा हा भेदभाव टाळण्यावर त्याने भर देऊन या अभ्यासाची पाच पथ्ये सांगितली आहेत. ती थोडक्यात पुढीलप्रमाणे :

१. अभ्यास संहितेपासून सुरू व्हावा.

२. संहितांतर्गत पुरावे संहिता बाह्य पुराव्याच्या आधारे निश्चित करूनच परक्याची उपस्थिती संहितेत कशी आहे ते तपासावे.

३. या पुराव्याचे संदर्भ काळ व परिस्थिती लक्षात घेऊन जुळवावे.

४. त्या साहित्यकृतीचे वाङ्मयीनत्व कशात आहे, हे समीक्षा-पद्धतीच्या चौकटीत स्पष्ट करता आले पाहिजे.

५. साहित्यकृतीचा विचार साकल्याने व पूर्ण संहितेतील परक्याच्या उपस्थितीवर लक्ष एकाग्र करून व्हावा.

ह्या पंचसूत्रीच्या आधारे प्रभावाला पर्याय म्हणून सूचविलेल्या स्फूर्तीची संकल्पना धूसर व गूढ आहे तिचे स्वरूप अधिक विस्ताराने सोदाहरण स्पष्ट करावे लागेल असे आनंद पाटील यांनी या संदर्भात म्हटले आहे.

**६. स्वागत सिद्धांत**

प्रभाव व स्वागत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रभावात प्रतिसाद (response) अथवा स्वीकार/नकार व स्वागत ह्या प्रक्रिया संभवनीय आहेत. स्वागत अभ्यासात reception व wirkung (response or effect) यांच्यात फरक केला जातो. यामध्ये भिन्न दृष्टिकोण असले तरी त्यांचे साध्य एकच आहे. स्वागत अभ्यास पद्धतीचा समाजशास्त्र, कला, इतिहास इ. विद्याशाखांवर परिणाम झाला आहे. स्वागत सिद्धांत वाचकाशी संबंधित वाटतो. पण एखाद्या साहित्यकृतीवरील ठशाचे स्वरूप तपासणे, त्याचा परिणाम पाहणे, यातील पहिला वाचकांशी तर संहितेशी संबंधित आहे. जर्मन अभ्यासक स्वागत सिद्धांतात प्राचीन साहित्यकृतीवर लक्ष खिळवून न ठेवता साहित्यातील वाचकांची भूमिका तपासतात. हा नाविन्यपूर्ण विकास आहे असे आनंद पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

**७. आंतर संहितात्मकता**

भारतीय कवीच्या सांकेतिक रचना किंवा प्राचीन वक्तृत्वशैलीशास्त्र (rhetoric) यामध्ये प्रभाव व आंतर संहितात्मकतेच्या कल्पनेचे मूळ सापडते. लेखक हा प्रथम वाचक असतो. त्यांच्यावर इतरांचे प्रभाव पडतात. सर्व संहिताना अन्य सहिता प्रभावित करतात. आडव्या तिडव्या छेदतात. प्रभावाचा आविष्कार कोणत्याही वाङ्मय संहितेत एकटा असत नाही. त्याचे जाळे असते. ते एकत्र नांदतातही संमीलित होतात, मोडले जातात आणि लढतात. सामाजिक व सांस्कृतिक घटकांशी प्रभाव व स्वीकारासंबंधीच्या समस्या जोडलेल्या असतात. उद्धृते, विडंबन, वाङ्मयचौर्य, प्रभाव असे विविध प्रकारचे संबंध एक व अनेक संहितामध्ये आढळतात. त्यांना आंतरसंहितात्मकता म्हटले जाते. पण एखाद्या संहितेचे नाममात्र उल्लेख आले म्हणून प्रभाव किंवा आंतरसंहितात्मकता सिद्ध होत नाही. साहित्यकृतीच्या संपूर्ण रूपरेषेत अर्थपूर्ण ठरण्यासाठी साम्य श्रुतयोजन किंवा उद्धृत असावे लागते, तरच त्यांना प्रभाव किंवा आंतरसंहितात्मकता म्हणता येते.

प्रभाव व आंतरसंहितात्मकतेच्या प्रवृत्ती भिन्न असून प्रभावावर आंतरसंहितात्मकतेचा मुलामा चढवला जातो. प्रभाव स्वायत्त मुक्त असून तो लेखकाच्या आज्ञेला बांधील नसतो. प्रभावाची जाणीव आंतर-संहितात्मकतेकडे घेऊन जाते. प्रभात या संकल्पाला चिकटलेली दुर्बोधना व चुका कमी होण्यास मदत होते. काही प्रश्न अनाकलनीयच राहतात. 'हॅम्लेट' हे विधान मराठीत कसे अस्पष्ट आणि गोंधळात टाकणारे आहे

ते पहा. 'हॅम्लेटचा महाराष्ट्रावर परिणाम' या विधानातील 'हॅम्लेट' याचा अर्थ नाटकातील रूपबंध की घटना असा घ्यायचा की ज्याचा परिणाम महाराष्ट्रावर, मराठी माणसांवर झाला आहे.

**८. भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेला प्रभावाभ्यासाचा आराखडा**

भारतीय साहित्याच्या संदर्भात वाङ्मयीन विद्वानांनी प्रभावाभ्यासाची प्रमाणपट्टी न वापरता अभ्यास केलेला आहे. इंग्रजीचा भारतीय भाषेवर पडलेला प्रभाव हा भाषिक मूल्यांशी संबंधित होता. भाषिक संयोग हा संस्कृतीचा भाग असतो. राजकीय-समाजशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक प्रक्रियेशी तो जोडलेला असतो. यामध्ये दोन संस्कृतीचा संघर्ष होऊन भाषेच्या उपव्यवस्थांमधील विस्तार नव्या परिस्थितीशी कसा जुळवून घेतो हे त्यामधून दिसते. या ठिकाणी अविकसित घटक, भाषा ह्या इतर विकसित घटकाशी समांतर येण्याची ती एक प्रक्रिया असते. वाङ्मयकृतीच्या संहितात्मक संरचनेवर भाषेतील बारीकसारीक बदलाचा प्रभाव पडत असतो.

भाषाशास्त्र हे संहितात्मक असते. त्यामध्ये संपूर्ण भाषेचा अभ्यास होणे आवश्यक असते. भाषा एक चिन्हव्यवस्था असते. ती एक सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था असते. यामधील सीमारेषा सामाजिक, सांस्कृतिक घटकांशी जोडलेल्या असतात. त्यामधील संघर्षातून दोन संस्कृतीशी संबंधित शैलीव्यवस्था, सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था आणि ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा भाषिक घटकांशी संबंधित असल्यामुळे करता येतो. असा भाषाशास्त्रीय प्रभावाचा आराखडा वाङ्मयीन प्रभावाच्या अभ्यासासाठी वापरता येईल असे भालचंद्र नेमाडे यांनी सांगितले आहे.

भाषिक प्रभावाचा आराखडा भाषाशास्त्रीय प्रक्रिया आणि घटना यांची कारणमीमांसा करतो. पण भाषिक प्रभावाच्या विविध अंगाचे स्पष्टीकरण देता येत नाही. त्यामुळे त्यांनी सोयीस्कर असणाऱ्या बहुमार्गी अभ्यास पद्धतीची सविस्तर मांडणी केली आहे.

बहुमार्गी अभ्यासपद्धतीत समावेश केलेल्या अभ्यासशाखाः

१. ऐतिहासिक भाषाशास्त्रीय

२. सामाजिक भाषाशास्त्रीय

३. तौलनिक वर्णनपर भाषाशास्त्र

४. वाङ्मयीन शैलीशास्त्राची अभ्यासपद्धत

**१. ऐतिहासिक भाषाशास्त्रीय**

आंग्लपूर्व मराठी गद्य आणि त्यानंतरचे गद्य या नमुन्याधारे इंग्रजीचा मराठीवरील प्रभाव शोधणे हे ऐतिहासिक भाषाशास्त्रीय पद्धतीने शक्य होते. मूळ मराठी शैलीरूपे आणि इंग्रजीचा संपर्क झाल्यानंतरची शैली रूपे अशी तुलना करणे हा भाग या शाखेत येतो. नवीन रूपे आणि जुनी रूपे याची तुलना करण्याकरिता नवीन रचना करून तयार केलेली आधाररेषा निश्चित करणे.

**२. सामाजिक भाषाशास्त्रीय**

द्विसांस्कृतिकता अस्तित्वात येते तेथे जित लोकांची संस्कृती ही द्विसांस्कृतिक निर्माण होते. त्याची भाषाही द्विभाषिकता स्वीकारते त्यावेळी प्रमाणापेक्षा आणि उपयुक्ततेपेक्षा अधिक द्विसांस्कृतिकता दिसू लागते. अशा वेळी ती रोखण्यासाठी देशीवादाच्या आधाराने शुद्धतेचा आग्रह धरणाऱ्या चळवळी निर्माण झालेल्या आहेत. परक्या संस्कृतीचा भाषेला प्रतिकार करण्यासाठी मराठीत संस्कृत शब्दांचा वापर इंग्रजी कालखंडात झालेला पहावयास मिळतो. या नव्या उसण्यारूपाने मूळ भाषेचा सजीवपणा नाहिसा होतो. जेते लोकांच्या ठिकाणी उसनवारी करणारा समूह येऊ पाहात असतो. परकीय संस्कृतीच्या प्रभावाच्या अवस्थेतून उसनवारी होते. प्रारंभी बदसूर, बेबंदता असली तरी त्यानंतर ती नाकारणे-स्वीकारणे या प्रक्रियेतून नियंत्रित होते. ग्राहक भाषेची उसनवारी आणि तिच्यातील बदल असा अभ्यास सामाजिक भाषाशास्त्रीय शाखेचा असू शकतो.

**३. तौलनिक वर्णनपर भाषाशास्त्र**

भाषिक प्रभावाचे विश्लेषण मांडणारा आराखडा वर्णनपर भाषाशास्त्राचा तौलनिक वापर करून दाखविता येतो. ऐतिहासिक भाषाशास्त्रातील अभ्यासातील नवीन रूपे व जुनी रूपे यांच्या तुलनेआधारे तयार केलेली आधाररेषा तिचा उपयोग या ठिकाणी संदर्भासाठी करता येतो. उसनवारीच्या प्रक्रियेने झालेल्या बदलामुळे ग्राहक भाषेतील वैशिष्ट्ये संपुष्टात येऊन भाषिक व्यवस्था बदलते. इंग्रजीतील अर्धविराम, स्वल्पविराम, अवतरणचिन्हे यामुळे मराठीला फायदा झालेला दिसतो. पण मराठीमधील मुक्तपणा व लवचिकपणा संपलेला असतो. उसनवारीने झालेला बदल आणि अंतर्गत घटकामुळे झालेला बदल हे मूळ संहिता तपासून उसनवारीची खात्री करता येईल असे नेमाडे यांनी सांगितलेले आहे.

**४. वाङ्मयीन शैलीशास्त्राची अभ्यासपद्धती**

ही अभ्यासपद्धती प्रभावाच्या विविध अवस्थामधील वाङ्मयकृतीचे विश्लेषण करण्यासाठी उपयोगी ठरणारी आहे. उसनवारीने आलेल्या वाङ्मयीन व सौंदर्यशास्त्रीय घटकांचा क्रम व संगती लागणे, शैलीलक्ष्यी तंत्रे, रूपबंध, प्रतिमा, प्रतीके, वाङ्मय प्रकार, चळवळी, साहित्यकृतीमधील पात्रे, प्रसंग, संविधानक यांचा समावेश केला जातो. हा तौलनिक अभ्यासाचा भाग आहे.

**९. प्रभावाभ्यासाची वसंत बापट यांनी सुचविलेली पद्धत**

विशिष्ट साहित्यिकांचा किंवा साहित्याचा अन्य भाषिक क्षेत्रात पडलेल्या प्रभावाचा अभ्यास कसा करता येईल. याचा नमुना म्हणून वसंत बापट यांनी रवींद्रनाथाचा मराठी साहित्यावरील प्रभावाभ्यासाचे उदाहरण दिले आहे.

असा अभ्यास करताना रवींद्रनाथाचा मराठी साहित्यात प्रथम कधी उल्लेख झाला आहे. पुढे त्याचा कसा लौकिक पसरला, त्याचा पहिला अनुवाद कोणी आणि कधी केला, वाचकावर काय परिणाम झाला.

त्याचे स्वागत कसे झाले. अनुवादितकृतीचे प्रकाशन करणारी संस्था, तिचे स्थान, त्यामुळे अनुवादित साहित्यकृतीला कसा आणि किती फायदा झाला. अनुवादक किंवा प्रकाशन संस्था सर्वसामान्य असल्याने साहित्यकृतीच्या स्वागताला झालेली मदत कशी होती, एकाच साहित्यकृतीचे किंवा इतर साहित्यकृतीचे झालेले अनुवाद, त्याच्या झालेल्या परिणामाचे स्वरूप, अनुवादातील सातत्य, त्याचे होणारे स्वागत, त्यांच्या साहित्याचे झालेले अनुकरण, अनुकरणातून निर्माण झालेल्या साहित्यकृती, त्यांची झालेली विडंबने, त्याच्यावर झालेली टीका, समीक्षा, भाष्यकारांची मते, त्यांच्या विचाराचे झालेले खंडण असा सर्व आढावा घेऊन त्यांच्याशी झालेली चर्चा, स्वरूप, अवलोकन याद्वारे मागोवा घेणे हा एक भाग आहे.

ही सर्व चर्चा व अभ्यासाचे टप्पे लक्षात घेऊन रवींद्रनाथांचा कोणत्या मराठी लेखकावर व लेखनावर प्रभाव पडलेला आहे, तो किती प्रमाणात अभिव्यक्त झाला, त्यामधील भाववृत्ती, जीवनदृष्टी याचा कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक, निबंध, समीक्षा अशा अंगानी शोध घेऊन कोणत्या कालखंडात प्रारंभ झाला, तो पुढे वाढत गेला की, उतरत गेला असा चढ उताराचा आलेख कारणमीमांसेसह दाखविणे. रविंद्रनाथाच्या साहित्याचा प्रभाव व अप्रत्यक्ष प्रभाव कसा व कुठपर्यंत पोहोचला याचा शोध घेतल्यानंतर केलेल्या निष्कर्षाची मांडणी हा प्रभाव अभ्यास ठरू शकतो. ही वसंत बापट यांनी केलेली प्रभावाभ्यासाची मांडणी लक्षात घेण्यासारखी आहे.

प्रभाव अभ्यासाच्या आराखड्याची मांडणी अनेक अभ्यासकांनी उदाहरणासह केलेली आहे. ह्या सर्व प्रभाव अभ्यासकाच्या मांडणीतून प्रभाव अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट होते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक, साहित्य व साहित्यिक या घटकाशी प्रभाव अभ्यासाचे स्वरूप संबंधित असते. प्रभावाची व्याप्ती ही सरसकट एकसारखी असत नाही. तो पूर्णपणे उलगडून दाखविता येत नाही. त्याचे प्रमाण कमी जास्त असू शकते. त्यामध्ये चढ आणि उतार, प्रारंभ आणि शेवट असतो.

साहित्याचा किंवा साहित्यिकाचा इतर क्षेत्रात प्रभाव पडतो. त्याचे स्वागत होते. त्याचे अनुकरण, अनुवाद, विडंबने, नकल होते. पण तो पडलेला प्रभाव सर्वांवर एकसारखा समप्रमाणात असत नाही. काही ठिकाणी त्याचा पूर्ण प्रभाव असेल तर कही ठिकाणी अंशतः प्रभाव जाणवेल. प्रभावाची व्याप्ती ही परिस्थितीशी संबंधित असते. तर कधी ती वस्तुस्थितीशी संबंधित असते. एखाद्या साहित्यिकांचा साहित्यावर थोड्या-बहुत प्रमाणात प्रभाव जाणवतो तर, एखादा लेखक किंवा त्यांची साहित्यकृती ही पूर्णपणे प्रभावातीत असते म्हणजे पूर्ण प्रभाव त्यावर पडलेला असतो.

अंशिक प्रभाव हा काही सीमित विभागापुरताच पडलेला असतो. शब्दांची लक्षणीय घटिते, छंदाचे प्रयोग, लेखक विशिष्ट विक्षिप्त लकबी एवढा मर्यादित प्रभाव असलेला दिसतो.

साहित्यकृती किंवा साहित्यिक यांचा प्रत्यक्ष प्रभाव इतर साहित्यिकावर किंवा साहित्यावर पडलेला दिसतो. शेक्सपिअरच्या साहित्याचा मराठी साहित्यिकांशी प्रत्यक्ष संपर्क आल्यामुळे मराठीत अनेक साहित्यिक आणि साहित्य यावर शेक्सपिअरचा प्रत्यक्ष प्रभाव दिसतो. नाट्याचार्य खाडिलकर यांच्यावरील शेक्सपिअरचा

प्रत्यक्ष प्रभाव 'सवाई माधवरावाचा मृत्यू' या नाटकात पहावयास मिळतो. महाकवी ग्योएथेच्या साहित्यावर रोमन साहित्याचा प्रभाव दिसतो, तर संत तुकारामाच्या अभंगावर संत कबीरांचा प्रभाव असल्याचे दिसते.

शेक्सपिअरच्या नाटकाचे अनुवाद, रूपांतर किंवा त्यासारखे साहित्य निर्माण करण्याची प्रेरणा मिळणे. शेक्सपिअरच्या अभ्यासासाठी स्वतंत्र मंडळे निर्माण होणे ही प्रत्यक्ष प्रभावाची उदाहरणे म्हणून सांगता येतात.

प्रत्यक्ष संपर्क न येता इतर साहित्य किंवा साहित्यिक यांच्या प्रभावातून साहित्य निर्माण होणे अप्रत्यक्ष प्रभाव असतो. मूळ साहित्याचा संपर्क न येता त्याच्या रूपांतरित साहित्याच्या प्रभावाने इतर साहित्य निर्माण होणे हा प्रभाव शेक्सपिअरच्या नाटकाच्या रूपांतरानी प्रभावित होऊन निर्मिती प्रेरणा निर्माण होणे असा दाखविता येतो किंवा शेक्सपिअर संदर्भातील लेखन व समीक्षा अभ्यासाने, वाचनाने, प्रतिभाविशेषांची जाणीव होणे, इतर मध्यस्थ घटकांमार्फत ओळख होणे, त्या परिणामातून स्वराष्ट्रीय साहित्यकृतीच्या गुणधर्माची चिकित्सा होणे हाही अप्रत्यक्ष प्रभाव म्हणून दाखविता येतो.

विखुरलेला, विरघळलेला, धूसर झालेला प्रभाव हा एक भाग प्रभावात असतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव या ठिकाणी साहित्यिक किंवा साहित्यकृती यांच्यावर असत नाही. अल्प प्रमाणात केवळ स्मरणाइतकाच प्रभाव असतो. रूपांतरांची रूपांतरे, अनुकृतीच्या अनुकृतीची अनुकरणे त्यामधील फक्त विशेषाचा प्रभाव दिसून येतो. विशेषाचे स्मरण व्हावे एवढा अल्प प्रभाव त्या साहित्यकृतीत असतो. कालांतराने तोही नाहिसा होतो किंवा मिसळून जातो. काही जाणकारांना त्याची जाणीव होते. असा विरळ होत जाणारा, विखुरलेला, धूसर झालेला प्रभाव, मिसळून जाणारा असला तरी त्या प्रभावाचा काही काळ तरी प्रभाव असतो.

### १. प्रभावाभ्यासाची व्याप्ती

प्रभावाभ्यासाची संकल्पना स्वरूप अभ्यासल्यानंतर प्रभावाभ्यासाच्या व्यक्तीचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. मानव व मानवी जीवनाच्या संबंधित सर्वच क्षेत्रात कोणत्या तरी घटकांचा, विचारांचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडलेला असतो. प्रभाव ज्याच्यावर पडत नाही असे माणसांच्या संबंधित कोणतेच क्षेत्र दाखविता येणार नाही, अशी प्रभावाची व्यापकता आहे. तरीही अभ्यासाच्या सोयीसाठी आपणास सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वाङ्मयीन कलाकृती अशी प्रभावाची व्याप्ती दाखविता येईल.

विशिष्ट साहित्यकृतीचा किंवा विशिष्ट साहित्यिकाचा इतर साहित्यकृतीवर किंवा साहित्यिकांवर प्रभाव पडतो. तो प्रभाव कधी अंशतः किंवा पूर्णतः, कधी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, विखुरलेला, विरळ, धूसर झालेलाही दिसतो. प्रभावाभ्यासाच्या व्याप्तीमध्ये सामाजिक घटक आणि विचारधारा, सांस्कृतिक घटक, रूढी परंपरा आणि विचारधारा, राजकीय घटक आणि विचारधारा, वाङ्मयीन कलाकृतीमध्ये आशयसूत्रे, आविष्काररीती, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी आदी मूल्ये असा प्रभावाभ्यास करता येईल.

**प्रभावाभ्यासाची व्याप्ती**

- सामाजिक
- सांस्कृतिक
- राजकीय
- वाङ्मयीन
  - आशयसूत्रे
  - आविष्काररीती
  - जीवनदृष्टी
  - मूल्ये

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव कोणत्या लेखकाच्या कादंबऱ्यात दिसतो ?

(अ) कृष्णराव भालेकर (ब) ना. सी. फडके

(क) शिवाजी सावंत (ड) ह. ना. आपटे

२. वा. म. जोशी यांच्या कादंबरीत कोणाच्या विचाराचा प्रभाव दिसतो ?

(अ) म. फुले (ब) म. गांधी

(क) डॉ. आंबेडकर (ड) वि. दा. सावरकर

३. वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र कोणी मांडले ?

(अ) स्वपन मजुमदार (ब) हॅरॉल्ड ब्लूम

(क) भालचंद्र नेमाडे (ड) वसंत बापट

४. नाट्याचार्य खाडिलकर यांच्यावरील शेक्सपिअरचा प्रभाव कोणत्या स्वरूपाचा होता ?

(अ) प्रत्यक्ष (ब) अप्रत्यक्ष

(क) अंशिक (ड) पूर्णतः

५. शेक्सपिअरच्या नाटकाच्या रूपांतरानी प्रभावित होऊन निर्मिती प्रेरणा निर्माण होणे हा प्रभावाचा कोणता प्रकार आहे ?

(अ) अप्रत्यक्ष (ब) सीमित

(क) प्रत्यक्ष (ड) धूसर

६. नेमाडे प्रभावातील कादंबरीकार म्हणून कोणाचा उल्लेख करता येईल ?

(अ) प्रवीण बांदेकर (ब) विश्वास पाटील

(क) चंद्रकुमार नलगे (ड) बाबा कदम

७. संत तुकारामाच्या अभंगावर कोणाचा प्रभाव दाखविता येईल ?

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत एकनाथ

(क) दासोपंत (ड) संत कबीर

८. अनेक गुणांनी मिळून संस्कृत महाकाव्याची एक परंपरा तयार झाली होती. तिला वसंत बापट यांनी काय नाव दिले आहे ?

(अ) पांडित्य प्रभाव (ब) संकुल प्रभाव

(क) संस्कृत प्रभाव (ड) प्रभाव

९. 'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन' या ग्रंथाच्या लेखकाचे नाव सांगा.

(अ) वसंत बापट (ब) चंद्रशेखर जहागीरदार

(क) र. बा. मंचरकर (ड) आनंद पाटील

१०. वि. स. खांडेकर यांचा प्रभाव कोणत्या राज्यात आहे ?

(अ) कर्नाटक (ब) गुजरात

(क) तेलगू (ड) मध्यप्रदेश

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. (अ) कृष्णराव भालेकर २. (ब) म. गांधी ३. (ब) हेरॉल्ड ब्लूम

४. (अ) प्रत्यक्ष ५. (अ) अप्रत्यक्ष ६. (अ) प्रवीण बांदेकर

७. (ब) संत कबीर ८. (ब) संकुल प्रभाव ९. (ड) आनंद पाटील

१०. (क) तेलगू

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रभाव अभ्यासाची संकल्पना व स्वरूप सांगा.

२. प्रभाव अभ्यास म्हणजे काय ? ते सांगून वसंत बापट यांनी सुचविलेल्या अभ्यास पद्धतीची चर्चा करा.

**प्र. २ : लघुत्तरी प्रश्न**

१. प्रभाव अभ्यासाची व्याप्ती

२. भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेला प्रभावाभ्यासाचा आराखडा

३. कालखंडीय प्रभावाभ्यास

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. तौलनिक साहित्य : दिशा आणि तत्त्वे (संपा.) चंद्रशेखर जहागिरदार, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२.

२. शोध शेक्सपिअरचा : वि. वा. शिरवाडकर, सुपर्ण प्रकाशन, पुणे १९८३

३. टीका स्वयंवर : भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

४. तौलनिक साहित्य : वसंत बापट, मौज प्रकाशन गृह, पुणे १९८१.

५. मराठी नाटकावरील इंग्रजी प्रभाव : आनंद पाटील, लोकवाङ्मय गृह, मुंबई

६. तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.

## घटक – २

# प्रभाव व अनुकरण


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.४ प्रभाव संकल्पना

- २.४.१ प्रभाव संज्ञेचा अर्थ
- २.४.२ प्रभाव अभ्यास पर्यायी शब्द
- २.४.३ प्रभाव व्याख्या
- २.४.४ प्रभाव समूहातील संज्ञाचे अर्थ
- २.४.५ प्रभावाचे स्वरूप
- २.४.६ साहित्यातील प्रभावाची वाटचाल
- २.४.७ प्रभाव आणि प्रभव अभ्यास भेद
- २.४.८ प्रभावाचे फिरते चक्र
- २.४.९ प्रभावाची कारणे
- २.४.१० प्रभावाची वैशिष्ट्ये

२.५ अनुकरण संकल्पना

- २.५.१ अनुकरण व्याख्या
- २.५.२ अनुकरणाचे स्वरूप
- २.५.३ साहित्यातील अनुकरण परंपरा
- २.५.४ अनुकरण आणि वाङ्मयचौर्य सहसंबंध
- २.५.५ अनुकरणाची वैशिष्ट्ये
- २.५.६ प्रभाव आणि अनुकरण भेद

२.७ समारोप

२.८ स्वाध्याय

२.९ सरावासाठी स्वाध्याय

२.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

२.११ पूरक वाचनासाठी पुस्तके

## २.१ उद्दिष्टे

तौलनिक साहित्याभ्यासात प्रभाव अभ्यास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अनेक अभ्यासकांनी तर प्रभावाचा अभ्यास म्हणजेच तौलनिक अभ्यास असे मानले आहे. लोकप्रिय साहित्याचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती विश्वातील सर्व साहित्यात, भाषेत दिसून येते. प्रभाव समूहात भाषांतर, रूपांतर, उसनवारी, नक्कल, कलम, वाङ्मय चौर्य, आंतरसंहितात्मकता इत्यादी प्रमाणेच अनुकरण ही एक महत्त्वाची संज्ञा, स्तर आहे. या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणाला

- प्रभावाची संकल्पना स्पष्ट करता येईल.
- अनुकरण संकल्पना विशद करता येईल.
- प्रभाव आणि अनुकरण यांच्यातील भेद लक्षात घेता येईल.

## २.२ प्रास्ताविक

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याची अभ्यासाची एक नवी शाखा आहे. साहित्याची एक स्वतंत्र शाखा म्हणून त्यास अभ्यासकांनी मान्यता दिली आहे. प्रभाव अभ्यास ही तौलनिक साहित्याभ्यासाची महत्त्वाची अभ्यासशाखा आहे. प्रभाव हे तौलनिक साहित्याभ्यासाचे प्रमुख घटकतत्त्वही आहे. तसेच प्रभाव हा अनुकरण, भाषांतर, रूपांतर, ठसा, परिणाम, कलम, वाङ्मय चौर्य इत्यादी अनेक घटकांच्या समूहातून बनलेला असतो. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील विविध साहित्यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास हे प्रभाव अभ्यासाचे महत्त्वाचे प्रयोजन आहे. प्रभाव अभ्यासाची सुरुवात युरोपमध्ये झाली. पुढे तिचा अन्य देशांनी महत्त्वाची ज्ञानशाखा म्हणून स्वीकार केला. भारतामध्ये विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय समाजाला तौलनिक साहित्याभ्यास महत्त्वाचा व उपयुक्त असल्याचे सांगितले. या अभ्यासाला गती देण्यासाठी ‘विश्व भारती’ या संस्थेची स्थापना केली आणि विश्वसाहित्य या संकल्पनेचा पुरस्कार केला. मराठी साहित्यावर १९व्या शतकापासून संस्कृत, प्राकृत, हिंदी, कन्नड, गुजराती, पारसी, बंगाली, इंग्रजी इत्यादी भाषांचा प्रभाव पडलेला दिसतो. निबंध, कथा, कादंबरी, कविता, नाटक या वाङ्मयाची निर्मितीही प्रभावातूनच झालेली आहे. असा हा प्रभाव अभ्यास खूप महत्त्वाचा मानला जातो.

प्रभाव समूहात अनुकरणास विशेष महत्त्व आहे. प्रतिभावंत कवी-लेखकांच्या साहित्यकृतीचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती जगभर दिसून येते. लोकप्रिय आणि यशप्राप्त कलाकृतींचे अनुकरणही सर्वत्र होत असते. अर्थप्राप्ती, प्रतिष्ठा आदी प्रयोजने ठेवून अनुकरण केले जाते. भारतात इंग्रज काळात ब्रिटिशांनी अनुकरणास प्रोत्साहन दिल्याचे दिसते. मराठी साहित्यात नाटक आणि कादंबऱ्यात इंग्रजी साहित्याचे अनुकरण झाले आहे. ही अनुकरणाची परंपरा आजही सुरू आहे.

प्रभाव आणि अनुकरण यामध्ये भेद असले तरी दोहोंचा अनन्यसंबंध असलेला दिसतो. प्रभाव संबंध हा अनुकरणाने सुरू होतो. नंतर तो स्वागत प्रक्रियेतून एक तर एकरूपता किंवा अलगता दाखवत पुढे सरकतो. प्रभाव आणि अनुकरण यांच्यात साहित्य, संस्कृती आदी पातळीवर भेद आढळतो. प्रस्तुत घटकात प्रभाव आणि अनुकरणाची संकल्पना तसेच प्रभाव आणि अनुकरणातील भेद याचा आढावा घेणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

तौलनिक साहित्याभ्यासाची प्रभाव अभ्यास ही वैशिष्ट्यपूर्ण अशी उपयोजित ज्ञानशाखा आहे. जगात जिथे जिथे तौलनिक साहित्याभ्यास केला जातो तिथे प्रभावाभ्यासास विशेष महत्त्व दिले जाते. मराठी साहित्यात प्रभाव अभ्यास ही उपयुक्त अशी ज्ञानशाखा आहे. प्रभाव हे तौलनिक साहित्याभ्यासाचे प्रमुख घटकत्व आहे. या घटकतत्त्वात अनुकरणासही तेवढेच महत्त्व आहे. तौलनिक साहित्याभ्यासात किंबहुना प्रभाव अभ्यासात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संबंध हा गाभा आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संबंधाचा, संस्कृतीचा अभ्यास करताना तुलनाकारांनी अनुकरण, भाषांतर, रूपांतर, उसनवारी, नक्कल, कलम, वाङ्मय चौर्य, ठसा, प्रतिकार मीमांसा, आंतरसंहिता इत्यादी अनेक संज्ञा वापरल्या आहेत. या संज्ञा एका अर्थाच्या असून त्यामध्ये फारच थोडी पुसट सीमारेषा आहे. त्यामुळे या सर्व संज्ञांचा अभ्यास प्रभावाभ्यास अंतर्गत करावा लागतो. या घटकांमध्ये प्रभाव आणि अनुकरण या संज्ञांचा अभ्यास करावयाचा आहे.

## २.४ प्रभाव संकल्पना

प्रभाव ही संकल्पना भारतीय साहित्यात पाश्चात्य देशातून आली आहे. या संकल्पनेचा भारतीय साहित्य चळवळ, संस्कृती, समाज इत्यादींवर फार मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. प्रभावातूनच साहित्यप्रवाह, सामाजिक चळवळी आदींमध्ये नवे बदल व परिवर्तन झालेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर काळातील प्रभावाचे स्वरूप काळानुसार बदललेले दिसते. त्यांची कारणेही त्या त्या प्रभावानुसार वेगवेगळी आहेत. प्रभावाचे सौंदर्यशास्त्र, महत्त्व आणि विशेषही उल्लेखनीय आहेत. प्रभावात अनेक दोषही दिसून येतात. प्रभाव संकल्पनेचे हे फिरते चक्र पाश्चात्त्य देशापासून महाराष्ट्रापर्यंत तसेच परकीय भाषांपासून मराठी बोलीपर्यंत पूर्वीपासून आतापर्यंत सुरूच आहे आणि पुढे सुरूच राहणार आहे. अभ्यासकांनी प्रभावातील हे बदल नवीन संदर्भ आपापल्या दृष्टिकोणातून मांडण्याची गरज आहे. प्रभावाची संकल्पना विचारात घेताना आपणास पुढील अनेक घटकांचा विचार करावा लागतो.

### २.४.१ प्रभाव संज्ञेचा अर्थ

प्रभाव या शब्दाचे अर्थ वेगवेगळ्या शब्दसंग्रह व शब्दकोशामध्ये दिलेले आहेत.

१. वा. गो. आपटे : 'शब्दरत्नाकर', प्रभाव म्हणजे तेज, सामर्थ्य, पराक्रम.

२. प्रल्हाद जोशी : प्रभाव म्हणजे ऐश्वर्य, वैभव, सामर्थ्य.

३. भाटवडेकर : ऐश्वर्य, तेज, वैभव, सामर्थ्य, असर, छाप, दबाव, परिणाम, वर्चस्व.

४. प्रभाव या शब्दाची व्युत्पत्ती चंद्र-ताऱ्यांच्या मानवी जीवनावर पडणाऱ्या गूढ प्रभावाशीही सांगितली जाते.

५. ईस्ताईफ यांनी प्रभाव संकल्पनेला पर्याय म्हणून 'स्फूर्ती' (Inspiration) ही संकल्पना मांडली. विशिष्ट ठिकाणी स्वतःचा व परका यांचा संघर्ष/टक्कर झाल्यानंतर ज्या बदलांची स्फूर्ती मिळते त्या बदलांचा अभ्यास करणे हे तुलनाकारांचे अवघड काम आहे. त्यामुळे स्फूर्तीची संकल्पना अभ्यासकांना पुरेशी स्पष्ट वाटत नाही.

६. आज प्रभाव ही संकल्पना शब्द सर्वत्र वापरला जातो. रेल्वे स्टेशन, हॉटेल वगैरे सार्वजनिक ठिकाणी, व्यवहारात सहजच शब्दप्रयोग वापरला जातो. परंतु साहित्यात मात्र प्रभाव शब्दास समीक्षात्मक आणि तौलनिक दृष्टीने मूल्य आहे हे निश्चित.

७. प्रभाव म्हणजे वजन टाकणे, प्रभावित करणे, दाब टाकणे परिणाम करणे.

याप्रकारे प्रभाव शब्दाचे अर्थ व्यापक प्रमाणात सांगितले आहेत. साहित्याच्या अंगाने प्रभाव या शब्दाचा अर्थ छाप, असर, परिणाम, तेज असा घेता येतो. अभ्यासकांनी साहित्य, संस्कृती, चळवळ, राजकारण इत्यादींवर पडलेल्या प्रभावाचा अर्थ काळ, घटना, प्रसंगानुरूप वेगवेगळा सांगितला आहे. आपणही प्रभावाचा अर्थ व्यवहारामध्ये संदर्भानुरूप बदलत असतो. हा शब्दप्रयोग प्रत्येकजण नियमित वापरतो हे मात्र निश्चित.

### २.४.२ प्रभाव अभ्यास पर्यायी शब्द

१. प्रभाव अभ्यास ही तौलनिक साहित्याभ्यासाची महत्त्वाची अभ्यासशाखा आहे. तौलनिक साहित्याभ्यासात प्रभाव अभ्यासाचे एवढे महत्त्व आहे की अभ्यासक प्रभावाचा अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय असे मानतात.

२. काही अभ्यासकांनी प्रभाव अभ्यासक्रम उपयोजित तौलनिक साहित्याभ्यासात असेही म्हटले आहे.

३. फ्रेंचमधील तौलनिक साहित्याभ्यास 'पॅरिस स्कूल' म्हणून ओळखला जातो. 'पॅरिस स्कूल' प्रामुख्याने प्रभावाभ्यासासाठी प्रसिद्ध आहे. त्यास 'डॉक्युमेंटरी स्कूल' असेही म्हटले जाते.

४. काही अभ्यासकांनी प्रभाव अभ्यासास तौलनिक साहित्याभ्यासाचे अपत्य मानले आहे. या प्रभाव अभ्यासांतर्गतच प्रभावाचा अभ्यास केला जातो. प्रभाव संकल्पनेत व्याख्याही महत्त्वाच्या ठरतात.

### २.४.३ प्रभाव व्याख्या

प्रभावाच्या पाश्चात्य आणि मराठी अभ्यासकांनी व्याख्या केलेल्या आहेत. यावरून प्रभाव संकल्पनेचे स्वरूप, वैशिष्ट्ये लक्षात येणेस मदत होईल. त्यातील काही अभ्यासकांच्या व्याख्यांचा इथे विचार करूया.

१. प्रभाव म्हणजे एखाद्या साहित्यिकाचा, साहित्यकृतीचा, तत्त्वज्ञानाचा स्वभाषक किंवा परभाषक साहित्य परंपरेतील एका किंवा अनेक साहित्यिकांच्या मनःपिंडावर व पर्यायाने त्यांनी निर्माण केलल्या साहित्यकृतींवर पडलेला वाङ्मयीन दाब होय.''

२. व्ही. सच्चितानंदन : ''एखाद्या लेखकाचा स्वतःचा कलात्मक विकास किंवा त्यांची वाङ्मयीन परंपरा जे स्पष्ट करू शकत नाही, ते जे काही देशी लेखकांच्या साहित्यकृतीत सापडते त्याला प्रभाव म्हणतात.''

३. जोसेफ टी. शॉ : ''लेखकाचा व्यक्तिगत विकास किंवा त्याची देशी वाङ्मयीन परंपरा त्याचा ललित साहित्यकृतीवर अथवा त्याच्यावर झालेला परिणाम स्पष्ट करू शकत नाही हे बाहेरून आलेले जे काही असे ते जेव्हा प्रात्यक्षिकाने दाखविता येते. तेव्हा त्या लेखकांवर विदेशी साहित्यिकांचा प्रभाव पडला असे समजले जाते.''

४. हॉस्केल ब्लॉक : ''.............बऱ्याच वेळा वाङ्मयीन प्रभाव निमित्त मात्र आणि प्रासंगिक असतात पण हेही खरे की नंतरच्या कलात्मक सर्जनक्रियेला दिशा आणि आकार देण्यात ते प्रभावीपणे कार्यरत असतात.''

### २.४.४ प्रभाव समूहातील संज्ञांचे अर्थ

एखाद्या व्यक्ती, साहित्यकृती, चळवळ इत्यादींचा प्रभाव ज्यावेळी व्यक्ती किंवा समाजावर पडतो तेव्हा पडलेला प्रभाव हा विशिष्ट असा एकटा नसतो. प्रभावाचे एक जाळे असते. या जाळ्यात समान धागे गुंफलेले असतात. प्रभाव हा एकटा येत नाही किंवा पडत नाही. तो समूहाने येतो. प्रभाव समूहात अनुकरण, भाषांतर, रूपांतर, उसनवारी, नक्कल, कलम, ठसा, खोटा प्रभाव, गर्भपतीत प्रभाव, वाङ्मय चौर्य, प्रतिकारमीमांसा (अतिवाङ्मय चौर्य) आंतरसंहितात्मकता इत्यादी अनेक प्रकारच्या संज्ञांचा समावेश होतो. या सर्व संज्ञामधील अर्थाच्या सीमारेषा फारच पुसट आहेत. त्या सर्व संज्ञा समनार्थी नाहीत पण एकाच वर्तुळात सामावणारी व एकमेकांनी छेदणारी वर्तुळे म्हणता येईल. प्रभाव समूहातील विविध संज्ञांचे अर्थ डॉ. तातोबा बदामे यांनी 'प्रभाव अभ्यास : आकलन आणि विश्लेषण' या शोधनिबंधात पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

**१. अनुकरण** : प्रसिद्ध लेखक, समाजसुधारक यांचे विचार तसेच साहित्यकृती यांचे अनुकरण जगात सर्वत्र होत असते. प्रभाव प्रक्षेपक व प्रभाव स्वीकारक कलाकृतीतील अनुबंध एकास एक जुळणे तसेच त्याची चिकित्सा होणे अनुकरणात महत्त्वाचे असते.

**२. भाषांतर** : एका भाषा साहित्यातील कलाकृतीतील कलाद्रव्य दुसऱ्या भाषा साहित्यात नेले जाते. या प्रक्रियेस भाषांतर म्हणतात. परभाषिक कलाकृतीने प्रभावित होऊन हे भाषांतर केले जाते.

**३. रूपांतर** : भाषांतराच्या अनेक प्रकारांपैकी एक रूपांतर कला सर्जनाच्या पातळीवर गेले की रूपांतराच्या शक्यता निर्माण होतात. मूळ संहितेचे रूप बदलून प्रभाव स्वीकारक स्वभाषा-संस्कृती परंपरेप्रमाणे नवे रूप घडवितो. तेव्हा रूपांतर होते.

**४. ठसा** : प्रभाव प्रक्षेपक हा साहित्यिकांची छाप प्रभाव स्वीकारकाने पाडून घेऊन, ती आपल्या कलाकृतीमधून आविष्कृत केल्यास अशा प्रकारच्या प्रभावास ठसा असे म्हणता येईल.

**५. परिणाम** : प्रभाव प्रक्षेपक जेव्हा वरच्या कलाकृतीच्या वाचनाने प्रभावित होतो तेव्हा त्याच्या मनःपटलावर व बऱ्यापैकी परिणाम झालेला असतो. या परिणामातूनच त्याची कलाकृती जन्म घेते.

**६. खोटा प्रभाव** : बऱ्याच वेळा साहित्यिक मुलाखत देताना किंवा अनुभव कथन करताना आपल्यावर कोणाकोणाचा प्रभाव आहे ते सांगतात. परंतु स्वीकारकाची संहिता तपासली असता नेमका प्रभाव दाखविता येत नाही. अशा प्रभावाला खोटा प्रभाव म्हणता येईल.

**७. गर्भपतीत प्रभाव** : प्रभाव प्रक्षेपकाच्या कलाकृतीतील कलामूल्यांचे स्वीकारक कलावंताच्या मनात अर्धवट बीजधारणा झाल्यास स्वीकारच्या कलाकृतीत नेमका प्रभाव उरत नाही. अशा प्रकारच्या प्रभावास गर्भपतीत प्रभाव असे म्हणतात.

**८. नक्कल** : जेव्हा प्रभाव प्रक्षेपक कलाकृती स्वीकारकाकडून हुबेहूब सांधेजोड केली जाते तेव्हा त्या प्रभावास नक्कल असे म्हणतात.

**९. कलम** : कलम ही मूळ वनस्पतीशास्त्रातील संकल्पना आहे. एका जातीतील वनस्पतीवर दुसऱ्या जातीच्या वनस्पतीचे कलम केले जाते. साहित्यशास्त्रात ही संज्ञा झॅक देरिदा यांनी सर्वप्रथम वापरली. मराठी प्रभाव अभ्यासात डॉ. आनंद पाटील यांनी 'मराठी नाटकातील इंग्रजी प्रभाव' या त्यांच्या संशोधनात कलम संशोधनेचा वापर केला आहे. या संकल्पनेतून प्रभाव नेमकेपणाने शोधता येतो.

**१०. वाङ्मयचौर्य** : वाङ्मयचौर्य म्हणजे मूळ लेखकाचा नामोल्लेख टाळून वाङ्मयाचा उपयोग करणे होय. प्रभाव अभ्यासात अशा प्रकारचे वाङ्मयचौर्य शोधून काढले जाते. साहित्यकृतीचे मूळ शोधताना वाङ्मयचौर्य सापडण्याच्या शक्यता निर्माण होतात.

**११. उसनवारी** : व्यवहारात उसनवारी हा शब्द आपल्याकडे एखादी नसलेली वस्तू दुसऱ्याकडून परतफेडीच्या वायद्यावर मागून घेणे या अर्थाने वापरला जातो. साहित्यात परतफेडीचा वायदा नसतो. या परंपरेत नसणाऱ्या साहित्यिक, वाङ्मयीन तंत्राची, आशयसूत्रांची कल्पनाबीजांची उसनवारी परक्या साहित्यातून केले जाते त्यास उसनवारी असे म्हणतात.

**१२. प्रतिकारमीमांसा** : या संज्ञेस अतिवाङ्मयचौर्य असेही म्हणतात. परक्या वाङ्मयास अथवा परक्या सत्तेस विरोध करण्यासाठी प्रतिकारवादी साहित्यनिर्मिती केली जाते. परक्या वाङ्मयकृतीचे विरूपीकरण अथवा विडंबन येथे अपेक्षित असते. या प्रतिकाराच्या उद्देशाने केलेल्या विडंबन प्रतिकारमीमांसा अथवा अतिवाङ्मयचौर्य असेही म्हटले जाते.

**१३. आंतरसंहितात्मकता** : लेखकाने लिहिलेल्या साहित्यकृतीत पूर्व संहितांमधील उद्‌धृते, प्रतिमा, प्रतिके, वैशिष्ट्यपूर्ण कल्पना, संकेत, म्हणी, वाक्‌प्रचार, शैली, वैशिष्ट्ये, आविष्काररूपे इत्यादी घटक आढळून येतात. उद्‌धृतांच्या संदर्भासह उल्लेख काही लेखक करतात. परंतु वरील पैकी अनेक घटक इतर संहितांमधील असूनही त्यांच्या मूळ आधाराचा उल्लेख केला जात नाही. ती अवतरणानंतर टाकली जात नाहीत. वाङ्‌मय विश्वातील या वाङ्‌मयीन उचलेगिरीला आंतरसंहितात्मकता असे म्हटले जाते. प्रभावात असे घटक अंतर्भूत असतात. या सर्व घटकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव हा व्यक्ती-साहित्यकृतीवर पडत असतो. या सर्व संज्ञांच्या दृष्टीने प्रभाव संकल्पना विचारात घेणे गरजेचे आहे.

### २.४.५ प्रभावाचे स्वरूप

प्रभाव शब्दाचा अर्थ, प्रभावित करणे, छाप पाडणे, पराक्रम करणे, दाब टाकणे, वर्चस्व गाजविणे अशा प्रकारे सांगितला जातो. तौलनिक साहित्याभ्यासात प्रभाव अभ्यास महत्त्वपूर्ण मानला जातो. इंग्रजी साहित्याचे प्रसिद्ध कवी व समीक्षक कोलरिज यांनी प्रभाव शब्द वाङ्‌मयासंदर्भात वापरला आणि तो शब्द अभ्यासकांनी स्वीकारला. प्रभाव हा एकटा पडत नसून तो समूहाने पडत असतो. प्रभावाच्या संबंधित अनुकरण, भाषांतर, रूपांतर, ठसा, परिणाम, खोटा प्रभाव, गर्भपतीत प्रभाव, कलम, वाङ्‌मयचौर्य, उसनवारी, प्रतिकार, मीमांसा, आंतरसंहितात्मकता अशा संज्ञा समूह प्रवाहाशी संबंधित आहेत. प्रभाव हा वाङ्‌मय, यंत्राधिष्ठित कला, समाजमाध्यमे, इंटरनेट अशा अनेक माध्यमांतून व्यक्ती वा समाजापर्यंत पोहचत असतो. ज्याचा प्रभाव पडतो त्याला प्रभाव प्रक्षेपक असे म्हणतात. ज्याच्यावर प्रभाव पडतो त्याला प्रभाव स्वीकारक असे म्हणतात. ज्यावेळी एकाचा दुसऱ्यावर प्रभाव पडतो त्यावेळी त्या दोहोंत कोणतेतरी समानतत्त्व अंतर्भूत झालेले असते. प्रभाव हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षही असू शकतो. ज्याचा प्रभाव पडतो तो श्रेष्ठ व ज्याच्यावर पडतो तो कनिष्ठ ही सामान्य व्यवहारातील धारणा तौलनिक साहित्याभ्यासाला मान्य नाही.

प्रभावाचे स्वरूप हे वेगवेगळे असते. राजकीय सत्तांतर धर्मप्रसार यामुळे होणारा सांस्कृतिक संघर्ष व संकर विविध नैसर्गिक आपत्तीचा अनेक कारणांनी दुसऱ्यावर प्रभाव पडतो आणि यातूनच भाषांतर, रूपांतर, अनुकरण, उसनवारी, नक्कल अशा प्रकारचा प्रभाव सर्वत्र पसरू शकतो. प्रभाव हा समाजात पडत असताना जसाच्या तसा पडत नाही तर त्यामुळेच काळ, धर्म, संस्कृती, समाजरचना, सत्ता, राजकारण आदींचा प्रभाव पडतो व त्यानुरूप प्रभावामध्ये बदल होतो आणि मग तो समाजात रूढ होतो. सर्व क्षेत्रातील प्रभावाचा विचार करता प्रभावाचे स्वरूप आपणाला पुढील प्रकारात सांगता येईल.

**(अ) मौखिक परंपरेतील प्रभाव** : व्यक्ती वा समाजात येणारा प्रभाव हा मौखिक परंपरेतही येत असतो. एका समाज, संस्कृती, प्रांतातील असलेला प्रभाव हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने येत असतो. या प्रभावात काळानुरूप बदल होतात पण ठराविक स्वरूप वैशिष्ट्ये असणारा प्रभाव हा पुढे चालत आलेला दिसतो. पूर्व युरोपातील तुलनाकारांनी साहित्यातील प्रभाव आणि मौखिक परंपरेच्या विकासाच्या शोधावर भर दिलेला आढळतो. त्यांनी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कोणता मौखिक प्रभाव पडला याचाही शोध घेतलेला दिसतो.

माडिया भाषिकांवर पर्यावरणाचा प्रभाव आहे हा आदिवासी समाज घनदाट जंगलात वास्तव्य करतो. जंगलातील निसर्गातील घटनांचा त्यांच्या जीवनावर एवढा प्रभाव पडलेला आहे की त्यांच्या लोककथा, लोकगीते यामध्ये पर्यावरणाचा व तेथील सौंदर्य बदलाचे चित्रण स्पष्टपणे घडते. जगातील लोकसाहित्याच्या कथा या समान आशय, धागा, केंद्र ठेवून अनेक राष्ट्रात पसरत असतात. मौखिक परंपरेतील प्रभाव हा साहित्य, संस्कृती, रूढी-परंपरा, मूल्ये अशा कोणत्याही स्वरूपाचा असू शकतो. एखाद्या व्यक्ती-समाजावर मौखिक प्रभाव कोणता आणि कसा पडला हे त्रोटकपणे सांगता येते पण पडलेल्या प्रभावाने व्यक्ती समाजाचे अंतर्बाह्य स्वरूप बदललेले दिसते. व्यक्ती व समाजाच्या जीवनात मौखिक परंपरेतील प्रभाव महत्त्वपूर्ण ठरत असतो.

**(ब) व्यक्तिनिर्मित प्रभाव** : प्रभाव अभ्यासात व्यक्तिकेंद्री प्रभावही महत्त्वाचा मानला जातो. प्रभाव पाडणारा व्यक्ती हा एखादा नेता, समाजसुधारक, कलावंत, साहित्यिक असू शकतो. सदर व्यक्तीच्या कलेचा, विचारांचा प्रभाव समाजजीवन, साहित्य चळवळ, संघटना आदींवर पडत असतो. एखाद्या कवी किंवा साहित्यिकाची कलाकृती लोकमान्य झाली की त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसून येते. आधुनिक मराठी साहित्यावर तसेच समाजमनावर महात्मा फुले, कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आदींच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. शेक्सपिअर, इलिअट, मोलियर, शेली या परकीय विचार-वंतांच्या विचारांचा प्रभाव आजही साहित्यात व समाजात असलेला दिसतो. महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा सामाजिक, राजकीय आदी चळवळींवरही प्रभाव पडलेला दिसतो. १९२० नंतरच्या समाजजीवनावर, सामाजिक आंदोलनावर महात्मा गांधी यांच्या तत्त्वज्ञानाचा व विचारांचा प्रभाव दिसतो. छ. शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव सर्व क्षेत्रात आजही टिकून आहे. याप्रमाणे व्यक्तिकेंद्री प्रभावाचे स्वरूप दिसून येते.

**(क) समाजनिर्मित प्रभाव** : मानव हा समाजशील असल्याने समाजातील संस्कृती, परंपरा, चालीरिती आदींचा प्रभाव व्यक्तीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पडत असतो. व्यक्ती ही एक असली तरी त्या व्यक्तीचा समाजातील प्रत्येक घटकांशी संबंध येत असतो. समाजातील घडामोडींचा कळत-नकळत प्रभाव प्रत्येकावर पडलेला असतो. समाजातील रोजच्या जगण्यातील ताण-तणाव, सुख-दुःख, निसर्ग, सौंदर्य, राजकारण, सण-उत्सव आदी घडामोडींचा व्यक्ती साक्षीदार असतो. त्या सर्वांचा समाजाकडून व्यक्तीकडे प्रभाव पडत असतो. एकूणच समाजनिर्मित प्रभाव महत्त्वाचा ठरत असतो.

**(ड) साहित्यनिर्मित प्रभाव** : जगात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक असे कोणतेही क्षेत्र असो प्रत्येक क्षेत्रात साहित्यिकांचा त्या क्षेत्रातील विचारवंतांचा प्रभाव पडलेला दिसतो. हा प्रभाव साहित्य, साहित्यिक, साहित्य चळवळ, उपक्रम अशा विविध पातळीवरच असतो. गांधीवाद, मार्क्सवाद अशी अनेक उदाहरणे साहित्यनिर्मित प्रभावाची सांगता येतील. अनेकजण व्यवहारात व सार्वजनिक जीवनात साहित्यिकांची, त्यांच्या साहित्याचे दाखले देत समाजात आदर्शवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. या सर्व बाबी विचारात घेता साहित्यनिर्मित प्रभाव किती महत्त्वपूर्ण आहे हे समजते.

**(इ) संप्रदाय-चळवळ निर्मित प्रभाव** : व्यक्ती असो वा समाज, प्रत्येकावर कोणत्या ना कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा चळवळीचा अगर संप्रदायाचा प्रभाव असतो. समाजातील अनेक चळवळ व संप्रदायाचा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रभाव समाजात पडत असतो. त्याचे अस्तित्व आपणाला वेळोवेळी जाणवते. महानुभाव, वारकरी आदी संप्रदायाचा प्रभाव आजही टिकून आहे. आंबेडकरी, मार्क्सवादी, सत्यशोधकी चळवळीचा प्रभाव, प्रत्येक क्षेत्रात आजही दिसतो. साहित्यक्षेत्रातील ग्रामीण, दलित आदिवासी आदी साहित्य प्रवाहांचा प्रभाव समाजात पडलेला दिसतो. सामाजिक आंदोलनावर, मोर्चावर महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. कोणतीही चळवळ, संप्रदाय असो वा अन्य संघटना त्यांचा प्रभाव कमी-अधिक प्रमाणात समाजात असतोच.

**२.४.६ साहित्यातील प्रभावाची वाटचाल**

साहित्यातील प्रभाव हा समाजजीवनावर चिरंतनपणे पडत असतो. त्याचे परिणामही सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य आदी जीवनावर स्पष्टपणे जाणवतात. सर्वसाधारणपणे साहित्यातील प्रभावाच्या वाटचालीचे पुढीलप्रमाणे टप्पे करता येतील आणि त्यातून साहित्यिक प्रभावाचा इतिहासही समोर येईल.

**(अ) जागतिक पातळीवरील साहित्याचा भारतीय साहित्यावर प्रभाव** : जगातील विविध देशातील साहित्याचा प्रभाव भारतीयांवर झालेला दिसतो. भारतीय साहित्यिक, समीक्षक व समाजामध्ये हा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. शेक्सपिअर, मोल्येर, शेली, इब्सेन, ईलियट यांचा प्रभाव भारतीय लेखकावर पडला. रशियातील टॉलस्टॉय, डॉस्टोवस्की, पुल्किन, चेकॉव्ह यांच्या साहित्याचाही प्रभावही भारतीय भाषेतील विविध साहित्यात आढळतो. जर्मनीतील हेमिंग्वे या लेखकाचा प्रभाव सर्व जगभर पडलेला दिसतो. ग्रीक ट्रॅजेडी, फ्रेंचमधील वास्तववादी साहित्य, जपानी 'हायकू' कवितांचा प्रभाव जाणवतो. इंग्रजी साहित्याचा प्रभाव तर भारतीय साहित्यावर अधिक जाणवतो. 'रेनॉलस' या कादंबरीकाराला इंग्रजी वाङ्मयात फारशी मान्यता नाही परंतु त्यांचा मराठीतील हरिभाऊ आपटे, नाथमाधव यासारख्या कादंबरीकारांवर मोठा प्रभाव दिसतो. नाटकांमध्ये शेक्सपिअर, जॉर्ज बर्नार्ड शॉ, जाँ आनुई, इब्सेन यांचा ठसा स्पष्टपणे दिसतो. कृ. पां. खाडिलकर, वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकावर शेक्सपिअरचा प्रभाव आहे. कवितांवर वर्डस्वर्थ, शेले, बायरन, मिल्टन, पाऊंड, एलियट, सार्त्र, कामू यांचा प्रभाव दिसतो. इंग्रज भारतात आल्यावर भारतातील सर्व भाषांवर इंग्रजीचा प्रभाव पडला. भारतातील विविध जाती-जमाती, आदिवासी, माडिया बोलीतसुद्धा इंग्रजी प्रभाव पडला आणि मोटार, बेल, सेंटर, प्लँटेशन, गार्ड असे शब्द वापरात असलेले दिसतात.

इराकमधील सुफी संप्रदायातील चिश्तीचा संप्रदायाचा संपूर्ण भारतीय उपखंडावर प्रभाव पडला. साहित्यशास्त्र, भाषाशास्त्र तसेच तौलनिक साहित्यशास्त्रावर ही परकीय भाषांचा प्रभाव आहे. परदेशात शिकलेल्या प्र. के. अत्रे, बा. सी. मर्ढेकर, विश्राम बेडेकर यासारख्या मराठी लेखकांवर इंग्रजीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यांचे साहित्य इंग्रजी प्रभावातील असलेले दिसते. आण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'संगीत सौभद्र' हे नाटक इंग्रजी प्रभावातून लिहिले आहे. भारतीय शब्दकोश, ज्ञानकोश हेही परकीय प्रभावाचा भाग आहे. कधीही

संमत नसणारे विल्यम जोन्स, मॅक्समूल्लर, शिल्लर, कान्ट, हेगेल या लेखकांचा भारतीयांवर ब्रिटिशांपेक्षा जास्त ठसा आहे. लोकसाहित्यातील लोककला, मिथके, गीतांचाही प्रभाव भारतीयांवर दिसतो. जगातील अनेक कथा थोडा फार संदर्भ बदलत भारतात सांगितलेल्या आहेत. याप्रमाणे जगातील सर्व देशातील साहित्यिकांचा, त्यांच्या कलाकृतींचा प्रभाव भारतीयांवर व साहित्यावर प्रभाव पडलेला आहे.

**(ब) भारतीय साहित्याचा परकीय साहित्यावर प्रभाव**

भारतीय साहित्याचा प्रभाव परकीय साहित्यावरही पडलेला दिसतो. त्याचे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. भारतीय उपनिषदांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव जगातील अनेक साहित्यिकांवर पडलेला आहे. भारतातील संत कबीर, संत तुकाराम यांच्या साहित्याचा अमेरिका, ब्रिटन, जपान, रशिया आदी देशात अभ्यास झाला आहे. त्यांच्या रचनांचा प्रभाव सर्वत्र दिसतो. रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याच्या प्रभाव स्पेनवर पडला आहे. त्यातूनच कवी जुआँ, रेआॅ, जिमेन्स यांनी टागोरांच्या काव्याची भाषांतरे केली. जुआँ जिमेंझ यांना स्पॅनिश काव्यनिर्मितीसाठी १९५६ साली नोबेल पुरस्कार मिळाला ठाकूर यांना तो १९१३ मध्ये मिळाला होता. स्पॅनिश लोकांना टागोरांच्या काव्याचे वेड होते. फ्रेंच कवी मालार्मेच्या काव्यात हिंदू मिथकांचा अप्रतिम वापर झाला आहे. अशाप्रकारे भारतीय साहित्याचाही प्रभाव परकीय साहित्यावर पडलेला दिसतो आणि हा प्रभाव कमी-जास्त प्रमाणात आजही टिकून आहे.

**(क) मराठी साहित्यातील प्रभाव**

भारतीय साहित्याचा विचार करता मराठी साहित्याचा इतर भाषेवर तसेच इतर भाषेचा मराठी साहित्यावर प्रभाव ठळकपणे दिसतो. हा प्रभाव पुढील चार प्रकारात सांगता येईल.

**१. वाङ्मय प्रकारावरील प्रभाव** : आधुनिक मराठी साहित्यावर महात्मा फुले, कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा, चळवळीचा प्रभाव जास्त आढळतो. या प्रवाहांतर्गत वेगवेगळे जातीसमूह, ग्रामीण दलित, स्त्रीवादी, आदिवासी असे प्रवाह व वाङ्मयाचे प्रकारही निर्माण झालेले आढळतात. म. फुले यांच्या विचारांचा प्रभाव ब्राह्मणेतर समाजावर झाला. पुढे शाहू-फुले-आंबेडकरवादी विचारधारा समाजात प्रभावातून निर्माण झालेली दिसते. आज सर्वच क्षेत्रात ही विचारधारा घेऊनच कार्य चालत असलेले दिसते. वाङ्मय प्रकारावरील प्रभावात अनेक विचारवंत, साहित्यिक यांचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. रणजित देसाई, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, कुसुमाग्रज यासारख्या लेखकांचा प्रभाव मराठी वाचकांवर आजही टिकून आहे.

**२. अन्य भाषिक स्तरावरील प्रभाव** : प्रारंभीच्या काळात मराठी भाषेवर संस्कृत भाषेचा प्रभाव पडलेला होता. म्हणून तर मराठीतील साहित्यनिर्मितीतही संस्कृतमधील अनेक ग्रंथांचे संदर्भ, अनुवाद आलेले आढळतात. फडके-खांडेकर यांच्या कथा-कादंबऱ्यांचा प्रभाव मराठी भाषिकांपेक्षा इतर भाषिक क्षेत्रात अधिक प्रमाणात पडलेला दिसतो. मराठी साहित्य आणि संस्कृत, प्राकृत, हिंदी, कन्नड, गुजराती, फारसी, बंगाली व अन्य भाषिक साहित्य यांच्या परस्परांवर प्रभाव दिसून येतो. या प्रभावातूनच निबंध, कथा, कादंबरी, कविता,

नाटक अशा वाङ्मय प्रकाराची निर्मिती झालेली दिसते. यादवकाळात मराठीचा द्राविडी भाषांशी संपर्क होता. या भाषांचा यातून प्रभाव जाणवतो. भारतातील प्रत्येक राज्याच्या सीमाभागात त्या त्या भाषेचा, संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. इंग्रज काळात इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला होता. तो वाढू नये म्हणून इंग्रजी शब्दाऐवजी संस्कृत दर्शविणारे शब्द तयार केले. या शुद्ध चळवळीच्यामुळे मराठीवर संस्कृतचा एवढा प्रभाव पडला की मराठी भाषा तत्कालीन संस्कृतप्रचुर बनली ती या प्रभावामुळेच. याप्रमाणे अन्य भारतीय भाषिकांचाही मराठीवर प्रभाव दिसतो.

**३. मराठीवर चळवळीचा प्रभाव** : मराठी साहित्य आणि चळवळ यांचा अन्योन्य संबंध आहे. चळवळीचा प्रभावातूनच मराठी साहित्याची निर्मिती झालेली दिसून येते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा समाज मनावर जसा प्रभाव झाला तसाच तो मराठी साहित्यावरही झाला. त्यातूनच सत्यशोधकी साहित्य निर्माण झाले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य चळवळीचा प्रभाव त्या त्या साहित्य प्रकारावर पडलेला दिसतो. मार्क्सवादी व आंबेडकरवादी विचारांच्या चळवळीचा दलित साहित्यावर मोठा प्रभाव आढळतो. विविध प्रकारच्या साहित्याची निर्मिती ही चळवळीतून आकाराला आलेली दिसते.

**४. समाजसुधारकांचा प्रभाव** : महाराष्ट्रामध्ये शाहू-फुले-आंबेडकर, महात्मा गांधी, आगरकर, टिळक, महर्षी कर्वे आदी समाजसुधारकांचा आणि त्यांच्या चळवळीचा प्रभाव आजही टिकून आहे. या चळवळीच्या विचारधारेतून, प्रभावातूनच कविता, लेख, निबंध, कथा, कादंबरी, नाटक आदी साहित्य प्रकाराची निर्मिती झालेली आहे. महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा व कार्याचा प्रभाव महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांच्यावर, साहित्यावर झालेला दिसतो. प्रारंभीच्या काळात पाश्चात्य विचारवंताचा प्रभावही पडलेला दिसतो. आज आंदोलने व सामाजिक कार्यावर म. फुले, म. गांधी, डॉ. आंबेडकर आदींच्या विचारधारेचा प्रभाव टिकून आहे.

### २.४.७ प्रभाव आणि प्रभव अभ्यास भेद

तौलनिक साहित्याचे अभ्यासक वसंत बापट यांनी प्रभव (Receiption Study) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरला. प्रभव अभ्यासालाच 'उद्‌गम', 'स्वीकार', 'स्वागत' अशी टोपणनावे असलेली दिसतात. 'प्रभाव' व 'प्रभव' या दोन्ही संकल्पना एकमेकास पूरक असलेल्या दिसून येतात. अन्य भाषिक साहित्याचा प्रभाव नवसाहित्यनिर्मितीसाठी अनेक कारक घटकांपैकी एक असू शकतो.

तौलनिक साहित्याभ्यासातील एक महत्त्वाचे घटकतत्त्व म्हणजे प्रभव होय. प्रभव अभ्यासात साहित्य-निर्मितीच्या क्षेत्राचा अभ्यास केला जातो. लेखकाच्या साहित्यनिर्मितीची सर्जक कारणमीमांसा म्हणजे प्रभव अभ्यास होय. या अभ्यासात लेखकाने लेखननिर्मितीसाठी वापरलेल्या कल्पना बीजांचा शोध घेतला जातो. म्हणजेच साहित्यनिर्मितीचे मूळ घटक म्हणजेच प्रभव होय. प्रभव अभ्यासात आशयमुळाखेरीज पूर्वसंहितांचे नूतन अवतार, लोकसाहित्य, ऐतिहासिक घटना-प्रसंग, मिथके, परीकथा, प्राणकथा, मानवनिर्मित युद्धे तसेच नैसर्गिक संकटे, विशिष्ट राजकीय-सामाजिक वातावरण, प्रतिद्वंद्वी साहित्य, मानसशास्त्रीय व गुन्हेगारी

शास्त्रातील ठळक सूत्रे इत्यादींचा अभ्यास केला जातो. एकूणच प्रभाव व प्रभव यामध्ये साहित्यनिर्मितीच्या मूळ घटकांचा अभ्यास होतो.

### २.४.८ प्रभावाचे फिरते चक्र

प्रभाव हा एकाच प्रकारचा कधीही असत नाही. तो समूहाने अनेक प्रकारे व्यक्ती अथवा समाजात पडत असतो. प्रभाव हा प्रत्येक वेळी जाणवतो असेही नाही. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूपात तो रुजत असतो. साहित्य, राजकारण, समाजकारण, धार्मिक अशा कोणत्याही क्षेत्रात व्यक्ती, संघटन, चळवळ आदींचा प्रभाव हा काळानुरूप संदर्भ बदलत समाजात पडत राहतो. प्रभावाची सत्ताकेंद्रे ही वेगवेगळी असतात. काळानुरूप प्रभाव हा कमी जास्त स्वरूपात पडत राहतो. म्हणजेच प्रभावाचे हे फिरते चक्र समाजव्यवस्थेत सुरूच असते. कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर काळ, घटना, प्रसंग, स्थित्यंतरे यानुसार कमीजास्त होईल पण नष्ट होईल असे म्हणता येत नाही. कालानुरूप संदर्भ बदलत प्रभावाचे चक्र फिरत असते हे मात्र नक्की.

### २.४.९ प्रभावाची कारणे

प्रभाव हा वेगवेगळ्या कारणांनी पडत असतो. प्रभावाची क्षेत्रेही वेगवेगळी असतात व ती बदलत असतात. प्रभाव हा सामाजिक, राजकीय, धार्मिक आदी कारणानुसार पडतो. जात, धर्म, राजकारण, नोकरी, उद्योग-धंद्याची ठिकाणे, वसतिस्थान, भौगोलिक परिस्थिती अशी अनेक कारणे सांगता येतात. इंग्रजांच्या भारतातील आगमनामुळे आणि जागतिक जनसंपर्क भाषा इंग्रजी असल्यामुळे आणि जागतिक जनसंपर्क भाषा इंग्रजी असल्यामुळे भारतातील प्रत्येक भाषेवर इंग्रजीचा प्रभाव आहे. सत्ताकेंद्रे हे प्रभाव निर्मितीचे कारण सांगता येते. समाजातील प्रत्येक व्यक्ती ज्या क्षेत्रात सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, वैद्यकीय आदी क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रातील शब्द, वाक्यप्रचाराचा प्रभाव हा वेगवेगळ्या कारणांनी निर्माण होतो व समाजात रूढ होतो.

### २.४.१० प्रभावाची वैशिष्ट्ये

प्रभाव हे तौलनिक साहित्यातील एक महत्त्वाचे तत्त्व आहे. साहित्य निर्मितीचे विविध घटक तपासताना हा प्रभावाभ्यास महत्त्वाचा ठरतो. या प्रभावाची वैशिष्ट्ये ही पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. प्रभाव हे तौलनिक साहित्यशास्त्राचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे.

२. प्रभाव आणि प्रभव यांचा अन्योन्यसंबंध आहे.

३. प्रभावात ज्याचा प्रभाव पडतो तो श्रेष्ठ आणि ज्यांच्यावर प्रभाव पडतो तो कनिष्ठ असा श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नसतो.

४. प्रभाव हा एकटा नसून तो समूहाने व्यक्ती समाजावर पडतो. प्रभावाचे जाळे लक्षात घेऊन त्याचे समानत्व शोधता येते.

५. तौलनिक साहित्याभ्यासाचा प्रभाव अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. काही अभ्यासक तर प्रभावाभ्यास म्हणजेच तौलनिक अभ्यास असेही म्हणतात. एवढे महत्त्व प्रभावाला असलेले दिसून येते.

६. प्रभाव हा जात, समूह, देश, परदेश, साहित्य अशा कोणत्याही टप्प्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा पडू शकतो. तो मर्यादित नसतो.

७. साहित्यात प्रभाव हा आशय, मूल्य, आकृतिबंध, शैली, तंत्र, भाषांतर, रूपांतर, अनुकरण, उसनवारी, नक्कल अशा स्वरूपात पडू शकतो.

८. प्रभाव हा मौखिक, व्यक्ती, समाज, साहित्य, संप्रदाय, चळवळ अशा स्वरूपात असतो.

९. प्रभावाला भाषा, प्रांत असे कोणतेच बंधन असत नाही. तो कोणावरही पडू शकतो.

१०. प्रभाव हा काळानुरूप संदर्भ बदलतो आणि तो कमी जास्त प्रमाणातही दिसून येतो.

११. प्रभाव ही चिरंतन चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्ती किंवा समाजास जे चांगले वाटते त्याचा स्वीकार होतो. नको त्या गोष्टींना नकार मिळतो. त्यामुळे प्रभाव प्रक्रिया सातत्याने सुरू असते.

१२. प्रभाव हा प्रत्यक्ष पडतो असेही नाही, तो प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पडत राहतो. तो कमी जास्त प्रमाणात त्या त्या संदर्भानुसार जाणवत असतो.

१३. समाजसुधारक, साहित्यिक, साहित्यकृती यांचे प्रभाव प्रभावीपणे पडतात आणि ते समाजातून व्यक्तही झालेले दिसतात.

१४. विशिष्ट संप्रदाय चळवळी, संघटना यांचे प्रभाव समाजात टिकून राहतात. ते कमी जास्त होतात पण त्यांचे अस्तित्व मात्र सदैव जाणवत राहते.

१५. विचारवंत, समाजसुधारक, तत्त्ववेत्ते यांचा प्रभाव जागतिक स्तरावर, समाजातील तळागाळापर्यंत पडलेला दिसून येतो. या विचारधारेवर व्यक्ती, समाज आपले तत्त्वज्ञान बनवत राहतो.

१६. जात, धर्म, उद्योग-व्यवसाय, भौगोलिकता आदी कारणांमुळे प्रभाव निर्माण होतो.

१७. प्रभावात सौंदर्यशास्त्र असते. ते सर्वांचे लक्ष वेधून घेते.

१८. प्रभाव पडताना त्यात त्रुटी, अडथळे, गैरसमज निर्माण होऊ शकतात. व्यक्ती व समाजाच्या दृष्टिकोणावर तो प्रभाव कसा स्वीकारायचा हे अवलंबून असते.

१९. प्रभाव प्रसारात भाषांतर, अनुकरण ही महत्त्वाची प्रक्रिया अवस्था असते.

२०. प्रभावमूल्य सौंदर्यात्मक नसून ते मानसशास्त्रीय असते. प्रभाव मूल्यमापन करताना आपण त्याच्या उत्पत्तिकार्याचा निवाडा करण्यात गुंतलेले असतो.

२१. आधुनिक तौलनिक साहित्यशास्त्रात व समीक्षेत प्रभाव संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते.

२२. प्रभाव हा फ्लूसारखा असू शकतो. तो समाजात तसा मिसळू शकतो.

२३. प्रभावाचे एक फिरते चक्र असते. तो एका देश, प्रांत, जात, समूहातून दुसरीकडे फिरत्या चक्राप्रमाणे फिरत राहते.

२४. समानधर्मी प्रवृत्तीमुळेच प्रभाव सर्व राष्ट्रात कमी-जास्त प्रमाणात त्या विचारधारेचा आढळून येतो.

२५. प्रभाव संकल्पनेला पर्याय म्हणून इस्ताईफ यांनी स्फूर्ती (Inspiration) ही संकल्पना मांडली. परंतु ही संकल्पना पुरेशी स्पष्ट नसल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

२६. प्रभाव शब्दाचा अर्थ व्यवहारात चंद्र-ताऱ्यांचा मानवी जीवनावर पडणारा गूढ प्रभाव तसेच हॉटेल, रेल्वे स्टेशन अशा सार्वजनिक ठिकाणीही हा शब्दप्रयोग वापरला जातो. त्यामुळे या शब्दाला सार्वजनिक जीवनात विशेष स्थान असलेले दिसते.

२७. प्रभावाचे क्षेत्र हे खूप मोठे क्षेत्र आहे. मूळ, उगम, मूलाधार या अर्थानेही या क्षेत्राकडे पाहिले जाते.

२८. प्रभावाचे नवनिर्माणक्षम, अनुकरणात्मक, फ्लूसारखे, संयोगित, नकारात्मक, सशक्त, गर्भपतीत, खोटे असे विविध प्रकार करता येतात.

२९. प्रभाव स्वायत्त व मुक्त असतो. तो तरुण लेखकाच्या आज्ञेला बांधील नसतो.

३०. प्रभाव पडतो म्हणजे तो व्यक्तिमत्त्वात मुरतो. तो दृष्टी नियंत्रित करतो आणि तो व्यक्तिमत्त्वाला, घटना-प्रसंगात दिसतो.

३१. प्रभाव संहितेला अपूर्ण अवस्थेत सोडत नाही. वाचकांना प्रभावाचे ज्ञान असेल तर नवीन भर पडत असते.

३२. प्रभाव केंद्रानुवर्ती असतो. कलाकारांच्या संदर्भात त्याच्या भूमिका वेगवेगळ्या असतात. प्रभाव लेखकांवर वर्चस्व गाजवतो. पहिला कुठल्याही रचनाबंधनातील क्लृप्तीसारखा असतो. दुसरा लेखकाने नियंत्रण झुगारले त्यामुळे प्रभाव बऱ्याच वेळा दैवासारखा अपरिवर्तनशील व न थांबता येण्यासारखा असतो.

३३. प्रभावाचे आकलन आपणाला त्या साहित्यकृतीचे व लेखकाचे वाङ्मय परंपरेतील स्थान निश्चित करायला उपयोगी पडते.

३४. प्रभाव हा प्रतिभावंताच्या कल्पनाशक्तीमार्फत संहितेत प्रवेश करतो. प्रभाव जाणीव अंतर्गत प्रभावांचा संघर्ष, साधर्म्य, बलाबल यावर संहितेचे स्वरूप ठरत जाते.

३५. प्रभाव हा आशय, जीवनदृष्टी, शैली इत्यादी अनेक प्रकारचा असू शकतो. प्रभाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असाही असू शकतो.

अशा प्रकारे तौलनिक साहित्याभ्यासात प्रभाव ही महत्त्वपूर्ण अभ्यासशाखा आहे. प्रभावाभ्यासात अनुकरण, रूपांतर, भाषांतर, नक्कल असे अनेक घटक महत्त्वाचे मानले जातात. विविध शब्दकोशात व

अभ्यासकांनी प्रभाव शब्दाचे अर्थ हे वेगवेगळे सांगितले आहेत. प्रभाव ही संकल्पना आज सर्वत्र वापरली जाते. प्रभावाचे स्वरूप मौखिक, व्यक्ती, समाज, साहित्य, संप्रदाय आदी माध्यमातून स्पष्ट करता येतो. साहित्यक्षेत्रात प्रभावाची वाटचाल ही आंतरराष्ट्रीय ते एखादा समूह अशी अनेक टप्प्यात राहिली आहे. प्रभावाचे स्वरूप हे फिरते राहिले असून सामाजिक, धार्मिक अशा अनेक कारणातून प्रभाव निर्माण होतो. चिरंतनता, भेद, स्वायत्त, मुक्त, केंद्रानुवर्ती अशी प्रभावाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. साहित्य, सामाजिक, राजकीय असे क्षेत्र कोणतेही असो प्रभाव हा महत्त्वाचा ठरतो हे निश्चित.

## २.५ अनुकरण संकल्पना

माणूस हा भाषेच्या माध्यमातून मनातील भावभावना, इच्छा-अपेक्षा एकमेकांजवळ व्यक्त करतो. समाजातील विविध स्तरातून मिळालेल्या ज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनात अनुकरण करून अनुभूती घेत असतो. अनुकरणाची ही प्रवृत्ती साहित्य, क्रीडा, सांस्कृतिक आदी क्षेत्रातही आढळते. तौलनिक साहित्याभ्यात प्रभाव अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. तर प्रभाव समूहात उसनवारी, कलम, रूपांतर, भाषांतर याप्रमाणे अनुकरण ही संज्ञाही महत्त्वाची आहे. प्रभावाभ्यासातील अनुकरण संकल्पनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### २.५.१ अनुकरण व्याख्या

१. प्रभाव प्रक्षेपक व प्रभाव स्वीकारक कलाकृतीमधील अनुबंध एकास एक जुळवून चिकित्सा करता येणे शक्य झाले तर अशा संज्ञेस अनुकरण म्हणता येते. मूळ संहितेचा प्रतिध्वनी असेल त्यांचे स्वरूप असल्याने अनुकरण स्पष्टपणे दिसते.

२. एखाद्या प्रतिभावंताचे विचार किंवा साहित्याला समाजात प्रसिद्धी मिळाल्यानंतर ते आपापल्या भाषेत, विचारात वळविणे म्हणजे अनुकरण होय.

### २.५.२ अनुकरणाचे स्वरूप

अनुकरण ही प्रभावाभ्यासातील महत्त्वाची संज्ञा आहे. प्रभाव संबंध हा अनुकरणाने सुरू होतो. एखाद्या साहित्यकृतीचे अनुकरण होताना ती साहित्यकृती अनेक प्रकारच्या वाङ्मयीन प्रक्रिया पूर्ण करून पुढे जात असते. अनुकरण होताना मूळ साहित्यकृती किंवा विचारात बदल होण्याची शक्यता असते. प्रभाव-प्रक्षेपक व स्वीकारक यांचा पुरेसा संबंध मध्यस्थांच्यामार्फत प्रस्थापित झाला असेल तर तेथे अनुकरण प्रक्रिया सुरू होते. अनुकरणाचे स्वरूप हे काळानुरूप बदलत आलेले आहेत. अनुकरणाचे स्वरूप, भूमिका, परिणाम आदी बाबतची सूक्ष्म चिकित्सा ही फ्रान्समधील कॉन्स्तांस स्कूलमधील फ्रेंच व जर्मन तुलनाकारांनी चांगल्या प्रकारे केलेली आहे.

अनुकरण हे अर्थप्राप्ती, यश, प्रतिष्ठा, आनंद, प्रचार, प्रसार अशा अनेक करणातून होत असते. अनुकरणाची प्रक्रिया सर्व देशात, सर्व क्षेत्रात चिरंतन सुरू असते एखाद्या साहित्य कृती किंवा विचारांचे अनुकरण एखाद्या देशात जास्त प्रमाणात झाले. त्याविषयी अभिव्यक्ती वाढली की त्या विचारातील चांगल्याप्रमाणे वाईट बाजूचाही प्रभाव त्या समाजव्यवस्थेवर पडत असतो. सत्ताधारी जेते असणाऱ्या व्यक्तीचा प्रभाव सर्वांवर

पडतो व त्यांचे अनुकरण प्रत्येकजण करू लागतो. अनुकरणाच्या स्वरूपाचा विचार प्रभावाभ्यासात होत असतो. साहित्यकृतीत अनुकरणाची परंपरा महत्त्वाची आहे. त्यावरूनही अनुकरण संकल्पना अधिकपणे स्पष्ट होईल.

### २.५.३ साहित्यातील अनुकरण परंपरा

प्रभावाप्रमाणेच अनुकरणाचीही साहित्यातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. प्रतिभावंत लेखक-कवींच्या कलाकृतींचे अनुकरण हे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत होत असते. अनुकरणाची ही परंपरा विविध स्तरांद्वारे स्पष्ट करता येते.

**(अ) जागतिक स्तरावरील अनुकरण** : प्रभावाभ्यास, अनुकरण यांच्या अभ्यासाची व्याप्ती वैश्विक आहे. जगातील विविध भाषेतील साहित्यातील भाषिक घटकांचे विश्लेषण हे उसनवारी, प्रेरणा, वाङ्मय-चौर्याप्रमाणेच अनुकरणातूनही होत असलेले दिसते. इंग्रजी साहित्य हे जगातील सर्व देशात अनुकरणाबरोबरच इतर कारणांनी पोहोचलेले आहे. १९व्या शतकात इटलीचा प्रभाव सर्वत्र असूनही इटलीचे साहित्य हे इंग्रजांना फारसे माहीत नव्हते. तसेच १४ व्या शतकात इटालीयन साहित्याचा प्रभाव व हा इंग्लंडमध्ये तळागाळापर्यंत पोहोचला होता असे असूनही इंग्रजी साहित्याचे अनुकरण इटलीत कमी प्रमाणात आढळते. इटालियन साहित्याच्या प्रभावातूनच चॉसर, शेक्सपिअर, एडमन्ड स्पेन्सर, मिल्टन या साहित्यिकांनी प्रभावी साहित्यनिर्मिती केली. म्हणजेच इंग्लंडच्या साहित्यावर इटलीचा प्रभाव असलेला दिसतो. इटलीच्या साहित्याचे अनुकरण इंग्रजीत एवढे झाले की सर्व क्षेत्रात या साहित्याचा प्रभाव वाढला. त्यामुळे ब्रिटिश इटलीला अनैतिकतेचे माहेरघर समजत. भारतीयांनी इंग्रजांचे अनुकरण पारतंत्र्यात जरूर केले पण नंतर त्याविषयी नकारात्मक भावना निर्माण झाली.

जागतिक स्तरावरील अनुकरणास जित-जेते संबंधही महत्त्वाचे ठरतात. वसाहतकाळात जेत्यांनी स्वसंस्कृती लादण्याच्या उद्देशाने अनुकरणाला प्राधान्य दिले आणि वाङ्मयीन चौर्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. जागतिक स्तरावर विविध भाषेत अनुकरण हे होतच असते म्हणून जागतिक स्तरावरील अनुकरणाची परंपरा महत्त्वपूर्ण समजली जाते.

**(ब) भारतातील अनुकरण परंपरा** : भारतातील अनुकरणाच्या परंपरेत रवींद्रनाथ टागोरांनी 'वसुधैव कुटुंबकम्' या स्वीकारलेल्या भूमिकेतून झाली. टागोरांनी भारतीय समाजाने व साहित्यिकांनी तौलनिक साहित्याचा विचार करावा असे मत १९०७ दरम्यान व्यक्त केले आणि या अभ्यासाला प्रोत्साहन म्हणून 'विश्वसाहित्य' ही संकल्पना मांडली आणि त्यामुळेच भारतातील मराठीसह विविध भाषांमध्ये युरोपियन साहित्याचा अनुवाद, अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढली. यादृष्टीनेच P.E.N. (Poem, Eassay and Novel) ही आंतरराष्ट्रीय भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास करणारी संस्था स्थापन करण्यात आली.

भारतातील मराठी, हिंदी, तेलगू, कन्नड, अशा अनेक भाषांमध्ये साहित्यकृतींचे अनुकरण होऊ लागले. वि. स. खांडेकर यांचे साहित्य मराठीत प्रसिद्ध आहेच पण त्यापेक्षाही त्या साहित्याचे अनुकरण होऊन त्यांचे साहित्य तेलगू भाषेत मराठीपेक्षा खूप प्रसिद्ध झाले. मात्र तेलगू लेखकांचे मराठीत तसे फारसे अनुकरण झालेले दिसत नाही. याप्रकारे अन्य भाषेतही कधी अधिक प्रमाणात अनुकरण झालेले आढळते.

### (क) मराठी साहित्यातील अनुकरण परंपरा

मराठी साहित्यातही अनेक वाङ्मय प्रकारांचे अनुकरण झालेले आहे. इंग्रजीच्या धर्तीवर मराठीत नाटक व कादंबऱ्यात अनुकरण झालेले दिसते. उर्दू-पारसी माध्यमातून इंग्रजी साहित्य मराठीत वसाहतकाळात खूप लवकर पोहोचले. कारण स्थानिक मंडळीत उर्दू व पार्शी भाषिक निवडक मंडळी ब्रिटिशांच्या संपर्कात जास्त होती. पूर्वी साहित्यात अनुकरण परंपरेला मान्यता होती आणि म्हणूनच मराठीतील संत, पंत, तंत कवी आद्यगुरूंना आपल्या काव्यात वंदन करताना दिसतात. याप्रमाणे मराठी साहित्यात काव्य, कथा, कादंबरी आदी वाङ्मयप्रकारांच्या अनुकरणाची परंपरा आजही सुरू आहे.

### २.५.४ अनुकरण आणि वाङ्मयचौर्य सहसंबंध

प्राचीन आणि मध्ययुगीन काळात वाङ्मयीन अनुकरण, वाङ्मयचौर्य याला मान्यता होती. अनुकरण आणि वाङ्मयचौर्याची परंपरा जागतिक स्तरापासून ते मराठीपर्यंत असलेली आढळते. त्या काळात अनुकरण, उसनवारी, रूपांतर, भाषांतर, रूपांतर असो वा वाङ्मयचौर्य सर्व काही साहित्यातील क्षम्य होते. परंतु व्यक्तिवाद व भांडवलशाहीच्या उदयानंतर लेखकाचे हक्क, करार, मानधन, खप, आवृत्ती असे विविध प्रकारचे व्यवस्थापन प्रत्येक लेखक, प्रकाशक, वितरण पाहू लागला आणि त्यातून वाङ्मयचौर्य हे कायद्याच्या चौकटीतून शिक्षापात्र ठरले. आजच्या काळात वाङ्मयचौर्य अनुकरण होते. परंतु मूळ लेखकांचा नामोल्लेख त्यामध्ये केला जातो. नाटक-चित्रपटकथा या वाङ्मयप्रकारात तर रीतसर परवानगी घ्यावी लागते.

अनुकरण आणि वाङ्मयचौर्य या संज्ञा प्रभावाभ्यासातील आहेत पण त्या दोन्ही पूर्णपणे वेगळ्या आहेत. अनुकरण हे कोणीही कोणत्याही साहित्यात त्या व्यक्तीचा, लेखकाचा नामोल्लेख करून करू शकतो. पण वाङ्मयचौर्यात फसवणुकीचा-चोरीचा गुन्हा दाखल होतो. प्रारंभीच्या काळात नेत्यांच्या प्रभावातून त्यांच्या अनेक साहित्यकृतीचे, संस्कृतीचे खूप अनुकरण झालेले दिसते. पण त्या त्या देशांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनुकरणात जेत्यांच्या विरोधात आशयसूत्रे वापरली गेली. एकूण अनुकरण आणि वाङ्मयचौर्य एक वाटत असले तरी त्यामध्ये तात्त्विक स्वरूपाचे भेद आहेत हे मान्य करावेच लागते. अनुकरण अणि वाङ्मयचौर्य हा दोहोंच्या सहसंबंधातूनच प्रभावाभ्यास अधिक समृद्ध होत असलेला दिसतो.

### २.५.५ अनुकरणाची वैशिष्ट्ये

१. अनुकरण ही प्रभावाभ्यासातील एक महत्त्वाची संज्ञा आहे.

२. प्राचीन व मध्ययुगीन काळापासून अनुकरणाची परंपरा जागतिक स्तरावर विविध भाषांमध्ये सुरू आहे.

३. प्रत्येक माणूस समाजातील विविध स्तरातील मिळालेल्या ज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनात अनुकरण करून अनुभूती घेत असतो.

४. प्रभावाभ्यासात भाषांतर, रूपांतर, उसनवारी, कलम याप्रमाणेच अनुकरणासही विशेष महत्त्व असलेले दिसते.

५. एखाद्या साहित्यकृतीचे अनुकरण करताना किंवा होताना मूळ साहित्यकृती किंवा विचारात बदल होण्याची शक्यता असते.

६. अनुकरणाचे स्वरूप हे काळानुरूप बदलत आलेले आहे.

७. अनुकरणाचा सविस्तर अभ्यास फ्रान्समधील कॉन्स्तांस स्कूलमधील फ्रेंच व जर्मन तुलनाकारांनी चांगल्या प्रकारे केला आहे.

८. अनुकरण हे यशप्राप्ती, प्रतिष्ठा, आनंद अशा अनेक कारणांतून होत असते.

९. जेत्यांच्या प्रभावातून अनेक देशात त्यांच्या विचारांचा, साहित्याचा प्रभाव पडलेला दिसतो. अनुकरणही याच प्रभावातून आलेले आहे.

१०. साहित्यात अनुकरणाची परंपरा चिरंतन सुरू असते. जागतिक देशपातळी व स्वभाषांतील अनुकरण अशी परंपरा सांगता येते.

११. भारतामध्ये रवींद्रनाथ टागोरांनी 'विश्व साहित्याची' संकल्पना ही तौलनिक साहित्य, प्रभावाभ्यास व अनुकरणातूनच मांडलेली दिसते.

१२. भारतातील हिंदी, मराठी, बंगाली, तेलगू अशा बहुतांशी भाषेतील साहित्यकृतीचे अनुकरण झालेले आहे.

१३. मराठी साहित्यात कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र आदी वाङ्मय प्रकाराचे इतर भाषेत व इतर भाषेतील मराठीत अनुकरण झालेले आहे.

१४. वाङ्मयचौर्य आणि अनुकरण या संकल्पना प्रभावाभ्यासातील असून त्या संकल्पना पूर्णपणे वेगळ्या आहेत.

१५. स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनुकरणात तसेच त्या विचारप्रणालीत बराचसा फरक व विरोधाभास असलेला दिसतो.

### २.५.६ प्रभाव आणि अनुकरण भेद

तौलनिक साहित्याभ्यासातील प्रभाव अणि अनुकरण हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा आशय एक वाटत असला तरी त्यामध्ये अनेक मुद्द्यांमध्ये भेद तर काहींमध्ये साम्य आढळते.

१. एखाद्याचा प्रभाव पडतो म्हणजे त्या व्यक्ती, साहित्यकृती, विचाराचे आपण अनुकरण करतो म्हणजेच प्रभाव संबंध अनुकरणाने सुरू होतो. पुढे अनुकरणातूनच आपण त्याचे प्रभावातून स्वागत करतो. स्वागतात एकरूपता निर्माण झाली की त्याचे ठशात पर्यवसान होते आणि मग ते विचार व्यक्तीकडून समाजात मान्य पावतात. थोडक्यात, प्रभावातूनच अनुकरण निर्माण होते.

२. प्रत्येक देशात अनुकरणाची परंपरा चिरंतन चालत आलेली असते. त्यास समाजाची मान्यताही मिळालेली असते. ही अनुकरणाची परंपरा प्रभावाशिवाय निर्माण होणे शक्य नसते. मराठीतील संत, पंत, तंत, कवी आपल्या आद्यगुरूंना वंदन करताना दिसतात. हे वंदन किंवा अनुकरण प्रभावातूनच झालेले दिसते.

३. प्रभाव हा समाजावर लादावा लागतोच असे नाही. तो वाचन, लेखन चळवळ आदी माध्यमातून समाजावर पडत राहतो. अनुकरणाला मात्र तसे म्हणता येत नाही. वसाहतकाळात जेत्यांनी स्वसंस्कृती लादण्याच्या उद्देशाने अनुकरणाला उत्तेजन दिले आणि वाङ्मयचौर्याकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते.

४. प्रभावातून निर्माण झालेली साहित्यकृती उपजत व प्रतिभेचा आविष्कार असतो. अनुकरण करताना मूळ साहित्यकृती, त्यात शब्द-अर्थ आदी संदर्भ नेटकेपणाने पाहावे लागतात. अनुकरण करताना विशेष काळजी घ्यावी लागते. संदर्भानुसार अभ्यास करावा लागतो.

५. प्रभावात एकाच वेळी अनेक मूलाधार किंवा त्याचे भाग मुरल्याच्या खुणा उघड दिसतात. या तुलनेत अनुकरण हे स्पष्टपणे चमकते.

६. प्रभावाचे कार्यक्षेत्र निश्चित नसते. अनुकरणाचे क्षेत्र हे निवडलेल्या विचार, कलाकृती, संबंधितच निश्चित असू शकते.

७. प्रभावाची प्रक्रिया थेट किंवा विचार, साहित्यकृती किंवा चळवळ आदी मार्गातून सुरू असते तर अनुकरणात प्रभाव, प्रक्षेपक व स्वीकारक यांचा पुरेसा संबंध मध्यस्थाच्या मार्फत प्रस्थापित झाला असेल तरच तेथे अनुकरण प्रक्रिया सुरू होते. अनुकरणाचे संबंध थेट व्यक्तिगत पातळीवरच्या संलग्नतेचे क्वचितच असतात.

८. काही अभ्यासकांच्या मते अतिशय दुरुपयोगी झालेल्या प्रभाव संकल्पनेकडे अनुकरण म्हणून पाहू नये पण तिच्याकडे बदलाची प्रक्रिया म्हणून पाहावे.

९. जेत्यांकडून सर्वजण जशी प्रेरणा घेतात तसेच त्यांचे अनुकरण करणारे लोक स्वसंस्कृतीत युगप्रवर्तक लेखक ठरतात. वाङ्मय संस्कृतीचे नेते बनतात.

१०. पूर्वसंहिता (आई-बाप) असल्याशिवाय उत्तम संहिता (मूल) होत नाही. हा निसर्ग नियम सर्व साहित्याप्रमाणे प्रभाव व अनुकरणासही लागू होतो.

११. प्रभाव हा चांगला किंवा वाईट कसाही असू शकतो. प्रभावावर टीका होतेच असे नाही पण अनुकरणाबाबत विविध मते, टीका व्यक्त केली जावू शकते. लॉन्जिनसने प्राचीन थोर कवींचे अनुकरण करणाऱ्या नव्या कवीची तुलना अपोलोने गरोदर केलेल्या पिथियाँ (Pythian) जोगिणीशी केली आहे.

१२. कोणत्याही वाङ्मय संहितेतील प्रभाव एकटा नसून तो समूहाचे जाळे असते. प्रभावाच्या सशक्त, नकारात्मक, फ्लू, वरवरचे अशा प्रकारांपैकीच अनुकरण हा एक प्रकार आहे.

१३. अशक्त तरुणावर सशक्त प्रभाव पडल्यास पोचट अनुकरण होते.

१४. व्यक्ती तितक्या प्रकृती याचाच अर्थ असा की माणूस प्रभावातून विचारसुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने करीत असतो तसेच अनुकरणही तो वास्तव जीवनात स्वीकारत असतो.

१५. साहित्य आणि संस्कृतीची तुलना करताना परस्परांवरील प्रभाव व अनुकरणाचा व्यापक शोध घेतला जातो.

१६. प्रभाव व अनुकरणाचे स्वरूप वैश्विक असते. प्रभाव अनुकरण हे घटक विश्वातील सर्व साहित्यात आढळून येतात.

१७. प्रभाव हा अंतरंगात पडत असतो तर अनुकरण हे तत्कालिक, वरवरचे असते.

१८. सर्व साहित्य हे प्रभावातूनच निर्माण होते असे नाही परंतु अनुकरण मात्र लोकप्रिय साहित्याचे होत असलेले दिसते. लोकप्रिय साहित्यात अनुवादाचे प्राबल्य असते.

१९. प्रभाव क्षेत्राची व्याप्ती ही अनुकरणापेक्षा अधिक असते.

## २.७ समारोप

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याच्या अभ्यासाची एक ज्ञानशाखा आहे. या ज्ञानशाखेत प्रभावाभ्यास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. काही अभ्यासक प्रभावाभ्यास ही स्वतंत्र शाखाही मानतात. अनुकरण हे प्रभावाभ्यासातील महत्त्वाचे घटकतत्त्व आहे. प्रतिभावंत कवी, लेखकाच्या साहित्यकृतीचा, विचारांचा प्रभाव समाजावर पडतो. ते साहित्य लोकप्रिय झाले की त्याचे अनुकरण होते. प्रभाव व अनुकरण यामध्ये भेद असले तरी दोहोंचा अनन्यसंबंध असलेला दिसून येतो. साहित्यात प्रभाव हा शब्द छाप, दबाब, सामर्थ्य, वजन टाकणे अशा अर्थाने घेतला जातो. प्रभाव हा एकटा नसून तो समूहाने असतो. प्रभावाच्या समूहात अनुकरण, भाषांतर, रूपांतर, उसनवारी, नक्कल, कलम, ठसा, वाङ्मयचौर्य अशा अनेक संज्ञा महत्त्वपूर्ण ठरतात.

प्रभावाचे स्वरूप मौखिक, व्यक्तिनिर्मित, समाजनिर्मित, साहित्यनिर्मित, संप्रदाय-चळवळ निर्मित अशा प्रकारात स्पष्ट करता येते. इतर क्षेत्राप्रमाणेच साहित्य क्षेत्रातील प्रभावाची वाटचाल ही सक्षम असलेली दिसते. अभ्यासाच्या दृष्टीने जागतिक, भारतीय, प्रांतीय प्रभाव अशी वाटचाल सांगता येते. मराठी साहित्यातील प्रभाव ठळकपणे दिसतो. तो वाङ्मयप्रकार, अन्य भाषिक, चळवळ, सामाजिक सुधारक अशा टप्प्यात स्पष्ट करता येतो. अभ्यासकांनी प्रभाव व प्रभव यांच्यातही भेद केलेले आहेत. प्रभावाचे फिरते चक्र विश्वपातळीवर चिरंतन सुरू असते. प्रभाव हा सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा अनेक कारणातून निर्माण होत असतो. प्रभावाची अनेक वैशिष्ट्ये ही प्रभाव संकल्पना अधिकपणे स्पष्ट करतात.

अनुकरण हे प्रभावाचे महत्त्वाचे घटकतत्त्व आहे. अनुकरणात प्रक्षेपक, प्रभाव स्वीकारक, कलाकृतीतील अनुबंध महत्त्वाचे ठरत असतात. प्रभावसंबंध हा अनुकरणातून सुरू होतो. साहित्यात अनुकरणाची परंपरा

जागतिक, भारतीय व स्थानिक पातळीवर सांगता येते. अनुकरण आणि वाङ्मयचौर्य यांचे सहसंबंध हे अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. अभ्यासकांनी दोहोंतील साम्यभेदाचे मुद्दे स्पष्ट केले आहेत. अनुकरणाच्या वैशिष्ट्यातून अनुकरण क्षेत्र किती महत्त्वाचे आहे हे समजते.

प्रभाव आणि अनुकरण या दोन्ही घटकात भेद वाटत असला तरी दोहोंत आंतरसाम्य असलेले दिसते. प्रभाव आणि अनुकरणाचे क्षेत्र व्यापक असल्यामुळे दोहोंतील भेद अभ्यासकांनी नेमकेपणाने स्पष्ट केलेले आहेत. प्रभाव हा प्रत्येकावर पडतच असतो. तसेच प्रत्येकजण अनुकरणही करत असतो. अनुकरणाच्या तुलनेत प्रभावाचे क्षेत्र व्यापक आहे. साहित्यिक, विचारवंत, चळवळ यांचा समाजावर प्रभाव पडतो व त्यांचे अनुकरण समाजाकडून होत असते. व्यक्ती तितक्या प्रकृती याप्रमाणे प्रभाव व अनुकरण प्रत्येकाचा वेगवेगळा असू शकतो. प्रभाव आणि अनुकरणास प्रभावाभ्यासात महत्त्व असल्याने दोहोंचा स्वतंत्रपणे व साम्यभेदासह अभ्यास करावा लागतो. प्रभाव व अनुकरणाच्या दृष्टीने मराठीत फारसे लेखन संशोधन झालेले दिसत नाही. ते होणे आवश्यक वाटते.

## २.८ स्वाध्याय

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. तौलनिक साहित्य अभ्यासाची कोणती प्रमुख ज्ञानशाखा आहे ?

(अ) अनुकरण (ब) प्रभावाभ्यास (क) भाषांतर (ड) रूपांतर

२. भारतामध्ये 'विश्वसाहित्य' या संकल्पनेचा पुरस्कार कोणी केला ?

(अ) वसंत बापट (ब) चंद्रशेखर जहागिरदार

(क) रवींद्रनाथ टागोर (ड) आनंद पाटील

३. प्रभाव ही संकल्पना भारतात कोठून आली ?

(अ) पाश्चात्य देश (ब) भारतातून (क) महाराष्ट्रातून (ड) फ्रेंच

४. इस्ताईफ यांनी प्रभाव संकल्पनेचा पर्यायी म्हणून कोणता शब्दप्रयोग वापरला ?

(अ) प्रेरणा (ब) प्रतिभा (क) चेतना (ड) स्फूर्ती

५. फ्रेंचमधील तौलनिक साहित्याभ्यास कोणत्या नावाने ओळखला जातो ?

(अ) पॅरिस स्कूल (ब) इंग्लीश स्कूल

(क) वैश्विक स्कूल (ड) पर्यटन स्कूल

६. डॉ. आनंद पाटील यांनी मराठी प्रभाव अभ्यासात कोणती संकल्पना मांडली ?

(अ) प्रतिकार (ब) स्फूर्ती (क) नक्कल (ड) कलम

७. जपानी कोणत्या काव्यप्रकाराचा प्रभाव मराठी कवितेवर पडला ?

(अ) गजल (ब) हायकू (क) शाहिरी (ड) सुनित

८. 'प्रभव' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम कोणी वापरला ?

(अ) आनंद पाटील (ब) चंद्रशेखर जहागिरदार

(क) वसंत बापट (ड) भालचंद्र नेमाडे

९. कायद्याच्या चौकटीत काय शिक्षा पात्र ठरते ?

(अ) भाषांतर (ब) रूपांतर (क) वाङ्मयचौर्य (ड) अनुकरण

१०. अनुकरणाचे कार्यक्षेत्र कसे असते ?

(अ) निश्चित (ब) अनिश्चित (क) चिरंतन (ड) तात्पुरते

**उत्तरे**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. प्रभावाभ्यास २. रवींद्रनाथ टागोर ३. पाश्चात्य देश

४. स्फूर्ती ५. पॅरिस स्कूल ६. कलम

७. हायकू ८. वसंत बापट ९. वाङ्मयचौर्य

१०. निश्चित

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कलम म्हणजे काय ?

२. अनुकरण म्हणजे काय ?

३. प्रभावाभ्यास कोणत्या साहित्याभ्यासाची प्रमुख शाखा आहे ?

४. प्रभाव समूहातील प्रमुख संज्ञा कोणत्या ?

५. PEN संस्था कशाचा अभ्यास करते ?

## २.९ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रभाव म्हणजे काय सांगून प्रभावाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. प्रभाव आणि अनुकरण यामधील भेद सोदाहरण स्पष्ट करा.

३. अनुकरण म्हणजे काय सांगून साहित्यातील अनुकरणाची परंपरा स्पष्ट करा.

**प्र. २ : लघुत्तरी प्रश्न**

१. प्रभावाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

२. मराठी साहित्यातील प्रभावाची वाटचाल स्पष्ट करा.

३. अनुकरणाची वैशिष्ट्ये विशद करा.

## २.९ अधिक वाचनासाठी संदर्भ

१. बापट वसंत, १९८१, तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. मिरजकर निशिकांत, २०१६, तौलनिक साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

३. पाटील आनंद, १९९८, तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

## २.१० पूरक वाचनासाठी संदर्भ

१. सबनीस श्रीपाद, १९९९, तौलनिक अभ्यास : संकल्पना आणि प्रारूप, कविता प्रकाशन, धुळे.

२. जहागिरदार चंद्रशेखर (संपा.), तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर.

३. मेनकुदळे शिवलिंग, २०१८, एम. ए. भाग-२, मराठी सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा, मार्गदर्शन अभ्यास पुस्तिका, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

* * *

## घटक - ३

# प्रभाव कारणमीमांसा

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

३.४ समारोप

३.५ स्वयं अध्ययन

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

### ३.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- तौलनिक साहित्यातील प्रभाव संकल्पना लक्षात येईल.
- प्रभावाची कारणे कोणकोणती आहेत हे समजेल.
- प्रभावाचे घटक लक्षात येतील.
- प्रभाव आणि सत्ताकेंद्रे यांचा संबंध कसा असतो हे सांगता येईल.
- अनुकरण, चळवळी, आंतरराष्ट्रीय संबंध, आदान-प्रदान, प्रत्यक्ष संपर्क, भाषांतर, नवतेचे आकर्षण या कारणांची मीमांसा करता येईल.
- सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व्यक्तिमत्व, अभिरुची या कारणांची मीमांसा करता येईल.

## ३.२ प्रास्ताविक

तौलनिक साहित्यामध्ये प्रभाव ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. एखाद्या साहित्यकृतीचा, लेखकाचा वा साहित्यिक प्रवृत्तीचा प्रभाव विशिष्ट कालखंडातील साहित्यावर असतो. तसेच साहित्य बाह्य व्यक्तिमत्त्वाचा किंवा विचारधारेचा प्रभावही साहित्यावर पडत असतो. उदा. कर्नाटकामध्ये बाराव्या शतकात बसवण्णांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि त्यांच्या वाचन साहित्याचा प्रभाव सबंध मध्ययुगीन कानडी साहित्यावर पडलेला दिसतो. तद्वतच महाराष्ट्रामध्येही याच कालखंडामध्ये तेराव्या शतकात ज्ञानेश्वर, नामदेवांचे कार्यकर्तृत्व, ग्रंथरचना आणि वारकरी संप्रदायाचे त्यांनी केलेले पुनरुज्जीवन याचा प्रभाव सबंध मध्ययुगीन संत साहित्यावर झालेला आहे हे दिसून येते.

आधुनिक काळामध्ये ब्रिटिश राजवटीच्या एकछत्री अमलानंतर त्यांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणाचा प्रभाव एकोणिसाव्या शतकातील मराठी वाङ्मयातील कितीतरी साहित्यकृतीवर असल्याचे दिसते. तसेच विसाव्या शतकात ना. सी. फडके, बा. सी. मर्ढेकर या लेखकांचा प्रभाव तसेच महात्मा गांधी, हे साहित्यबाह्य व्यक्तिमत्त्व व मार्क्सवाद ही विचारसरणी यांचा वाङ्मयावरील प्रभाव ध्यानात घेण्यासारखा आहे.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ प्रभाव संकल्पना

प्रभाव ही संकल्पना स्पष्ट करताना 'वेस्टाईन' म्हणतात की, ''प्रभाव द्विस्तरीय असतो, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन राष्ट्रीय साहित्याचा आणि त्यामधील साहित्यकृतीचा अभ्यास प्रभाव संकल्पनेत अभिप्रेत आहे. प्रभावांचा अभ्यास हा गुणात्मक नसून प्रत्यक्ष प्रभावदर्शी असतो. प्रभावित करणारा आणि प्रभावित होणारा यांच्यामध्ये शब्दशः अनुकरण नसते तर सर्जनात्मक आदानप्रदान असते. प्रभाव हे उद्‌बोध अनुकरण असून अनुकरण हे प्रत्यक्ष प्रभाव असते. शिवाय प्रभाव हा एकेरी साचा नसून ते विविध पद्धतींनी आविष्कृत होतो.'' (वसंत बापट, तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा)

प्रभाव हा दोन पद्धतींचा असतो. (१) प्रत्यक्ष भेट स्वीकारलेला (२) अप्रत्यक्ष म्हणजे नकळतपणे व्यक्त होणारा अर्थात प्रभाव हा दोन साहित्यातील आदानप्रदान या कारणामुळे घडून येतो. प्रभाव हा गुणात्मक पद्धतीने मापता येत नाही तर अनेक घटकांच्या साह्याने प्रभावाचे मोजमाप करता येते. उदा. कोल्हटकर, खाडीलकरांवरील संस्कृत साहित्याचा पडलेला प्रभाव, गडकऱ्यांच्या नाटकांवर असलेला शेक्सपिअरचा प्रभाव.

जोसेफ टी. शॉ प्रभावची संकल्पना स्पष्ट करताना म्हणतात की, ''लेखकाचा व्यक्तिगत विकास किंवा त्याची देशी वाङ्मयीन परंपरा त्याच्या ललित साहित्यकृतीवर अथवा त्याच्यावर झालेला परिणाम स्पष्ट करू शकत नाही. हे बाहेरून आलेले जे काही असते ते जेव्हा प्रात्यक्षिकामध्ये दाखविता येते. तेव्हा त्या लेखकावर विदेशी साहित्याचा प्रभाव पडला असे समजले जाते.'' (लिटररी इनडेटेडनेस ॲण्ड कम्परिटिव्ह लिटरेचर स्टडीज).

थोडक्यात, एखाद्या लेखकाचा स्वतःचा कलात्मक विकास वा त्यांची वाङ्मय परंपरा स्पष्टपणे नसताना नवीन असे काही देशी लेखकांच्या साहित्यकृतीत सापडते, त्यास प्रभाव असे म्हणतात. प्रभाव अभ्यास हा आंतरराष्ट्रीय सहिष्णुता आणि सामंजस्य निर्माण करत असतो.

### ३.३.१.१ प्रभाव, साधर्म्य आणि स्वीकार

प्रभाव हे आदानप्रदानाचे महत्त्वाचे साधन आहे. कारण हा प्रभाव साहित्यिकांबरोबर साहित्याचाही असतो. उदा. संस्कृत पंचमहाकाव्याचा देशी भाषांतील काव्यावर पडलेला प्रभाव हा दिसणारा प्रभाव केवळ कालिदासाचा म्हणता येणार नाही. कारण या महाकाव्याची रचना, पद्धती, अलंकारिता, विषयाची निवड, निवेदन कौशल्य, पांडित्याचे दर्शन इत्यादी सर्व घटकांची जी एक परंपरा निर्माण होते तिचा तो संकुल प्रभाव असतो असे म्हणता येईल. जगातील वाङ्मयीन घडामोडींमध्ये असणारे असे अनेक प्रभाव दाखविता येतात. प्रभावामध्ये अन्य साहित्याचे स्वागत व स्वीकार करणे महत्त्वाचे असते. प्रतिभावंताचा प्रभाव हा अमर्यादित असतो. तो प्रभाव पडणे स्वाभाविक असते. हा प्रभाव साहित्यिकांच्या तसा साहित्याचा वा साहित्य परंपरेचाही पडत असतो.

साम्य साधर्म्य यामध्ये अन्य कोणताही फरक आढळत नाही. साम्य दर्शविण्यासाठी शैली, संरचना, मनोवस्था किंवा कल्पना यांचा संबंध असतो. साधर्म्यात प्रभाव शोधता येत नाही.

सादृश्य, संस्कृती, समाजव्यवस्था, आर्थिक व्यवस्था, राजकीय वातावरण इत्यादीमुळे साधर्म्य उत्पन्न होत असते. दोन साहित्यामध्ये प्रभावाचे जवळचे संबंध प्रस्थापित करणारी ही प्रभावरचना असते. तेव्हा साधर्म्य आढळले तर प्रभाव गृहीत धरणे चूक ठरते. कारण त्यामध्ये अन्य कारणेही असतात. प्रभावाचे चढ उतार होत असताना प्रभावाची प्रक्रिया महत्त्वाची मानली जाते. आशय अभिव्यक्तीसह समग्र जीवनदर्शन हे प्रभावाने व्यापून टाकले जाते. स्वीकार, अनुकरण, संस्कार. ऋणग्रहण, वाङ्मयीन मूल्य निर्धारणासाठी मानदंडासारखा उपयोग होतो. प्रभाव हा नेहमीच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असतो. तो विखुरलेला धूसरही (diffused) असतो. प्रभावाचे समग्र वा अंशिक स्वरूप असून त्याचा प्रतिद्वंद्वी प्रभाव पडत असतो. साहित्य हे सर्जक की परिणामकारी असा भेद करणे कठीण असते म्हणून प्रभव व प्रभाव यांचा एकत्र विचार करावा लागतो.

### ३.३.१.२ प्रभव

प्रभाव या संकल्पनेसोबत प्रभव ही संकल्पना महत्त्वाची आहे. एखादी साहित्यकृती दुसऱ्या साहित्यकृतीला जन्म देत असते. साहित्यकृतीतील नेमक्या कोणत्या एका घटकाने दुसऱ्या साहित्यकृतीची निर्मिती झाली हे सांगता येत नाही. मग त्यामध्ये प्रसंग घटना, पात्रे इत्यादीतून साहित्यकृती साकारते असे रेने वेलेक म्हणतो. त्या कलाकृतीत समांतर वा समानगुण समुच्चय असू शकतात. कार्यकारणभाव कधी असतो तर तो नसतो म्हणून प्रभाव, प्रभव, साधर्म्य परंपरा इत्यादींचा एकत्रित विचार करावा लागतो. यामुळे नवीन जीवनरस उत्पन्न होतो. प्रभाव प्रेरणादायी असतो पण वापरण्याची पद्धती भिन्न असते.

प्रत्येक साहित्यकृतीचे प्रभव कारण म्हणजे प्रतिमा होय. प्रभव मीमांसेच्या महत्त्वाविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. सामान्य लेखकाचाही प्रभाव पडू शकतो. त्यामध्ये निष्कर्षांना कमी महत्त्व असते. पण प्रभव विचार हा जुन्यातून नवनिर्मिती असते. उदा. शेक्सपिअरची नाटके म्हणजे प्रभव. म्हणजेच आदिमूळ सर्जक घटक होय. याचे स्वरूप स्पष्ट करता येते. त्यामध्ये :

१. वस्तुचित्रे (Themes)

२. पुराण इतिहास इत्यादी व्यक्तीचे नूतनावतार (Perfigurations)

३. लोककथा, लोकगीते, प्रतिक्रिया (Folklore)

४. ऐतिहासिक घटना (History)

५. पुराणकथा, परीकथा (Popular Literature etc.)

६. विशिष्ट आदिम स्थिरपद कल्पना (Archetypes)

७. नैसर्गिक संकटे, युद्ध, वादळ, भूकंप (a tastrophies)

८. विशिष्ट राजकीय आणि सामाजिक आसमंत (Milieu), घडामोडी (Events), परिस्थितीचे आव्हान (Situations)

९. पूर्वसूरींच्या वाङ्मयकृती, समग्रता वा विभागशः (Classics re-interpretated)

१०. मानसशास्त्र, गुन्हेगारीचे शास्त्र इत्यादी मधील वेधक भाग (Psychology Criminology)

वरील घटकांमध्ये अन्योन्य मिश्रणे होतात. या आधारे निर्माण होणाऱ्या साहित्यामध्ये साम्य वैषम्ये आढळून येतात. याचा शोध तौलनिक साहित्यामध्ये महत्त्वाचा असतो. प्रभाव पाडणारे घटकच प्रभव म्हणून कार्यान्वित होतात. त्यामुळे प्रभव-प्रभावांचा (Soreces-influences) अभ्यास संलग्नच असतो. समान प्रभावातून निर्माण झालेल्या विभिन्न साहित्य कृतीतून विभिन्न साहित्य परंपरांचे स्वरूप स्पष्ट होत असते. संपर्काशिवाय साधर्म्य म्हणजे सहज साधर्म्य होय. साधर्म्यात समान वस्तुबीजे आढळून येत असतात. एक प्रभावमूलक व दोन प्रभवमूलक असे दोन प्रकारचे भिन्नत्व साहित्यकृतीमध्ये असल्याचे दिसते.

प्रभव अभ्यासाचा एक भाग म्हणजे एखाद्या साहित्यकृतीचे वा लेखकाचे दुसऱ्या भाषेत कशा प्रकारे स्वागत झाले आहे ते पाहणे होय. उदा. मराठीतून तमीळ, गुजराती, हिंदी भाषांमध्ये फडके खांडेकर यांच्या कादंबऱ्यांचा स्वीकार जेव्हा प्रभव-प्रभाव आणि साधर्म्य यांचा स्वीकारक स्वतः मध्यस्थ म्हणून काम करतो तेव्हा स्वीकार पद्धतीचा अभ्यास असतो. प्रभव आणि स्वीकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रभव, प्रभाव आणि स्वीकार यांमुळे समाजशास्त्र, कला, इतिहास विद्याशाखांवर प्रभाव झालेला आढळतो.

### ३.३.२ प्रभावाची कारणे

साहित्यकृती वा साहित्यिक यावर कोणकोणत्या कारणांमुळे प्रभाव पडतो हे पाहताना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यक्तिमत्व, अभिरुची वाङ्मय अशी कारणे दाखविता येतात. याबरोबरच आंतरराष्ट्रीय संबंध, प्रत्यक्ष संपर्क, भाषांतर, चळवळी धर्मप्रसार अशी इतर कारणेही सांगता येतात.

### ३.३.२.१ प्रभाव आणि सत्तासंबंध

सत्ता आणि अधिसत्ता यांचा व्यक्तीवर पडणारा प्रभाव यांचे विश्लेषण प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या काळापासून अनेकांनी केलेले आहे. समाजात काही व्यक्ती वरचढ असतात आणि त्या वरचढ व्यक्ती इतरांवर वर्चस्व गाजवीत असतात. सत्ताधारक आणि सत्ताग्राहक हे ज्या प्रसंगात उपस्थित असतील तेथेच सत्तासंबंध प्रस्थापित होत असतात. प्रभाव हा दोन किंवा अधिक व्यक्तींच्या आंतरसंबंधावर आधारीत असतो. प्रभाव पाडणारी व्यक्ती तार्किक युक्तिवाद, नैतिक मुद्दे, फायदे-तोटे सांगून अन्य व्यक्तींचा निर्णय प्रभावित करीत असते. मात्र प्रभावित व्यक्ती स्वनिर्णय घेण्यास स्वतंत्र असते म्हणजे प्रभावात दडपण असत नाही. प्रभावाचे अनेक आधार असले तरी प्रतिष्ठा ही प्रभावकारकच ठरते. प्रतिष्ठा ही जशी स्थानसिद्ध असते तशीच ती व्यक्तिमत्वावरही आधारीत असते दिला जाणारा संदेश आणि ऋणाईतपणा हेही आधारघटक महत्त्वाचे असतात. सत्तेचा प्रभाव मोजताना वजन, क्षेत्र, व्याप्ती विचारात घेऊन मूल्यमापन करावे लागते. बट्रॉर्ड रसेल यांनी अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता असे सत्तेचे वर्णन केले आहे. प्रभावामागे अधिबलने नसतात तर सत्तेमागे ती असतात. त्यामुळे सत्ता म्हणजे एक प्रकारचा प्रभावच असतो. फक्त सापेक्षतः कडक अधिबलने पाठीशी असलेला प्रभाव असतो असे लास्वेल म्हणतो.

समाजजीवनामध्ये प्रभावाचे प्रसारण करण्याचे कार्य राजकीय, धार्मिक, साहित्यिक, शैक्षणिक सत्ताकेंद्रे याबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक सत्ताकेंद्रेही असतात. अशा सत्ताकेंद्राच्या प्रभावातून निर्माण झालेल्या कलाकृतीमध्ये प्रभाव ठळकपणे दिसून येतो.

### ३.३.२.२ राजकीय सत्ताकेंद्राचा प्रभाव

कोणत्याही देशातील मानवी जीवनात राजकीय सत्ताकेंद्राचा प्रभाव हा असतोच. तत्कालीन कालखंडावर राजकीय सत्तेचे वर्चस्व असते. या सत्ताकेंद्राची स्व-धोरणे, विचारधारा असतात. राजकीय सत्ताकेंद्राला अपेक्षित असणारी मूल्ये जतन केली जातात. सत्ताकेंद्राचा विचारधारेच्या प्रभावात झालेल्या साहित्यनिर्मितीला राजमान्यता मिळते, प्रोत्साहन दिले जाते तर कधी पारितोषिक देऊन गौरव केला जातो, तर कधी याऊलट घडू शकते. सत्ताकेंद्राच्या विचारसरणीला छेद देणारे साहित्यिक आपल्या साहित्यकृती जेव्हा निर्माण करतात तेव्हा त्या निषेधार्ह असतात. उदा. सलमान रश्दी, तस्लीमा नसरीन यांना देश सोडून परागंदा व्हावे लागले. राजकीय सत्ताकेंद्राच्या प्रभावामध्ये प्रभाव स्वीकारक लेखक साहित्यकृती निर्माण करतो. उदा. इंग्रजी राजवटीतील साहित्य निर्मिती, इस्लाम राजवटीतील साहित्यनिर्मिती.

### ३.३.२.३ सामाजिक सत्ताकेंद्रे

प्रत्येक मानवी समाजगटांमध्ये प्रस्थापित समाजगटांची सत्ताकेंद्रे अस्तित्वात असतात. भारतासारख्या बहुधार्मिक, बहुजातीय समाजामध्ये ब्राह्मण व इतर प्रस्थापित जातींचे सामाजिक वर्चस्व असल्याचे दिसते. ज्ञानाची मक्तेदारी त्यांच्याकडे होती या समाजगटांकडूनच वाङ्मयनिर्मिती होते तेव्हा इतर समाजगटांवर त्याचा प्रभाव पडतो व त्या प्रभावातून पुढे साहित्यनिर्मिती होत राहते.

### ३.३.२.४ सांस्कृतिक सत्ताकेंद्रे

प्रत्येक मानवी समाजाची एक विशिष्ट अशी संस्कृती असते. या संस्कृतीची विशिष्ट मूल्यधारणा असते त्या संस्कृतीमध्ये सांस्कृतिक प्रतिके, प्रतिमा, मिथके रूढ होत असतात. या सर्वामधून सांस्कृतिक सत्ताकेंद्रे निर्माण होतात. अशा सांस्कृतिक वातावरणात कलावंत व लेखक जी वाङ्मयनिर्मिती करतात त्या वाङ्मय निर्मितीवर सांस्कृतिक सत्ताकेंद्राचा प्रभाव असतो. उदा. इस्लामिक राजवटीतील सांस्कृतिक सत्ताकेंद्रे, भारतीय समाजामध्ये नानाविध सांस्कृतिक सत्ताकेंद्रे उदयास येऊन त्यांनी विशिष्ट प्रकारच्या वाङ्मय निर्मितीला प्रोत्साहित केल्याचे दिसते.

### ३.३.२.५ धार्मिक सत्ताकेंद्रे

संपूर्ण जगात धर्मानुसार विविध धर्माची सत्ताकेंद्रे निर्माण झालेली आहेत. ज्या धर्माचे प्राबल्य ज्या समाजात असते त्या धर्माची सत्ताकेंद्रे स्थापन होतात. हिंदू, बौद्ध, मुस्लीम, जैन, शिया इत्यादी प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या धर्मात आपले जीवन जगत असतो. आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान, आचार-विचार यांचा प्रभाव यांचा प्रभाव त्या-त्या वाङ्मयावर पडतो.

### ३.३.२.६ साहित्यिक सत्ताकेंद्रे

प्रत्येक भाषेतील साहित्यामध्ये साहित्यिक सत्ताकेंद्रे निर्माण झालेली असतात. त्यामध्ये प्रस्थापित साहित्यिक सत्ताकेंद्रे व विस्थापित साहित्यिक केंद्रे प्रचलित असतात. आपआपल्या प्रभाव कक्षेतील साहित्यिक व साहित्यांवर ही सत्ताकेंद्रे नियंत्रण ठेवत असतात. यामधून विशिष्ट मूल्यव्यवस्थेला, विचारधारेला प्रोत्साहन देऊन, साहित्यिक साहित्यनिर्मिती करतात. पोषक वातावरण मिळावे म्हणून वाङ्मयीन मेळावे, संमेलने, नियतकालिके आपली विचारधारा प्रबळ करतात. साहजिकच या सत्ताकेंद्राचा प्रभाव वाढू लागतो. मराठी साहित्यामध्ये अशी अनेक सत्ताकेंद्रे आहेत. उदा. दलित साहित्य, मुस्लिम साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य इ.

### ३.३.२.२ वाङ्मयीन चळवळी आणि घटनांचा प्रभाव

संपूर्ण जगभर प्रत्येक काळामध्ये काही विशिष्ट वाङ्मयीन चळवळी वा घटना घडत असतात. विशिष्ट संस्कृतीमध्ये जगणारी माणसे समकालीन संस्कृतीला प्रतिक्रिया देत असतात. कारण या चळवळींचा चांगला वा वाईट परिणाम तत्कालीन जीवनावर होत असतो. प्रतिक्रिया जशी तीव्र आणि संघटित होते तेव्हा चळवळीचे तिला स्वरूप प्राप्त होते. या चळवळींचा प्रभाव अभ्यास राजकीय सामाजिक वाङ्मयीन दृष्टीने करावा लागतो.

अशा चळवळीमध्ये काही ग्रंथ प्रभावी ठरतात. चळवळींच्या रूपात जुन्या आशयसूत्रांना नाविन्य वा नवरूप प्राप्त होत असते. याचा प्रभाव तत्कालीन लेखकांवर होत असतो. उदा. आर्य, मुघल, बौद्धधर्म प्रचार, राज्यक्रांत्या, जागतिकीकरण अशा घटनांचे पडसाद वाङ्मयीन चळवळीवर निश्चितपणे होत असतात. चळवळींचे स्वरूप विस्तारत जावून त्या प्रभावी ठरतात. मध्ययुगात निर्माण झालेली भक्तीआंदोलन चळवळ. या चळवळीतून सर्वात जास्त भक्तिसाहित्याची निर्मिती झाली. तिरुवन्तरचे तमीळ, महाराष्ट्रातील ज्ञानदेव-तुकोबांची भक्तिकविता, मीरा-सूरदासांची हिंदी कविता असा भक्तीचा धागा भारतभर पसरत गेला आहे. याचा परिणाम प्रादेशिक भाषांमध्ये जे वाङ्मय निर्माण झाले त्यावर त्या चळवळीचा प्रभाव प्रकर्षाने पडलेला जाणवतो. अलिकडील काळात दलित चळवळींचा प्रभाव जाणवतो किंवा डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केले. याच प्रभावातून अनेकांनी साहित्यनिर्मिती केली. तसेच १९६० नंतर निर्माण झालेल्या ग्रामीण चळवळीचा प्रभाव कितीतरी ग्रामीण लेखकांवर आहे. या चळवळीतून अनेक लेखक निर्माण झाले. प्रभावाचे एक कारण म्हणून वा वाङ्मयीन चळवळींचा उल्लेख करावा लागतो.

### ३.३.२.३ आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंध

जेव्हा जेव्हा आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंध निर्माण होतात तेव्हा तेव्हा त्याचा प्रभाव हा होतच असतो. साहित्य निर्मितीचे कारण घटक आणि त्यावर परिणाम करणाऱ्या प्रभाव घटकांचा अभ्यास करताना भिन्न भाषिक साहित्य संस्कृतीमधील साम्य-विरोध लक्षात येतो. आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधातून भिन्न संस्कृतीमधील वाङ्मयाचा एकमेकांवर प्रभाव पडतो. लेखकाचा प्रवास, परदेशातील वास्तव्य, त्याचा व्यासंग, त्याचे साहित्यादर्श, त्याने स्वीकारलेला वाङ्मय प्रकार, चळवळीतील सहभाग आदी घटक त्याच्या साहित्याला इतर साहित्यिकाशी वा साहित्याशी जोडत असतात. आंतरराष्ट्रीय संपर्कातून आदानप्रदान मोठ्या प्रमाणात घडून येते. संपर्क प्रस्थापित झाल्यानंतर स्वागत, अनुकरण, भाषांतर, साधर्म्य यांच्या एकत्रिकरणातून प्रभावाची तीव्रता स्पष्ट होत जाते. खरे तर लेखक सुद्धा एक वाचक असतो. त्याच्यावर प्रथम प्रभाव जाणवतो तो जेव्हा साहित्यनिर्मिती प्रक्रियेत गुंतला जातो तेव्हा साहजिकच त्याच्या साहित्यात आंतरराष्ट्रीय संबंधाचा प्रभाव पडतो. आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधामध्ये भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक घटकाबरोबरच आर्थिक, राजकीय, प्रादेशिक, अभिनिवेश यांच्याशी संपर्क येतो. उदा. ब्रिटिशांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले. त्यांच्या इंग्रजीचा प्रभाव मराठी साहित्यावर स्पष्ट जाणवतो. आज खूप मोठ्या प्रमाणावर परकीय भाषांतील साहित्य अनुवादित होत आहे. त्याचा प्रभाव वाचकांवर निश्चित स्वरूपात पडतो. अमिय देव, भालचंद्र नेमाडे, पॉल वॅनि, रिधेम, जोसेफ टी शॉ, ए. एन. वेलेस्लोव्हकी यांचे विवेचन पाहण्यासारखे आहे. इंग्रजी भाषा, ख्रिस्ती मिशनरी आणि शिक्षण या माध्यमाद्वारे पाश्चात्यांचा प्रभाव भारतीय वाङ्मयावर अधिक झालेला आहे. नाट्य, कादंबरी या प्रकारांचा विचार केला तर अधिक स्पष्ट होईल. जर्मन विल्यम जोन्स, ग्योथे, मॅक्समूलर, मिल्लर, कान्ट आणि हेगेल यांच्या देशाने भारतावर कधीही राज्य केले नसले तरी या लेखकांचा प्रभाव भारतीय साहित्यावर खोलवर उमटलेला दिसतो. परंतु भारतीय साहित्यापेक्षा भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि कवीवर अधिक जाणवतो.

### ३.३.२.४ युगधर्म आणि कालखंड

आपण अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळे कालखंड गृहीत धरून विचारमंथन करतो. त्या-त्या कालखंडामध्ये प्रत्येक काळाचा एक स्वतःचा म्हणून युगधर्म असतो आणि तो तत्कालीन साहित्यामधून व्यक्त होतो. त्या काळाची परिस्थिती, साहित्यकृतीमध्ये दिसत असते. त्या काळात प्रतिष्ठित असलेले वाङ्मयसिद्धांत, जीवनरीत, समकालीन लेखक यांचा निर्मितीकाळाशी संबंध असतो. लेखक कसदार वा प्रतिभावंत असेल तर त्या काळाचा निर्माता ठरतो. लेखक आणि त्याचे साहित्य यावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडतो. त्या काळाचा, युगधर्माचा पुढील पिढ्यांवरही एक प्रकारचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव पडतच असतो. त्या प्रभावातून साहित्य निर्मिती होणे शक्य असते. मराठी वाङ्मयाचा विचार करता ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांच्या कालखंडाचा प्रभाव तत्कालीन सर्वच लेखक वा लेखन साहित्यावर झालेला आहे. आजही शिवकाळाच्या प्रभावातून साहित्यनिर्मिती होते.

### ३.३.२.५ आदानप्रदान

पाश्चात्त्य आणि पौर्वात्य संस्कृतीच्या आदानप्रदानातून आधुनिक भारत आकाराला आलेला पहावयास मिळतो. स्वतःला विसरून समुहातील व्यक्तीचे आदानप्रदान सामाजिक स्वरूपाचे असते. प्रसिद्ध जर्मन समाजशास्त्र मॅक्स वेबर यांनी चार प्रकारचे आदानप्रदान सांगितले आहे.

१. पारंपरिक (पूजाअर्चा, उपवास, रूढी पाळणे)

२. मानसिक (प्रेम, वाईट वाटणे, भिणे, सहार)

३. मूल्यप्रमाणित वर्तन ( कायदे पाळणे, लढाया)

४. वैचारिक व व्यावहारिक वर्तन

या आदानप्रदानाच्या माध्यमातून सामाजिक व्यक्तीवर प्रभाव पडत असतो. नैसर्गिक आणि अन्य आपत्तीवेळी सामाजिक दातृत्वाचे दर्शन घडते. धर्म, जात, वंश, आर्थिक स्थिती इत्यादींचा विचार न करता लोक मदत करतात. यातूनच आपलेपण वाढीस लागते. ज्ञान प्राप्त करणे, मानसिक प्रवृत्तींचे उन्नयन करणे व त्यानुसार क्रिया करणे या त्रिसूत्रीप्रमाणे जनता वर्तन करते. या वर्तनामध्ये नकळतपणे प्रभाव पडतो. सामाजिक आंतरक्रियेमुळे माणसा-माणसांमध्ये समान विचारशैली, समाज भावना, व समान वर्तनशैली विकसित होत जाते. यातून पुढे समूह तयार होतो. अशा समूहांचे इतर समूहांशी आदानप्रदान होत राहते. साहित्यक्षेत्रात हे आदानप्रदान प्राचीन काळापासून होत आहे. साहित्य लिखित वा मौखिक असो. मौखिक परंपरा शतकानुशतके टिकून आहेत. आदान प्रदानामुळे मौखिक साहित्याचा प्रभाव इतर साहित्यावर पडतो. उदा. भिन्न आदिवासी समाजातील काही कथा एकसारख्या दिसतात. आजच्या काळात आधुनिक माध्यमांमुळे आदानप्रदानाला मोठी चालना मिळाल्याने चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन याबरोबर सोशल मिडिया यांचा प्रभाव सर्व क्षेत्रावर पडलेला दिसतो. भाषेच्या आदानप्रदानातून संस्कृतीचा व सांस्कृतिक पर्यावरणाचा विकास होत असतो.

### ३.३.२.६ अनुकरण

अनुकरण करणे हा मानवी स्वभावधर्म आहे. मानव समाजजीवनातील एकमेकांच्या अनेक गोष्टींचे अनुकरण करत असतो. साहित्यक्षेत्रामध्येही असे अनुकरण होत असते. प्राचीनांचे अनुकरण म्हणजे त्यांच्या गुणांचे किंवा उत्कृष्टतेचे अनुकरण असते. नाविन्यपूर्णतेने उत्कृष्टता आत्मसात करण्याचे कौशल्य स्वतःमध्ये असावे लागते. आदर्श साहित्य कृतीतील लेखनतत्त्वांचे अनुकरण केल्यास नवनिर्मिती तितकीच उत्कट होते. हाच प्रभाव नंतरच्याही नवनिर्मितीवेळी राहू शकतो. असे होताना शोधकता वा नवनिर्मिती क्षमतेला बाधा येत नाही. किंबहुना विकासासाठीच अनुकरण केले जाते. हे आपणास नाकारता येत नाही. अशी मते बेन जॉन्सन यांनी व्यक्त केली आहेत. (Timber or Discoveries) अनुकरण जर सातत्यपूर्ण होत असेल तर, लेखक या प्रभावाखाली नाविन्याला मुकला जाण्याची शक्यता असते. प्रभावसंबंध अनुकरणाने सुरू होतो. नंतर स्वागत प्रक्रियेतून एक तर एकरूपता किंवा अलगता दाखवत पुढे सरकतो. त्याचे पर्यावसान ठशात होते. ''अनुकरण हे अधिक होकारात्मक आणि क्षणिक वैधता स्वीकारणारे असते. त्याचे कार्यक्षेत्र निश्चित असते. संहितेच्या प्रतिध्वनीतून ते तात्काळ प्रतिसाद मिळविते. प्रभावाचे कार्यक्षेत्र निश्चित नसते. तो स्वीकारकाच्या मानसिक प्रक्रियेत व्यापून उरणाऱ्या समानुभूतीची प्रेरणा चेतवतो.'' असे आनंद पाटील म्हणतात. परंतु अनुकरणातून प्रभावाला आरंभ होतो. पण अशा अनुकरणाचा चक्रव्यूह भेदून नाविन्यपूर्ण साहित्यनिर्मिती करणारे प्रतिभावंत क्वचितच आढळतात.

### ३.३.२.७ भाषांतर

कधी कधी भिन्न भाषेतील साहित्याशी प्रत्यक्ष संपर्क येत नाही तेव्हा भाषांतराद्वारे त्यांच्याशी संपर्क निर्माण होतो. अनुवाद भाषांतराच्या माध्यमातून साहित्यास्वाद घडत असतो. यातूनही प्रभावाची शक्यता निर्माण होते. उदा. हॅरी पॉटरची जादूची मालिका पुस्तके. भाषांतरकार हा दोन साहित्य परंपरा आणि भाषा यांच्यामध्ये दुवा साधण्याचे काम तो 'मध्यस्थ' म्हणून करतो. ए. एम्स. प्रावर म्हणतात की, ''आंतरराष्ट्रीय प्रभावांना प्रवाहित करण्यासाठी महत्त्वपूर्ण मार्ग भाषांतर उपलब्ध करून देतो. एक लेखक जेव्हा त्याला कोणत्या प्रकारचा प्रतिसाद मिळतो. त्याचा कितपत प्रभाव पडतो याचे कसे स्वागत होते, अनुकरण होते हे पाहण्यासारखे आहे.'' भाषांतर वाङ्मयीन व सांस्कृतिक प्रबोधनामध्ये मौलिक कार्य करतात त्यांच्या माध्यमातून संस्कृतीकरणाला गती प्राप्त होते. युरोपातील प्रबोधन काळामध्ये हिब्रू, अरबी, ग्रीक आणि लॅटिन अभिजात ग्रंथाच्या भाषांतराच्या लाटा आल्या. उदा. निकोलाय गोगोलच्या 'इन्स्पेक्टर जनरल'वर आधारलेले पु. ल. देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक स्वतंत्र कलाकृती वाटावी इतके सुंदर झालेले आहे. तसेच शॉच्या 'पिग्मॅलियन'वर आधारीत 'ती फुलराणी' आणि ब्रेश्तच्या 'द थ्री पेनी ऑपेरा'वर आधारलेले 'तीन पैशाचा तमाशा' हे परकीय प्रभाव आपल्या मातीत कशा पद्धतीने रुजतात हे सहजच लक्षात येईल. भाषांतरामुळेच परकीय भाषेतील साहित्य कला यांचे रूपबंध कळतात आणि राष्ट्राला मोठा फायदा होतो. थोडक्यात, भाषांतरामुळे प्रभाव पडू शकतो.

### ३.३.२.८ प्रत्यक्ष संपर्क

जेव्हा जेव्हा विभिन्न साहित्यक्षेत्रातील घटकांशी प्रत्यक्ष संबंध किंवा संपर्क येतो तेव्हा प्रभाव निर्माण होण्याची शक्यता असते. डॉ. मिरजकर यांनी प्रत्यक्ष संपर्काचे तीन मार्ग सांगितले आहेत.

**१. जीवनचरित्र संबंध**

एखाद्या लेखकाने अन्य भाषांमधील साहित्याचा अभ्यास केलेला असतो किंवा अन्य भाषिक साहित्यिकांच्या सहवासामध्ये काही काळ व्यतित केलेला असतो, त्यामुळे स्वीकारकाच्या साहित्य निर्मितीवर प्रक्षेपकाचा प्रभाव पडणे स्वाभाविक आहे.

**२. भौगोलिक संबंध**

ज्या दोन भाषिकांचे भूप्रदेश शेजारी शेजारी असतात तेथील अनुभवांचे तज्ज्ञच साहित्याचे आदानप्रदान होणे चालू असते. परिणामी, तेथील भाषीक, सांस्कृतिक रचनाबंधाचा प्रभाव परस्पर साहित्यावर पडत असतो. उदा. मराठी व कन्नड साहित्य, मराठी व हिंदी साहित्य, फ्रेंच व इंग्रजी साहित्य.

**३. राजकीय संबंध**

जेव्हा राजकीय कार्यकर्त्यांची भाषा प्रजेच्या भाषेपेक्षा भिन्न असते तेव्हा राजकीय वातावरणामुळे जनतेच्या मनात निर्माण होणाऱ्या न्यूनगंडामुळे राज्यकर्त्यांची भाषा व वाङ्मय श्रेष्ठ ठरते अशी धारणा होते. यातून राज्यकर्त्यांची भाषा व वाङ्मयाचा प्रभाव स्वीकारण्यास आरंभ होतो. उदा. भारतीय भाषांवर इंग्रजी सत्तेचा झालेला प्रभाव.

### ३.३.२.९ नवतेचे आकर्षण

नाविन्याचे आकर्षण हे मानवाला उपजतच असते. तो त्याचा स्वभावधर्म असतो. जेव्हा भिन्न संस्कृती, भिन्न भाषा आणि भिन्न वाङ्मयीन चळवळींचा किंवा प्रवाहाचा नव्याने परिचय वा संपर्क येतो तेव्हा कारणघटक सभोवतीच्या अनुभूतीमध्ये नसतानासुद्धा केवळ नाविन्याच्या आकर्षणामुळे त्या चळवळीचा, वाङ्मयाचा, त्या संस्कृतीचा प्रभाव साहित्यनिर्मितीवर होताना दिसतो. उदा. परदेशी लोक जेव्हा पंढरीची वारी पाहतात तेव्हा त्या वारीचा प्रभाव त्यांवर होणारच किंवा शहरीकरणाच्या आकर्षणातून पडलेला खेड्यावरील प्रभाव.

### ३.३.२.१० आदर्श सर्जनशीलता

एखादा साहित्यकार अथवा एखाद्या भाषेतील साहित्यप्रवाह राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर इतका सुप्रतिष्ठित होतो की, त्याची सर्जनशीलता अन्य भाषांतील साहित्यकार आदर्श म्हणून सतत स्वतःपुढे ठेवतात. उदा. जपानी हायकू प्रकार. या प्रकारात मराठी लेखक काव्यलेखन करताना दिसतात. साहजिकच साहित्यकाराचा प्रभाव त्यांच्या साहित्यात प्रकट होतो. तसेच दया पवार यांचं 'बलुतं' हे आत्मकथन प्रकाशित झाल्यानंतर याच्या प्रभावाने अनेक लेखकांनी आत्मकथने प्रकाशित केल्याचे दिसून येईल. स्वानुभव व स्वतंत्र सर्जनशीलता असली तरी प्रभावातूनच हे लेखन झाले असे म्हणता येईल.

### ३.३.२.११ धर्माचा प्रचार व प्रसार

एखाद्या धर्माचा प्रसार करणे हा हेतू ठेवून जेव्हा साहित्य निर्मिती होते तेव्हा सातत्याने त्या धर्माच्या प्रसारासाठी निर्माते झटत असतात. साहजिकच त्या धर्माचा प्रभाव अशा साहित्यावर असतोच. उदा. जैन साहित्य, बौद्ध साहित्य. संत एकनाथ महाराजांनीही अध्यात्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून भारूडे लिहिली आहेत. सोंगी भारूड म्हणून ती फार प्रभावी व उत्तम आहेत.

### ३.३.२.१२ स्थलांतर आणि संपर्क

भारतातील मोठ्या शहरांमध्ये विविध भाषीक जनसमुदाय एकत्र नांदताना दिसतात. या एकत्र राहणाऱ्या भाषिकांमध्ये साहित्यनिर्मिती करणारेही साहित्यकार असतात. त्यांची आपआपल्या भाषेमध्ये साहित्यनिर्मिती चालू असते. साहजिकच त्या भिन्न भाषांतील साहित्याचे परस्परांवर प्रभाव पडत असतात.

### ३.३.२.१३ वैचारिक प्रभाव

बऱ्याच वेळा समाजात प्रचलित असलेल्या वैचारिक प्रवाहांचा, मतांचा प्रभाव साहित्यावर पडलेला दिसतो. उदा. आंबेडकरांच्या साहित्याचा प्रभाव व मतांचा प्रभाव स्वीकारून अनेक साहित्यिकांनी वाङ्मय निर्मिती केली आहे. याबरोबरच मार्क्सवाद, गांधीवाद, बौद्ध तत्त्वज्ञान, शाहू महाराज, महात्मा फुले यांच्या प्रभावातून साहित्यनिर्मिती होताना दिसते.

### ३.३.२.१४ संकुल प्रभाव

संकुल प्रभाव हा एका घटकाचा पडत नाही तर अनेक घटकांच्या समूहाचा पडतो. उदा. महाकाव्याचा प्रभाव, रचना पद्धती, अलंकारिता, विषय निवड, पांडित्य प्रदर्शन, निवेदन कौशल्य या सर्व घटकांचा मिळून एक संकुल प्रभाव तयार होतो. ग्रीक ट्रॅजेडी, फ्रेंच वास्तववादी साहित्य, आदि महाकाव्ये असे अनेक प्रभावशाली प्रवाह वेगवेगळ्या देशात प्रभावशील होतात. नावीन्य, सामर्थ्य, सौंदर्य ह्या गुणांमुळे हा संकुल प्रभाव पडत असतो. विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकांचा प्रभाव अन्य भाषिक साहित्यावर पडल्याची उदाहरणे अनेकदा आढळली तरी अशा प्रभावाची कारणे भिन्न असू शकतात. प्रभावाचे प्रमाण अथवा व्याप्ती सरसकट सारखीच असते असे नाही. प्रभावाची तार्किक कारणमीमांसा शक्य असतेच असे नाही. परंतु प्रभाव पडल्याची वस्तुस्थिती मात्र जाणवते.

प्रभाव का पडतो, प्रभावाची कारणे कोणती असतात, हे आपण पाहिले. तरीही कधी कधी सैनिकी सक्तीमुळे अर्थात शिस्त, शस्त्रास्त्रे, धडाडी, शौर्य यांच्यामुळेही प्रभाव पडतो. तर कधी प्रभावाचे वलय पूर्वीच्या त्यागामुळे, पराक्रमामुळे व विजयामुळे निर्माण होते. कधी श्रीमंत उमरावांच्या खानदानी परंपरेमुळे, कधी धाडसी लोकांना मिळालेल्या प्रचंड आर्थिक फायद्यामुळे तर कधी यांत्रिक व औद्योगिक प्रगतीमुळे तर कधी साहित्यामुळे प्रभाव निर्माण होत असतो. थोडक्यात, प्रभाव का पडतो हे नेमकेपणाने सांगता येणार नाही तर तो आपल्या कार्यामुळे नेहमी आपणास प्रत्ययाला येत असतो.

### ३.३.२.१५ सांस्कृतिक प्रभाव

वस्तुतः सर्वच सामाजिक संस्था सांस्कृतिक व ऐतिहासिक प्रभावाखाली घडलेल्या असतात. तसेच त्यांच्या कार्यामधूनच संस्कृतीची वाढ झालेली असते. व्यक्ती व समाज यांच्यातील संबंधामध्ये सांस्कृतिकतेचा प्रभाव असतो. कोणताही समाज आजुबाजूच्या अथवा संपर्कातील इतर समाजगटांशी असलेल्या संबंधातून व देवाण-घेवाणीतून, व्यक्तीची नवनिर्माणशीलता व चाकोरीबाह्य वर्तनाची प्रवृत्ती यामधून नैसर्गिक बदलांतून स्वसंस्कृती-मध्ये भर टाकत असतो. मात्र समाजाचा सांस्कृतिक वारसा स्थितीशील असतो. त्यामुळे सांस्कृतिक प्रभाव दीर्घकाळ टिकून राहू शकतो. भारतीय समाजावर झालेल्या खऱ्या आणि धर्मप्रसारार्थ हेतू ठेवून केलेले कार्य यामुळे सांस्कृतिक विनिमयाला हातभारच लागतो. संस्कृती सन्मुखतेतून सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक बदलांमुळे सांस्कृतिक परिणाम घडून येतात. म्हणजे संस्कृती संकर निर्माण होत असतो. पूर्व व पश्चिम यांचा झालेला सांस्कृतिक संघर्ष व समन्वय पाहता सांस्कृतिक प्रभाव लक्षात येईल.

इतर मानव समूहाविषयी, त्याच्या संस्कृतीविषयी माणसाला एक प्रकारची जिज्ञासा आणि कुतूहल असते. दुसऱ्या संस्कृतीच्या ज्ञानाच्या प्रकाशात तो आपल्या समाजाला आणि संस्कृतीला ताडून पाहत असतो. इतरांना जाणून घेण्यात स्वतःची ओळख निर्माण होते असे सांस्कृतिक कुतूहल क्षमविताना त्या संस्कृतीचा प्रभाव पडत असतो. भाषेच्या आदानप्रदानामधून संस्कृतीचा व सांस्कृतिक पर्यावरणाचा विकास होतो. गांधीवाद, मार्क्सवाद, सत्यशोधक समाज, आंबेडकरी चळवळ, स्त्रीशिक्षण यासारख्या विविध सामाजिक आर्थिक व राजकीय चळवळीमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यावरणामध्ये परिवर्तनाची एक लाट आली. ह्या सांस्कृतिक पर्यावरणाचा प्रभाव तत्कालीन साहित्यावर पडलेला दिसतो.

### ३.३.२.१६ अभिरुची प्रभाव

साहित्य आणि संस्कृती यांच्या प्रभावातून, अभ्यासातून आणि संस्कारातून साहित्यविषयक अभिरूची जन्माला येते. अभिरूचीच्या माध्यमातून संस्कृती अभिव्यक्त होते. जीवनशैली आणि मनोरंजनाची माध्यमे यांच्यात जसे अतूट नाते असते, तसेच जीवनशैली आणि अभिरुची यांच्यातही अतूट नाते असते. जीवनशैलीचा प्रभाव बऱ्याच वेळा अभिव्यक्तीवर व समाजाच्या अभिरुचीवर पडत असतो. मानवसमूहाची जीवनशैली त्या मानवसमूहाच्या अभिरूचीला एकतर घडवीत असते किंवा अभिरुचीत बदल तरी घडवीत असते. चोखंदळ अभिरुची असलेली रसिकता एका बाजूला जन्म घेते तर दुसऱ्या बाजूला अभिरुची शून्यता वा अभिरुचीहीनता जन्म घेते. सौंदर्याकडे नेणारी ती अभिरुची असते. अभिरुची संपन्नतेचा आणि संवेदनशीलतेचा घनिष्ठ असा संबंध असतो. ज्यांची अभिरुची उत्तम असते त्या व्यक्तीला श्रेष्ठ कलावंत म्हणून गौरविले जाते. कलाकृतीचा आस्वादक सौंदर्यस्वादाचा श्रेष्ठ आनंद उपभोगत असतो. आस्वाद क्षमतेतून अभिरुची संपन्नता प्राप्त होते. अशा अभिरुचीसंपन्न कलावंतांचा प्रभाव इतर सर्व कला व्यवहारावर होत असतो. वाचक प्रगल्भ बुद्धिमत्तेचा असेल तर पुस्तकातील आशय, विषय, अभिव्यक्ती यांना सहजगत्या आत्मसात करतो. वाचन अभिरुचीमुळे सौंदर्यग्रहण करण्याची क्षमता निर्माण होते. सुयोग्य सांस्कृतिक वातावरणाचा अभिरुचीवर परिणाम घडतो. मागणी तसा

पुरवठा या न्यायानेही वाचकांच्या अभिरुचीनुसार साहित्यिक लेखन करतात. त्यामुळे वाचकांच्या अभिरुचीवर वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक घटक परिणाम करत असतात. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा जनक तेन याने म्हटले आहे की, Every individual is the creation of environment. म्हणजेच व्यक्ती ही जशी पर्यावरणाचे अपत्य असते तशीच व्यक्तिगत अभिरुचीही पर्यावरणातून घडते. अर्थात पर्यावरण बदलले की अभिरुचीसुद्धा बदलते. कालमानानुसार अभिरुचीत बदल होतो. उदा. विष्णुदास भावे यांचे 'तागडथोम' नाटक आणि नंतरचे 'घाशीराम कोतवाल' सारखे नाटक. नाटकांचे बदललेले रूप तत्कालीन सामूहिक पातळीवरील अभिरुचीमध्ये झालेला बदल आपल्या लक्षात येईल. थोडक्यात, अभिरुचीच्या प्रभावातून साहित्यनिर्मिती घडते. साहित्यनिर्मिती अभिरुची घडविण्यास मदत करते असा परस्परावलंबी हा संबंध असतो.

### ३.३.२.१७ सामाजिक प्रभाव

साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य मानले जाते. साहित्य निर्मितीची पाळेमुळे समाजात रुजलेली असतात. तसेच साहित्यिकाची जडणघडण होण्यास तत्कालीन सामाजिक परिस्थिती, विचारप्रणाली त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मय व शैलीविषयक परंपरा इत्यादी घटक कारणीभूत असतात. 'साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वतःची वैशिष्ट्ये पूर्णतः ती जपत असते' हे खरे आहे. पण त्याचवेळी ज्या काळात व ज्या परिस्थितीमध्ये ती निर्माण होते त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा पूर्णपणे ओलांडू शकत नाही. हे मान्यच करावे लागते.

त्या काळाचा वा परिस्थितीचा स्पष्ट-अस्पष्ट प्रभाव साहित्यावर असतो. समाजातील प्रवाह, चळवळी, विकास आदी घटकाबरोबर, स्थानिक ज्ञान, कार्यक्रम, मूल्ये, सेवा योजना, निसर्ग यांचा परिणाम साहित्यावर पडतो.

स्पेनसरची समाजाच्या वर्गीकरणाची पद्धत व कॉम्ते विचारात नमूद केलेले समाजाचे वर्गीकरण यात मोठ्या प्रमाणावर साम्य आढळते. स्पेन्सरने केलेल्या वर्गीकरणाची छाप १९ व २०व्या शतकातील जवळजवळ सर्व विचारवंतावर पडल्याचे दिसते. वस्तुतः सर्वच सामाजिक संस्था सांस्कृतिक व ऐतिहासिक प्रभावाखाली घडलेल्या असतात. तसेच त्यांच्या कार्यामधून सामाजिकतेची वाढ होते. व्यक्ती व समाज यातील संबंध. सामाजिक संस्थांच्या व्यक्तीवर नियंत्रण ठेवतो. व्यक्तीचे व्यक्तिमत्व समाजाला अनुकूल राहील असे नाही. कुटुंब, धर्म इत्यादी सामाजिक नियंत्रणाच्या संस्था व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करीत असतात व त्यांचे काम हे रचनात्मक स्वरूपाचे असते. सामाजिक नियंत्रणातच सांस्कृतिक व्यक्तिमत्व घडत जाते. सांस्कृतिक वारसा हा स्थितीशील असल्याने परकीय संस्कृतीला व्यक्तिमत्वाचा सहसंबंध आल्यास पुढील सामाजिक वर्तनात हा प्रभव प्रखरतेने जाणवतो.

### ३.३.३ प्रभावाचे घटक

प्रत्येक साहित्यातील परंपरा, प्रवाह, तिच्यातील कमतरता, तिच्या गरजा यांच्यामुळे कोणत्याही अन्य भाषिक साहित्याचा व साहित्यिकाचा प्रभाव पडू शकतो. सहज साधर्म्याचे कोडे उकलण्यासाठी जे जे प्रयत्न

झाले व होत आहेत त्यावरून त्या घटकांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कोणताही प्रभाव पाहण्यासाठी त्या प्रभावाचे घटक पाहणे महत्त्वाचे आहे.

**१. मानसशास्त्रीय घटक**

बाह्यसृष्टी आणि मानवी मन यातील संबंधामुळे निर्माण होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांचे स्वरूप सर्वत्र सारखे आढळते. जीवन जगताना मानवाच्या वाट्याला येणाऱ्या अनुभवामध्ये समानता असते. निसर्गातील सूर्य. चंद्र, नदी, निर्झर, फुले पाने, पशू पक्षी इत्यादींच्या दर्शनामुळे माणसांच्या मनाला आनंद होतो आणि या आनंदाचे साहित्यातील स्वरूप कोणत्याही काळात, कोणत्याही देशात समान असू शकेल. मानवी जीवनातील अनुभव आणि मानसिक क्रिया-प्रतिक्रिया यांचा प्रभाव पडल्यामुळे साहित्यामध्ये लक्षणीय साधर्म्य आढळणे वा प्रगट होणे शक्य होते.

**२. मानवविद्याधिष्ठित घटक**

राजनैतिक परिस्थिती, संस्कृती, आर्थिक व्यवस्था, समाज रचना, इतिहास, धर्म इत्यादी बाबतीत ज्या समाजात साधारणपणे समान अवस्था असेल त्या समाजाच्या साहित्यिक परंपरा समान असणे संभवनीय आहे. उदा. कृषीप्रधान समाजरचनेत हर्ष वा विशाद यांची कारणे आणि प्रकटीकरण एक स्वरूपाचेच असणार. उदंड पीक झाल्याचा आनंद भारत देशामध्ये व बल्गेरियामध्ये सारखाच असणार. उद्योगाबाबतही सारखेपणा असेल. गुलामीची पद्धत असणाऱ्या राष्ट्रात मग ते अमेकिरन असो की आफ्रिकन. गुलामाची दुःखे आणि ते व्यक्त होण्याचे प्रकार यात सारखेपणा येणारच. अशा परंपरा समान असतील तर अशा परिस्थितीमध्ये सदृश्य साहित्य निर्माण होणे शक्य आहे.

**३. वाङ्‌मयइतिहासाधिष्ठित घटक :**

प्रत्येक राष्ट्रीय वाङ्‌मयाला विशिष्ट विकास अवस्था असते. त्यामध्ये तफावत व साम्यही असते. विशिष्ट साहित्यविषयक कल्पना, काव्यशास्त्र इत्यादी साधर्म्य असू शकेल. उदा. भारतात मध्ययुगीन साहित्यामध्ये बंगाल, गुजराती, हिंदी, कानडी असे साहित्य विकास पावत असताना प्रबोधनात्मक साहित्य, आख्यानक कविता, या प्रवृत्ती समान आहेत तर गद्य साहित्याचा व नाटकाचा अभाव दिसतो. भक्तीविचार, नितीविचार, अद्वैत तत्त्वज्ञान यांच्या प्रभावात एकरूपता दिसते अथवा भारतीय साहित्याच्या स्थितीमध्ये साधर्म्य दिसते.

**४. वाङ्‌मयीन स्पष्टीकरण :**

कवीवृत्तीचे साम्य, प्रतिभाधर्मातील साम्य, कलाकृतीचा विशिष्ट उद्देश, अथवा पांडित्य या दृष्टीने दोन लेखकांमध्ये संभवणारे साम्य अशा वाङ्‌मयीन कारणांमुळे साधर्म्य उद्‌भवू शकेल. बायबल, वेद, उपनिषदे, उत्पत्ती, स्त्रीपुरुष संबंध, प्रजनन इत्यादी विषयांची आदीम रूपके, इतिहास मानवी जीवनाचा अर्थ माणसाला युगानुयुगे आकर्षित करणारी सनातन कल्पनारूपे आहेत. ही प्रभावाची कारणे अज्ञात राहतात. परंतु भिन्न राष्ट्रीय साहित्यामध्ये साधर्म्य निर्माण करतात.

## ३.४ समारोप

विद्यार्थी मित्रांनो, आतापर्यंत आपण प्रभाव म्हणजे काय ? तो कसा पडतो? तो कोणकोणत्या कारणांमुळे घडून येतो याची माहिती घेतली. खरे तर प्रभाव का पडतो याची कारणे एक एक वेगळी काढून दाखविता येणे अशक्य आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण सविस्तरपणे त्या त्या कारणांचा उहापोह केला आहे. आपण या घटकातून केलेली मांडणी पुढीलप्रमाणे :

प्रभाव संकल्पना

प्रभाव-प्रभाव, साधर्म्य आणि स्वीकार

प्रभव व प्रभवचे स्वरूप

प्रभावाची कारणे

प्रभाव आणि सत्तासंबंध

वाङ्मयीन चळवळी आणि घटनांचा प्रभाव

आंतरराष्ट्रीय संबंध

युगधर्म आणि कालखंड

आदानप्रदान, नवतेचे आकर्षण

अनुकरण, भाषांतर, प्रत्यक्ष संबध

आदर्श सर्जनशीलता, धर्माचा प्रचार व प्रसार

स्थलांतर आणि संपर्क, वैचारिक प्रभाव

संकुल प्रभाव

सांस्कृतिक, अभिरुची, सामाजिक प्रभाव आणि

प्रभावाचे घटक आदी कारणांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न

### ३.५.१ (अ) योग्य पर्याय निवडा.

१. एकोणिसाव्या शतकातील मराठी वाङ्मयावर कोणत्या राजवटीचा प्रभाव दिसतो ?

(अ) मुघल (ब) ब्रिटिश (क) फ्रेंच (ड) डच

२. प्रभाव किती पद्धतीचा असतो ?

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) एक

३. गडकऱ्यांच्या नाटकांवर कोणाचा प्रभाव आहे ?

(अ) शेक्सपीअर (ब) व (क) शॉ (ड) बास्वेल

४. प्रत्येक साहित्यकृतीचे प्रभव कारण कोणते ?

(अ) रूपके (ब) अलंकार (क) शैली (ड) प्रतिमा

५. आदिमूळ सर्जक घटकांना काय म्हणतात ?

(अ) प्रभव (ब) प्रभाव (क) अनुकरण (ड) साधर्म्य

**३.५.२ (ब) चूक की बरोबर ते लिहा.**

१. आदान प्रदानातून प्रभाव घडून येतो.

२. भाषांतराचा साहित्यावर प्रभाव पडत नाही.

३. प्रभावाचे संपर्क हे एक कारण आहे.

४. साधर्म्यात प्रभाव शोधता येत नाही.

५. प्रभव व प्रभाव यांचा एकत्रच विचार करावा लागतो.

## स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ब्रिटिश २. दोन ३. शेक्सपिअर ४. प्रतिमा ५. प्रभव

**(ब) चूक की बरोबर लिहा.**

१. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. बरोबर

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### ३.६.१ प्र. १ : दीर्घोत्तरी प्रश्न

१. प्रभावाची कारणे सविस्तर लिहा.

२. प्रभव व प्रभाव संकल्पना स्पष्ट करा.

३. प्रभावाची राजकीय व सामाजिक कारणे स्पष्ट करा.

४. प्रभावाचे घटक सविस्तर लिहा.

### ३.६.२ प्र. २ : लघुत्तरी प्रश्न

१. प्रभाव आणि सत्तासंबंध स्पष्ट करा.

२. आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधाचा प्रभाव कसा पडतो हे स्पष्ट करा.

३. भाषांतर आणि अनुकरण ही प्रभावाची कारणे स्पष्ट करा.

४. सांस्कृतिक प्रभाव स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

१. तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, आनंद पाटील.

२. तौलनिक साहित्य : मूलतत्त्वे आणि दिशा, वसंत बापट.

३. तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन वाङ्मय, रत्नाकर मंचरकर.

**पूरक वाचन**

१. तौलनिक साहित्य, निशिकांत मिरजकर.

२. वाङ्मयाचे अध्यापन, संपा. द. दि. पुंडे.

* * *

## घटक – ४

# प्रभाव आणि सत्तासंबंध

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.४ राजकीय राजवटी

४.५ राजकीय राजवटी आणि मराठी साहित्यातील प्रभाव

४.५.१ प्राचीन काळातील राजवटी आणि प्रभाव

४.५.२ मध्ययुगीन प्राचीन काळातील राजवटी आणि प्रभाव

४.५.३ आधुनिक काळातील राजवटी आणि प्रभाव

४.६ वाङ्मयीन सत्ताकेंद्रे

४.६.१ भक्तीमार्गाची चळवळ/वारकरी चळवळ यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव

४.६.२ दलित चळवळीचा मराठी साहित्यावरील प्रभाव

४.६.३ ग्रामीण साहित्य चळवळ

४.६.४ स्त्रीवादी साहित्य चळवळ

४.७ सांस्कृतिक सत्ताकेंद्रे आणि प्रभाव

४.७.१ लोकसंस्कृती

४.७.२ धर्म/धार्मिक जीवन

४.७.३ समाजजीवन

४.७.४ भाषा/बोली

४.८ समारोप

## ४.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे -

- राजकीय राजवटींचा आढावा घेणे.
- राजकीय राजवटींचा प्रभावाशी असणारा संबंध अभ्यासणे.
- वाङ्मयीन सत्ताकेंद्राचा प्रभावाशी असणारा संबंध तपासणे.
- सांस्कृतिक सत्ताकेंद्रांचा प्रभावाशी असणारा संबंध अभ्यासणे.

## ४.२ प्रास्ताविक

साहित्यिक आदान-प्रदान प्रक्रियेचे स्वरूप विविधांगी आहे. हे आदान-प्रदान अनेक प्रकारे घडून येते. त्याचा अभ्यास प्रामुख्याने तुलनाकारांनी करण्याचे कार्य केलेले आहे. राष्ट्रीय साहित्यातील आपल्या व परक्या घटकांना अधोरेखित करण्याचे कार्य देखील केले आहे. त्यातून साहित्यातील आदान-प्रदान घटकांचा मेळ घालण्याचे काम झाले आहे. हा मेळ घालताना साहित्यिक प्रभावाची संकल्पना व अभ्यासपद्धती याची मागील घटकांमधून आपण विपूल माहिती घेतली आहे. पॉल वॅन टिघेम, जोसेफ टी शॉ, ॲन बलकियन, ए. एन. वेसेस्लोव्हस्की, हॅरॉल्ड ब्लूम, एव्ह. शेव्हरेल, क्लॅडिओ ग्युलियन, अब्दुल नबी-इस्ताइफ, अमिय देव, स्वपन मुजुमदार, भालचंद्र नेमाडे इत्यादींच्या प्रस्तुत विषयांबाबतच्या विवेचनाचा अभ्यास उपयुक्त ठरला आहे.

प्रभावाचे सखोल आकलन करण्याने आपणास साहित्यकृतीचे आणि लेखकाचे साहित्यपरंपरेतील स्थान निश्चित करण्यास मदत होते. प्रभाव लेखकावर ज्याप्रकारे वर्चस्व गाजवतो हा प्रभाव अनेकदा वाङ्मयीन व सांस्कृतिक सत्ताकेंद्राचा असतो. तसेच साहित्यकृती अथवा लेखक ज्या काळाचे अपत्य असतो त्या काळातील राजकीय सत्ताकेंद्रे ही देखील त्या साहित्यविश्वावर प्रभाव टाकणारी महत्त्वाची घटक असतात.

## ४.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकामध्ये आपण मराठीच्या अभ्यासासाठी प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक अशी कालखंड विभागणी करतो त्याप्रमाणे प्राचीन कालखंडातील राजकीय राजवटी, मध्ययुगीन कालखंडातील राजकीय राजवटी आणि आधुनिक कालखंडातील राजकीय राजवटी अशी विभागणी करणार आहोत. प्राचीन कालखंडातील राजकीय राजवटींमध्ये जनपद मगध, मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादी राजवटींचा समावेश होतो. मध्ययुगीन राजकीय राजवटींमध्ये देवगिरीचे यादव, अल्लाउद्दीन खिलजी, मुहम्मद बिन तुघलक, पोर्तुगीज, विजापूर, मोगल, मराठा (शिवकाल व पेशवेकाल) इत्यादी राजवटींचा समावेश होतो तर आधुनिक राजकीय राजवटींमध्ये इंग्रज व पोर्तुगीज सत्तांचा समावेश होतो. प्रस्तुत विभागणीनुसार आपण राजकीय राजवटींचा प्रभावाशी असणारा संबंध अभ्यासणार आहोत. तसेच वाङ्मयीन सत्ताकेंद्रांच्या स्वरूपामध्ये निर्माण झालेल्या वाङ्मयीन चळवळींचा मराठी साहित्यावरील प्रभाव अभ्यासणार आहोत. त्यामध्ये प्रामुख्याने भक्तीमार्गाची / वारकरी चळवळ, दलित साहित्याची चळवळ, ग्रामीण साहित्याची चळवळ आणि स्त्रीवादी

साहित्याची चळवळ या प्रमुख चळवळींचा प्रभावाच्या अनुषंगाने अभ्यास करणार आहोत. तसेच सांस्कृतिक सत्ताकेंद्रे म्हणून सांस्कृतिक घटकांचा मराठी साहित्यावरील प्रभाव याची पाहणी करणार आहोत.

राजकीय राजवटी, वाङमयीन व सांस्कृतिक सत्ताकेंद्रे यांचा प्रभावाशी असणारा संबंध या बाबींचा परामर्श खालील मुद्द्यांच्या आधारे घेऊया.

## ४.४ राजकीय राजवटी

महाराष्ट्राचा इतिहास इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकापासून उपलब्ध आहे. जनपद, मगध, मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूल, देवगिरीचे यादव, अल्लाउद्दीन खिलजी, मुहम्मद बिन तुघलक, पोर्तुगीज, विजापूर, मोगल, मराठा (शिवकाल व पेशवेकाल), हैद्राबादचा निजाम आणि इंग्रज राजवट इत्यादी राज्यकर्त्यांनी महाराष्ट्राचे विविध भाग वेगवेगळ्या कालखंडात सत्तेखाली ठेवले होते.

प्राचीन काळामध्ये महाराष्ट्राचा कोकण विभाग मौर्य साम्राज्याचा (इ.स.पू. ३२१-१८४) भाग होता तर सातवाहन (साधारणतः इ.स.पू. २२० ते इ.स. २२५) हे महाराष्ट्राचे पहिले ज्ञात राजघराणे होय. वाकाटक (इ.स. २५० ते ५२५) राजघराण्याने विदर्भाचा भाग आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. या काळात प्रामुख्याने साहित्य व कला यांचा विशेष विकास झाला. त्यानंतर कलचुरी राजघराण्याने महाराष्ट्राच्या काही भागांवर राज्य केले. तसेच बदामी चालुक्य आणि कल्याणी चालुक्यांचा काळ इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून साधारणतः बाराव्या शतकापर्यंत राहिला. यादवांनी कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता हस्तगत करून इ.स. ११८९ ते इ.स. १३१० पर्यंत महाराष्ट्रावर राज्य केले.

मध्ययुगीन कालखंड हा प्रामुख्याने इस्लामी राजवटींचा कालखंड होय. १३व्या शतकात महाराष्ट्र प्रथम इस्लामी सत्तेखाली आला. दिल्लीमधून अल्लाउद्दीन खिलजी व नंतर मोहंमद बिन तुघलक यांनी दखखनचा काही भाग ताब्यात घेतला. मोहंमद बिन तुघलक याने आपली राजधानी दिल्ली येथून दौलताबाद येथे हलवली. तसेच बहामनी सुलतानांनी जवळपास दीडशे वर्षे सत्ताकेंद्रे काबीज ठेवण्याचे काम केले. १६व्या शतकापर्यंत दिल्ली-स्थित मुघल साम्राज्यांशी संलग्न इस्लामी राजवटींनी मध्य महाराष्ट्राच्या भागांना व्यापलेले होते. याच कालखंडात महाराष्ट्राच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर व्यापाराच्या हेतूने पोर्तुगीजांनी आपले पाय रोवले होते.

१७व्या शतकाच्या मध्यास पश्चिम महाराष्ट्रात शिवाजीराजे भोसले यांनी मराठा साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. आदिलशाही, निजामशाही आणि मोगल साम्राज्याविरोधात शिवाजीराजांनी मराठा राज्य उदयास आणले. १८ व्या शतकात अनेकविध राजकीय घडामोडीनंतर मराठा राज्याची सूत्रे बाळाजी विश्वनाथ या प्रथम पेशव्याकडे आली. तद्नंतरच्या काळात पेशव्यांचे राज्य महाराष्ट्रामध्ये सुरू झाले. ज्यांनी मराठा साम्राज्याची पताका अटकेपार नेण्याचे धैर्य दाखवले. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात येऊन लष्करी व राजकीय घडामोडींमध्ये शिरकाव केला. मराठे व ब्रिटीश यांच्यात इ.स. १७७७ ते १८१८ च्या दरम्यान तीन युद्धे झाली व तद्नंतर इ.स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी महाराष्ट्राची सत्ता हस्तगत केली. भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यंत महाराष्ट्रामध्ये ब्रिटीश राजवटीचा अंमल राहिला.

## ४.५ राजकीय राजवटी आणि मराठी साहित्यावरील प्रभाव

प्रस्तुत मुद्यांतर्गत आपण कालखंडानुसार प्राचीन काळातील राजवटी, मध्ययुगीन काळातील राजवटी आणि आधुनिक काळातील राजवटी अशी विभागणी करून त्या-त्या कालखंडातील राजवटींचा मराठी साहित्यावरील प्रभाव अभ्यासणार आहोत.

### ४.५.१ प्राचीन काळातील राजवटी आणि प्रभाव

ग्युलियनने 'लिटरेचर ॲज सिस्टिम' (१९७१) मध्ये प्रभावाच्या सौंदर्यशास्त्रावरील निबंधात म्हटले आहे की, ''प्रभावांची प्रत्येक चिकित्सा ही प्रारंभी साहित्यकृतीच्या जन्माची चिकित्सा असते. त्या जननाच्या घटकांचे ज्ञान आणि अर्थनिरूपणाच्या आधारे त्यांचे (प्रभावांचे) भाकीत वर्तविता येते.'' राजकीय राजवटींच्या अनुषंगाने प्रभावाची चिकित्सा करताना प्राचीन काळात म्हणजेच मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य इत्यादी राजवटींमध्ये साहित्यकृतीचा जन्म आढळत नाही. परिणामी तत्कालीन राजकीय राजवटी व मराठी साहित्यातील प्रभाव यांची चिकित्सा करता येत नाही. तद्नंतरच्या काळात देखील प्राचीन राजवटींचा प्रभाव मराठी साहित्यावर उल्लेखनीय असा आढळत नाही. प्राचीन काळात मराठी भाषा जडणघडणीच्या स्वरूपात होती. श्रवण-बेळगोळसारख्या प्राचीन शिलालेखांमधून या राजवटींचा प्रभाव दिसून येतो. मुख्यतः ज्या शिलालेखांमधून मराठी शब्दरूपाने आढळते तेच राज्यकर्त्यांनी निर्माण केलेले दिसून येतात. बाराव्या शतकातील 'विवेकसिंधू' हा मराठीतील प्रथम लिखित ग्रंथ असल्याकारणाने तत्पूर्वीच्या कालखंडाच्या राजवटींचा प्रभाव मराठी साहित्यात विशेष आढळत नाही.

### ४.५.२ मध्ययुगीन कालखंडातील राजवटी आणि प्रभाव

मध्ययुगीन कालखंडामधील प्रमुख राजकीय राजवटींमध्ये यादवराजे, इस्लामी सत्ता आणि मराठा साम्राज्य यांचा उल्लेख करावा लागतो. इसवी सनाच्या तेराव्या शतकातील ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' या ग्रंथामधून यादवकालीन मराठी भाषेचा प्रभाव दिसून येतो. 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' अथवा महानुभाव साहित्य परंपरा यांमधून प्रामुख्याने धार्मिक बाबी केंद्रीभूत असल्याकारणाने राजकीय राजवटींमधील भाषेच्या व तत्कालीन समाजजीवनाच्या प्रभावाव्यतिरिक्त अन्य बाबींचा प्रभाव आढळत नाही. मात्र हरिभाऊ नारायण आपटे यांच्या 'वज्राघात' (१९१५) या कादंबरीवर यादवकालीन राजवटींचा प्रभाव आपणास आढळतो. 'वज्राघात' ही कादंबरी दंतकथाधिष्ठित कलाकृती आहे मात्र त्यामधून १३ व्या शतकातील राजकीय घडामोडींना व देवगिरीच्या राज्याचे लयास जाण्याच्या कारणांना कल्पनेच्या आधारे चित्रित करण्याचे कार्य हरिभाऊंनी केले आहे. राक्षसतागडीच्या लढाईच्या/बखरीचा मूलाधार घेऊन 'वज्राघात' या कादंबरीचे कल्पनाचित्र साकारण्याचे कार्य हरिभाऊ करतात. अशा प्रकारच्या यादवकालीन राजवटींचा प्रभाव अल्पशा प्रमाणात मराठी साहित्यावर दिसून येतो.

इस्लामी राजवटींची मराठी भाषेमध्ये अनेक फारसी व अरबी शब्दांची भर टाकली. इस्लामी राजवटी या जेते होत्या. साहजिकच जेत्यांच्या भाषेचा आणि वाङ्मयाचा प्रभाव जितांच्या भाषेवर व वाङ्मयावर पडतो.

साम्राज्यसत्ता आपली भाषा आणि वाङ्मय जिंकलेल्या प्रदेशात कशा रुजतात, याचा भारताच्या संदर्भातील सुंदर आलेख गौरी विश्वनाथनच्या 'मास्क ऑफ कॉन्क्वेस्ट : लिटररी स्टडी ॲन्ड ब्रिटीश रूल इन इंडिया' (१९८९) मध्ये पाहावयास मिळते. परक्या साम्राज्यशाहीने लादलेली भाषा व वाङ्मय स्वीकारण्यात येते अथवा स्वार्थी आणि संधीसाधू स्थानिक लोक आनंदाने स्वीकारून नवनिर्मितीचा प्रयत्न करतात अथवा मोठ्या प्रमाणावर जेत्यांच्या वाङ्मयाचे अनुकरण करून साहित्यामध्ये घालण्याचे काम करतात. हा जेत्यांच्या भाषा आणि साहित्याचा प्रभाव असतो. इस्लामी राजवटींच्या कालखंडामध्ये प्रामुख्याने अशा प्रकारचे अनुकरणात्मक व जेत्यांच्या भाषा आणि साहित्याच्या प्रभावातून निर्माण झालेल्या साहित्याचा प्रभाव अधिक आढळतो.

संत एकनाथांच्या काळात महाराष्ट्रात इस्लामी सत्ता कार्यरत होती. याच काळात मराठा सरदारांच्या मनामध्ये स्वाभिमानाचे स्फुलिंग निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. याच पार्श्वभूमीवर एकनाथांच्या भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावरील मराठी भाष्यामध्ये व भारूडामध्ये समतेच्या तत्त्वांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. तसेच भारूडांमधून मुसलमानी सत्ताधीशांच्या कट्टरतेवर प्रखर भाष्य करण्याचे काम केले होते. हा तत्कालीन राजकीय बदलांचा प्रभाव होता.

इस्लामी सत्ताकाळ व ब्रिटीश सत्तेचा काळ या दरम्यानचा काळ हा मराठी राजकीय राजवटीचा काळ होय. मराठा साम्राज्याच्या व तद्नंतरच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये शिवकाल व पेशवेकालीन राजवटींचा विशेष प्रभाव मराठी साहित्यावर असलेला दिसून येतो. शिवाजी राजे भोसले हे इतिहासातील प्रभावी व्यक्तिमत्व होय. त्यांच्या कार्याचा आणि तत्कालीन राजकीय घडामोडींचा प्रभाव स्वीकारून अनेक वाङ्मय प्रकारांमधून नवनिर्मिती करण्याचे काम झाले. प्रामुख्याने वीररसपूर्ण कवनांची निर्मिती आणि चरित्रात्मक लेखन यांचा समावेश त्यामध्ये होतो. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, ताराबाई इत्यादींच्या शौर्याचे आणि कार्याचे तसेच राजकीय उलाढालींचे प्रभाव मराठी साहित्यातून विपूल प्रमाणात आढळतो. शिवाजी महाराजांच्या कालखंडाच्या शेवटी तुकारामांसारखे संतकवी उदयास आले. तुकारामांनी आपल्या 'पाइकांचे अभंगा'मधून शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या उपक्रमांबाबत भाष्य केलेले आढळते. हे अभंग सैनिकांशी साधलेल्या संवाद व उपदेश रूपात आहेत. तुकारामांच्या या रचनांमधून तत्कालीन राजकीय व सामाजिक घडामोडींवर प्रकाश टाकण्याचे कार्य झाले आहे. वाङ्मय पद्धतीत प्रभाव प्रक्रिया क्रिया सूक्ष्म पातळीवर चालते याचे उदाहरण आपणास मराठा राजवटींचा मराठी साहित्यावरील प्रभाव पाहिल्यानंतर स्पष्ट दिसून येते. कारण मराठा साम्राज्याच्या शिवकालीन व पेशवेकालीन राजकीय घटनांचा वेध घेणाऱ्या विविध साहित्यकृतींचा अभ्यास केल्यास हा प्रत्यय येतो. नाटक, ऐतिहासिक कादंबरी, कवने इत्यादी प्रकारांमध्ये त्याची अनेक उदाहरणे आढळून येतात. उदा. 'बेबंदशाही', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'ही श्रींची इच्छा' इत्यादी नाटके 'स्वामी, 'झेप', 'झुंज', 'राऊ', 'मंत्रावेगळा', 'पानिपत' या पेशवाई कालखंडाला चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या शाहीर राम जोशी, सगनभाऊ होनाजी बाळा इत्यादी शाहीरांनी रचलेली पोवाड्यासारखी वीररसपूर्ण कवने अशा प्रकारच्या विविध साहित्य प्रकारांमधील मराठ्यांच्या राजकीय राजवटींचा प्रभाव स्पष्टपणे व्यक्त होतो.

### ४.५.३ आधुनिक कालखंडातील राजकीय राजवटींचा मराठी साहित्यावरील प्रभाव

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात येऊन महाराष्ट्र इंग्रजी सत्तेच्या अंमलाखाली आला. एकूणच इंग्रजांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले. या प्रदीर्घ कालखंडामध्ये पाश्चात्य राज्यतंत्राबरोबरच एतद्देशीयांचा परकीय संस्कृतीशी आणि वसाहतवादाशी परिचय झाला. आंग्ल विद्येच्या संपर्काने एतद्देशीयांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रवाह सुरू झाला. प्रथम सुशिक्षित झालेल्या पिढीने इंग्रजांच्या भाषेचे आणि साहित्याचे अध्ययन सुरू केले. परिणामी मोठ्या प्रमाणावर इंग्रजी साहित्याचे भाषांतर आणि अनुकरण मराठी साहित्याचे होण्यास सुरुवात झाली. वि. ब. वनारसे म्हणतात की, ''कालिदास, शेक्सपिअर यासारखे नाटककार आपल्या भाषेत निपजवावे त्यांच्या नाट्यकृतींच्या तुर्जम्यानी आपल्यावर भाषेचे वाङ्मय भूषवावे अशी महत्त्वाकांक्षा तरुण सुशिक्षितांच्या मनामध्ये उद्‌भवू लागली या आकांक्षेने नाट्यवाङ्मयाचा जन्म झाला.'' (वनारसे, वि. ब., मराठी नाट्यवाङ्मयातील वास्तवता : एक मूल्य, सेवा प्रतिष्ठा, पुणे, १९९५, पृ. २९) अशा प्रकारच्या बुकीश नाटकांच्या निर्मितीची प्रेरणा वनारसे नमूद करतात. इब्सेनच्या नाट्यतंत्राने निर्माण झालेली नाटके, शेक्सपिअरच्या भाषांतरित नाट्यकृती इ. भाषांतरित मराठी साहित्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे प्रामुख्याने इ.स. १८१८ ते १८७४ या कालखंडाला 'भाषांतरित युग' असे संबोधले जाते.

भारतात ब्रिटिश व पोर्तुगीजांचे राज्य अधिक काळ राहिले. इंग्रजांच्या संपर्कामुळे एतद्देशीयांच्या अभिरुचीमध्ये आमूलाग्र बदल झाला. इंग्रजांच्या प्रभावातून मराठीमध्ये अनेक नावीन्यपूर्ण बाबींची भर पडली. उदा. महादेव मोरेश्वर कुंटे यांनी आपल्या 'राजा शिवाजी' (१८६९) या खंडकाव्याला इंग्रजी प्रस्तावना लिहिली. शिवाय तिच्यामध्ये काव्याची व्याख्या तसेच अभिरुची या बाबींवर विशेष भाष्य केले. हा सखोल लेखनाचा प्रभाव व साहित्यसिद्धांतांची प्रस्तावनांमधून मांडणी करण्याची पद्धती हा इंग्रजांच्या प्रभावाचा परिणाम होता.

वसाहतीकरण आणि ब्रिटिशांची राजकीय वाटचाल यांच्या खुणा मराठी साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात. ब्रिटिश सत्तेकडून होणारे राजकीय डावपेच, आर्थिक व सामाजिक शोषण यांचे प्रभावातून अनेक साहित्यकृतींनी जन्म घेतला. त्याचबरोबर भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा परंपरांना नष्ट करण्याचे काम इंग्रजांनी केले. त्यांच्या या समाजहितकारक बाबींना पाठींबा देणाऱ्या घटकांना अंतर्भूत करणाऱ्या साहित्याने देखील जन्म घेतला. तसेच इंग्रजी शासकांच्या आणि अधिकाऱ्यांच्या जुलमी प्रवृत्तीचा प्रभाव देखील मराठी साहित्यावर पडलेला दिसून येतो. उदा. विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' या कादंबरीतील 'गोऱ्या सोजिऱ्यां'च्या (सोल्जरांच्या) शोषित प्रवृत्तीचे चित्र. 'बळी' कादंबरीतून येणारी ही वर्णने ब्रिटिशांच्या जुलमी वागणुकीचे आणि तारेच्या तुरुंगासारख्या कायद्यांच्या अंमलबजावणीचे परिणाम होत. शिरूरकरांनी सोलापूर येथील तारेच्या तुरुंगाच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या परिस्थितीतून ही मांडणी केली आहे. हा शिरूरकरांच्या लेखनावर इंग्रजी राजवटीतील समाजस्थितीचा असणारा प्रभाव प्रस्तुत कादंबरीमधून दिसून येतो.

इंग्रजांच्या राजकीय राजवटीच्या विरोधात बंड पुकारणाऱ्यांनी इंग्रज राजवटीचे शोषणात्मक स्वरूप साहित्याच्या रूपात समाजासमोर आणले. त्यासाठी वैचारिक लेखनाचा स्वीकार करून प्रतिकार करण्यात आला.

वृत्तपत्र व नियतकालिकांसारख्या माध्यमातून लेखन करण्याची इंग्रजांची पद्धती अनुसरण्यात आली. अनेक नियतकालिकांचा जन्म झाला व त्यातून विपूल प्रमाणात देशी आणि विदेशी वळणाचे लेखन मोठ्या प्रमाणावर झाले.

एकूणच मराठी साहित्यावर प्राचीन काळापासून महाराष्ट्रावर राज्य केलेल्या राजकीय राजवटींचा प्रभाव असल्याचे दिसून येते. मध्ययुगीन राजकीय राजवटींमध्ये यादवराजे, इस्लामी राजवटी आणि मराठी राजवटी या राजवटींच्या राजकीय घडामोडी, राजकीय व्यक्तिमत्वे, महत्त्वपूर्ण घटना, नाट्यपूर्ण घडामोडी इत्यादींचा प्रभाव प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. तसेच आधुनिक कालखंडामध्ये प्रामुख्याने इंग्रजी राजकीय राजवटीच्या कालखंडाचा समावेश आहे. आंग्ल संपर्कानंतर मराठी साहित्यामध्ये भाषा, अनुकरण, भाषांतर, विविध संकल्पना, सिद्धांत, घटना, व्यक्तिमत्वे इत्यादींचा प्रभाव मराठी साहित्यावर जाणवतो. पाश्चात्य साहित्याचा प्रभाव देखील विशेष असल्याचे दिसून येते.

## ४.६ वाङ्मयीन सत्ताकेंद्रे

प्रस्तुत स्थळी आपण वाङ्मयाच्या अनुषंगाने मराठी साहित्यविश्वात निर्माण झालेल्या परंपरांचा, वाङ्मयीन चळवळींचा आणि प्रमुख विचारधारांचा अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये प्रामुख्याने वारकरी चळवळ, दलित साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ, स्त्रीवादी साहित्य चळवळ इत्यादी.

### ४.६.१. भक्तिमार्गाची चळवळ/वारकरी चळवळ यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव

भारतीयांच्या मागील अनेक शतकांमधील भक्तीमनाचा आणि सर्जनशीलतेच्या उद्रेकातून उदयास आलेली परंपरा म्हणून वारकरी चळवळीकडे पाहावे लागते. महाराष्ट्रामध्ये ही भक्तीमार्गाची परंपरा तेराव्या शतकापासून आढळते. मराठा साम्राज्यकालापासून आधुनिक कालखंडापर्यंत या चळवळीचा मराठी साहित्य परंपरेवर प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. या वारकरी चळवळीचे व्यापकत्व तिच्या ग्रामीण बहुजन समाजामध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याच्या व लोकचळवळीचे स्वरूप धारण करण्याच्या स्थित्यंतरामधून प्रकर्षाने प्रतीत होते. वारकरी चळवळीला मुख्यत्वे गरीब लोकांचा पाठिंबा मिळाला. अधिकारहीन बहुजन समाजाने वारकरी चळवळीस जोपासले व वाढविले. उदारमतवादी धोरणाने वाटचाल करताना या चळवळीने राजकारणाशी अंतर ठेवले तसेच कोणत्याही राजकीय घडामोडींमध्ये सामील होणे व त्यावर भाष्य करणे कटाक्षाने टाळले. जातीभेदासारख्या बाबींना थारा दिला नाही तर सर्व जातीधर्माच्या लोकांप्रती जिव्हाळ्याचे आणि आपलेपणाचे धोरण ठेवले. वारकरी चळवळीने ध्यान, कीर्तन, भजन, वारी इत्यादी साध्यासोप्या आचारधर्मांचा स्वीकार करून मौखिक संस्कृतीचा पुरस्कार केला, हे विशेष होय. या मौखिक परंपरेच्या माध्यमातून वारकरी चळवळीचे विपूल साहित्य निर्माण झाले.

वारकरी चळवळीचे प्रसारक-प्रचारक थोर संत म्हणजे नामदेव. नामदेवाने चौदाव्या शतकाच्या अखेरीस उत्तरेत भक्तिपंथाचा जोरदार प्रसार केला. त्यांच्या या प्रसारातून उत्तर भारतात व्यापक अशी भक्ती चळवळ पसरत गेली. चळवळीचे प्रसार कार्य करताना नामदेवांच्या साहित्यनिर्मितीतून हिंदू आणि मुस्लिमांच्या धर्मांध

प्रवृत्तीस दाखवण्याचे काम केले. नामदेवांकडून अस्पृश्यांना पंथात आश्रय देत कीर्तनातून लोकशिक्षण साधण्याचे क्रांतिकारी कार्य झाले. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगीं ।' असे म्हणताना शिक्षणाचे महत्त्व विशद केले. नामदेवांच्या घरी दासी म्हणून राहणाऱ्या जनाबाई या देखील वारकरी चळवळीच्या कार्यास वाहून घेणाऱ्या महान कवयित्री होत. त्यांनी नामदेवांच्या प्रभावातून व भक्तिमार्गाच्या प्रभावातून नामदेवांविषयी व भक्तीपर अशा अभंगांच्या अनेक रचना केल्या. याच प्रभावातून नामदेवांच्या कुटुंबियांकडून देखील अभंग रचनेचे कार्य झालेले दिसून येते.

नामदेवांचे समकालीन वारकरी असणारे चोखामेळा हे अस्पृश्य महार जातीतील व्यक्तिमत्व आपल्या संतत्वाच्या आदर्शाबद्दल प्रसिद्ध होते. त्यांचा जातीभेदामुळे मोठ्या प्रमाणावर छळ झाला ही बाब समकालीन संत कवीच्या संत कवीच्या अभंगांमधून आपणास दिसून येते. आपल्या छळाला आणि समाजातील विरोधाला स्वतः चोखामेळा यांनी शब्दबद्ध केले तसेच त्यांची पत्नी सोयराबाई, बहीण निर्मळाबाई, भाऊ बंका आणि मुलगा कर्ममेळा या सर्वच कुटुंबियांनी अस्पृश्यतेच्या अमानवी परिस्थितीचे वर्णन आपापल्या अभंग रचनांमधून केले आहे. तद्‌नंतर सुमारे तीन शतकानंतर देहूमध्ये महाकवी तुकाराम यांनी वारकरी चळवळीचा झेंडा प्रबळपणे फडकविला. आपल्या भाषिक सामर्थ्यावर त्यांनी सनातन्यांच्या वर्चस्वाला जोरकस प्रतिकार केला. लोकशिक्षण आणि आत्माविष्कार याद्वारे वारकरी चळवळीचा मोठ्या प्रमाणावर विकास घडवून आणला. चळवळीच्या प्रेरणेतून आणि प्रभावातून उदयास आलेल्या महान संतकवीमध्ये तुकारामांचे स्थान हे अखंड मानवतेचा आदर्श समाजासमोर ठेवणारे असे आहे.

एकूणच संतकवींनी वारकरी चळवळीचे नेतृत्व करताना लोकप्रिय अशा काव्यरचनांचा स्वीकार करून चळवळीच्या प्रभावातून विपूल काव्यरचना केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने नामदेव, जनाबाई, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम इत्यादींच्या विविध काव्यप्रकारातून विपूल रचनांचा समावेश होतो. या चळवळीने भक्तीभावनेस काव्यप्रवृत्तीची जोड देवून मौखिक वाङ्मयाची निर्मिती केली. कालांतराने या मौखिक साहित्यास लिखित स्वरूप प्रदान करण्यात आले आणि मराठी साहित्यविश्वात महत्त्वपूर्ण भर पडण्याचे काम झाले. भालचंद्र नेमाडे म्हणतात की, ''समाजाचे लोकरंजन, तसेच ज्ञानाचे जतन आणि प्रसार ही वाङ्मयाची नैसर्गिक प्रयोजने तर वारकरी साहित्याने पार पाडलीच, पण त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाचे एक साधन म्हणून वारकरी वाङ्मयाने मोठेच कार्य केले. भाषेचा सर्जनशील वापर कृती म्हणून वापरण्याची संतकवींची ही शैलीय योजना अशा रीतीने व्यापक सामाजिक पातळीवर प्रभावी ठरली.'' (नेमाडे, भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ५७) अशा प्रकारे चळवळीच्या प्रभावातून निर्माण झालेल्या संतसाहित्याने मौखिक आणि लिखित संस्कृतीना एकाच वेळी जोडून समाजाशी भावनिक नाते जोडले तसेच प्रबोधनाचे कार्य केले. भक्तीमार्गाच्या चळवळीचे अधिष्ठान घेऊन आविष्काराची विविध तंत्रे अवलंबण्याचे आणि त्याद्वारे शैलीचे प्रयोग करण्याचे काम प्रभावीपणे केले.

### ४.६.२ दलित चळवळीचा मराठी साहित्यावरील प्रभाव

चळवळ ही प्रामुख्याने विशिष्ट तत्त्वज्ञानास अथवा वैचारिक प्रवाहास समाजजीवनामध्ये रुजविण्यासाठी

केलेली कृती असते. समाजातील शोषित अथवा वंचित घटकास निश्चित दृष्टी व उचित जीवनशैली देण्याची भूमिका त्यामध्ये असते. दलित चळवळ ही देखील अशीच विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन आकारास आलेली आधुनिक महाराष्ट्रातील महत्त्वाची चळवळ आहे. या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे आणि त्यांनी मांडलेल्या मानवी जीवनमूल्यांचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

चळवळ आणि चळवळीचे महत्त्वाचे प्रसार साधन म्हणून साहित्याचा उपयोग होतो. तसाच उपयोग दलित चळवळीच्या प्रभावातून उदयास आलेल्या साहित्यातून झाला असल्याचे पाहावयास मिळते. दलित चळवळीच्या प्रेरणेतून आणि प्रभावातून विपूल साहित्यसंपदा उदयास आली. त्यामध्ये प्रामुख्याने कविता, कथा, आत्मचरित्र अथवा आत्मकथने आणि वैचारिक लेखन या वाङ्मयप्रकारांचा समावेश आहे. कवितेमध्ये नामदेव ढसाळ, बाबूराव बागूल, अर्जुन डांगळे, लोकनाथ यशवंत इत्यादी, आत्मचरित्र व आत्मकथनांमध्ये शंकरराव खरात, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, प्र. ई, सोनकांबळे, उर्मिला पवार, इसादास भडके इत्यादी, नाटकाच्या लेखनांमध्ये प्रेमानंद गज्वीचे नाट्यलेखन, कथेमध्ये योगिराज वाघमारे, गौतमीपुत्र कांबळे इत्यादी अनेक लेखकांची यादी तयार होते. शिवाय मोठ्या प्रमाणावर वैचारिक लेखनाचा प्रवाह देखील समृद्ध झालेला पहावयास मिळतो. हा समृद्ध झालेला एकूणच दलित साहित्याचा प्रवाह चळवळीबरोबरच्या अनुबंधातून आकारास आल्याचे दिसून येते. दलित साहित्याची निर्मिती करणारे लेखक हे प्रामुख्याने समाजव्यवस्थेमध्ये आत्यंतिक दुःखदायक व वेदनामय जीवन कंठलेले शोषित होते. तसेच ते चळवळीतील कार्यात सक्रिय सहभागी असल्याचे देखील दिसून येते. त्यामुळे त्यांच्याकडून निर्माण झालेली ही दलित साहित्याची संपदा चळवळीच्या कार्याचे बलस्थान देखील आहे. अर्थातच दलित साहित्य आणि दलित चळवळ या दोन्ही बाबी परस्परपूरक अशा असलेल्या आढळतात.

वेदना-विद्रोह-नकार या त्रयसूत्रीवर निर्माण झालेले दलित साहित्य दलित समाजाने सोसलेल्या अपरंपार दुःखाला तीव्रतेने नोंदविते. गावकुसाबाहेरचे हाल-अपेष्टांचे जीवन, शोषण, अपमान, भूक, अमानवी व्यवहार इत्यादी अस्वस्थ करणारे अनुभव दलित साहित्यामध्ये अंतर्भूत असल्याचे दिसतात. उदा. रुस्तम अचलखांब यांचे आत्मकथन 'गावकी' (१९८३) सत्य आणि प्रांजळपणाचे ब्रीद जोपासणारे असे आत्मकथन आहे. या आत्मकथनाच्या अनुषंगाने लेखन करताना दलित साहित्याविषयीचे भालचंद्र नेमाडे म्हणतात की, ''दलित साहित्याच्या मागे अतिशय प्रखर आणि हिंदुस्थानात अजून कुठल्याही भाषेत व्यक्त होत नाही, अशा प्रकारचा विद्रोह आहे.'' (नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९०, पृ. १७८). अशा प्रकारे अवाङ्मयीन वातावरणातील विद्रोह आणि शोषण वाङ्मयीन वातावरणामध्ये प्रकर्षाने तीव्र वेदनेसह व्यक्त होताना दिसतो. दुसरे उदाहरण म्हणून शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी' या आत्मकथनाकडे पाहू शकतो. वाचकास संयमशीलतेने आपल्या वेदनेच्या विश्वात नेऊन नवीन अनुभव देणारे असे हे आत्मकथन आहे. अक्करमाशी म्हणजे अनौरस संतती. अनौरसपणे महारीण स्त्रीच्या पोटी जन्मलेल्या मुलाच्या पोटी आलेल्या यातनामय जीवनाचे चित्रण हे आत्मकथन करते. तसेच 'तराळ-अंतराळ' सारखे आत्मचरित्र शंकरराव खरातांच्या जीवनलढ्यास मांडते. महार जातीत जन्मलेल्या व शाळेबाहेर बसून शिकलेल्या शंकररावांचा

विद्यापीठाच्या व्हाईस चॅन्सेलर पदापर्यंतचा प्रवास यामध्ये येतो. अशा प्रकारे दलित चळवळीच्या प्रभावातून उदयास आलेल्या असंख्य लेखकांनी आपल्या ललित आणि ललितेतर लेखनाच्या निर्मितीतून मराठी साहित्यविश्वात मोलाची भर टाकली आहे. तसेच आपल्या दुःखमय जीवनास विशाल सामाजिक पटावर स्थान प्राप्त करून देण्याचे काम केले आहे.

### ४.६.३ ग्रामीण साहित्य चळवळ

ग्रामीण साहित्याची चळवळ ही एक साहित्यविषयक चळवळ आहे. ग्रामीण जीवनात निर्माण झालेले असंख्य प्रश्न, विस्थापित ग्रामीणांच्या भाव-भावना, व्यथा-वेदना यांना व्यक्त करून त्यावर उपाययोजना सुचविणाऱ्या साहित्याची आणि साहित्यिकांची ही चळवळ आहे. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिल्यानंतर सर्व राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील लोकांचे लक्ष खेड्याकडे गेले. त्यांच्या कार्याच्या आणि लेखनाच्या केंद्रभागी ग्रामीण जीवन हळूहळू येण्यास सुरुवात झाली. इ.स. १९४० च्या सुमारास मराठीमध्ये खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनातील समस्यांना प्रमुख स्थान प्राप्त झाले. श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' मधून तर बी. रघुनाथ यांच्या साहित्यातून त्या काळातील ग्रामीण व शोषित घटकांचे जिणे मांडण्याचे कार्य झाले. असे असले तरी तत्पूर्वीच्या कालखंडात महात्मा फुले यांनी आपल्या 'तृतीयरत्न' (नाटक) 'शेतकऱ्याचा आसूड' इत्यादी वैचारिक ग्रंथामधून शेतकऱ्यांच्या जीवनास व त्यांच्या दयनीय स्थितीस मांडून ग्रामीण साहित्य चळवळीचा पाया घालण्याचे काम केले होते. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून शेतकरी व कष्टकरी यांच्या दुःखाला वाचा फोडली होती व त्यांच्या प्रबोधनासाठी व उद्धारासाठी लेखन व कार्य केले होते. सत्यशोधक चळवळीतील म. फुल्यांचे सहकारी व शेतकरी जीवनाविषयी तळमळ असणारे कृष्णराव भालेकर यांनी 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी निर्माण करण्याचे काम केले. कालांतराने 'प्रादेशिक लेखन' या सदराखाली येणाऱ्या प्रादेशिक वैशिष्ट्यांसह येणारे लेखन उदयास आले. ज्या लेखनामध्ये विशिष्ट प्रदेशाची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक वैशिष्ट्ये अंतर्भूत होती. ही एकप्रकारे ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी परंपराच होती. उदा. ह. मो. मराठे यांची कोकणची पार्श्वभूमी असणारी 'काळेशार पाणी' ही प्रसिद्ध कादंबरी. अशा प्रकारे ग्रामीण जीवनानुभव, जाणिवा आणि बोलींचा आविष्कार करणारी ग्रामीण साहित्याची चळवळ उदयास आली जिचा प्रभाव मराठी साहित्य निर्मितीवर मोठ्या प्रमाणावर झाला व ज्याद्वारे मराठी साहित्यामध्ये मोलाची भर पडली.

गावपातळीवरचे कलह, राजकारण, ग्रामविकासाच्या नावावर योजना आणि उद्योग यांचे राजकारण, नवे अर्थकारण, पिळली जाणारी सामान्य माणसे, ग्रामीण भागातील धनदांडगी नेते मंडळी व त्यांच्याकडून होणारे शोषण, ग्रामीण जीवनातील श्रद्धा-अंधश्रद्धा, शेतीची हलाखीची स्थिती, शेतमालाचे अत्यल्प भाव, दुष्काळाची दयनीय स्थिती इत्यादी अनेक ग्रामीण समस्यांवरती ग्रामीण साहित्य चळवळीने भाष्य केले. अशा विविध विदारक प्रश्नांना मांडणारे साहित्य निर्माण झाले. त्यामध्ये प्रामुख्याने भास्कर चंदनशिव, रा. रं. बोराडे, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे या सिद्धहस्त लेखकांचा समावेश होतो. या लेखकांनी ग्रामीण साहित्याच्या चळवळीला अधिक व्यापक स्वरूप प्रदान करीत उल्लेखनीय अशी साहित्यसंपदा मराठी

साहित्यविश्वाला बहाल केली. ग्रामीण साहित्य चळवळीच्या माध्यमातून या सिद्धहस्त लेखकांनी ग्रामीण समाजमनाचे प्रबोधन करण्याचे आणि ग्रामीण संस्कृतीस जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. आनंद यादव म्हणतात की, ''ग्रामीण साहित्याची चळवळ ही सबंध महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व वाङ्मयीन जीवनाचे प्रबोधन घडवून उद्याच्या एकसंध मराठी समाजासाठी व्यापक अनुभवांचा वाङ्मयीन पातळीवर शोध घेणारे साहित्य निर्माण करू पाहणारी चळवळ आहे.'' अशा प्रकारचे ग्रामीण जीवनाच्या व्यापक अनुभवांचा अवकाश कवेत घेणारे हे साहित्य चळवळीच्या प्रभावातून विपूल प्रमाणात निर्माण झाले. १९२० साली भा. रा. तांबे यांच्या काव्यसंग्रहातून रसिकांसमोर आलेल्या 'गुराख्याचे गाणे', 'दुष्काळानंतर सुकाळ' यासारख्या कविता जानपद कवितेच्या अंगाने जाणाऱ्या होत्या. गिरीशांची 'भलरी' ही कविता, चंद्रशेखर यांचे 'काय हो चमत्कार' हे खंडकाव्य, गिरीशांचे 'आंबराई' हे खंडकाव्य इत्यादीमधून शेतकरी जीवन-चित्रणाच्या खुणा आढळतात. १९३३ साली प्रसिद्ध झालेला ग. ल. ठोकळ यांच 'सुगी' हा कवितासंग्रह याच प्रयत्नात मोडतो. ग. ह. पाटील यांचा १९३४ साली प्रसिद्ध झालेला 'रानजाई' व १९३८ साली प्रसिद्ध झालेला 'मीठभाकर' हा काव्यसंग्रह ग्रामीण जीवनाचे वर्णन करताना दिसतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये विपूल ग्रामीण साहित्यसंपदेची निर्मिती झाली त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, रणजीत देसाई, अण्णा भाऊ साठे, बी. रघुनाथ, शंकर पाटील, शंकरराव खरात, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, सखा कलाल, द. ता. भोसले, चारुलता सागर, उद्धव शेळके, आसाराम लोमटे इत्यादी अनेक लेखकांनी ग्रामीण साहित्य चळवळीच्या प्रभावातून सकस अशा ग्रामीण साहित्यकृतींची निर्मिती केली. कथा, कविता, कादंबरी, वैचारिक लेखन इत्यादी साहित्यप्रकारांचा वापर करून ग्रामीण साहित्य चळवळीस भरीव असे योगदान दिले.

### ४.६.४ स्त्रीवादी साहित्य चळवळ

पाश्चात्य देशात स्त्रीवादाचा उदय साधारणपणे १९६० च्या आसपास झाला. भारतात स्त्रीवाद इ. स. १९७५ नंतर रुजला. मात्र स्त्रीवादी जाणीव तत्पूर्वी अस्तित्वात नव्हती असे नव्हते तर व्यक्तिगत पातळीवर असणारे दुय्यमत्व, हिनत्व इत्यादी बाबींची जाणीव कमी-अधिक प्रमाणात होती आणि ती साहित्यातून व्यक्त देखील होत होती. मात्र हे स्वरूप सुट्या-सुट्या अनुभवांच्या स्वरूपाचे होते. या जाणीवांच्या मांडणीस व्यापक व संघटित चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. मराठी साहित्यामध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथाद्वारे पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्ध बंडखोरी करण्याचे काम केले. असे असले तरी संपूर्ण स्त्रीजातीला भान येण्यास आणि स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचा खऱ्या अर्थाने उदय होऊन चळवळीचे स्वरूप प्राप्त होण्यास इ.स. १९७५ साल उजाडावे लागले होते.

जगभर पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे. या व्यवस्थेने आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्रीला गौणत्व प्रदान केले आणि स्त्रीचे अस्तित्व तिच्या लक्षणांनी, कार्याने आणि कर्तव्यावर आधारीत असे निश्चित केले. 'स्त्री ही स्त्री म्हणून जन्मतः नाही तर ती घडवली जाते'. हे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉन द बोव्हाचे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणिवेचे महत्त्वाचे सूत्र होय. स्त्री-पुरुष विषमतेची जाणीव,

स्व-अस्तित्वाचा शोध, पुरुष निर्मित स्त्रीत्वाच्या विचारांना तीव्र नकार देणे इत्यादी तत्त्वांवर आधारलेली स्त्रीवादाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. एकूणच स्त्रीवादी चळवळीतून निर्माण झालेले सिमॉन द बोव्हाचे 'द सेकंड सेक्स' या ग्रंथापासून स्त्रीमुक्ती चळवळीच्या साहित्य परंपरेचा प्रारंभ झाला. 'शाश्वत स्त्रीत्व' ही पूर्वग्रहदूषित संकल्पना हद्दपार करण्यासाठी तिने बौद्धिक युक्तिवाद मांडण्याचे काम केले आहे. या स्त्रीवादी चळवळीच्या आणि स्त्रीवादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावातून जगभर तसेच मराठी साहित्यामध्ये विपूल साहित्यनिर्मिती झालेली आढळून येते. स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी समीक्षा हे मराठी साहित्यातील महत्त्वपूर्ण प्रकार स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावातून आकारास आले आहेत. त्याने एक विशाल पट व्यापलेला दिसून येतो. स्त्रियांच्या कथा, कादंबऱ्या, कविता इत्यादी साहित्यांतून त्यांच्या 'स्व'चा शोध कशाप्रकारे घेण्यात आलेला आहे याचे चित्रण आढळते. स्त्रीत्वाची होणारी जाणीव, स्त्रीचे होणारे शोषण, पुरुषप्रधानतेकडून होणारे दडपशाहीचे प्रकार, समाजव्यवस्थेतील अपमानजनक व गौणत्वाचे स्थान इत्यादी बाबींना प्रकर्षाने मांडण्याचे काम या साहित्यातून झाले आहे.

मराठी साहित्यामध्ये स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावाने लेखन करणाऱ्या अनेक लेखिका आढळतात. त्यामध्ये प्रामुख्याने विभावरी शिरूरकर, इंदिरा संत, शांता शेळके, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, अश्विनी घोंगडे, गौरी देशपांडे, सानिया, मधु सावंत, ललिता गादगे इत्यादी महत्त्वपूर्ण लेखिकांनी लेखन केलेले आहे. या लेखिकांनी हाताळलेल्या कथा, कविता, कादंबरी इत्यादी साहित्यप्रकारांमधील लेखन स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावातून झालेले आणि स्त्रीच्या अस्तित्वाविषयी भाष्य करणारे असे आहे. हे एकूण स्त्रीवादी चळवळीतून प्रभावित असणारे, स्त्रीच्या शोषणाचे वर्णन करणारे तसेच स्त्रीमध्ये स्वाभिमानाचे स्फुल्लिंग चेतविणारे अतिशय संवेदनशील असे साहित्यसंपदेचे योगदान आहे.

## ४.७ सांस्कृतिक सत्ताकेंद्रे आणि प्रभाव

'संस्कृती' या संकल्पनेमध्ये विविध अर्थछटा समाविष्ट आहेत. कला व शास्त्रे यामधील उच्च अभिरूचीच्या माध्यमातून आकारास येणारी अभिजात संस्कृती होय. तर एखाद्या समूहाच्या प्रवृत्ती, मूल्ये, ध्येये, प्रथा आणि परंपरा यांना समाविष्ट करणारी लोकसंस्कृती होय. संस्कृतीची दृश्य आणि ज्ञानेंद्रियांना जाणवणारी अशी दोन रूपे देखील कल्पिली जातात. इरावती कर्वे संस्कृती संदर्भात 'भारतीय संस्कृती कोशा'मध्ये म्हणतात की, 'व्यक्ती या घरे, कपडे इत्यादी स्थूल वस्तूंचा उपभोग घेत असतात. हे संस्कृतीचे बाह्य रूप. संस्कृतीचे दुसरे रूप म्हणजे माणसाने सामाजिक जीवन जगण्यासाठी ठरवून घेतलेली रीत होय. योग्य-अयोग्य, पाप-पुण्य इत्यादी संकल्पना तसेच कौटुंबिक नाती, वागणूक इत्यादी गोष्टी या परंपरागत असतात. या गोष्टी माणूस एकटा निर्माण करत नाही. तो समूहाने त्या करत असतो.'' एकूणच संस्कृती ही मानवी जीवनाशी निगडीत अनेक बाबींना अंतर्भूत करून आकारास आलेली संकल्पना आहे.

संस्कृती आणि साहित्य यांचा सहसंबंध मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. तसेच संस्कृतीच्या उपघटकांचा अर्थातच सांस्कृतिक सत्ताकेंद्रे म्हणून कार्यरत असणाऱ्या बाबींचा देखील मराठी साहित्याशी घनिष्ठ संबंध

आलेला दिसून येतो. प्रस्तुतस्थळी या घटकांमधील प्रामुख्याने आपण लोकसंस्कृती, धार्मिक जीवन, भाषा, कला, समाजजीवन इत्यादी घटकांच्या अनुषंगाने थोडक्यात पाहणी करणार आहोत.

### ४.७.१ लोकसंस्कृती

लोकजीवन, प्रथा-परंपरा, सण-उत्सव, देव-देवता, लोकरूढी, लोकगीते, लोककथा, लोककला, लोकसाहित्य इत्यादी घटकांना समाविष्ट करून लोकसंस्कृती आकारास येते. लोकांची वेशभूषा, रहणीमान, खाणे-पिणे, गाणे-बजावणे, मनोरंजनाची साधने, वाद्ये इत्यादी घटकांना लोकसंस्कृतीमध्ये विशेष महत्त्व प्राप्त होते. मराठी साहित्यविश्वामध्ये लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे नवे दालन फार पूर्वीपासून उपलब्ध आहे व त्याची व्यापकता देखील विशाल आहे. रा. चिं. ढेरे, दुर्गा भागवत, प्रभाकर मांडे, गंगाधर मोरजे, विश्वनाथ शिंदे इत्यादी अनेक अभ्यासू व प्रतिभावंत लेखकांनी लोकसंस्कृतीच्या प्रभावातून मराठी साहित्यामध्ये विशेष भर टाकण्याचे कार्य केले आहे. लोकपरंपरेमध्ये महत्त्वपूर्ण असणाऱ्या मौखिक परंपरेला अक्षररूप प्रदान करण्याचे काम त्यांनी केले आहे. मौखिक परंपरेतील गीते, कथा इत्यादी साहित्य लिखित स्वरूपात निर्माण झाल्यामुळे लोकसाहित्याचे एक वेगळे विश्व मराठी साहित्यकृतीत निर्माण झालेले दिसून येते. लोककला व लोकनाट्यांचे स्वरूप प्रकट करणारे साहित्य देखील लोकसंस्कृतीच्या प्रभावातून निर्माण झालेले पहावयास मिळते.

### ४.७.२ धर्म/धार्मिक जीवन

धर्म ही भारतीय समाजजीवनातील महत्त्वाची आणि अतिशय संवेदनशील बाब आहे. आपल्या धर्माविषयी भारतीयांनी प्रगाढ श्रद्धा आणि अभिमान बाळगल्याचे नेहमीस दिसून येते. धर्म हा सांस्कृतिक सत्ताकेंद्रांपैकी महत्त्वाचा घटक आहे. धर्म या सांस्कृतिक सत्ताकेंद्राचा मराठी साहित्यावर कमी-अधिक प्रमाणात प्रभाव असल्याचे दिसून येते. धर्माच्या प्रचारासाठी देखील विपूल प्रमाणात मराठी साहित्यात लेखन झाल्याचे आढळते. तसेच सत्यशोधक चळवळीसारख्या समाजविधायक चळवळींची धर्माचे स्वरूप समजावून देण्याच्या हेतुस्तव विपूल साहित्यनिर्मिती केल्याचे दिसून येते.

धार्मिक रूढी, परंपरा इत्यादी बाबी तसेच विशिष्ट धार्मिक विचारधारेची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मांडणी करणाऱ्या कलाकृती मराठी साहित्यामध्ये विपूल आढळतात. पौराणिक-धार्मिक ग्रंथ, संत वाङ्मय इत्यादी साहित्यनिर्मिती ही केवळ धार्मिक प्रभावातून झालेली दिसते. कथा, कादंबरी इत्यादीमध्ये देखील धर्म या बाबीचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. उदा. 'यमुनापर्यटन' या बाबा पद्मनजी यांच्या कादंबरीमध्ये ख्रिस्ती जीवनाचे वर्णन येते. एकूणच धर्म या सांस्कृतिक घटकाचा मराठी साहित्यावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव आहे.

### ४.७.३ समाजजीवन

साहित्य हे समाजजीवनाचा आरसा आहे. प्रत्येक कलाकृतीमध्ये तत्कालीन समाजजीवनाची विपूल चित्रणे आढळतात. एखाद्या कालखंडामध्ये निर्माण झालेली साहित्यकृती त्या कालखंडातील समाजजीवनाचे चित्र रेखाटण्यास समर्थ असते. उदा. महानुभाव साहित्यामधून बाराव्या-तेराव्या शतकातील समाजजीवनाचे वर्णन

मिळते. तत्कालीन लोकांचे राहणीमान, खाणे-पिणे, पोशाख, रूढी, प्रथा-परंपरा, सण-उत्सव इत्यादी घटकांची तपशीलवार माहिती मिळते. एकूणच आपण असेही म्हणू शकतो की साहित्यकृती आकारास येताना सभोवतालच्या समाजजीवनाच्या प्रभावातून आकारास येते. याबाबत अनेक उदाहरणे मराठी साहित्याच्या निर्मितीपासून पाहावयास मिळतात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संत परंपरेतून निर्माण झालेल्या संत साहित्यात आपणा तत्कालीन समाजजीवनाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. तसेच शाहीरांच्या कवनांमधून पेशवेकालीन समाजजीवनाचे चित्र उभे राहते.

आधुनिक कालखंडामधील समाजजीवनाच्या प्रभावाची उदाहरणे देखील आपणांस मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. अव्वल इंग्रजी कालखंडामध्ये निर्माण झालेल्या साहित्यामध्ये शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, वर्णव्यवस्था इत्यादी सामाजिक समस्यांना अंतर्भूत करणारे साहित्य आढळले तर इंग्रजांच्या शोषित प्रवृत्तीवर प्रकाश टाकून प्रबोधनाचे काम करणारे साहित्य देखील आढळते.

### ४.७.४ भाषा/बोली

भाषा हा महत्त्वाचा सांस्कृतिक घटक आहे तर मराठीच्या विविध बोली या भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्यपूर्ण रूप आहे. मराठी साहित्यामध्ये निर्माण झालेल्या विविध वाङ्मयप्रकारांवर भाषेच्या वैविधतेचा प्रभाव दिसून येतो. त्यामध्ये प्रामुख्याने बोलींचा प्रभाव असणारी विपूल साहित्यसंपदा आपणांस आढळते. वऱ्हाडी, कोकणी, अहिराणी, डांगी इत्यादी विविध बोलींच्या माध्यमातून कथा, कविता, कादंबरी इत्यादी लेखन प्रभावित झालेले दिसून येते. हा प्रभाव त्या-त्या कलाकृतींच्या वेगळेपणाचे कारण देखील ठरलेला दिसून येतो. उदा. वऱ्हाडी बोलीच्या प्रभावातून निर्माण झालेली उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी, महारी बोलीमध्ये असणारे प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन, कोकणच्या भाषिक सौंदर्यासह येणारे गो. नी. दांडेकरांचे लेखन इत्यादी अनेक उदाहरणे देता येतील. भाषिक वेगळेपण आणि बोलींचे गुण यांच्या प्रभावाने समृद्ध अशा अनेक कलाकृती मराठी साहित्यविश्वात आढळून येतात.

## ४.८ समारोप

एकूणच राजकीय राजवटींचा उदय आणि वाटचालीचा तसेच तत्कालीन समाजजीवन व राजकारण यांचा प्रभावाशी कमी-अधिक प्रमाणात संबंध आलेला दिसून येते. तसेच भक्ती संप्रदायाची चळवळ, दलित साहित्याची चळवळ, ग्रामीण साहित्याची चळवळ, स्त्रीवादी साहित्याची चळवळ इत्यादी प्रमुख वाङ्मयीन चळवळीच्या प्रभावातून निर्माण झालेले साहित्य हे विपूल प्रमाणात आढळते. चळवळीच्या विशिष्ट विचारधारेस अनुसरणारे आणि अल्प प्रमाणात प्रभावित असणारे साहित्य मराठी साहित्यविश्वात ज्याप्रमाणे आढळते त्याचप्रमाणे पूर्णतः चळवळीस वाहिलेले साहित्य देखील मोठ्या प्रमाणावर आढळते. वाङ्मयीन चळवळींचा प्रभाव स्वीकारून निर्माण झालेल्या साहित्याबरोबरच सांस्कृतिक सत्ताकेंद्रांचा प्रभाव असणारे साहित्य देखील मराठीमध्ये आढळून येते. त्यामध्ये प्रामुख्याने लोकसंस्कृती, भाषा, समाजजीवन, धार्मिक जीवन इत्यादी घटकांच्या प्रभावातून त्याची निर्मिती झालेली आहे.

## ४.९ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ : वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. ग्युलियनने प्रभावाच्या सौंदर्यशास्त्रावरील निबंध कोणत्या ग्रंथ समाविष्ट आहे ?

२. हरिभाऊ आपटे यांच्या कोणत्या कादंबरीवर यादवकालीन राजवटीचा प्रभाव दिसून येतो ?

३. वारकरी चळवळीचे प्रसारक-प्रचारक थोर संत कोण ?

४. कोणत्या त्रयसूत्रीवर दलित साहित्य निर्माण झालेले आढळते ?

५. बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीमध्ये कोणत्या धार्मिक जीवनाचा संदर्भ येतो ?

**उत्तरे** : (१) लिटरेचर ॲज सिस्टिम (१९७१) (२) वज्राघात (३) नामदेव

(४) वेदना-विद्रोह-नकार (५) ख्रिस्ती

**प्र. २ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. राजकीय राजवटींचे स्वरूप स्पष्ट करून राजकीय राजवटींचा मराठी साहित्यावरील प्रभाव स्पष्ट करा.

२. वाङ्मयीन चळवळीचे स्वरूप स्पष्ट करून वाङ्मयीन चळवळींचा प्रभाव लिहा.

३. प्रमुख सांस्कृतिक सत्ताकेंद्रे मांडून त्यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव लिहा.

**प्र. ३ : टीपा लिहा.**

१. मध्ययुगीन काळातील राजकीय राजवटी आणि प्रभाव

२. आधुनिक काळातील राजकीय राजवटी आणि प्रभाव

३. भक्ती संप्रदायाची चळवळ / वारकरी चळवळ

४. दलित साहित्याची चळवळ

५. ग्रामीण साहित्याची चळवळ

**उपक्रम**

१. मध्ययुगीन समाजजीवनाचा साहित्यावरील प्रभाव अभ्यासणे.

२. दलित साहित्य / ग्रामीण साहित्य चळवळीच्या प्रभावातून झालेल्या लेहखनाची सूची तयार करणे.

३. कला या सांस्कृतिक घटकाचा मराठी साहित्यावरील प्रभाव नोंदविणे.

**साधनग्रंथ**


१. किरवले कृष्णा, दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९६.

२. जहागीरदार चंद्रशेखर (संपा.), तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर १९९२.

३. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

४. पाटील आनंद, तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.

५. पाटील आनंद, ब्रिटीश बॉम्बे आणि पोर्तुगीज गोव्यातील वाङ्मय, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९.

६. मंचरकर रत्नाकर, तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३.

७. मुलाटे वासुदेव, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

# घटक – १
# प्रभाव आणि निर्मितीप्रेरणा

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

- १.३.१ वैचारिक प्रवाहाच्या प्रेरणा
- १.३.२ केशवसूत
- १.३.३ ह. ना. आपटे
- १.३.४ वामन मल्हार जोशी

१.४ सामाजिक/राजकीय घटितांमधील प्रेरणा

- १.४.१ व्यक्तीच्या प्रभावातून प्रेरणा
- १.४.२ महात्मा फुले
- १.४.३ महात्मा गांधी
- १.४.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१.५ साहित्यकृतीच्या प्रभावातील प्रेरणा

१.६ समारोप

१.७ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.८ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.९ सरावासाठी स्वाध्याय

१.१० उपक्रम

१.११ अधिक वाचनासाठी संदर्भ

## १.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१. साहित्याचा प्रभाव आणि निर्मितीप्रेरणांचे आकलन होईल.

२. वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा व साहित्यनिर्मिती यांचे आकलन होईल.

३. केशवसूत, ह. ना. आपटे व वामन मल्हार जोशी यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व उलगडेल.

४. साामाजिक/राजकीय घटितांमधून निर्माण झालेल्या प्रेरणांचे ज्ञान होईल व व्यक्तीच्या प्रभावातून आलेल्या प्रेरणांचे ज्ञान होईल.

५. साहित्यकृतींच्या प्रभावातून आलेल्या प्रेरणांचे ज्ञान होईल.

## १.२ प्रास्ताविक

प्रभाव अभ्यासामध्ये प्रभाव आणि त्यांच्या निर्मिती प्रेरणा हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. व्यक्ती, साहित्यकृती, विचार तत्त्व आणि राजकीय/सामाजिक घटना यांचा साहित्यनिर्मितीवर कसा प्रभाव पडतो याचे आकलन आपण या घटकामध्ये करणार आहोत. तसेच साहित्यकृतीच्या अनुषंगानेही हा प्रभाव अभ्यासणे महत्त्वाचे आहे. वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा पाहत असताना आपणाला केशवसूत, ह. ना. आपटे, वामन मल्हार जोशी यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण व त्यांच्या साहित्यावरील प्रभाव व त्यांचा पुढील साहित्यिक पिढ्यांवर पडलेला प्रभाव पाहावा लागेल. तसेच सामाजिक, राजकीय घटितांमधून आलेल्या प्रेरणा व समाजसुधारकांच्या प्रभावातून आलेल्या प्रेरणा यामध्ये महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा समजून घेणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर या ठिकाणी साहित्यकृतीच्या प्रभावातून येणाऱ्या निर्मिती प्रेरणा यांचाही सांगोपांग विचार केला जाईल.

## १.३ विषयविवेचन

विद्यार्थी मित्रांनो, आपणाला प्रभाव आणि निर्मितीप्रेरणा या घटकाचा अभ्यास करावयाचा आहे. मराठी साहित्यामध्ये अनेक प्रभावातून साहित्यनिर्मिती झालेली आहे. परंतु या ठिकाणी आपणाला १९व्या शतकाच्या पार्श्वभूमीवर वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा तसेच सामाजिक, राजकीय घटितांमधून येणाऱ्या प्रेरणा, व्यक्तीच्या प्रभावातून येणाऱ्या प्रेरणा व साहित्यकृतीच्या प्रभावातील प्रेरणा या मूलभूत घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करावयाचा आहे. वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा जाणून घेऊन त्यामध्ये केशवसूत, ह. ना. आपटे व वामन मल्हार जोशी यांच्या विचाराने प्रभावित साहित्याचा वेध घ्यावा लागेल. वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभावातून मराठी साहित्य कसे बदलत गेले याचाही विचार करावा लागेल. प्रभावाच्या अनुरोधाने रचनाप्रकार समजून घेताना त्या प्रकारात आलेली नवीनता कोणती व तिचा पुढील साहित्यनिर्मितीवर काय परिणाम झाला याचाही विचार करावा लागेल.

### १.३.१ वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा

वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा पाहत असताना आपणाला आधुनिक काळातील भारतीय समाजसुधारणेच्या प्रबोधन पर्वाकडे पाहावे लागेल. ब्रिटिशांनी भारतावर सत्ता स्थापन करून अंमल सुरू केला आणि भारतीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, बौद्धिक, मानसिक क्षेत्रात कमालीचे बदल झाले. इंग्रजांच्या ख्रिश्चन मिशनरी स्कूलमधून शिकलेल्या भारतीय तरुण पिढ्या भारतीय समाजाची चिकित्सा करू लागल्या. पाश्चात्त्य साहित्याची प्रगल्भता-विविधता व अभिजातता याची मोहिनी भारतीय शिक्षित समाजमनावर पडत होती. इंग्रजीतील अनेक साहित्य प्रकार भारतीय लेखक हाताळू लागले होते. भाषांतर, रूपांतर व अनुवाद या साहित्यिक घडामोडींना बहर आला होता. कधी नव्हे एवढे ज्ञानाचे, कलेचे व बुद्धीचे स्फोट होऊन भारतीय समाजमनावर आदळत होते. इंग्रजांच्या सत्तास्थापनेनंतरच्या काळात भारतीय समाज ढवळून निघाला होता. वैचारिक व बौद्धिकदृष्ट्या नवविचारांना पालवी फुटत होती व समाजमन परंपरांमधून बाहेर पडू लागलेले होते. जगावर मानवतावादी मूल्यांचा प्रभाव टाकणारा थॉमस स्पेन यांचा 'मानवी अधिकार' हा ग्रंथ भारतीय समाजसुधारकांना प्रबोधन आणि परिवर्तनाच्या दृष्टीने मार्गदर्शक होता. इंग्रजांनी स्त्री शिक्षणाला चालना दिल्यामुळे स्त्री-पुरुष तुलना होऊ लागली होती व स्त्रिया आपले प्रश्न मांडू लागल्या होत्या. विज्ञानवादी, बुद्धिवादी, ऐहिकवादी, धर्मनिरपेक्ष व जातविरहित समाजाचा प्रवास सुरू झाला होता. महात्मा फुले यांच्या सुधारणावादी चळवळीमुळे आगरकर, केशवसूत, ह. ना. आपटे, वा. म. जोशी इ. मंडळी नव्या मूल्यांना कवटाळत होती. महात्मा गांधी यांचे राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्य चळवळ, टिळकांची स्वदेशी चळवळ, तसेच कृतीशील सुधारकांच्या प्रबोधनपर लेखनाने एका प्रबोधनाच्या टप्प्यावरती भारतीय साहित्य येऊन ठेपले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्पृश्यता निवारणाची चळवळ, अस्मितेची आंदोलने माणुसकीची हाक देत होती. याचा परिणाम भारतीय साहित्यावर होत होता. फुले, आगरकर, आंबेडकर यांचा वैचारिक वारसा जपणारे विद्वान निर्माण झाले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून माणूस, निसर्ग व समाज यांच्याकडे साहित्यिकांचा बघण्याचा दृष्टिकोन विशाल होत होता. महात्मा फुले, महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव साहित्य, समाज व संस्कृती एकूण भारतीय साहित्यावर पडलेला आहे. त्या सर्वच प्रभावित साहित्यिक व त्यांच्या वैचारिकतेचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

### १.३.२ केशवसूत

केशवसुतांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी मालगुंड, जि. रत्नागिरी येथे झाला. त्यांचा विवाह १८८१ किंवा १८८७ दरम्यान केशव गंगाधर चितळे यांच्या कन्येशी झाला. त्यांचे १८८१ पर्यंतचे सर्व शिक्षण खेड जिल्हा रत्नागिरी येथे झाले. नंतर ते १८८२ साली बडोद्यास थोरले बंधू श्रीधरपंत यांच्याकडे इंग्रजी शिक्षणाकरिता गेले. परंतु श्रीधर पंत यांच्या निधनानंतर १८८३ साली वर्धा आणि नागपूर येथे इंग्रजी शिक्षणासाठी गेले. तर १८८४ साली पुणे येथे शिक्षणाकरिता आले. येथे प्रथम ते सरकारी हायस्कूलमध्ये १८८४ मध्ये न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजी चौथीत दाखल झाले. १८८९ साली त्यांनी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण केली. १८९०-९६ या कालावधीत त्यांनी मुंबई येथे निरनिराळ्या प्रकारच्या नोकऱ्या केल्या. दरम्यान

१८९२-९३ मध्ये काही दिवस सावंतवाडी येथे नोकरी केली. १८९३ ला मुंबई येथे संसारास प्रारंभ केला. १८९७ ला प्लेगमुळे मुंबई सोडून भडगाव, खानदेश येथे ए. व्ही. स्कूल येथे हेडमास्तर म्हणून काम केले. १९०३ च्या एप्रिल पासून धारवाड येथे सरकारी हायस्कूलमध्ये मराठीचे शिक्षक म्हणून काम पाहिले. १९०५ साली ७ नोव्हेंबर या दिवशी हुबळी येथे चुलते हरि सदाशिव दामले यांच्याकडे वयाच्या ३९ व्या वर्षी प्लेगने त्यांचा मृत्यू झाला. (हरपले श्रेय : संपा. रा. श्री. जोश, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९८५, केशवसुतांचा चरित्रपट).

अर्वाचीन मराठी कवितेमध्ये आधुनिक विचाराचा व वादग्रस्त कवी म्हणून केशवसुतांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी मराठी कवितेत केलेल्या क्रांतीमुळे मराठी काव्य बंधमुक्त झाले. त्यांच्या काव्यप्रवृत्तीबद्दल अनेक प्रकारे साधक-बाधक चर्चा झाली. काहींनी आक्षेप घेतले तर काहींनी या बदलांचा स्वीकारही केला. मराठी कवितेच्या बाबतीत जाणीवपूर्वक बदल करण्याचे श्रेय केशवसूत यांनाच जाते. त्याचे कारण सुरुवातीच्या काळात आर्या व श्लोक सदृश्य लेखन करणारे केशवसूत पुढे स्फूट रचना व आत्मलेखाकडे वळले. त्याचदृष्टीने त्यांनी काही भाषांतरित इंग्रजी पुस्तके वाचल्याने त्यांच्या जाणिवा प्रगल्भ झाल्या. 'नवी काव्ये' व 'दुर्मुखलेला' या दोन कविता त्यांच्या आत्मलेखनाची जाणीव करून देतात. त्यांच्या काव्यलेखन प्रवृत्तीवरती इंग्रजीतील सुनित काव्यप्रकाराचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. केशवसूतांनी हे पाश्चात्त्य वळण स्वीकारल्यामुळे त्यांच्या कविता अनुकरणशील व अनुवाद केलेल्या असल्यासारख्या झाल्या आहेत, असा काही वाचकांचा समज झाला. अशा भाषांतरित, अनुवादित किंवा रूपांतरित स्वरूपाच्या त्यांच्या पंचवीस एक कविता आहेत. त्यांच्या इंग्रजी वळणाच्या काव्यप्रवृत्तीबद्दल, रा. श्री. जोग म्हणतात, ''आपले काव्य इंग्रजी वळणाचे व्हावे ही कल्पना इंग्रजी कवितेच्या अभ्यासाने केशवसुतांच्या मनात अधिक दृढ व्हावी हे स्वाभाविक होते. त्या वेळच्या त्यांच्या शालेय अभ्यासक्रमात कोणती कविता अभ्यासाकरिता होती हे निश्चित सांगता न आले तरी शेली, कीटस्, वर्डस्वर्थ या इंग्रजी रोमँटिक कवींच्या दीर्घ रचनेपेक्षा शेली-वर्डस्वर्थ यांची स्फूट रचनाच निदान केशवसुतांना आकृष्ट करिती झाली हे उघड आहे. ही कविता बहुतेक सारी पालग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी' मध्ये समाविष्ट झाल्यामुळे माडखोलकरांनी केशवसुतांचे इंग्रजी कवितेचे वाचन गोल्डन ट्रेझरीपलीकडे गेले नसल्याचे विधान केले आहे. ते खरे नसले, तरी केशवसुतांचा मनःपिंड या रोमँटिक कवितेवर पोसला गेला हे स्पष्ट आहे व मराठी कवितेला ते वळण लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केशवसुतांनी त्यामुळे केला असे म्हणावयास काहीच हरकत नाही.'' (हरपले श्रेय : संपा. रा. श्री. जोग, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९८५-प्रस्तावना) रा. श्री. जोग यांचे मत रास्तच आहे.

वैचारिक प्रभावाच्या दृष्टीने केशवसुतांच्या कवितेचा विचार केल्यास त्यात सुधारकी बाणा दिसतो. त्या काळात पुढच्या समतावादी समाजाची स्वप्ने पाहणारा कवी काळाच्या पलीकडे जाऊन माणसाचा विचार करत होता. मराठी कवितेला आधुनिक रूप देऊन नवा आयाम देत होता, हे लक्षणीय म्हणावे लागेल. जगातील लोकशाहीपूरक राजकीय व सामाजिक रचनेची नांदी समतेच्या दिशेने निघाली आहे हे केशवसुतांना कळले होते. हे विशेषच म्हणावे लागेल. त्यांची कविता नव्या जगाचा, नव्या माणसाचा, नव्या समाजाचा शोध घेत

होती. याविषयी गजानन कामत म्हणतात, ''ब्रिटिश शिक्षणाच्या परिणामाने महाराष्ट्रीय मनोभूमिकेत घडून आलेल्या बदलांचे स्वरूप अजून साकल्याने आलेखित झालेले नाही. ब्रिटिशांच्या संपर्कामुळे वर्णव्यवस्थेपासून वर्गव्यवस्थेकडे झुकलेल्या आपल्या समाजाने काय कमावले व काय गमावले' याचा हिशोब अजून व्हायचाच आहे. तो पक्का झाल्याशिवाय केशवसुतांच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासांतून निर्माण झालेले सुधारकी विचार व ते विचार निर्माण करून आचरणांत आणणारा महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय हाच केशवसुतांच्या कवितेचा खरा सांस्कृतिक संदर्भ आहे. या संदर्भात केशवसुतांचे काव्यकर्तृत्व तपासून पाहण्याचा प्रयत्न गेल्या साठ वर्षांत झालेला नाही. उलट आगरकर हे केशवसुतांचे शिक्षक होते व त्यांची मते केशवसुतांच्या काही कवितांत व्यक्त झालेली आढळतात. एवढेच नमूद करून हा व्यापक प्रश्न डावलला असल्याचा आढळतो. अशा उथळ समीक्षेमुळे केशवसुतांच्या अनेक ठळक वैशिष्ट्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. व्यवहारवादी जाणीवपद्धती व प्रतीकवादी (काव्यात्म) जाणीवपद्धती यांच्यातील भेदाचे केशवसुतांनी वारंवार केलेले प्रतिपादन हे यातील दुर्लक्षित असे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.'' 'केशवसुत कसले गेले : संपा. वसंत दावतर, आलोचना प्रकाशन, मुंबई दु. आ. १९९०, पृ. ९५) दावतर यांचे निरीक्षण सूक्ष्म स्वरूपाचे होय.

कवितेसारख्या छोट्या प्रकारातून जीवनविषयक, काव्यविषयक विचार देण्याचे महान कार्य केशवसुतांनी केले आहे. जीवनव्यवहार व कविता यांतील फरक समजण्यात दिशा दिग्दर्शन करण्याचे काम त्यांनी विविध प्रकारच्या काव्यनिर्मितीतून केल्याचे दिसून येते. 'दिवस आणि रात्र', 'कवितेचे प्रयोजन', 'कवि', 'आम्ही कोण?' इ. कविता यांचे उदाहरण म्हणून देता येतील. त्यांचे काव्यलेखन जरी अल्पप्रमाणात असले तरी मनुष्य, समाज आणि निसर्गविषयक जाणिवांना प्रगल्भ करणारे होते. समाजातल्या अनिष्ट, कालबाह्य व जीर्ण प्रथांना हद्दपार करायला सांगून नव्या समतावादी, निधर्मी व मानवतावादी विचारांच्या स्वरूपात आचरण करायला लावणारे त्यांचे विचार क्रांतीकारक होते. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील कटू अनुभवांचे कधीच प्रदर्शन केले नाही उलट स्वतःबरोबर समूहमनाचा कानोसा घेताना डोळसपणे आत्मशोध व समूहशोध घेण्याची जीवनवादी अशी परंपरा निर्माण केली. याचा आदर्श आपणाला पुढे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्यात दिसून येतो. ब्रिटिशांची शिक्षणप्रणाली व सुधारकांचा बाणा यातून ब्रिटिश जडवाद व विवेकवाद जरी डोकावत असला तरी बुद्धिवादाच्या नावाखाली संशयवाद व व्यवहारवाद यांचे अवडंबर माजवून काव्यद्रोह करणे हिताचे नाही किंवा मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीची री ओढून संस्कृतीच्या विकासाबरोबर काव्याला अधोगती प्राप्त होते, हे चिपळूणकरांचे मत केशवसुतांना अजिबात मान्य नव्हते. तर संस्कृतीच्या विकासात काव्याचे महत्त्व अधिक असते हे काव्यनिर्मिती करून केशवसुतांनी पटवून दिले. केशवसूत बुद्धिवादी, धर्मनिरपेक्ष व विज्ञानवादी होते. त्यांनी संस्कृती विकास व काव्यनिर्मिती यामध्ये फरक न करता कविता या माध्यमाचा समाजप्रबोधन व परिवर्तनासाठी सुयोग्य वापर करून घेतला. याबद्दल गजानन कामत म्हणतात, ''हा जडवादी व अनुभववादी दृष्टिकोन आचरणात आणणारा माणूस हा व्यवहारवादी व काव्यद्रोही बनणे अपरिहार्य असते. काव्य ही वस्तू नसते व पुरेसे पसरट, भावविवश आणि गुळमुळीत असल्याशिवाय काव्यापासून आनंदही निर्माण होत नसतो. कवडी मोलावर मूल्ये विकून टाकण्यास निघालेल्या या दृष्टिकोनाचा धोका जाणवताच त्याला

विरोध करण्याची केशवसुतांना अत्यंत निकडीची आवश्यकता भासू लागली. संस्कृती आणि काव्य यांच्या परस्परसंबंधासंबंधीचे चिपळूणकरी विचार खोडून काढण्यासाठी त्यांनी 'कवितेचे प्रयोजन', 'कवि', 'आम्ही कोण?' यासारख्या काव्यविषयक कविता लिहिल्या, तर व्यवहारवादाला विरोध करण्यासाठी त्यांनी आपले सर्व काव्यच खर्ची घातले. 'झपूर्झा' ही कविता या त्यांच्या प्रयत्नांची संप्रृक्त प्रतिमा आहे.'' (केशवसूत गाऊनी गेले – संपा. वसंत दावतर, आलोचना प्रकाशन, मुंबई, दु. आ. –१९९०, पृ. ९७). गजानन कामत यांचे मत केशवसूती विचार सुधारकी बाणा व्यक्त करणारे आहे. केशवसुतांना कविता हा प्रकार आवडीचा होता. काव्याच्या चर्चेत त्यांना व्यवहाराचे भानही राहत नसे. अत्यंत साधेपणा, अबोल, उदास वाटणारा हा माणूस मुलांशी बोलायचा, त्यांच्या खोड्या काढायचा म्हणूनच त्यांनी 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' असे म्हटले असावे. उदास व अगतिक मनःस्थितीत आत्मशोध घेताना ते काव्यनिर्मितीत रंगून जात. याबद्दल वि. स. खांडेकर म्हणतात की, ''त्यांच्या मनाला स्वाभिमानाचा विलक्षण पीळ होता. उदात्ततेचे मोठे आकर्षण होते. तत्कालीन समाजातल्या प्रौढ पांढरपेशा लोकांच्या तोंडात नाना प्रकारचे अपशब्द किंवा अभद्र शब्द असत. पण केशवसुतांना वेडावाकडा शब्द विशेषतः बायकांना उद्देशून बोललेला मुळीच खपत नसे.'' (केशवसुत : काव्य आणि कला, संपा. वि. स. खांडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ. आ. जून २००१, पृ. १०) या ठिकाणी केशवसूत हे सुसंस्कृत व स्वाभिमानी व्यक्तिमत्त्व असल्याचे दिसून येते. त्यांच्या संपूर्ण काव्यरचनेवर मानवतावादी आचार–विचारांचा प्रभाव होता. सुधारकी व विज्ञानवादी विचार यांची कास धरून काव्यनिर्मिती करणारे केशवसूत चिकित्सक व बुद्धीप्रामाण्यवादी व्यक्तिमत्त्वाचे होते. याचा परिणाम पुढे गोविंदाग्रज, बालकवी, मर्ढेकर इ. कवींच्यावर पडलेला दिसून येतो. केशवसुतांच्या कवितेला माणूस केंद्रितता हे वैशिष्ट्य लाभलेले आहे. जातिविरहित समाज व निधर्मी माणसाचे स्वागत करणारी ही कविता सामाजिक प्रश्न केंद्रभागी ठेवणारी आहे. याचा हुंकार महात्मा फुले यांच्या अखंडात व सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून आलेला दिसतो. नव्या युगाची चाहूल लागलेले हे कवी मराठी काव्याला नवे वळण देऊ पाहत होते हे मान्य करावे लागेल. हीच बाजू केशवसूतांनी आपल्या काव्यनिर्मितीच्या माध्यमातून रुजवलेली दिसून येते. समाजातील स्थित्यंतरांवर कलावंताने नजर ठेवून व नजर रोखून बघायचे असते. त्याशिवाय त्याला बदलांचे भान येत नाही. केशवसूत यांचे काव्य व तो कालखंड असा नजर रोखून बघण्याचा होता. याबद्दल प्रा. डॉ. पारसे म्हणतात, ''केशवसुतांचा कालखंड हा नवविचारांचा आणि नवकल्पनांचा होता. त्यांनी आपल्या अभिजात प्रतिभेने, 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'तुतारी', 'नवा शिपाई', 'गोफण', 'मूर्तीभंजन' इत्यादी कवितांतून नवा सामाजिक विचार मांडला आणि दैनंदिन व्यवहारातील साधा विषय सुद्धा उत्तम कवितेचा आशय होऊ शकतो हे प्रथम मांडले व यातूनच मराठी कवितेला नवे वळण मिळाले. म्हणून ते अर्वाचीन मराठी कवितेचे नव्या युगाचे उद्गाते झाले. ('दलित कवितेतील अस्मिता – डॉ. बिरा पारसे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००८, पृ. ९२, ९३)

इंग्रजी काव्याच्या वाचनामुळे केशवसुतांच्या काव्यनिर्मितीच्या जाणिवा विस्तृत होऊ लागल्या. आगरकरांचा सुधारणावादी विचार व विज्ञानवादी दृष्टिकोन यांचा प्रचंड प्रभाव केशवसुतांवर होता. भारतात व महाराष्ट्रात सुधारकांनी केलेली वैचारिक व कृतिशील आंदोलने व केशवसुतांचे विविध ठिकाणी झालेले वास्तव्य तसेच प्लेगच्या साथीने मनुष्याच्या जीवनातील अगतिकता या सर्व गोष्टी केशवसुतांच्या चिंतनाचा विषय होत असताना साहजिकच ईश्वर कल्पनेवरचा त्यांचा उडत चाललेला विश्वास त्यांच्या काव्यनिर्मितीला खतपाणी घालत होता. इथल्या विषम व्यवस्थेने माणसाचे झालेले विग्रहीकरण, वियुक्तीकरण ते पाहात होते. त्यातच शिक्षणाअभावी सर्वसामान्य माणसाच्या, मजुरांच्या कष्टकऱ्यांच्या जीवनातील हाल त्यांना पाहावत नव्हते. दलित, उपेक्षित, वंचित माणसाच्या अधोगतीला इथली दैववादी, विषम व चातुवर्ण्य व्यवस्था कशी कारणीभूत आहे यातील समाजविज्ञानवादी विचार केशवसुतांच्या मनाला ढुसणी देत होता. त्यामुळेच केशवसूत स्वतःबरोबर समूह मनाचाही कानोसा घेत होते. याबद्दल वि. स. खांडेकर म्हणतात, ''केशवसूत वैयक्तिक दुःखाच्या बाबतीत जितके हळुवार, तितकेच सामाजिक दुःखाच्या बाबतीत झुंजार होते. जणू काही प्राजक्ताची फुले आणि हिरकण्या यांचे एक विलक्षण रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या रूपाने साकार झाले होते. त्यांच्या आत्मपर लेखनात जे उदास वातावरण आहे त्याचा वासवारा सुद्धा त्यांच्या सामाजिक कवितेला लागलेला नाही. तिथे ते आशावादाचे निशाण घेऊन आपल्या देशबांधवांना आवाहन करीत असलेले दिसतात. (केशवसूत : काव्य आणि कला, संपा. वि. स. खांडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ. आ. २००१, प्रास्ताविक पृ. ४५)

केशवसुतांच्यावर आगरकरांच्या 'सुधारक' मधील लेखांचा मोठा प्रभाव होता. भारतीय विषम समाजव्यवस्थेवर आगरकरांनी आपल्या लेखणीद्वारे मोठे आघात केले. त्या विचाराने केशवसूत समाज-परिवर्तनवादी व ऐहिकतावादी दृष्टीने विचार करून आपल्या कवितेद्वारे समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होते. याबद्दल वि. स. खांडेकर म्हणतात. ''सामाजिक दुःखाच्या, अन्यायाच्या आणि विषमतेच्या चिंतनाने विद्ध आणि क्षुब्ध झालेल्या केशवसुतांच्या मनाला आगरकरांच्या असल्या निर्भीड व सडेतोड लेखांनी निःसंशय चालना दिली असली पाहिजे. १८८८-१८९३ या काळात सामाजिक म्हणता येईल, अशी एकही कविता त्यांनी लिहिली नाही. पण १८८८ साली जी कविता त्यांनी लिहिली ती 'अत्यंजाच्या मुलाचा प्रश्न' व 'मजुरांवर उपासमारीची पाळी' यांपेक्षा अगदी भिन्न होती. ती म्हणजे 'तुतारी'. पूर्वीच्या कवितांत कारुण्याला आवाहन होते. या कवितेत वीरत्वाला आहे. आगरकरांच्या गद्यातला जोश या कवितेच्या कडव्या-कडव्यात संचारला आहे. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी। जाळुनी किंवा पुरूनी टाका!' 'रूढी, जुलूम यांची भेसूर। संताने राक्षसीं तुम्हाला। फाडुनी खाती ही हतबला। जल्शाची काक्ष पुसा मनाला।' 'पुराण पडक्या सदनीं का रे। भ्याड बसुनीया रडतां पोरे?' अशा किती ओळी द्याव्यात? तुकोबाचे काही अभंग आणि रामदासांचे निवडक मनाचे श्लोक यांच्याप्रमाणे प्रत्येक मराठी मुलाला 'तुतारी' ही मुखोद्गत असायला हवी.'' (केशवसूत : काव्य आणि कला - वि. स. खांडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ. आ. जून २००१, पृ. ५१, ५२) आगरकरी विचारांचा प्रभाव असणारी ही कविता समतेचा स्वीकार करण्यासाठी सामाजिक मन तयार करते. त्यांच्या सामाजिक मतांचा प्रेम व निसर्गविषयक जाणिवांचा टप्प्याटप्प्याने विकास होत गेला. त्यांना विद्यार्थी

दशेत देवाविषयी जी चैतन्यवादी अनुभूती जाणवत होती, 'देवळी त्या देवास बळे, आणा परी राहे तो सृष्टीमध्ये राणा' (एक खेडं) ती सामाजिक उपेक्षितता, वंचना, सुखदुःखाच्या निरीक्षणाने, वाचनाने, आधुनिक विचाराने बदलत गेलेली आहे, असे जाणवते. उदा. 'देव-दानवां नरें निर्मिले हें मत लोकां कवळू द्या' खांडेकर यांच्या मते, ''केशवसूत रूढ अर्थाने आस्तिक नव्हते. ते अज्ञेयवादी होते. बुद्धिवादाकडे आकृष्ट झालेल्या महाराष्ट्राच्या मध्यम वर्गात ते जन्माला आले. इतकेच नव्हे, तर बुद्धिवादाची निष्ठापूर्वक उपासना करणाऱ्या आगरकरांची शिकवण त्यांनी आत्मसात केली आणि ओजस्वी सामाजिक कवितांच्या रूपाने ती जनमनापर्यंत नेऊन पोहोचविली. त्यांनी आमरण अत्यंत निष्ठेने उपासना केली, ती कवितेची, काव्य हाच त्यांचा वेदांत आणि तेच त्यांचे अध्यात्म होते.'' (तत्रैव पृ. ६१) खांडेकरांचे मत साक्षेपी स्वरूपाचे आहे.

केशवसुतांच्या कवितांचे वर्गीकरणात्मक स्वरूप पुढीलप्रमाणे :

**(अ) आत्मनिष्ठ कविता** : गोष्टी घराकडील, नैर्ऋत्येकडील वारा, आईकरिता शोक, दुर्मुखलेला.

**(ब) काव्यप्रयोजन विषयक कविता** : फुकट दवडलेला तास, कविता आणि कवी, कवितेचे प्रयोजन, काव्य कोणाचे, सृष्टी आणि कवी, दूर कोठे एकला जाऊनिया, शब्दांनो मागुते या, दिव्य ठिणगी, सृष्टी तत्त्व, आणि दिव्यदृष्टी, क्षणात नाहीसे होणारे दिव्यभास, चिन्हीकरण, प्रतिभा, कवि, आम्ही कोण? धुमकेतू आणि महाकवि, फिर्याद, रूष्ट सुंदरीस.

**(क) प्रेम आणि विरहविषयक कविता** : थकलेल्या भटकणाऱ्याचे गाणे, जरी तू ह्या येथे, प्रीति, प्रयाणगीत, माझा अंत, फार दिवसांनी भेट, प्रणयकथन, मनोहारिणी, राजा शंतनू.

**(ड) भावकाव्य (सुनित रचना)** : मयूरासन आणि ताजमहाल, चिरवियुक्ताचा उद्‌गार, वियुक्ताचा उद्‌गार, स्मरण आणि उत्कंठा.

**(इ) निसर्गविषयक कविता** : अढळ सौंदर्य, एक खेडे, भृंग, फुलांची पखरण, पर्जन्याप्रत, पुष्पाप्रत, फुलपाखरू, फुलांतले गुण, संध्याकाळ, फुलपाखरू, दिवाळी.

**(ई) सामाजिक कविता** : अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, मजुरांवर उपासमारीची पाळी, रूढी, सृष्टी आणि कलि, 'पण लक्षात कोण घेतो'च्या कर्त्यास, तुतारी, स्फूर्ति, मूर्तिभंजन, नवा शिपाई, निशाणांची प्रशंसा, गोफण, गावी गेलेल्या मित्राची खोली, लागलेली पाहून, एका भारतीयाचे उद्‌गार.

**(ख) चिंतनात्मक कविता** : सिंहावलोकन, निद्रामग्न मुलीस, रांगोळी घालताना पाहून, दोन बाजी, घुबड, सतारीचे बोल, वातचक्र, दवाचे थेंब, घड्याळ, विद्यार्थ्यांप्रत, पद्यपंक्ती, स्फुट विचार, उत्तेजनाचे दोन शब्द.

**(ग) गूढगुंजनात्मक कविता** : तत्त्वतः बघता, कोठे जातोस, स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य, कल्पकता, स्वप्नामध्ये स्वप्न, आहे जीवित काय, झपूर्झा, कोणीकडून? कोणीकडे?, म्हातारी, हरपले श्रेय, तुझे नाम मुखी, इ. कवितांच्या आधारे केशवसुतांच्या काव्यनिर्मितीवरील प्रभाव अभ्यासता येतील.

### १.३.३ हरि नारायण आपटे ऊर्फ ह. ना. आपटे

हरि नारायण आपटे ऊर्फ ह. ना. आपटे यांचा कालखंड हा (८ मार्च १८६४ ते ३ मार्च १९१९) असा आहे. ह. ना. आपटे यांच्यावर महादेव गोविंद रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांचा प्रभाव होता. त्याचबरोबर निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर व समाजसुधारक गो. ग. आगरकर यांचाही मोठा प्रभाव पडला होता. ते पुण्याला शिक्षणासाठी असताना वरील प्रभृतींचा वैचारिक व साहित्यिक प्रभाव त्यांच्यावर पडल्यामुळे ह. ना. आपटे यांनी विद्यार्थीदशेतच लेखनाला सुरुवात केली. त्यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील पारोळे या गावी खानदेशात झाला व त्यांचे शिक्षण पुणे येथे झाले. ह. ना. आपटे महाराष्ट्राला एक मराठी लेखक, कादंबरीकार, नाटककार, कथाकार, कवी व संपादक या अर्थाने परिचित आहेत. ते 'ज्ञान प्रकाश' या मासिकाचे काही काळ संपादक होते. त्यांनी 'आनंदाश्रम' या प्रकाशन संस्थेचे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले तर 'करमणूक' या मासिकाचे संस्थापक व संपादक म्हणून २८ वर्षे काम पाहिले. अकोला येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष होते. त्यांनी अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या. 'आठ स्त्रीरत्ने' हे सदर चालविले होते. यामध्ये त्यांनी भास्कराचार्यांची लीलावती, राणी दुर्गावती इ. स्त्रियांची बोधप्रद माहिती प्रकाशित केली. केशवसुतांची कविता आणि गोविंद बल्लाळ देव यांचे 'शारदा' हे नाटक त्यांनी प्रकाशात आणले. त्यांना आधुनिक मराठी कादंबरीचे जनक म्हणून संबोधले जाते. त्यांनी १२ सामाजिक व ११ ऐतिहासिक अशा २३ कादंबऱ्या लिहिल्या. त्याबरोबर त्यांनी इतरही प्रकारात मोठ्या प्रमाणात साहित्य लिहिले. ते चांगले अनुवादक देखील होते. त्यांनी अनेक इंग्रजी साहित्यकृतींचे मराठीत रूपांतर केले आहे. विद्यार्थीदशेतच त्यांनी संस्कृत नाटके व स्कॉट डिकसन भेंकरे, रेनाल्डस या इंग्रजी कादंबरीकारांचा खोलवर अभ्यास केल्यामुळे त्यांना कादंबरी लेखनविषयक दृष्टिकोन प्राप्त झाला. पुढे त्यांनी सातत्याने २९ ते ३० वर्षे साहित्यनिर्मिती केल्यामुळे या कालखंडाला 'हरिभाऊ युग' असे म्हटले जाते. हा लेखनाचा त्यांचा काळ साधारण (१८८४ ते १९१९) असा असल्याचे आढळते. त्यांच्या 'करमणूक'मधील स्फूटलेखांना कथेचे स्वरूप प्राप्त झाले होते व इथेच लघुकथेचा उगम असल्याचे म्हटले जाते. त्यांच्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून वास्तव चित्रण येते. ते सत्यम् शिवम् सुंदरम्चे उपासक होते. 'करमणूक'मधील स्फूट गोष्टीतून त्यांनी सातत्याने समाज प्रबोधन केले. त्यांची साहित्यसंपदा विपूल आहे. ती पुढीलप्रमाणे –

**(अ) कादंबरी**

**सामाजिक** : (१) आजचं – १९०६, (२) कर्मयोग (अपूर्ण) – १९१७, (३) गणपतराव (अपूर्ण) – १८९२ (४) चाणाक्षपणाचा कळस – १८९२ (५) जग हे असे आहे – १८९९ (६) तारा (अनुवादित) (७) पण लक्षात कोण घेतो – १८९२ (८) पांडूरंग (अनुवादित) (९) भयंकर दिव्य – १९०३ (१०) आजकालच्या गोष्टी – १८८८ (११) माध्यान्ह – १९०८ (१२) मायेचा बाजार – १९१२ (१३) यशवंतराव खरे – १८९५.

**ऐतिहासिक** : (१) उषःकाल - १८९७ (२) कालकूट (अपूर्ण) - १९११ (३) केवळ स्वराज्यासाठी - १९०४ (४) चंद्रगुप्त व चाणक्य - १९०५ (५) रूपनगरची राजकन्या - १९०२ (६) वज्राघात - १९१५ (७) सूर्यग्रहण (अपूर्ण) - १९०९ (८) सूर्योदय - १९०६ (९) गड आला पण सिंह गेला.

**आत्मचरित्रात्मक ऐतिहासिक** : (१) म्हैसूरचा वाघ - १८९१.

**(ब) कथासंग्रह**

१. घटकाभर करमणूक - १९१७

२. भास कवीच्या नाटककथा (अनुवादित कथा) १९१७

३. स्फूट गोष्टी - भाग १ ते ६ (कथासंग्रह) १९१७

४. काळ तर मोठा कठीण आला (दीर्घकथा)

**(क) नाटके**

१. जयध्वज : नाटक (रूपांतरित) मूळ लेखक व्हिक्टर, ह्यूगोचे हेनानी हे नाटक

२. चुतकीर्त चरित्र - नाटक (रूपांतरित) -

३. संत सखू - नाटक - १९११

४. सती पिंगळा - नाटक - १९११

५. सुमतिविजय - नाटक (रूपांतरित) मूळ विल्यम शेक्सपियर लिखित मेझर फॉर मेझर

**(ड) प्रहसने**

१. जबरीचा विवाह : प्रहसन रूपांतरित - मूळ लेखक - मोलियर, १९१०

२. धूर्त विल्सन - प्रहसन रूपांतरित - मूळ लेखक - मोलियर, १९१०

**(इ) अनुवाद** : गीतांजली : रवींद्र टागोरांचे चरित्र व त्यांच्या गीतांजलीचा मराठी अनुवाद, १९१७.

**(ई) ऐतिहासिक माहितीपर** : चंद्रगुप्त - १९०५.

**(स) व्याख्यान पुस्तिका** : विदग्धवाङ्मय, १८८२

**(ग) श्लोकमय विलापिका** : शिष्यजन विलास - १८८२

**(घ) पत्र संग्रह** : हरिभाऊंची पत्रे इत्यादी.

**१.३.४.१** हरि नारायण आपटे यांचे लेखन विपूल व समृद्ध आहे. विशेषतः त्यांनी कादंबरी लेखन मोठ्या प्रमाणात केलेले आहे. त्यांच्या 'करमणूक' या स्वतः काढलेल्या नियतकालिकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध

होत होते. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, विष्णूशास्त्री चिपळूणकर, गो. ग. आगरकर व इंग्रजी साहित्य यांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यातूनच त्यांनी विद्यार्थीदशेत असताना 'मधली स्थिती ?' (आजकालच्या गोष्टी) ही कादंबरी लिहिली. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय तरुणांनी लिहिलेल्या कथा व्यापक होत होत्या. बुद्धिवाद, विज्ञानवाद व पुरोगामी विचार तरुणांना त्या काळी गप्प बसू देत नव्हते. १९ वे शतक हेच मुळात ज्ञानाचे स्फोटाचे शतक होते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. हरिभाऊंच्या कादंबरी लेखनाअगोदर मराठीमध्ये विविध प्रवृत्तींचे कादंबरी लेखन झालेले होते. 'हातीमताई' नंतर दोनच महिन्यांनी प्रकाशित झालेली बाबा पद्मनजींची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने उच्च दर्जाची कादंबरी म्हणावी लागेल. कारण 'हातीमताई'चे कथानक भाषांतरित व कथावस्तू स्वरूपात असल्यामुळे व त्यातील कथांची संख्या जास्त असल्यामुळे कादंबरी जवळ जाणारे घटक व तंत्र कमी पडल्यामुळेच बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीला मराठीतील पहिली कादंबरी म्हणतात. योगायोग म्हणा किंवा अप्रत्यक्ष अनुकरण प्रभाव म्हणा बाबा पद्मनजींच्या कादंबरीची नायिका 'यमुना' आहे व हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीची नायिका पण यमुनाच आहे. बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटना'तील यमुना व हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीतील यमुना या दोघीही हिंदू धर्मातील विधवा स्त्रिया असल्या तरी त्यांच्या जीवनप्रवासात काही मूलभूत फरक आहे. तो म्हणजे बाबा पद्मनजींची यमुना पर्यटनाच्या अनुषंगाने स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास स्वतंत्र आहे. मात्र हरिभाऊंची यमुना मात्र हिंदू धर्माच्या रूढी, परंपरा व बंधने यामध्ये कोंडून घेतलेली आहे. याबद्दल ज्येष्ठ समीक्षक नरहर कुरुंदकर म्हणतात, 'योगायोगाने हरिभाऊंच्या नायिकेचे नावही यमुनाच आहे. हरिभाऊंनी हे नाव बाबांच्या नायिकेवरून उचललेले असेल काय? कोण जाणे? 'पण लक्षात कोण घेतो?' मधील पतीपत्नीचे परस्पर सौहार्द मुळात यमुना व विनायकराव या जोडप्यावरून सुचले असेल काय? हे तरी कोण सांगू शकेल? पण हरिभाऊ आपल्या नायिकेचा पुनर्विवाह दाखवू शकले नाहीत. ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे तेथपर्यंत बाबांना जाता आले. बाबा पद्मनजींच्या जवळ कल्पदृष्टी फारशी नव्हतीच. म्हणून यमुनेच्या पुनर्विवाहापर्यंत जाताना बाबांना अडचण वाटली नाही. पहिला पती विसरताना यमुनेला काही अडचणी आल्या असे बाबांच्या लिखाणावरून वाटत नाही. पण विनायकरावाला सुद्धा ख्रिस्ती झाल्याविना मरू देणे बाबांना प्रशस्त वाटले नाही. ती व्यवस्था त्यांनी करून टाकली. या दृष्टीने आपण बोधवादी कादंबरी म्हणून 'यमुनापर्यटन'कडे पाहू लागलो तर या कादंबरीचे चित्र बरेच बदलल्यासारखे वाटू लागते.'' (धार आणि काठ – नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र.आ. १९७१, पृ. ११) नरहर कुरुंदकर यांचे मत चिकित्सक व साक्षेपी स्वरूपाचे आहे. कोणत्याही साहित्यकृतीचा संबंध प्रचलित राजकीय समाजव्यवस्था आणि आर्थिक व्यवस्थेशी संबंधित असतो. ब्रिटिश वसाहतीकरण झालेला तत्कालीन हिंदू समाज नव्या मूल्यांना सामोरा जात होता. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेली तरुण पिढी व्यक्तिगत स्वातंत्र्याची व त्यातील नवखेपणाची छाप सामाजिक स्तरांवर मांडत असताना, ताळमेळ घालत होती. पण साहित्य, समाज व संस्कृतीचा मुलभूत अभ्यास करता, हिंदू समाजाची मानसिकता एवढी विकसित नव्हती. त्यामुळे कादंबरी सारख्या व्याप्ती असणाऱ्या वाङ्मय प्रकारात जी नव्या विचारांची मांडणी होत होती ती धक्कातंत्राची

होती. कादंबरीकारांचे सामाजिक भान सम्यक स्वरूपात आलेले दिसत नाही. तरीही बाबा पद्मनजी, हरिभाऊ यांसारखे कादंबरीकार हिंदू समाजातील ही जुनाट प्रथांची ओझी समाजाला सांगत होती. कारण ब्रिटिशांच्या व जागतिक साहित्याच्या वाचनाने व अध्ययनाने त्यांच्यात ही प्रभाव ऊर्जा संचारलेली होती. पण या मूल्यांचा प्रभाव जनमाणसांवर पडण्यासाठी वेळ लागतो व स्वतःच्या नव्या जडणघडणीत देशीपणाचा आपणाला विसर पडतो की काय अशी परिस्थिती निर्माण होते. याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''प्रदीर्घ वसाहतीकरण झालेला हिंदू समाज, जगातील कोणत्याही समाजापेक्षा अधिक काळ गुलामगिरीत वाढला आहे. जेव्हा प्रगत संस्कृतीची मूल्ये सांस्कृतिक अशा मागासलेल्या संस्कृतीवर आदळतात तेव्हा प्रगत संस्कृतीतील मूल्यांचे तेज प्रखर असल्याने ती जित संस्कृतीला डोळे मिटून स्वीकारावी लागतात. माणूस म्हणून संतोषाने आपल्याच भूमीवर उभे राहण्याचा आत्मविश्वास ढासळतो. वसाहतवादाचा हा सगळ्यांत भयानक परिणाम म्हटला पाहिजे. पाश्चात्य मूल्ये जेव्हा हिंदू समाजाने स्वीकारली तेव्हा एक आर्थिक व्यवस्था सोडून सर्व व्यवस्था प्रगत मूल्यांवर हुकूम गेल्या. व्यापारी इंग्रजी संस्कृती इथली आर्थिक व्यवस्था शोषण्यासाठीच आल्यामुळे त्यांनी अन्य सांस्कृतिक व्यवस्था सुधारल्या तरी आर्थिक व्यवस्था जुनी मध्ययुगीनच ठेवली, हे सत्य आहे. ही कसर (Lag) कादंबरीतील सामाजिकतेत विचित्र अवास्तव निर्माण करते. (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, १९५०-१९७५, संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८६, पृ. २५) नेमाडे यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. भारतीय हिंदू समाज हा गतिशील नव्हता तर स्थितीशील होता व आजही आपण याचे बऱ्याच प्रमाणात परिणाम पाहत आहोत. पारलौकिकतावादी परंपरा भौतिकवादामुळे कोलमडून पडते तेव्हा स्वतंत्रपणे नव्या सक्षम पर्यायाची उभारणी करणे ही काळाला धरून केलेली कृती ठरते.

मराठी कादंबरीच्या मुळाशी काही स्वकीय सांस्कृतिक प्रेरणा असली तरी युरोपीय कादंबऱ्यांचा व धाटणीचा प्रभाव देखील आहे हे मान्य करावे लागते. सुरुवातीच्या काळातील भाषांतरित कादंबऱ्यांमधून हा प्रभाव तर मोठ्या प्रमाणात दिसतो. याबद्दल डॉ. वसंत बिरादर म्हणतात की, ''इंग्रजी शिक्षणाच्या बरोबर येथे महाराष्ट्रात नवीन प्रकारच्या वाङ्‌मयाची ओळख होत गेली. गद्याचा प्रभाव मुद्रणाच्या सोयीमुळे ध्यानात आला. शाळांच्या, विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात इंग्रजी कवी-कथा-कादंबरीकार यांचा परिचय झाला. 'रासलेस' (जॉन्सन), 'व्हीकार ऑफ वेकफिल्ड' (गोल्डस्मिथ) या अठराव्या शतकातील कादंबऱ्या एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात परिचयाच्या झाल्या. सर वॉल्टर स्कॉट (१७७१-१८३२), जेन ऑस्टिन (१७७५-१८१७) यांचा प्रभाव तर ध्यानात घेण्यासारखा होता. अलेक्झांडर पुस्किन, निकोलाय गॉगोल, टुर्गेनिव्ह, टॉलस्टॉय, डॉस्टायव्हस्की या रशियन कादंबरीकारांचा व रूसो, बाल्झॅक, फ्लॉबेर, झोला, मोपाँसा, अनातोल फ्रान्स या फ्रेंच कादंबरीकारांचाही हळूहळू परिचय होत गेला. डिकन्स, थॅकरे, मेरेडिथ, थॉमस हार्डी, जॉन गॅल्सवार्दी, ॲरनॉल्ड बेनेट, एच. जी. वेल्सपासून जेम्स जॉईस, आल्डस् हक्स्ले वा विल्यम फॉकनर इत्यादी इंग्लिश कादंबरीकारांचा मराठीवरील प्रभाव हा एक अभ्यासाला चांगला विषय होण्यासारखा आहे. आन्द्रे जीद, वेसरमन्, जॉ पॉलसार्त्र, काफ्फा, कामू, सिमॉद, व्युव्हायर अशा अनेक नवविचारांच्या कादंबरीकारांशी मराठीचे काही नाते निदान वरवरच्या अनुकरणापुरते तरी आहे असे दिसेल. कथा-विषय या

भूमीतील असले तरी ते मांडण्याची-गुंफण्याची पद्धती अनेकदा परकीय असल्याचे दिसून येते.'' (आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रा. डॉ. वसंत बिरादर, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. १६८) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे मत मान्यच करावे लागेल. कारण हा प्रभाव अनेक मराठी लेखकांवर जसा आहे तसा ह. ना. आपटे यांच्यावरही आहे. असे असले तरी बऱ्याच सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन नीतिबोध, उपदेश, राष्ट्रीयत्वाची भावना जागृती, अद्‌भूतता, कल्पना रम्यता या ओढीपोटी बऱ्याच मराठी कादंबरीकारांनी ऐतिहासिक थोरामोठ्या व्यक्तींच्या आयुष्यातील घटनांचा शोध घेऊन कादंबऱ्या लिहिल्या व त्या वाचकांच्या लोकप्रियतेला उतरलेल्या आढळतात. हरिभाऊंनी जवळ जवळ २३ कादंबऱ्या सामाजिक व ऐतिहासिक विषयावर लिहिलेल्या दिसून येतात. सामाजिक कादंबरी 'मधली स्थिती' १८२५ मध्ये आली. केवळ मनोरंजन अथवा कल्पनाविलास या उद्देशाने त्यांनी कादंबरी लेखन न करता सामाजिक प्रश्नांची जाण ठेवून त्यावर चर्चा व्हावी, सामाजिक परिवर्तनाला लोकमानस तयार व्हावे या हेतूनेही त्यांनी कादंबरीलेखन केले. अशा कादंबऱ्यांचे लेखन 'करमणूक' मधून दोन-दोन, तीन-तीन वर्षे होत असे व वाचकाला वाचायला मिळत असे. त्यांच्या 'करमणूक' पत्राचा उद्देशही खूप स्पष्ट स्वरूपाचा आहे. ते म्हणतात ''मराठी भाषा जाणणाऱ्या साधारण जनसमूहाचे मनोरंजन करून त्यास व्यावहारिक, शास्त्रीय इत्यादी अनेक गोष्टींचे ज्ञान करून द्यावयाचे. केसरी, सुधारकादी पत्रे आपल्या कुशल लेखणीने जे काम त्यातील निबंधाच्या द्वारे करतात तेच काम हे पत्र मनाची करमणूक करून करणार ! जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी म्हणून केसरी, सुधारक, एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दांनी सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्याचे वेळी वावप्रतोदाचे तडाखे लगावणार, तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचे शासन करणार! ज्यास पुढल्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यातील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हाती पडले तरी हवे त्याने हवे त्याच्यादेखत निःसंकोचपणे वाचण्यास हरकत नाही असे पत्र पाहिजे असेल त्यांनी अवश्य करमणुकीचे वर्गणीदार व्हावे.'' (आधुनिक वाङ्मयाचा इतिहास - प्रा. डॉ. वसंत बिरादर, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ. १९९९, पृ. १८०, १८१) हरिभाऊंचा उद्देश प्रामाणिक आहे.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्याबद्दल बोलायचे झाल्यास या कादंबऱ्या समाज सुधारणेचा बाज घेऊन आलेल्या आहेत. लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर आदी समाजसुधारकांच्या वैचारिक व कृतिशील घुसळणीचा फार मोठा परिणाम या कादंबऱ्यांवर झालेला आहे. समाजातले हे वास्तव व प्रश्न सोडविण्याची नैतिक जबाबदारी हरिभाऊंनी घेऊन एक वाङ्मयीन जीवनमूल्ये जोपासणारी सामाजिक बांधिलकी जोपासलेली आहे हे यांवरून दिसते. याबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''हरिभाऊंनी समाजाचे चांगले निरीक्षण केले होते. नव्या शिक्षणाने समाजात एक प्रकारची दांभिकता पसरली होती. लोक स्वाभिमानशून्य बनत होते. घातक अशा सामाजिक रूढींना जपत होते. दुर्गुणांची गोडी समाजात वाढत होती. हरिभाऊंनी रुक्षपणे उपदेश न करता समकालीन समाजाची, व्यक्तींची सुखदुःखे समर्थपणाने रंगविली. आपल्या सामाजिक कादंबऱ्यांनी ते 'आजकालच्या गोष्टी' सांगत असत. याचे कारण असे की, ते समाजातील दोषांचे, व्यसनांचे

चित्रीकरण हेतूपूर्वक करीत. कुटुंबपद्धती, विवाहादी संस्कार, बऱ्यावाईट रूढी, सद्‌गुणी व दुर्गुणी व्यक्ती, ढोंगी लोक, समाजसुधारणेविषयीची भिन्न-भिन्न मते इत्यादींची चर्चा हरिभाऊंच्या कादंबरीत असे. त्यांच्या या सामाजिक कादंबऱ्यांतील विचारसूत्रे पुढे वाढविणारी पात्रे पुनःपुन्हा भेटतात. 'मधल्या स्थिती' मधील विष्णूपंत, लक्ष्मीबाई पुढील 'गणपतराव' या मनोरंजनात प्रसिद्ध झालेल्या कादंबरीत भेटतात. गणपतराव शेवटच्या 'कर्मयोग'मध्ये दिसतात. 'आजच'मधील यशवंतराव कृष्णबापू, नारायणराव अशी काही पात्रे वाचकांना पूर्वीच्या कादंबऱ्यांतून परिचयाची असतात. 'पण लक्षात कोण घेतो?' मधील नाना व यशोदाबाई, विष्णुपंत व लक्ष्मीबाई यांचे दर्शन 'आजच' व 'कर्मयोग' मध्ये होते. 'मी' मधील भावानंदाचा मठ 'भयंकर दिव्य' मधील ताई व सुंदरी चालवितात. समकालीन समाजाचे, विशेषतः पांढरपेशा समाजाचे चित्र हरिभाऊंना आपल्या कादंबरीत काढायचे होते. (आधुनिक वाङ्मयाचा इतिहास - प्रा. डॉ. वसंत बिरादर, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. १८१) अशी हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीतील उदात्त भावना होती.

इतिहासाच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान असते. राष्ट्रीय सद्‌गुणांचा विकास व देशीपणा व पराक्रमी व्यक्तींचे कर्तृत्व पुढच्या पिढीला आदर्शभूत व प्रेरणादायी ठरायचे असेल तर प्रत्येकाने ते जतन केले पाहिजे. हरिभाऊंनी एकापेक्षा एक वरचढ अशा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून मोठे वाङ्मयीन कर्तृत्व केले. त्यांनी ११ ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या ऐतिहासिक कादंबरी लेखनाबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादर म्हणतात, ''यापैकी 'म्हैसूरचा वाघ' ही त्यांची कादंबरी मिडोज टेलर यांच्या 'टिपू सुलतान'चे रूपांतर आहे. त्यांच्याच एका कादंबरीचे रूपांतर म्हणजे वर सांगितलेली 'ठगाची जवानी' होय. 'उषःकाल', 'सूर्योदय', 'सूर्यग्रहण' व 'गड आला पण सिंह गेला' या हरिभाऊंच्या कादंबऱ्या शिवकालीन व शिवचरित्रातील महत्त्वाच्या घटना यावर आधारित असून आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर हरिभाऊंनी अतिशय अद्‌भूत पण वास्तवाशी, ऐतिहासिक वातावरणाशी इमान राखण्याची किमया या ऐतिहासिक कादंबऱ्यात साधली.'' (तत्रैव - पृ. १८५, १८६). यापुढेही भारतातल्या अनेक वीरगाथा हरिभाऊंनी 'रूपनगरची राजकन्या', 'वज्राघात', 'कालकूट' 'चंद्रगुप्त', 'उषःकाल' इ. कादंबऱ्यांतून लिहिल्या. त्यांनी सत्याच्या पातळीवर इतिहासाचे संशोधन करून कल्पकतेने या कादंबऱ्या लिहिलेल्या दिसून येतात. त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीचा पट मोठा असून प्रादेशिक स्तर महाकाय आहे. त्यासाठी त्यांनी इतिहास ग्रंथ, पुराणे, संस्कृत नाटक यांचे सूक्ष्मपणे अध्ययन केलेले जाणवते. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये सांगताना प्रा. डॉ. वसंत बिरादर म्हणतात की, ''हरिभाऊंची सामाजिक कादंबरी सदाशिवपेठी असली तरी त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीचे क्षेत्र मात्र स्थळाच्या दृष्टीनेही विस्तृत आहे. हिमालयापासून दक्षिणेस म्हैसूर, विजयनगर, मगधापासून राजस्थानपर्यंत त्यांच्या कथानकांचा क्षेत्रविस्तार आहे. राजस्थानातील मध्ययुगीन वातावरण, 'चंद्रगुप्त'मधील बौद्ध भिक्षू व ब्राह्मण यांच्यातील संघर्ष, विषयुक्त अपूपवायन प्रसंग, कारस्थाने, कुटील नीती, 'कालकूट' मधील हिमालयावरील कापालिकांच्या मठांची व तेथील अघोरी साधनेची वर्णने यांनी हरिभाऊंची कादंबरी वातावरणनिर्मितीच्या बाबतीत यशस्वी झाली आहे. राजांची अंतःपुरे त्यातील भानगडी व कटकटी, बादशहाच्या छावण्या, विस्तृत अरण्ये, डोंगरदऱ्या, किल्ले व गढ्या, मंदिरे व भुयारे, पर्वशिखरे, लढाया, गुप्त कारस्थाने, शिकारी, चांदण्या

रात्री, नौकाविहार, दोन वाद्यांची झुंज अशा अनेक प्रसंगी हरिभाऊंच्या अचूक इतिहासज्ञानाचे व त्यांच्या वर्णनशैलीचे दर्शन घडते. आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्या रसपूर्ण करण्यासाठी हरभिाऊंनी जशी आपली कल्पकता वापरली. तशीच त्यांची बुद्धिमत्ता ऐतिहासिक वाङ्मयाच्या व संशोधनाच्या अभ्यासातही रमली. त्यांनी इतिहास ग्रंथ, पुराणे, संस्कृत, नाटक यांचा अभ्यास केला. पण त्या त्या काळाशी समरस होण्याची एक अजब किमया हरिभाऊंच्या वृत्तीत दिसते. चंद्रगुप्ताच्या काळापासून अठराव्या शतकापर्यंतच्या हिंदुस्थानच्या इतिहासात त्यांची प्रतिभा सहजतेने विहार करताना दिसते. हरिभाऊंची कला व त्यांचे इतिहासज्ञान यांचा प्रत्यय त्यांच्या एका आकाराने छोट्या पण गुणाने मोठ्या कादंबरीत येत असल्याने तिचा थोडक्यात परिचय करून घेऊ. 'गड आला पण सिंह गेला' ही हरिभाऊ आपटे यांची एक अतिशय रमणीय व उद्‌बोधक ऐतिहासिक कादंबरी आपल्या कलागुणांनीही प्रसिद्ध आहे. (तत्रैव : पृ. १८७, १८८) अशा प्रकारे त्यांच्या कादंबरीत ऐतिहासिक गोष्टींच्या सूक्ष्म छटा येताना दिसतात.

हरिभाऊंची नाटके व प्रहसने फार उद्‌बोधक स्वरूपाची आहेत. त्यांनी केलेला पत्रसंग्रहही फार मोलाचा आहे. ही पत्रे त्यांनी तत्कालीन 'केसरीत' छापलेली होती. त्यांचे वाङ्मय प्रेम अजोड दर्जाचे होते. स्फुट गोष्टीच्या माध्यमातून त्यांनी लघुकथेचा पाया घातला.

**समारोप** : अत्यंत कमी वयात हरिभाऊंनी अफाट वाङ्मय निर्मिती केली. त्यांच्याकडे आधुनिक मराठी कादंबरीचे जनकत्व जाते. हरिभाऊंचा काळ म्हणून त्यांच्या कर्तृत्वाची नोंद मराठी वाङ्मय इतिहासात झालेली आहे. त्यांच्या साहित्यविचाराचा प्रभाव अनेक पिढ्यांवर झाला. कथा, कादंबरी, काव्य, नाट्य, प्रहसने, माहितीपर संपादन व व्याख्यानांमधून हरिभाऊंनी मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली दिसून येते. महाराष्ट्र व मराठी वाचक, अभ्यासक, संशोधक त्यांचा नेहमीच ऋणी राहील, याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. असा त्यांचा दैदिप्यमान वाङ्मयीन निर्मितीचा कालखंड आहे.

### १.३.४ वामन मल्हार जोशी

यांचा कालखंड (२१ जानेवारी, १८८२ ते २० जुलै, १९४२) असा आहे. त्यांचा जन्म २१ जानेवारी, १८८२ रोजी रायगड जिल्ह्यातील तळे या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण तळे येथेच झाले व डेक्कन कॉलेज मध्ये १९०४ साली बी. ए. व १९०६ साली एम.ए. झाले. तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र हे एम.ए. साठी त्यांनी विषय ठेवले होते. एम. ए. ही पदवी प्राप्त केल्यानंतर ते कोल्हापूर येथे राष्ट्रीय शिक्षण योजनेअंतर्गत चालविलेल्या समर्थ विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाले. या संस्थेचे मार्गदर्शक वि. गो. विजापूरकर होते. तेथे काही काळ त्यांनी 'विश्ववृत्त' या मासिकाचे संपादनकार्यही केले. संपादनाची जबाबदारी पेलत असताना विश्ववृत्तमध्ये प्रसिद्ध झालेल्या 'वैदिक धर्माची तेजस्विता' या लेखामुळे तत्कालीन इंग्रज सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेवून वामन जोशी व विजापूरकर यांना तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांची १९११ मध्ये तुरुंगातून सुटका झाली व त्यानंतर त्यांनी १९१६ पर्यंत केसरी-मराठा संस्थेत काम केले. पुढे 'मेसेज' या अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या इंग्रजी दैनिकाचे उपसंपादक झाले. नंतर १९१८ मध्ये

हिंगणे येथील महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या कॉलेजात प्राध्यापक म्हणून रुजू झाले व तेथे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व इंग्रजी-मराठी विषयाचे अध्यापन करू लागले. पुढे विविध पदावर काम करत करत प्राचार्य पदावर काम करून ते निवृत्त झाले. एक मराठी कादंबरीकार, पत्रकार, संपादक, साहित्य समीक्षक आणि तत्त्वचिंतक या नात्याने ते महाराष्ट्राला परिचित आहेत.

त्यांची जडणघडण ही पुणे, कोल्हापूर या ठिकाणी झाली. अध्यापनाचे काम करताना त्यांनी साहित्यनिर्मितीही केली. हरिभाऊ आपटे यांच्या वाङ्मय निर्मितीच्या काळात कादंबरी लेखनाच्या संकल्पना बदलत गेल्या. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, स्त्री शिक्षण यामुळे विविध प्रश्नांवर व समस्यांवर चर्चा होत होत्या. देशसेवा, समाजसेवा, तत्कालीन तरुणांना आकर्षित करीत होती. हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचकांच्या पसंतीस उतरल्या. समाजमनात रुजल्या. लोकप्रियतेच्या शिखरावर गेल्या. परंतु पुढे मराठी कादंबरी निरस होऊ लागली. तेच ते विषय व इतिहासातील गौरवकथा यामुळे मराठी कादंबरी कंटाळवाणी झाली होती. अशा वेळेला वामन मल्हार जोशी यांनी मराठी कादंबरी लेखनामध्ये समाजातील विविध प्रश्न, समस्या यांच्या अनुषंगाने नव्या जीवनमूल्यविषयक तत्त्वचर्चा आणली आणि मराठी कादंबरीला नवीन वळण दिले. त्यांच्या साहित्यसंपदेमध्ये विविधता आहे. 'रागिणी अथवा काव्यशास्त्रविनोद' १९१५, 'सुशिलेचा देव' १९२०, 'आश्रमहरिणी' १९१६, 'नलिनी' १९२०, 'इंदू काळे, सरला भोळे' १९३४ इत्यादी कादंबऱ्या. नवपुस्तक, करंडक, विचारसौंदर्य नीति-शास्त्रप्रवेश इ. वैचारिक लेखन, विस्तवाशी खेळ, नाटक १९३७, स्मृति लहरी हे ललित लेखन इ. साहित्यसंपदा लिहून त्यांनी भारतीय साहित्यात स्वतःची छबी उमटवलेली दिसून येते. त्यांच्या साहित्य सेवेचा गौरव म्हणून त्यांना १९३० साली मडगाव येथे झालेल्या पंधराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्ष पदाचा मान मिळाला.

वामन मल्हार जोशी यांच्या लेखनात सामाजिक, नैतिकता, व्यक्तिस्वातंत्र्य, श्रद्धा, बुद्धी, नीतिबंधने, कलाप्रेम, ध्येयनिष्ठा, कर्तव्य इ. मूल्यांचा समावेश झालेला आहे. त्यांच्या कादंबऱ्यात व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास हे वैशिष्ट्य आढळते. विकास ही एक समृद्धीची प्रक्रिया असते. ती अखंडपणे चालते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाल्यानंतर व्यक्ती खोल विचार करते व अंतःप्रवाहाचा शोध घेत घेत यशाचा पाठलाग करते. यश मिळो अथवा न मिळो पण त्यासाठीची धडपड ही व्यक्तीला साजिवंत ठेवत असते. नरहर कुरुंदकर म्हणतात, ''कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला हा सांस्कृतिक विकास समृद्धी आणतो. हा सांस्कृतिक विकास नीतिमूल्यांना धरूनच असे नाही. तो नीती आणि अनीती, चांगले आणि वाईट, भव्य आणि क्षूद्र सगळ्याच कक्षांना आपल्या परिघात सामावून घेणारा विकास असतो. या विकासालाच व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांची परिपक्वता असे आपण म्हणतो. ही परिपक्वता आणि पात्रांचा हा विकास हे वामन मल्हारांच्या कादंबरीचे एक विलोभनीय आणि ठळक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या पात्रांना विकासाची ओढ आहे. दरक्षणी नवनवा अनुभव घेताना व या अनुभवाचा अर्थ लावताना त्यांच्या पात्रांची व्यक्तिमत्त्वे विकसित व समृद्ध होत जातात.'' (धार आणि काठ, नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र. आ. १९७१, पृ. ७९) नरहर कुरुंदकर यांचे मत साक्षेपी आहे.

वामन मल्हार जोशी यांचे मन तत्त्वनिष्ठेने भारलेले होते. तर्कसंगत लेखन हे एक त्यांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. वामन मल्हार हे लोकमान्य टिळक व महात्मा गांधीजींच्या समकालीन होते. यावेळी स्वातंत्र्यलढा तसेच सामाजिक चळवळी बळ धरू लागल्या होत्या. लोकजीवनामध्ये मार्क्सवाद, राष्ट्रवाद, गांधीवाद, समाजवाद अशा विविध वादांवर चर्चा होत होत्या. वामन मल्हारांनी कधीच व कुठेही अत्यंत टोकाची भूमिका न घेता सम्यक मार्ग स्वीकारला. त्यांनी टोकाची भूमिका कधीही घेतली नाही. त्यामुळेच त्यांचे सर्वच लेखन दिशादर्शक झालेले आहे. त्यांच्या कादंबरीलेखनाबद्दल भालचंद्र फडके म्हणतात, ''हरिभाऊंच्या कादंबरीपेक्षा वामन मल्हार जोशी यांची कादंबरी अनेक तऱ्हांनी निराळी आहे. तिचे रूप, तिच्यामागील प्रेरणा अगदी निराळ्या आहेत. ती कुणाला तंत्रदृष्ट्या बेडौल वाटते, विस्कळीत वाटते, तर तिचा तात्त्विक कादंबरी म्हणून गौरव करावासा वाटतो. तिच्या लेखनामागील प्रेरणा खरोखर कालबाह्य आहेत का? असाही प्रश्न पडलेला आहे. कादंबरीच्या रूपाचा, तिच्या अंगोपांगाचा विचार करून त्यांनी 'रागिणी' आणि अन्य कादंबऱ्यांचे लेखन केलेले नाही. पण १८५० ते १९१४ पर्यंतच्या मराठी कादंबरीच्या रूपांचा व त्यातील विचारप्रवाहांचा वामन मल्हारांच्या लेखनात शोध घेता येईल.'' (प्रदक्षिणा - संपा. रा. श्री. जोग, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सा.आ., पृ. २२४) भालचंद्र फडके यांचे मत अभ्यासनीय आहे. वामन मल्हार यांचे ज्ञानिक व तत्त्वजिज्ञासू मन मध्यमवर्गीयांचे वैचारिक विश्व शोधत होते. तत्त्वप्रधान कादंबरी लेखन एवढाच भाग मर्यादित न धरता वामन मल्हार जोशी यांच्या कादंबरीलेखनाचा विचार झाला पाहिजे. त्या तत्त्वजिज्ञासेबरोबरच खटकेबाज संवाद, सत्यशोधनाची तळमळ कादंबरीत यांचा सुरेख वापर केलेला आहे. त्यांनी लिहिलेल्या 'आश्रमहरिणी' या लहानग्या कादंबरीत रमणीय चित्रणे आलेली आहेत. त्यांच्या 'नलिनी' या कादंबरीबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''यानंतर वामनरावांची 'नलिनी' (१९१९) ही राजकीय थाटाची लहानशी कादंबरी प्रसिद्ध झाली. देश विपरित परिस्थितीत असला म्हणजे सर्व गुणांची माती होते. नलिनीला वसंतरावासारख्या अनुरूप पुरुषाशी लग्न करता येत नाही आणि रंगरावसारख्याशी सात्त्विक देशप्रीती निरुपयोगी ठरते' असे साद या कादंबरीचे आहेत. या कादंबरीतील कमलेच्या अधःपतनाच्या निमित्ताने वा. म. जोशी यांनी प्रौढ पण अविचारी कुमारिकेच्या प्रश्नांची चर्चा केली आहे. दिवाणजीच्या कपटास बळी पडून अधःपतित झालेली ही कमला व केवळ बुद्धिविकासालाच सर्वस्व मानून राजकारणाच्या व समाजकारणाच्या गप्पा अजाणता करणारी नलिनी या दोन व्यक्तिचित्राद्वारे वामनराव शिक्षित स्त्रीच्या असाह्यतेवर व दोषांवर बोट ठेवतात.'' (आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रा. डॉ. वसंत बिरादार, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. १९४) हा तत्कालीन सामाजिक व राजकीय विचार वामन मल्हार यांनी चर्चेद्वारे कादंबरीत मांडलेला दिसून येतो. पण यालाही व्यक्तिविकसन व तत्त्वजिज्ञासा यांची बाजू असलेली दिसून येते. मराठी कादंबरी व गांधीवाद यांचा एकत्रित विचार करताना ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''वामनरावांनी 'सुशिलेचा देव' मध्ये विश्व-कुटुंबवादाचा पुरस्कार केला आहे. मात्र साम्यवादी विचारसरणीशी या वादाचे साम्य असले तरी वामनराव अत्याचारी मार्गाला, सशस्त्र क्रांतीला आणि व्यक्तिस्वातंत्र्यविरोधी विचाराला विरोध करतात. हा गांधीवादी विचारसरणीचा पराभव आहे. पुढे 'इंदू

काळे' व सरला भाळे' मध्ये ते गांधीवादाकडे अधिक आस्थेने पाहतात. पण विनायकरावांना गांधीवादातील अतिरेकही पसंत नसतो. व्यवहार व तत्त्वनिष्ठा यांच्या संघर्षात प्रतिबिंबित झालेले वैचारिक ताण लक्षात घेतले तर महाराष्ट्रीय युवकांच्या मनातील टिळकांची लोकसंग्रही व्यावहारिक वृत्ती आणि गांधीची तात्त्विक तडजोड नाकारण्याची निर्भय वृत्ती यांच्या रस्सीखेचीचा खेळ लक्षात येतो. विनायकरावांची गांधीवादावरील श्रद्धा मधून-मधून डळमळीत होते. केळकरांच्या कौन्सिल-प्रवेशासंबंधी ते म्हणतात, 'माझी बुद्धी तुमच्या बाजूला आहे, पण भावना गांधीकडे मला ओढते; त्याला मी काय करू?'' शेवटी ज्याने-त्याने आपल्या शरीरप्रकृतीला मानवेल, मनःप्रकृतीला आवडेल, आर्थिक परिस्थितीला जुळेल, भावनांना रूचेल, मनाला पटेल असा एखादा मार्ग स्वीकारावा आणि तोच आपला स्वधर्म म्हणून त्यात रममाण व्हावे, असे सुचवितात. हा एकप्रकारचा व्यक्तिवादच आहे. विवेकशील व्यक्तिवादी दृष्टी!'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सहावा - संपा. गो. म. कुलकर्णी / व. दि. कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे प्र.आ. १९८८, पृ. २६३) चंद्रकांत बांदिवडेकर यांचे वामन मल्हार यांच्या कादंबरीवरील गांधीवादाच्या प्रभावाचे विश्लेषण यथार्थ अशा स्वरूपाचे आहे. त्यांच्या कादंबरीतून मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय जीवनविचार व त्यांचे भावनिक अनुबंध यांचे स्थित्यंतर दृगोचर झालेले आहे. कल्पनेची बदलती रूपे, व्यक्तिवाद स्वकेंद्रिता, समाजवादाचे आगमन, प्रभावाबद्दलचा शुद्धतावाद, मध्यमवर्गीय शहरी समाज मानसिकता व स्त्री-पुरुषांच्या बदलत्या संबाधांचा तत्त्वविचार या विषयांवरील वामन मल्हार यांची कादंबरी नवे वळणे घेत होती.

वामन मल्हार यांचे कथालेखन हे सुद्धा ध्येयवादी व तत्त्वचिंतन करणारे होते. याबद्दल म. ना. अदवंत म्हणतात, 'वामन मल्हार जोशी यांचे नाव 'तत्त्वचिंतनशील कादंबरीकार' म्हणूनच विशेष प्रसिद्ध आहे. 'नवपुष्पकरंडका'मधील किंवा विचार-विलास'मधील त्यांच्या कथा जुन्या वळणाच्या व पाल्हाळिक स्वरूपाच्या आहेत. विशिष्ट तत्त्वाच्या प्रतिपादनासाठी जरी ते कथा लिहित नसले तरी कथेतून कोणते ना कोणते तरी तत्त्व काढण्याचा त्यांचा हव्यास आहे. 'दोन स्वदेशींचा लढा' ही त्यांची कथा पाहा. 'आपल्या देशाचा अभिमान बाळगणे म्हणजे दुसऱ्या देशाच्या लोकांबद्दल मनात द्वेषबुद्धी बाळगणे नव्हे' हे तत्त्व त्यांनी एक आंग्ल स्त्री व तिच्याबरोबर विवाह केलेला एक हिंदी गृहस्थ यांचे जीवन रेखाटून काढले आहे. 'चारित्र्यक्रांती' यातही एका अँग्लो-इंडियन कुटुंबाचे चित्र रंगवून नासदखान या खलपुरुषाच्या अंतःकरणाचे परिवर्तन घडवून आणले आहे. 'बायकांना उजव्या डोळ्यांनी दिसत नाही'. दुसरा एक शास्त्रीय चमत्कार अहंकार, 'अदृष्य करणारी अंगठी' यासारख्या कथांतून मानवी स्वभावातील विसंगतीचे दर्शन अत्यंत मार्मिकपणे घडविले आहे. त्याचप्रमाणे 'नाव बदलीन' व 'नाटकराव' यांतील विनोदही वामनरावांच्या विनोद दृष्टीची चांगली साक्ष देतात.'' (प्रदक्षिणा- संपा. रा. श्री. जोग, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, पृ. ११९-१२०) म. ना. अदवंत यांनी वामन मल्हार यांच्या कथावस्तूचे स्वरूप उलगडून दाखविले आहे. वामन मल्हार यांनी 'विस्तवाशी खेळ' या नाटकामधून तत्त्वचिंतन आणि ध्येयवादाचाच पुरस्कार केलेला आहे. स्त्रीमनाच्या जागृतीची कल्पना वामन मल्हार यांनी मांडली तर 'स्मृति-लहरी' या ललित लेखनातून त्यांनी जीवनानुभवाच्या तत्त्वचिंतनातून आठवणींचे लेखन केलेले आहे. तत्त्वशोधक वृत्ती व प्रसन्न विनोदबुद्धी त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे ते या लेखनात आठवणींना उजाळा देताना हलके-फुलके वातावरण तयार करून अनुभव सांगतात.

**समारोप**

थोडक्यात, वामन मल्हार जोशी हे तत्त्वचिंतक व ध्येयवादी व्यक्तिमत्त्व होते. गांधीवाद व टिळक यांच्यामधील वैचारिकतेचा दुवा म्हणून त्यांच्याकडे पहावे लागेल. तेवढेच ते समाजातील बऱ्या-वाईट गोष्टींवर बोलणारे भाष्यकार आहेत. त्यांनी त्यांची मते कोणावर न लादता, स्वतःही कधी टोकाची भूमिका घेतली नाही. एक तत्त्वचिंतनशील कादंबरीकार, ध्येयवेडा प्राध्यापक, संपादक, कथाकार, ललितलेखक व नव्या विचारांना स्त्री-पुरुषांसहीत चर्चेत आणणारा साहित्यिक म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागेल. त्यांच्या जीवन, विचार व साहित्यावरील प्रभाव हा संमिश्र स्वरूपात असून तर्कशास्त्र, मानसशास्त्र व तत्त्वज्ञानाच्या मुशीतून त्यांची साहित्यनिर्मिती झालेली दिसून येते.

## १.४ सामाजिक/राजकीय घटितांमधून प्रेरणा

जगभराच्या साहित्यनिर्मितीच्या अभ्यासाकडे दृष्टिक्षेप टाकताना आपणाला मोठ्या प्रमाणात सामाजिक आणि राजकीय घटितांच्या प्रेरणा कारणीभूत ठरलेल्या दिसून येतात. १८०४ साली भारतात मुद्रण कला आली. सामाजिक व राजकीय घटितांना कारणीभूत ठरलेल्या गोष्टी वृत्तपत्रे व नियतकालिकांनी वैचारिक माहिती व साहित्याचा विषय बनविल्या. दर्पण, ज्ञानोदय, विविध ज्ञान विस्तार, सुधारक, करमणूक, प्रभाकर, काळ इत्यादी वृत्तपत्रे नियतकालिकांनी सामाजिक सुधारणा चळवळ व स्वातंत्र्य चळवळ विकसित केली. दक्षिण आफ्रिकेत कृष्णवर्णियांनी गौर वर्णियांच्या विरोधात जी मानवमुक्तीची चळवळ उभी केली होती तिचा आधार हा 'काळे साहित्य' (ब्लॅक लिटरेचर) हा होता. याबद्दल निग्रो साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, ''ब्लॅक पँथर'सारख्या युवक संघटनांनी कृष्ण वर्णियांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला, 'जिंकू किंवा मरू' या अभिनिवेशाने त्यांनी जगाकडे पाहिले.

"We shall overcome / we shall overcome / we shall overcome some day / Deep in my heart / I do believe / We shall overcome some day" (केशव मेश्राम / उषा देशमुख : (संपा.) 'दलित साहित्याची स्थितीगती', लेख 'कृष्णसाहित्य आणि दलित साहित्य' : डॉ. जनार्दन वाघमारे, मुंबई विद्यापीठ आणि अनुभव पब्लिकेशन्स, मुंबई, प्र. आ. १९९७, पृ. १११) सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून ज्या ज्या घटना जागतिक पातळीवर घडत होत्या त्या-त्या साहित्यनिर्मितीला प्रेरणा देत होत्या. साहित्य आणि चळवळ यामुळे सामाजिक व राजकीय घटितांना कवेत घेण्याचे सामर्थ्य साहित्यिकांना मिळाले व त्यातून साहित्यनिर्मिती झाली. ब्रिटिशांनी भारतावर लादलेल्या पारतंत्र्याचे अनेक पडसाद बंगाली, मराठी, हिंदी साहित्यामध्ये उमटलेले दिसून येतात. डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या चळवळीचे परिणाम भारतीय साहित्यात उमटलेले आहेत. सामाजिक आणि राजकीय घटितांना जागवणारा साहित्य आणि चळवळीचा विशाल दृष्टिकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे होता. साहित्य-निर्मिती करताना ती साहित्यिकांनी कशी केली पाहिजे हे सांगताना ते म्हणतात, तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यकारांनी जोपासली पाहिजेत. ती सतेज बनवली पाहिजेत.

वृद्धिंगत केली पाहिजेत. मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व संस्कृतीमूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा ! आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं मोठ जग आहे हे विसरू नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा नीट समजून आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे.'' (भी. रा. आंबेडकर, 'दलितांचे जग, वेदना आणि शिष्टाई'- ना. रा. शेंडे, नागपूर, १९७८, पृ. ११५-११६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साहित्यविषयक भूमिका व्यापक आहे. साहित्य आणि चळवळीचा अन्योन्य संबंध असून त्याच्या प्रेरणा ह्या सामाजिक स्थित्यंतरे व राजकीय स्थित्यंतरांच्या घटितांमध्ये असतात. ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक प्रा. अरुण कांबळे म्हणतात, ''फ्रेंच राज्यक्रांतीच्या मुळाशी रुसी आणि व्हाल्टेअर यांनी केलेली साहित्यिक, वैचारिक क्रांती होती. रशियन राज्यक्रांतीच्या पाठीमागे कार्लमार्क्स यांचे क्रांतिकारक साहित्य होते. बंदुकीच्या नळीतून गोळी बाहेर पडते. त्याप्रमाणे लेनिनच्या लेखणीतून शब्द बाहेर पडताना दिसतात. मार्क्स, माओ, तथागत गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त हे सर्व क्रांतिकारक व धर्मसंस्थापक पहिल्यांदा साहित्यिक आणि कवी होते.'' (मेश्राम केशव/उषा देशमुख : (संपा.), 'दलित साहित्याची स्थितीगती', लेख 'दलित साहित्याची स्थितीगती', प्रा. अरुण कांबळे, मुंबई विद्यापीठ आणि अनुभव पब्लिकेशन्स, मुंबई प्र. आ. ११९७ पृ. १३९) प्रा. अरुण कांबळे यांचे मत योग्यच आहे. थोडक्यात सामाजिक आणि राजकीय घटितांच्यामधून साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणा मिळालेल्या दिसून येतात. सामाजिक सुधारणेची सत्यशोधक चळवळ व राष्ट्रीय जागृतीसाठी झालेले इतिहास लेखन याची सर्वात मोठी साक्ष आहे. लोकहितवादी यांची 'शतपत्रे', महात्मा फुले यांचे लेखन, सावित्रीबाई फुले यांचे काव्यलेखन, बाबा पदमनजी यांचे साहित्य, आगरकरांचे लेखन, गोपाळ कृष्ण गोखले यांचे लेखन, ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या, केशवसुत यांचे नवसमाजनिर्मिती विषयक काव्यविचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखन इ. उदाहरणे म्हणजे सामाजिक आणि राजकीय घटितांच्या प्रेरणाच असलेल्या दिसून येतात.

### १.४.१ व्यक्तिच्या प्रभावातून निर्मिती

जगभरातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व ऐतिहासिक कर्तृत्वाची उदाहरणे पाहताना आपणाला देशोदेशीचे दार्शनिक विचार व महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वांच्या प्रभावांची तेजोमय उदाहरणे सापडतील. गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, कच, चार्वाक, कपील, सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, हेगेल, रुसो, व्हाल्टेअर, थॉमस, स्पेन, कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स, मार्टिन ल्यूथर किंग, महात्मा फुले, कबीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तुत्वाच्या व विचार आंदोलनाच्या प्रभावातून खूप मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झालेली दिसून येते. व्यक्तिप्रभाव हा त्या-त्या युगाचा मूलभूत मार्गदर्शक विचार असतो. त्यामध्ये समाजाला सर्वंकष दिशा देणारी नैतिक मूल्ये सामावलेली असतात. त्या विचारांचे निर्माते हे युगपुरुष दिपस्तंभ किंवा प्रज्ञासूर्य ठरतात. त्यांच्या तेजस्वी विचार आंदोलनातून साहित्य निर्मिती होत असते

याला व्यक्तिप्रभाव म्हणतात. थॉमस स्पेन यांच्या विचारांचा प्रभाव महात्मा फुले यांच्यावर होता. त्यांच्या 'मानवी अधिकार' या ग्रंथाने फुले यांना व्यक्तिस्वातंत्र्य व मानवतावाद इ. तत्त्वांचा परिचय होऊन सामाजिक सुधारणा व सत्यशोधनाची दृष्टी प्राप्त झाली. थॉमस स्पेन यांच्या विचारांचा प्रभाव महात्मा फुल्यांवर शेवटपर्यंत होता. विश्वातल्या सर्व शोषितांबद्दल फुलेंना कळवळा होता. म्हणूनच दीडशे वर्षांपूर्वी त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ निग्रोंच्या गुलामीला अर्पण करताना, त्यापासून निग्रोंची मुक्तता व्हावी अशी मनिषा बाळगलेली दिसून येते. महात्मा गांधी यांच्यावर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आचार-विचारांचा प्रभाव होता. त्यातून त्यांची ग्रंथनिर्मिती झालेली दिसून येतात. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरती तथागत, गौतम बुद्ध, संत कबीर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांचे समग्र लेखन, धम्मक्रांतीच्या विचारांचे प्रतीक असलेले दिसते. महात्मा फुले, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावातून मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रात प्रगती झाली. तसेच साहित्यनिर्मितीही झाली. या व्यक्तिप्रभावातील नवसाहित्यनिर्मिती याविषयीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

### १.४.२ महात्मा जोतिबा फुले (१८२७ ते १८९०)

महात्मा फुले यांनी आयुष्यभर समाजसुधारणा, ज्ञान प्रसार व विज्ञानवादी विचारांनी सत्यशोधकाचे काम केले. त्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात लादल्या गेलेल्या गुलामगिरीला जाहीर विरोध करून आपल्या कृती-उक्तीने हल्लाबोल केलेला दिसून येतो. जोतिबा फुले हे कृतिशील समाजसुधारक होते. त्यांचा जन्म खटाव तालुक्यातील कटगुण या गावी झाला. सामाजिक विषमतेचे चटके त्यांना बालवयातच बसले. त्यांच्या आईवडिलांनी गाव सोडले व पुण्याचा रस्ता धरला. पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यातील 'खानवडी' येथे राहून त्यांनी शेती केली. पेशवाईच्या सरत्या काळात त्यांना फुले पुरवण्याचे काम महात्मा फुलेंच्या वडिलांनी केले. महात्मा ज्योतिबा फुलेंचे शिक्षण प्रथमतः १८३४-३८ या काळात पंतोजींच्या शाळेत मराठीत झाले. तर त्यांचा विवाह १८४० साली खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला व त्यानंतर १८४१-४७ या काळात त्यांचे पुढील शिक्षण स्कॉटिश मिशनरी इंग्रजी शाळेत झाले. इंग्रजी शिक्षणामुळे जोतिबा यांचे मन चिकित्सक होऊ लागले. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. त्यांनी सावित्रीबाईंनाही शिक्षण दिले. गोरगरीब, अस्पृश्य मुला-मुलींसाठी शाळा काढल्या. शिक्षण हे मानवी जीवन सुधारण्याचे व माणूस बनविण्याचे मूलभूत साधन आहे हे त्यांना पक्के कळल्यामुळे त्यांनी सामाजिक विषमतेचे व शूद्रांच्या अधोगतीचे मूळ अज्ञानात असून बहुजन समाज शिक्षित झाला पाहिजे यासाठी शैक्षणिक व सामाजिक सुधारणेच्या कार्याला प्रारंभ करून त्यांनी सर्व प्रकारच्या गुलामगिरीला हद्दपार करण्याचे कृतीशील विचार-आचारांचे कार्यक्रम हाती घेतले. त्यासाठी त्यांनी वैश्विक स्वरूपाचे साहित्यलेखन करून भारतीय समाजसंस्कृतीचा तळमूळ शोधला. समाजविज्ञान व धर्मनिरपेक्षता या मूल्यांना त्यांनी आपल्या लेखणीने बळच प्राप्त करून दिलेले दिसते. त्यांचे एकूण साहित्यलेखन पुढील अनेक पिढ्यांना आदर्शवत ठरलेले आहे. त्यांच्या साहित्यसंपदेचा मागोवा पुढीलप्रमाणे होय.

**(अ) ग्रंथनिर्मिती**

१. गुलामगिरी : १८७३

२. हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेले निवेदन (निबंध) १८८२

३. शेतकऱ्यांचा आसूड १८८३

४. इशारा (निबंध) १८८५

५. अस्पृश्यांची कैफियत (निबंध) १८८५

६. सत्सार भाग एक व भाग दोन (निबंध/नियतकालिक) १८८५

७. सार्वजनिक सत्यधर्म – १८९१

**(ब) पद्यलेखन**

१. छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा – १८६९

२. विद्या खात्यातील ब्राह्मण पंतोजीचा पोवाडा – १८६९

३. ब्राह्मणांचे कसब (दीर्घकाव्य) – १८६९

४. सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी – १८८७

५. अखंडादी काव्यरचना – १८८९

**(क) स्फुट लेखन**

१. सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकीकत – २४ सप्टेंबर १८७६

२. पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट – १८७०

३. दुष्काळाविषयी विनंतीपत्र – १८७७

४. दारूची दुकाने उघडू नयेत म्हणून पत्र – १८८०

५. ग्रामजोशांविषयी जाहीर खबर – १८८४

६. मराठी ग्रंथकार सभेस पत्र – १८८५

७. स्वामी परमानंद यांना पत्र – १८८६

८. ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांना लिहिलेली पाच पत्रे – १८८८

९. मृत्युपत्र – १८८७ इत्यादी

### (ड) तृतीय रत्न – नाटक – १८५५

महात्मा जोतिबा फुले यांचे वरील वाङ्मय, नव्या धाटणीचे व नव्या मूल्यांवर आधारित होते. ज्यामध्ये माणसाचे, समाजाचे व वंचित घटकांचे हीत जोपासण्याचे महान कार्य फुले यांनी केलेले आहे. प्राचीन मराठी काव्यलेखन काही ठरावीक विषयांनी बंदिस्त होते. वेदांत विचार, आत्मविचार, धर्म व संस्कृती, भक्तिमार्ग, परमार्थ, अध्यात्म, रामकृष्णाच्या व कौरवपांडवांच्या युद्धकथा अशा काही ठरावीक विषयांवर संतसाहित्य आधारलेले होते. महात्मा फुले यांनी मराठी वाङ्मयाला वैश्विक दर्जा देण्याचा प्रयत्न आपल्या लेखनातून केला. मराठी कविता फुलेंच्या निर्मितीतून पहिल्यांदाच बदलत होती. अभंगाला नव्या स्वरूपात 'अखंड' मधून अक्षरबद्ध केले. मुक्तछंदात काव्यनिर्मिती होऊ लागली होती. शूद्रातिशूद्रांना, त्यांच्या जीवनाला प्रथमतःच मराठी काव्यात महात्मा फुलेंमुळे स्थान मिळत होते. आधुनिक विचारांचा, नव्या बदलांचा, नव्या रचनांचा बाज मराठी काव्याला देण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केशवसुतांच्या अगोदर केलेला आहे. याबद्दल डॉ. यशवंत मनोहर म्हणतात की, ''तेव्हा आधुनिक कवितेचे जनक जर केशवसुत ठरत असतील तर आधुनिक काव्यक्रांतीचे अग्रदूत व आधुनिक काव्यासाठी वैचारिक भूमी तयार करणारे कवी म्हणून जोतिबा फुल्यांचे कार्य टाळले जाऊ नये. मराठी कविता केशवसुतांच्या काव्यलेखनातून आमूलाग्र बदलली असे आपण म्हणतो पण या बदलाची पहाट, परिवर्तनाचा उषःकाल अर्थात या बदलाचे सर्व संकेत फुल्यांच्या काव्यलेखनात मिळतात ही बाब समजून घेण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर संतांची कविता व शाहिरी आणि आधुनिक कवितेचे जनक केशवसुत यांना जोडणारा दुवा म्हणूनही फुल्यांच्या कवितेचा विचार व्हायला पाहिजे.'' (डॉ. यशवंत मनोहर – मराठी कविता आणि आधुनिकता, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९३, पृ. २३) डॉ. यशवंत मनोहर यांचे मत अभ्यासनीय आहे. हा प्रभाव आपणाला सातत्याने जाणवत राहतो. त्याचे कारण, कवितेतून मानवी अधिकार व गरीबांना न्याय आणि सामाजिक समतेची जाहीर मागणी पहिल्यांदा महात्मा फुले यांनी केली व त्यानंतर तो आवाज केशवसुतांच्या कवितेत दिसतो. महात्मा जोतिबा फुले यांची ग्रंथनिर्मिती ही समाजप्रबोधन आणि परिवर्तनासाठी होती. ती स्वान्तसुखाय अशी कधीच नव्हती तर ती 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' अशी होती म्हणूनच त्यांच्या ग्रंथनिर्मितीला आजही महत्त्वाचे स्थान असलेले दिसते. याबद्दल डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''जोतिबांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' ही पुस्तके लिहून श्रुतिस्मृतिपुराणोक्त व धर्मकल्पनांवर व ब्राह्मणांच्या वर्चस्वावर हल्ला केला.'' डॉ. वसंत बिरादार यांचे मत योग्यच आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या एकूण चरित्राचा व समग्र वाङ्मयाचा मोठा असा प्रभाव अलीकडच्या दलित साहित्यावर पडलेला आहे. या साहित्याची एक प्रेरणा व आदर्श म्हणून महात्मा जोतिबा फुले यांचे साहित्य दलित साहित्याच्या इतिहासात नोंद झालेले दिसून येतात. याबद्दल डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, ''म. जोतिबा फुले यांची विचारपरंपरा ही दलित साहित्याची प्रथम प्रेरणा मानण्यात येते. याचे कारण म. फुल्यांनी आपल्या विचाराने व कृतीने सामाजिक विषमता, अस्पृश्यता व वर्णजातीवर्चस्वाविरुद्ध बंडाचा उठाव केला. दलितोद्धाराचा, त्यांच्या मुक्तीचा व माणुसकीचा लढा सामाजिक-धार्मिक रूढीविरुद्ध आयुष्याच्या अखेरपर्यंत चालविला. फुले मानवतावादाचे व समतेचे निस्सीम पुरस्कर्ते होते. समाजाला न्याय

मिळवून देण्यासाठी अन्यायाविरुद्ध, समतेसाठी विषमतेविरुद्ध आणि माणुसकीचे हक्क हिरावून घेणाऱ्या अमानुषतेविरुद्ध त्यांनी केलेल्या बंडाची तसेच समाजजागृतीची प्रेरणा त्यांच्या साहित्यातून मिळते.'' (डॉ. योगेंद्र मेश्राम - दलित साहित्य - उद्‌गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९८, पृ. १७०) डॉ. योगेंद्र मेश्राम यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा क्रांतिकारी व मानवतावादी प्रभाव सांगण्याचा केलेला प्रयत्न योग्यच आहे. महात्मा जोतिबा फुले यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ अनेक अर्थाने महान ग्रंथ आहे. या ग्रंथाने शूद्रातिशूद्र समाजाच्या उत्थानाचे महान कार्य केले आहे. या ग्रंथाचा उद्देश सांगताना महात्मा जोतिबा फुले म्हणतात, ''या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, आज शेकडो वर्षे शूद्रादी अतिशूद्र ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशित आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत, तर या गोष्टीकडे त्या सर्वांचे लक्ष्य लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भट-ब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे.'' (महात्मा जोतिबा फुले - 'गुलामगिरी' (महात्मा फुले समग्र वाङ्मय (संपा.) धनंजय कीर व स. ग. मालशे) समग्र वाङ्मय - म. रा. सा. सं.मं. द्वारा प्रकाशित, १९६९, पृ. ८३) हे पाहता महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य किती महान होते हे लक्षात येते. त्यांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथाबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''जोतिरावांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा विचार होता. जोतिबा फुले यांना जी भयंकर सामाजिक बंधने दिसली, ती तोडण्याचे जबरदस्त शिक्षण त्यांना कुठून प्राप्त झाले, याचे उत्तर शोधणे म्हणजेच त्यांच्या महात्मतेच्या रहस्याचा शोध घेणे होय. नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय, परंपरागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही. 'गुलामगिरी'तील संदेश आपणास भारतातील परंपरागत, ब्राह्मणप्रधान धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरुद्ध उठाव करण्यास प्रेरित करतो.'' (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - महात्मा फुले - समग्र वाङ्मय प्रस्तावना) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वरील मतातून महात्मा जोतिबा फुले यांची दूरदृष्टी प्रत्ययाला येते. महात्मा जोतिबा फुले यांनी १८५५ साली 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहून पुरोहित वर्ग सर्वसामान्य लोकांना धार्मिक बाबींचा धाक दाखवून कशी फसवणूक करतो याचे वास्तव सांगण्याचा प्रयत्न केला. स्त्रीशूद्रातिशूद्रांचा उद्धार व्हावा, त्यांना आत्मभान यावे, यासाठी त्यांनी सत्यशोधक जलशाला सुरुवात केली. हे जलसे कमालीचे लोकप्रिय झाले, त्याचे कारण त्यांचे सादरीकरण होय. त्या-त्या ठिकाणाची गरज पाहून या जलसाच्या सादरीकरणात बदल केला जात असे. बहुजन समाजाचे प्रश्न, सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे विषय, साधी-सोपी सरळ लोकभाषा, लोकमत, नृत्य, संगीत, गीतरचना, अखंड, पोवाडे इ. ची सरमिसळ इतकी लाजवाब असे की, त्यातून लोकप्रबोधन होत होते. याबद्दल डॉ. भगवान ठाकूर म्हणतात, ''सत्यशोधक जलसे म्हणजे एका अर्थाने लोकधर्मी नाट्यपरंपरेचा समाज-प्रबोधनात्मक गीत-संगीतमय लोकनाट्याचा आविष्कार होय.'' स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या सम्यक उद्धारासाठी गीत, संगीत, नृत्य आणि नाट्य यांची चातुर्यपूर्ण गुंफण करून सादर केलेले सामाजिक आशयाचे तमाशे म्हणजेच सत्यशोधक जलसे होत.'' (भगवान ठाकूर - आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. ०४) भगवान ठाकूर यांचे मत योग्यच आहे. बुद्धिप्रामाण्यवादी असलेले महात्मा जोतिबा फुले मूलगामी

विचारांवर भर देऊन बहुजन समाजाला दिशा देणारे लेखक होते. ग्रामीण खेड्यातील दिन-दलित शेतकरी, शेतमजूर, स्त्रीवादी, शोषित, वंचित घटक त्यांच्या विचारांचा व लेखनाचा केंद्रबिंदू होते. त्या वंचित घटकांना अस्मिता प्राप्त व्हावी, कष्टकऱ्यांच्या घामाला, कष्टाला व मेहनतीला फळ मिळून त्यांचे जीवन सुखी व्हावे हा ध्यास महात्मा जोतिबा फुले यांच्या कवितेला व एकूण लेखनाला लागला होता. म्हणून महात्मा जोतिबा फुले हे ग्रामीण साहित्याचेही प्रेरणास्थान असलेले दिसून येतात. त्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ आजही जगाला आदर्शवत आहे. लोकशाही प्रस्थापित पुढील काळात शासन व देशाला दिशा देण्याचे काम करत आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाबद्दल प्रा. नंदकुमार साळुंके म्हणतात, ''या ग्रंथामध्ये म. फुले यांनी सरकारचे गोरे अधिकारी ऐषोआरामात लीन असल्याने त्यांनी कारभाराचा सर्व भार ब्राह्मण कामगारांकडे सोपवला. हा ब्राह्मण वर्ग शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत त्यांची लुबाडणूक करत आहे आणि सरकार यावर उदासीन वृत्तीने पाहत आहे. जे ब्राह्मण शिकले नाहीत ते गळ्यात माळ घालून अज्ञानी शेतकऱ्यांना धर्माच्या नावाने लुबाडत आहेत, ही दुहेरी लूट म. फुले यांनी दाखवून दिली. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची विविध कारणे देऊन त्यावर उपायही सुचविले आहेत. उदा. ब्राह्मणांना नोकरीत त्यांच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा देऊ नयेत. खरे तर आरक्षणाच्या मागणीची हीच पहिली ठिणगी होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शूद्र मानल्या गेलेल्या शेतकऱ्यांना जगण्याची आणि प्रतिकार करण्याची नवी हिंमत यावी म्हणून या पुस्तकाला जाणीवपूर्वक 'शेतकऱ्यांचा आसूड' हे नाव दिल्याचे सांगून या सर्वांचे मूळ शिक्षणात आहे हे खालील तीन ओळीत ते व्यक्त करतात.

*विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली ।*
*नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले।*
*वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले।*

या पुस्तकामध्ये शिक्षणाअभावी शोषण होत असलेल्या शेतकऱ्यांचे व शेतीतील समस्यांचे वर्णन केले आहे. (प्रा. नंदकुमार साळुंके - युगपुरुष महात्मा जोतिराव फुले, ज्ञानसूर्य प्रकाशन, पुणे, प्र.आ., २०१७, पुर्नमुद्रण २०१८, पृ. ५०, ५१) प्रा. नंदकुमार साळुंके यांनी वरील विवेचनातून 'शेतकऱ्यांचा आसूड' या महात्मा जोतिबा फुले यांच्या पुस्तकाचे महत्त्व विशद केलेले आहे.

**समारोप** : महात्मा जोतिबा फुले यांच्या विचार व एकूण साहित्याचा प्रभाव मराठी साहित्यावर पडलेला दिसून येतो. 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड व सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाला अनेक क्षेत्रात क्रांतीसन्मुखतेने विचार करायला लावणारी आहेत. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, कामगार साहित्य, गुराख्यांचे साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लिम सत्यशोधक साहित्य, इ. साहित्यप्रवाहांना त्यांनी नवे आशय-विषय व मूल्यप्रधान विचार दिलेले दिसून येतात. थोडक्यात, महात्मा जोतिबा फुले यांच्या आचार-विचारांचा व साहित्यातील वाङ्मयीन जीवनमूल्यांचा फार मोठा प्रभाव पुढील साहित्यावर पडलेला दिसतो. हे मात्र आपणाला सातत्याने जाणवते.

### १.४.३ महात्मा गांधी (२ ऑक्टोबर १८६५ ते ३० जानेवारी १९४७)

महात्मा गांधी यांचा जन्म पोरबंदर, काठियावाड येथे झाला व त्यांची हत्या नवी दिल्ली येथे झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे व स्वातंत्र्यप्राप्तीचे अग्रगण्य नेते म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद व आईचे नाव पुतळाबाई होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोरबंदर येथे झाले व नंतरचे शिक्षण राजकोट येथे झाले. भारत देशातील एक प्रभावी नेता म्हणून जग त्यांच्याकडे पाहते. त्यांचे वडील राजकोट येथे संस्थानचे दिवाण होते.

महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील बलाढ्य नेते व तत्त्वज्ञ सुद्धा होते. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी हरप्रकारचे प्रयत्न केले. सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे ते प्रणेते होते. त्यांना रविंद्रनाथ टागोर यांनी प्रथमतः महात्मा ही उपाधी बहाल केली. तर सुभाषचंद्रजी बोस यांनी त्यांना 'राष्ट्रपिता' म्हणून इ.स. १९४४ मध्ये प्रथमतः संबोधले. त्यांच्या जीवनावर लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन, गोपाळ कृष्ण गोखले इ. प्रभृतींचा प्रभाव होता. असहकार व अहिंसा या तत्त्वांना धरून त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय नागरिकांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच, राजकारण, समाजकारण केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची धुरा सांभाळताना त्यांनी गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण इ. साठी देशभर विविध प्रकारे चळवळ सुरू ठेवलेली दिसून येते. त्यांच्या देशव्यापी कार्याबद्दल डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, ''महात्मा गांधी हे हिंदी राजकारणातील एक अत्यंत बलिष्ट राजकारणी पुरुष होत. त्यांच्या दैदिप्यमान कर्तृत्वामुळे दिपून गेलेल्या हिंदी लोकांचे ते एकप्रकारे 'अनभिषिक्त राजे'च होते. म्हणूनच म. गांधी हे त्यावेळच्या राजकारणाचे अध्वर्यू, स्वराज्यकांक्षी आणि स्वातंत्र्यलढ्याची प्रमुख प्रेरक शक्ती ठरले. गांधीजींचा विशेष हा की, टिळकांप्रमाणे त्यांनी सामाजिक प्रश्न डावलून केवळ राजकारणच साधले नाही, तर राजकीय सत्ता हे समाजाच्या उत्कर्षाचे एक महत्त्वाचे साधन आहे, असे त्यांचे मत होते आणि राजकीय व सामाजिक सुधारणा परस्पर विरोधी नाहीत असे त्यांना वाटत होते.'' (डॉ. योगेंद्र मेश्राम – दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९८, पृ.११२) डॉ. योगेंद्र मेश्राम यांनी गांधीजींच्या समाजकारणातून राजकारण करण्याच्या मानसिकतेचा पैलू उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकमान्य टिळक यांच्यानंतर स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. त्यांच्यातील सात्त्विकता व साधूशील व्यक्तिमत्त्व यांचा प्रभाव देशावर पडला. त्यांना मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळाले. भारतीय समाजाचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांनी आपले विचार 'हरिजन' व 'यंग इंडिया' इ. साप्ताहिकांमधून मांडले. त्यांनी अत्यंत मूलगामी असे लेखन केलेले आहे. त्यांच्या साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे :

(अ) महात्मा गांधीनी लिहिलेले ग्रंथ किंवा वेळोवेळी साप्ताहिकातून केलेले लेखन

१. Indian Home Rule - (हिंदी स्वराज्य) राजकीय पुस्तिका

२. माझे सत्याचे प्रयोग (गांधीजींची संक्षिप्त आत्मकथा)

३. गांधीजींचे जीवन त्यांच्याच शब्दात

४. गांधीविचार दर्शन : अहिंसा विचार

५. गांधी विचार दर्शन : राजकारण

६. गांधी विचार दर्शन : सत्याचे प्रयोग

७. गांधी विचार दर्शन : सत्याग्रह विचार

८. गांधी विचार दर्शन : सत्याग्रहाची जन्मकथा

९. गांधी विचार दर्शन : हरिजन

१०. नैतिक धर्म

११. माझ्या स्वप्नांचा भारत

भारत सरकारने गांधीजींचे संपूर्ण लेखन 'संकलित महात्मा गांधी' या शीर्षकाखाली १९६० च्या दशकात प्रकाशित केलेले आहे. ते १०० खंडात ५०,००० हजार पानांचे आहे. त्यांनी शाकाहार, आहार आणि स्वास्थ्य, धर्म, सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन यांसारख्या विषयांवर मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन केलेले आहे. महात्मा गांधीजी यासोबतच गुजराथी भाषेत लिहित असत. त्यांनी त्यांच्या हिंदी आणि इंग्रजी भाषांतराची परीक्षणे सुद्धा ते करत असत असे दिसून येते. त्यांनी 'हरिजन' या साप्ताहिकांतून गुजराथी, हिंदी, इंग्रजी भाषेत लेखन केलेले दिसते. ते दक्षिण आफिकेत होते तेव्हा 'इंडियन ओपिनियन' यामध्ये लेखन करत होते व त्यानंतर 'नवजीवन' हे साप्ताहिक त्यांनी भारतात प्रथमतः गुजराथी व नंतर हिंदी भाषेतूनही प्रकाशित केल्याचे दिसते. पत्रलेखनात त्यांचे सातत्य होते.

त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेक विचारवंत व साहित्यिकांच्यावर होता. महात्मा गांधीजींच्या जीवन-विचार व कर्तृत्व यांवरील पुस्तके / लेख याचा आढावा पुढीलप्रमाणे -

**(ब) महात्मा गांधीजी यांच्यावरील पुस्तके**

१. अखंड प्रेरणा गांधी विचारांची - डॉ. रघुनाथ माशेलकर

२. अस्त गांधीयुगाचा आणि नंतर - अनंत भोगले

३. अज्ञात गांधी - नारायण देसाई (मराठी रूपांतर सुरेशचंद्र वारघडे)

४. गंगेमध्ये गगन वितळले - अंबरिश मिश्र

५. गांधी चरित्र – पु. ल. देशपांडे व अवंतिकाबाई गोखले

६. गांधीजींचे असामान्य नेतृत्व – बाळ पोतदार

७. गांधीजी होते म्हणून – बाळ पोतदार

८. गांधी नंतरचा भारत – मूळ इंग्रजी लेखक – रामचंद्र गुहा

– मराठी अनुवाद : शारदा साठे

९. शोध गांधींचा – चंद्रशेखर धर्माधिकारी

१०. महात्मा गांधीची – विचारसृष्टी – यशवंत सुमन

११. दुसरे प्रॉमिथियस : महात्मा गांधी – वि. स. खांडेकर

१२. गांधी, विनोबा आणि जयप्रकाश – मिलिंद बोकील

१३. गांधी नावाचे महात्मा – लेखसंग्रह, संपा. रॉय किणीकर

१४. बापू – माझी आई (मूळ लेखिका : अनुबहेन गांधी, मराठी अनुवाद – ना. गो. जोशी)

१५. सत्याग्रही समाजवाद व मार्क्सवादाचा समन्वय : आचार्य शं. द. जावडेकरकृत मीमांसा – प्राचार्य डॉ. शिरीष पवार

१६. गोष्टीरूप गांधीजी व इतर – साने गुरूजी इत्यादी.

महात्मा गांधीजी यांच्यावरील हे विपूल साहित्यलेखन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व्यापकता प्रत्ययास आणून देते. ज्या लेखकांनी त्यांच्या विविध पैलूंवर लेखन केले, त्यांच्यावर गांधीजींच्या विचार-आचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

महात्मा गांधीजी यांच्या वैचारिक लेखनाचे महत्त्व सांगताना प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, '' 'हरिजन' या साप्ताहिकातून त्यांनी आपले राजकीय, सामाजिक व आर्थिक विचार प्रकट केले आहेत. हे विचार म्हणजेच गांधीवाद किंवा गांधी यांचा दृष्टिकोन होय. त्यांचे हे विचार अतिशय वेगळे आणि मौलिक स्वरूपाचे आहेत. त्यांचे बहुतेक विचार भारतीय परंपरेवर आधारलेले असले तरी ते पूर्णपणे परंपरावादी नाही. उलट परिवर्तनशील व प्रगतीवादी आहेत. त्यांच्या विचारांचा एक विशेष म्हणजे ते समाजाच्या केवळ भौतिक कल्याणाचा विचार करीत नाहीत तर अध्यात्मिक मूल्याचाही विचार करतात. त्यांच्या या विचारात अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था, शिक्षण, बुद्धिमत्ता इत्यादी अनेक विषय आहेत.'' (प्रा. डॉ. वसंत बिरादार – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. ४५३) महात्मा गांधीजी यांचा तात्त्विक मूल्यविचार, मानवाची प्रगती, सत्य व अहिंसेचे आचरण, मानवी विकासाची संधी, समाजात एकीकरण आणि सामंजस्य ठेवणे इत्यादी मूलभूत तत्त्वांवर आधारलेला दिसून येतो. त्यांच्या सर्वंकष विचारांचा

प्रभाव मराठी वाङ्मयावर पडलेला आहे. याबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात की, ''सामान्यतः १९२० ते १९५० या कालखंडात गांधीवादाचा सर्वच क्षेत्रात प्रभावी परिणाम झाला आहे. गांधीवादावर तथा गांधी यांच्या कर्तृत्वावर काही ग्रंथ, प्रबंध व निबंध लिहिले गेले. तसेच या कालखंडातही कथा, काव्य, कादंबरी व नाटके या सर्व क्षेत्रात गांधीवादाचे पडसाद प्रभावीपणे उमटले.'' (तत्रैव - पृ. ४५४) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे मत योग्यच आहे. महात्मा गांधीजी यांच्या विचारांचा प्रभाव एवढा मोठा होता की, तत्कालिन सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात फार मोठी खळबळ उडाली होती. याच काळात त्यांच्यावर विविध लेखकांनी पुस्तके लिहिलेली दिसून येतात. 'महाराष्ट्राची सांस्कृतिक आई' म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल त्या साने गुरूजी यांच्यावर महात्मा गांधीजी यांच्या आचारविचारांचा फार मोठा प्रभाव होता. ज्येष्ठ विचारवंत यदुनाथ थत्ते म्हणतात, ''गांधीजी हा गुरुजींच्या जीवनाचा सूर्य होता. हा सूर्य दूर तळपत असला, तरी त्यापासूनच उष्णता आणि प्रकाश मिळवून गुरूजी आपले जीवनपुष्प फुलवीत होते.'' तर ते पुढे साने गुरूजींवरील गांधीवादी आचारविचारांचा प्रभाव किती व्यापक व दूरगामी झाला होता हे सांगताना म्हणतात, गुरूजींच्या वाङ्मयातही आपल्याला सर्वत्र गांधी विचारांचे दर्शन होते. महाराष्ट्राला गांधीजींची खरी ओळख करून देण्याचे श्रेय ज्या थोड्या व्यक्तींना आहे, त्यात गुरूजींचे स्थान फार वरचे आहे. मानवी मनाची उंच भरारी आणि मानवी मनाचा कमकुवतपणा त्या दोन गोष्टींची जाणीव दोघांच्या जीवनात विपूल होती. कारण ते दोघे जन्मजात थोरपण घेऊन आलेले नव्हते. थोरपण स्वप्रयत्नाने मिळवणारे दोघेही जीवनवीर होते. गुरूजींचे वाङ्मय 'पत्री' पासून सुरू झाले. त्यांनी 'सुंदर पत्रे' किंवा 'विद्यार्थी' मासिकापासून साहित्यसेवा सुरू केली ती 'साधना' साप्ताहिकापर्यंत. ह्या सर्व साहित्यात गांधीजींचे सर्वत्र दर्शन होते.'' (साने गुरूजी - गोष्टीरूप गांधीजी व इतर, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती २०११, प्रस्तावनेमधून) यदुनाथ थत्ते यांचे मत सानेगुरूजींवरील महात्मा गांधीजींचा प्रभाव स्पष्ट दाखवणारे आहे. मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये महात्मा गांधीजी यांच्या विचारांचा प्रभाव वा. म. जोशी. वि. स. खांडेकर, साने गुरूजी यांच्या कादंबरी लेखनावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. वामन मल्हार जोशी यांच्या कादंबरीलेखनावरील प्रभाव सांगताना प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''वैचारिक व राजकीय क्षेत्राप्रमाणेच गांधीवादाचा कादंबरी क्षेत्रातही प्रभाव पडलेला आहे. गांधीवादाचा बराच मोठा प्रभाव (हा प्रभाव वैचारिकही आहे) वा. म. जोशी यांच्या मनावर व वाङ्मयावर पडलेला आहे. जोशी यांच्या कादंबऱ्यांमध्ये सामाजिक आशय बराच असतो. त्यांच्या सर्वच कादंबऱ्या विचार-प्रधान असतात. वा. म. जोशी गांधींच्या राजकीय चळवळीत होते. त्याकरिता त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. 'सुशिलेचा देव' या कादंबरीत विश्वकुटुंबवादाबरोबरच समाजवादाचाही पुरस्कार केलेला आहे. त्याबरोबरच हे दोन्ही वाद व्यक्तिविकासाला घातक होण्याचा संभव आहे अशी भीतीही व्यक्त केलेली आहे. 'इंदू काळे' व 'सरला भाळे' या त्यांच्या कादंबऱ्यात त्यांनी गांधीवादाचा बुद्धिप्रामाण्यवादी परामर्श घेतलेला आहे. यातील नायक विनायकराव गांधी यांच्या प्रभावाखाली असून ते गांधी यांच्या चळवळीत भाग घेतात व जेलमध्ये जातात. तरीही ते पूर्ण गांधीवादी नाहीत. गांधीवादी लोक कसे दुराग्रही असतात हेही त्यांनी दाखवून दिले आहे. सारांश एवढाच की, गांधीवाद हा त्यांना व्यावहारिक वाटत नाही.''

(प्रा. डॉ. वसंत बिरादार - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. ४५५, ४५६) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे मत योग्यच आहे.

वामन मल्हार जोशी यांच्याप्रमाणेच वि. स. खांडेकर यांच्या 'कांचनमृग' ते 'ययाती' पर्यंतच्या सर्व कादंबरी लेखनावर गांधीवादाचा प्रभाव आहे. याबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''वि. स. खांडेकर यांच्याही कादंबऱ्यांवर गांधीवादाचा प्रभाव आहेच. खांडेकरांच्या 'कांचनमृग' पासून ते 'ययाती' पर्यंतच्या कादंबऱ्यांवर गांधीवादाचा बराच प्रभाव पडलेला दिसतो. त्यांच्या कथांवरही गांधीवादाचा प्रभाव आहेच. खांडेकरांची प्रकृती साने गुरूजींप्रमाणेच गांधीवादास अनुकूल आहे. खांडेकर हे त्याग, ध्येय, पराक्रम, व मानवतापूजक आहेत. त्यामुळेच त्यांच्या कथा-कादंबरीत हे सारे गुण गांधी आणि गांधीवादाने भारलेले आहेत. 'उल्का' कादंबरीतही गांधी यांचा ध्येयवाद दिसून येतो. 'क्रौंचवध' या कादंबरीतही गांधीवादाची विचारसरणी उमटली आहे. तरीही असे म्हणता येत नाही की, खांडेकरांची प्रकृती बऱ्याच अंशी गांधीवादी असली तरी गांधी यांचा अतिरेकीपणा खांडेकरांना पसंत नसावा असे दिसते.'' (तत्रैव, पृ. ४५६) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांनी वि. स. खांडेकरांच्या कादंबरी लेखनावर असलेल्या गांधी यांच्या प्रभावाचे योग्य मूल्यमापन केलेले आहे. मराठी कादंबरी वाङ्मयात गांधीवादी प्रभाव असणाऱ्यांमध्ये प्रेमा कंटक व सानेगुरूजी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. याबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात. 'प्रेमा कंटक व साने गुरूजी हे गांधीवादाचे आत्यंतिक पुरस्कर्ते आहेत. त्यांची गांधीवादावर अतिशय श्रद्धा व निष्ठा आहे. पण त्यांच्या कादंबऱ्यात शुद्ध गांधीवाद नाही. प्रेमा कंटक यांनी 'काम आणि कामिनी' व 'अग्नियान' या दोन गांधीवादी बैठक असलेल्या कादंबऱ्यांही लिहिल्या. साने गुरूजींचे व्यक्तित्त्व मात्र बऱ्याच अंशी गांधीवादाला अनुकूल होते. गांधीवादाचे अस्तिकता, आदर्शवाद, सेवाभाव, त्याग, निष्ठा, बुद्धिवादावरील श्रद्धा, मनुष्याबद्दल प्रेमभाव इत्यादी सर्व गांधी यांचे विशेष त्यांच्या कादंबरीत व लिखाणात दिसतात. पण त्यांच्या कादंबरीत कलात्मकता कमी आहे. (तत्रैव, पृ. ४५६) डॉ. वसंत बिरादार प्रेमा कंटक व साने गुरूजी यांच्या कादंबरी लेखनावरील गांधीवादाचा प्रभाव सूक्ष्मपणे मांडताना दिसतात. यापुढेही जाऊन ते साने गुरूजींच्या काही कादंबऱ्यातील गांधीवादी अशा निष्ठांचा कसा प्रभाव आहे हे सांगताना म्हणतात, ''साने गुरूजींची 'क्रांती', 'संध्या', 'रामाचा शेला', 'धडपडणारी मुले', 'श्याम' व 'श्यामची आई' या कादंबऱ्या लिहून गांधीदावरील आपली निष्ठा प्रकट केली. त्यांचे सर्व नायक गांधीवादी आहेत. त्यांच्या 'संध्या' कादंबरीत गांधीवाद व मार्क्सवाद यांचे विचारमंथन दाखविले आहे. पण गांधीवादाच्या आत्यंतिक पुरस्कारामुळे त्यांच्या कादंबऱ्या एकांगी झालेल्या आहेत. मात्र यात भावुकता, आवेग, आत्यंतिक जिव्हाळा वाणीचे मार्दव इत्यादी गुणवैशिष्ट्याने प्रगट झालेले आहेत.'' (तत्रैव, पृ. ४५६) डॉ. वसंत बिरादार यांचे मत योग्यच आहे.

याशिवाय विनोबा भावे, दादा धर्माधिकारी इ. नी गांधीवादी विचारसरणीचा निष्ठेने पुरस्कार करून आपले लेखन केलेले दिसून येते. मराठी कवितेवरील गांधीवादाचा प्रभाव पाहताना आपणाला भा. रा. तांबे, माधव ज्यूलियन. कवी यशवंत, विठ्ठलराव घाटे, बा. भ. बोरकर, डॉ. वि. भि. कोलते, जयकृष्ण केशव उपाध्ये, टेकाडे, द. भि. रणदिवे, ना. के. बेहेरे, कवी सुधांशू, भ. श्री. पंडित, द. रा. बेंद्रे, राजा मंगळवेढेकर,

श्रीनिवास खांडेकर, तळवळकर, श्रीपाद जोशी, इंदू टिकेकर, सोपान देव चौधरी, गो. ह. पाटील, साने गुरूजी, संजीवनी मराठे इ. कवींच्यावर तो प्रभाव असल्याचे आपणाला जाणवते. त्याचबरोबर कवी गिरीश कळस, प्रभाकर माचवे, मार्क्स आणि गांधी, साने गुरूजी 'पत्री' हा काव्यसंग्रह, कुसुमाग्रज यांची 'करा दूर धर हात' ही कविता तर बोरकर यांच्या 'मज लोभस हा इहलोक हवा' तसेच महात्मा गांधी यांच्या जीवनावरील 'महात्मायन' ह्या प्रदीर्घ काव्यनिर्मितीचा संकल्प अपूर्ण राहिलेला आहे. अशाप्रकारे कमी-अधिक प्रमाणात गांधीवादाचा प्रभाव मराठी कवितेवरही असलेला दिसून येतो. याबरोबरच गांधीवादी विचारांचा मराठी नाटकांवरही थोडाफार प्रभाव होता. हे स्पष्ट करताना प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''गांधी आणि गांधी-वाद यांचा प्रभाव मराठी नाट्यक्षेत्रात फारसा उमटला नाही. एक वरेरकर यांचा अपवाद वगळता गांधी व गांधीवादावर मराठीत फारशी नाटके निर्माण झाली नाहीत. तात्पर्य हे की, गांधी आणि गांधीवादाचा परिणाम महाराष्ट्रावर थोड्या प्रमाणात झाला आहे हे खरे आहे; परंतु महाराष्ट्राची भूमी गांधीवादाला फारशी अनुकूल नाही. त्यामुळे आचार्य जावडेकर, शंकर देव, विनोबा भावे, साने गुरूजी, धर्माधिकारी इत्यादी गांधीवादी मंडळी सोडून दिल्यास गांधीवाद हा पाहिजे तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्रात रुजू शकला नाही असेच म्हणावे लागते.'' (तत्रैव, पृ. ४६०) डॉ. वसंत बिरादार यांचे म्हणणे बरोबर आहे.

**समारोप** : थोडक्यात, मराठी साहित्यात गांधीवादाचा प्रभाव विविध साहित्यिक व साहित्यप्रकारांवर कमी-जास्त प्रमाणात झालेला दिसून येतो. महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान त्या काळात लोकप्रिय झाले होते. शिवाय राष्ट्रभक्ती व स्वातंत्र्यप्राप्ती हे दोन भाग महात्मा गांधी जोमाने पेलताना दिसतात. देशभरातील गांधीजींचे अनुयायी त्यांच्या पाठीशी होते. याचा परिणाम म्हणजे मराठी साहित्यावर देखील असा कलावंत व लेखकांकडून गांधी व गांधीवादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

### १.४.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल १८९१ ते ६ डिसेंबर १९५६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मराठवाड्यातील महू या गावी झाला. त्यांचे वडील सैन्यात सुभेदार होते. डॉ. आंबेडकरांचे शिक्षण इंग्लंड-अमेरिका येथील विद्यापीठांमध्ये झाले. त्यांनी विविध क्षेत्रातील सर्वोच्च अशा पदव्या संपादन केल्या. ज्ञानसंपन्नता व विद्वत्ता यांनी डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व झळाळून निघाले होते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय व बौद्धिक क्षेत्रांवर त्यांच्या आचार-विचारांचा मोठा प्रभाव असलेला दिसून येतो. भारतीय लोकशाही घटनेच्या प्रस्थापनेच्या प्रक्रियेत डॉ. आंबेडकरांचा मोठा वाटा आहे. भारतीय संविधानाची निर्मिती हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा देशप्रेमाचा भाग आहे. जागतिक विद्यापीठांतील सर्वोच्च पदव्या मिळाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी समाजप्रबोधन, परिवर्तन व देशहितांना प्रोत्साहन देऊन आधुनिक विचारांची वैचारिक व कृतिशील आंदोलने उभी केली. त्यांनी आपल्या आयुष्यात केलेले वाचन, चिंतन, मनन, लेखन, वादविवाद, चर्चा, पुनर्मांडणी हा एक साहित्य, संशोधन व चळवळीचा भाग होता. त्यांच्या बुद्धिमत्तेचे, मानवतेचे व देशहिताचे सार त्यांच्या लेखनात असलेले दिसते. लाखो ग्रंथांचे अध्ययन केलेल्या डॉ. आंबेडकरांनी भारत देशाच्या नवसमाजनिर्मितीला देशाच्या राष्ट्रीय एकात्मता व विकासाला अग्रस्थान दिल्याचे दिसते. हे करत

असताना भारतीय विषमता नष्ट व्हावी ही त्यांची मनिषा होती. त्यांनी सर्वदूर व सर्वक्षेत्रात पसरलेल्या भारतीय विषम व्यवस्थेला समतेच्या पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्यासारख्या प्रगत व आधुनिक विचारांचा विज्ञानवादी, बुद्धिनिष्ठ आणि तर्कनिष्ठ नेता सापडणे मुश्किल आहे. कारण त्यांचे विचार काळाबरोबर व काळाच्याही पुढे दिशा दिग्दर्शन करणारे होते. भारतीय समाजातील धर्मांध व जात्यांध विषमता नष्ट करून देश सर्व प्रकारच्या समतेच्या पातळीवर आणण्यासाठी त्यांनी जे आजन्म प्रयत्न केले त्याला या भारत देशाच्या इतिहासात तोड नाही. याबद्दल डॉ. यादव गायकवाड म्हणतात, ''सामाजिक विषमता हा डॉ. आंबेडकरांचा चिंतन विषय होता. या विषयाचा सर्वस्पर्शी सूक्ष्म असा विचार अन्य कुणा महापुरुषाने केला असेल असे मला वाटत नाही.'' (डॉ. यादव गायकवाड – ''सम्यक संवाद'' प्रज्ञा प्रबोध प्रकाशन, सांगली, प्र. आ. २०१०, पृ. २३५) डॉ. यादव गायकवाड यांचे मत योग्यच आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या ग्रंथलेखन व अन्य लेखनांतून जी मांडणी केली त्यास भारत देशाच्या इतिहासात तोड नाही. त्यांची अद्वितीय ग्रंथसंपदा दैदिप्यमान स्वरूपाची आहे, ती पुढीलप्रमाणे :

**डॉ. आंबेडकरांची ग्रंथसंपदा**

**(अ) ग्रंथनिर्मिती**

(१) व्हेअर दी शूद्राज, (२) अनहिलेशन ऑफ कास्ट, (३) वेटिंग फॉर व्हिसा (आत्मकथा), (४) बुद्ध आणि त्याचा धम्म, (५) गांधीजी आणि कॉंग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले, (६) गांधी, रानडे, जीना व कॉंग्रेस, (७) प्रॉब्लेम ऑफ रूपी, (८) थॉटस् ऑन पाकिस्तान, (९) बुद्ध आणि कार्लमार्क्स, (१०) एडमिनिस्ट्रेशन एंड फिनांसेज ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी, (११) द एव्होल्यूशन ऑफ प्रोविंशियल फिनांसेज इन ब्रिटिश इंडिया, (१२) विच वे टू इमैनसिपेशन, (१३) अनटचेबल्स, (१४) रिडल्स इन हिन्दुइझम, (१५) डिक्शनरी ऑफ पाली लॅंग्वेज (पाली इंग्लिश), (१६) द पालि ग्रामर (पालि व्याकरण), (१७) रिव्होलेशन ॲन्ड काऊंटर रिव्होलेशन इन एनशियंट इंडिया : इ. ग्रेथ

**(ब) पत्रकारिता**

(१) बहिष्कृत भारत, (२) मूकनायक, (३) जनता, (४) प्रबुद्ध भारत

**(क) संविधानिक लेखन**

(१) भारतीय संविधान (राज्यघटना)

(२) हिंदू कोड बील

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विपूल अशी ग्रंथनिर्मिती केली. परंतु बाबासाहेब यांच्यावर मराठी, हिंदी, इंग्रजी, जगभरातल्या विविध भाषांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती झालेली आहे की त्यावर अनेक पीएचडीचे प्रबंध होतील. त्यामुळे त्या ग्रंथांची व ग्रंथकर्त्यांची नावे विस्तारभयास्तव देता येणार नाहीत. एवढा प्रभाव त्यांचा विविध क्षेत्रावर व जगातल्या विविध समूहांवर झालेला आपणाला दिसून येतो.

डॉ. आंबेडकरांनी बुद्ध, फुले आणि कबीर यांना गुरू मानले. कारण वरील तिन्ही महापुरुष हे विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ, बुद्धिवादी, सत्यशोधक व धर्मनिरपेक्ष आचारविचारांचे होते. कृतीशील सुधारक व मानवतावादी तत्त्वज्ञान सांगणारे ते महाविद्वान होते. डॉ. आंबेडकरांनी पूर्णतः जीवनभर बुद्ध, फुले व कबीर यांना आदर्श व प्रेरणा मानून सर्वप्रकारच्या समतेची आंदोलने विचारपूर्वक लढली. भारतीय विषम समाजव्यवस्था मनुस्मृती व चातुवर्ण्य व्यवस्थेवरती आधारित होती व ही व्यवस्था सांभाळून ठेवणारा हिंदू धर्म होता. या जातिव्यवस्थेला आलेले कडू फळ म्हणजे अस्पृश्यता होय. ही अस्पृश्यता भारतीय समाजव्यवस्थेला लागलेला कलंक होता. म्हणून ही अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी बाबासाहेब आयुष्यभर झटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजवादी विचारांचा प्रभाव लोक कलाकारांवर मोठ्या प्रमाणात झाला होता. किंबहुना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समाजपरिवर्तनाची चळवळ या दीन-दलित लोकशाहिरांनी जोमाने पुढे नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. याबद्दल डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''बाबासाहेबांच्या वाणी-लेखणीची धग पकडून हे लोककवी येथील धर्मव्यवस्थेवर हल्ला करीत. माणसाची श्रेणी निर्माण करणाऱ्या वर्णव्यवस्थेवर, जाति-व्यवस्थेवर हल्ले करीत.

माणूस तुडवून टाकणारे पारंपरिक, सांप्रदायिक, अप्रतिष्ठित नाकारले जाऊ लागले. विज्ञानाचा डोळा घेऊन विद्रोह प्रकटू लागला. 'तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे। वादळ वारा, पाऊस वारा मुळी न आम्हा शिवे।।' असा आत्मशोध निर्भयपणे होऊ लागला. स्वाभिमान, स्वावलंबन आणि समानता तेजाळू लागला. शब्दप्रामाण्य झुगारून बुद्धिप्रामाण्य भरास आले. ही क्रांती होती. हे नवे सांस्कृतिक परिवर्तन होते. 'जग बदल घालून घाव । सांगून गेले भीमराव' हा ध्यास होता. हा साराच नवा अनुभव होता.'' (गंगाधर पानतावणे - विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९७६, मनोगतातून) अशाप्रकारची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आचार-विचारांच्या प्रभावातून दलित साहित्याची निर्मिती झाली. वेदना, विद्रोह व नकार ही दलित साहित्याची वैशिष्ट्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानातून मिळालेली दिसून येतात. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''अस्पृश्यतेचे व गुलामीचे जू झुगारून देण्यासाठी जे शब्द त्यांनी वापरले ते अस्पृश्यांच्या आगीचे ओहळ झाले. हिंदूधर्मशास्त्रांनी दिलेल्या अपुऱ्या गोळीचा अंमल अहिस्ते-अहिस्ते उतरू लागला. परंपरा, पोथी आणि परमेश्वर नाकारण्याचे सामर्थ्य त्यास आले. 'मनुस्मृती'च्या दहनातून अस्पृश्य तेजाळून उठला. त्याला त्याची 'अस्मिता' जागल्या-सारखे झाले व नवा माणूस घडत गेला. प्रस्थापित सांस्कृतिक मूल्यांचा अव्हेर करीत लोकशाहीने दिलेल्या मूल्यांचा त्याने स्वीकार केला. यातूनच शतावधी वर्षे मूक असलेल्या भावना-विचार, विकारांचा स्फोट होऊन आत्मशोधाला प्रारंभ झाला. आपल्या पूर्वजांनी भोगलेल्या दुःखाची स्मृती त्याच्या मनात ताजी होऊन आली. या शिगोशीग भरलेल्या दुःखातूनच तो हुंकारत होता. मुखर झाला आणि दलित साहित्य आकाराला आले.'' (गंगाधर पानतावणे, मूल्यवेध, अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९७४, पृ. ९९, १००) गंगाधर पानतावणे यांनी समूहाचा आत्मशोधाचे स्वरूप सांगितलेले आहे.

आंबेडकरवादाचा प्रभाव सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व साहित्यिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाला. अलीकडच्या काळात त्यांच्या विचारांचे महत्त्व पटू लागले आहे. शेती, पाणी, ऊर्जा, कामगार, आदिवासी इ. गोष्टींचा विकास, स्त्रियांचा उत्कर्ष, शिक्षण, भाषा, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकसंख्या नियंत्रण, जातिउच्चाटन, परराष्ट्र धोरण, साहित्य, राष्ट्रीय एकात्मता, सर्वांना समान अधिकारांची संकल्पना, संविधानाची कामगिरी, हिंदू कोड बील इत्यादी विषयक डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनाची देशाला मोठ्या प्रमाणात गरज असल्याचे जाणवते. आंबेडकरवादी तत्त्वज्ञान हे फक्त दलित साहित्याच्या प्रेरणा व आदर्शापुरते मर्यादित नाही तर स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, कामगार साहित्य, ग्रामीण साहित्य इ. साहित्यप्रवाहांना मानवी हक्क आणि अधिकाराच्या रूपाने सातत्याने प्रेरणा देत आहे. हा साहित्यविषयक प्रभाव नव्याने जग न्याहाळणारा व वंचितांना न्याय देणारा आणि लोकशाही जीवनप्रणाली अधिक मजबूत करणारा आहे. त्यांनी केलेले अध्ययन व संशोधन देशहिताला कुठेही बाधा न आणता समाजमानस डोळस व समाजविज्ञानी बनवणारे आहे. त्यांनी प्राचीन मध्ययुगीन इतिहासाचा व संतसाहित्याचा सूक्ष्म अभ्यास केलेला होता. याबद्दल डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणतात की, ''वारकरी संप्रदायातील संताच्या कार्याचा, संताच्या साहित्याचा सूक्ष्म अभ्यास डॉ. आंबेडकरांनी केला. वारकरी संप्रदायांवर गौतम बुद्धांच्या विचाराचा प्रभाव आहे आंबेडकरांनी पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती ही बुद्धाची मूर्ती आहे आणि हे मी सिद्ध करून दाखवेन असे प्रतिपादन २५ डिसेंबर, १९५४ च्या देहू रोड येथील भाषणात केले. वारकरी संप्रदायातील संताच्या कार्याचा व साहित्याचा अभ्यास त्यांनी एकूण समाजात समता प्रस्थापित करणाऱ्या चळवळीचा भाग म्हणूनच केला. या त्यांच्या अभ्यासाचा अनुबंध दलितांच्या प्रश्नांपेक्षा समाजाच्या अखंडतेशी, एकात्मतेशी संबंधित प्रश्नांशी अधिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या व्यापक भूमिकेला नितळ दृष्टीने वारकऱ्यांसह सर्वांनी समजून घेतले, तर समाजोन्नतीसाठी अधिक उपकारक ठरेल.'' (डॉ. प्रल्हाद घुलेकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., द्वि. आ. २०१२, पुनर्मुद्रण, २०१४/१५/१६ पृ. १९६) डॉ. लुलेकर यांचे प्रस्तुत मत डॉ. आंबेडकरांची व्यापकता व देशप्रेम किती मोठे होते हे सांगणारे आहे. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनांनी, विचारांनी व लेखनीने नव्या युगाचे वादळ मराठी साहित्यात आले व ते कुणी रोखू शकत नव्हते. या विचारांनी साहित्यिकांच्या लेखनविषयक दृष्टीस बदलण्यास भाग पाडले. आंबेडकरांच्या विचारांची नैतिक, आधुनिक व मानवतावादी झेप एवढी मोठी होती की त्या प्रभावाने कथा, कादंबरी व एकूण साहित्यनिर्मितीचे केंद्र बदलून ते माणूस व त्यांची मुक्ती, विकास आणि आधुनिक जीवनप्रणाली व लोकशाही जीवनमूल्यांचे प्रस्थापना याकडे वळले. या संदर्भात गं. बा. सरदार म्हणतात, ''आपल्या राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा व संधीसमानता इत्यादी तत्त्वे घोषित केली. परंतु प्रत्यक्षात काय घडत गेले ? राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्त्व आणि व्यवहार, आदर्श आणि वास्तव यांच्यातील दरीकडे त्याचवेळी सर्वांचे लक्ष वेधले होते. या संविधानात ग्रथित केलेल्या मूलभूत तत्त्वांना अनुसरून आपल्या देशात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समता स्थापन झाली नाही, तर आपल्या या राज्यघटनेला काही

अर्थ उरणार नाही; इतकेच नव्हे तर आपली लोकशाही देखील संकटात येईल; त्यांनी दिलेला हा इशारा किती अर्थपूर्ण होता; याचा आज आपल्याला वारंवार अनुभव येत आहे.'' (गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर (संपा.) 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप' (१९५०-१९७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८६, पृ. ५) या ठिकाणी गं. बा. सरदार यांनी सांविधानिक प्रणालीच्या आचरणासाठी दिग्दर्शन केलेले आहे. डॉ. आंबेडकर हे साहित्याचे व्यासंगी अभ्यासक होते. त्यांनी सर्व प्रकारचे मराठी साहित्य मनापासून वाचले. त्यावर प्रतिक्रियाही दिल्या आहेत. प्रसंगी त्यांनी साहित्यिकांना नव्या युगाचे भान आणून देणाऱ्या साहित्यनिर्मितीविषयक विचारही सांगितलेले दिसून येतात. लेखक व लेखन मानवतावादी असावे. ते मानवी जीवन उन्नत करणारे असले पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. याबद्दल डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणतात, ''आधुनिक वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्रपणे साहित्यचिंतन आपल्या लेखनातून करता आले नाही. हरिभाऊ आपटे, महात्मा फुले, आगरकर, टिळक, गडकरी, देवल, लोकहितवादी आदींचे साहित्य त्यांनी अभ्यासले. 'किंगलियर' या नाटकावरून 'शहाणी मुलगी' हे नाटक स्वतः लिहून त्याचा प्रयोग महाविद्यालयीन शिक्षण घेताना केला. प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'खरा ब्राह्मण' या नाटकाची समाजशास्त्रीय समीक्षा लिहिली. ही समीक्षा समाजशास्त्रीय समीक्षेचा उत्कृष्ट नमुना आहे. जुन्या विचारातून लोकांना नवीन मार्ग परिणामकारकपणे देणाऱ्या नाटकांचा परामर्श त्यांनी या नाटकाच्या निमित्ताने घेतला. त्यांच्या समकालीन मराठी साहित्याविषयी मत प्रकट करताना ते म्हणतात, 'आत्तापर्यंत जे महाराष्ट्रीय साहित्य आणि सारस्वत निर्माण झाले; खरेतर ते अजून निर्माण करावयाचे आहे.'' (डॉ. प्रल्हाद लुलेकर - अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे, द्वि. आ. २०१२, पुनर्मुद्रण २०१४-१५-१६, पृ. १९६, १९७) डॉ. आंबेडकरांची साहित्याविषयी इतकी नितळ व प्रामाणिक भूमिका होती हे यावरून लक्षात येते. नव्याने शिक्षित झालेल्या साहित्यिकांनी साहित्य निर्मितीत काही आधुनिक बदल केले पाहिजेत, समतेच्या प्रस्थापनेसाठी वंचितांना न्याय मिळावा, त्यांचे जीवन हे साहित्याचा विषय व्हावा. अस्पृश्यता निवारण्यासाठी साहित्याची निर्मिती झाल्यास ती योग्य अशी बाब आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यांनी प्रबोधनकार केशव ठाकरे यांच्या 'खरा ब्राह्मण' या नाटकांवर २१ मार्च, १९३६ च्या 'जनता' पत्रात परीक्षण लिहिले आहे. त्यामध्ये ते म्हणतात, ''साहित्य हा एक अस्पृश्यता निवारणाचा मार्ग होऊ पाहात आहे. कवितेच्या द्वारे, गोष्टींच्याद्वारे व नाटकाच्या रूपाने अस्पृश्यता निवारणासंबंधाने स्पृश्य लोकांमध्ये सहानुभूती उत्पन्न करण्याचा हा मार्ग नवा आहे. विचारक्रांती झाल्या-शिवाय आचारात फेरबदल होऊ शकत नाही. आचारात फेरबदल करावयाचा झाल्यास आधी मनावर बसलेल्या, जुन्या विचारांची छाप काढून टाकणे अगत्याचे आहे. अशा प्रकारची विचारक्रांती घडवून आणण्यास साहित्यासारखा दुसरा उपयुक्त मार्ग नाही.'' ही वैचारिक क्रांती घडविण्यासाठीचे साहित्यिकांना केलेले आवाहन विचार करायला लावते. अशा अनेक विचारांचा प्रभाव मराठी साहित्यात अनेक दलित व दलितेतर साहित्यिकांच्यावरती पडलेला दिसून येताना आढळतो. तो प्रभाव पुढीलप्रमाणे :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव लोककलावंत व कवींवर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. लोककलावंतांमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या काळात किसन फागोजी बनसोडे, कवी दिनबंधू, बाबू कालिचरणदास, नंदा गवळी, गणेश आक्काजी गवई, पतीत पावनदास ग. म. ढवरे, कव्वाल नागोजीराव पाटणकर, हेमचंद्र खांडेकर, पावन भटकर या नागपूर विदर्भाकडील कलावंतांच्यावर डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या चळवळीचा प्रभाव होता. तसेच गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, वामन कर्डक, बंधूमाधव, अण्णाभाऊ साठे, राजानंद गडपायले, भीमराव कर्डक, शंकर फवकड, भऊ फवकड इत्यादी पश्चिम महाराष्ट्रातील कलावंत अस्पृश्य लोकांत जागृती करण्याचे काम आपल्या कलेतून करत होते. आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव अण्णाभाऊ साठेंच्यावर पुढीलप्रमाणे दिसतो.

*''जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव*
*गुलामगिरीच्या या चिखलात, रुतून बसला का ऐरावत*
*अंग झाडुनी निघ बाहेरी, हो बिनीवरती घाव।।*

तर अण्णाभाऊंनी आपली 'फकिरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'झुंजार लेखनीस' समर्पित केली आहे.

आंबेडकरी ध्येयवादाने झपाटलेले लोककलावंत महाकवी वामन कर्डक यांच्या पूर्ण जीवनावर डॉ. आंबेडकरांचा प्रभाव होता. पूर्ण आयुष्यभर त्यांनी आंबेडकरवादी प्रेरणेची गीतं रचली व गरीब जनतेपुढे गायली. ते एका काव्यात डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल म्हणतात,

*'काय सांगू तुला आता, भीम माझा कसा होता*
*लेकराला जशी माता, भीम माझा तसा होता*
*झुंज देऊनी काळाशी, सात कोटी गुलामांचा*
*उंचविला इथे माथा, दान केल्या या देशाला*
*ज्ञानसाठा तसा होता, भीम माझा असा होता.''*

आंबेडकरवादी आचारविचारांच्या प्रभावाने समाजजागृती व समाजपरिवर्तन आणि प्रबेधन करणाऱ्या या लोकलावंताबद्दल ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींना जपण्यासाठी सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी जीवापाड कष्ट उपसले हे जसं खरं आहे तसं शाहिरांनी आपल्या रचनांतून आंबेडकरी विचार घरोघर नेला हेही खरं आहे. आंबेडकर चळवळींचे हे योगदानच होतं. श्रेयाची, कष्टाची, मानापमानाची तमा न बाळगता या लोकलावंतांनी अथक प्रवास केला. बाबासाहेब लोकमनात रुजविला. चळवळींना तोलून धरण्याचे काम कलावंतांनी केलं. लौकिकार्थाने त्यांनी शाळा महाविद्यालयांची पायरी ओलांडली नसेल. परंतु लोकजीवनाच्या विश्वविद्यालयाचे ते शिल्पकार होते. त्यांचा अनुभव एकेक सुरुंग होता. अंतःस्फोट होता, याच अंतःप्रेरणेतून, त्यांची रचना आकाराला येत होती.''

(डॉ. परशुराम गिमेकर (संपा.) वामनदादा कर्डक यांची गीतरचना, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ. २००५, पृ. ४१) डॉ गंगाधर पानतावणे यांचे मत योग्यच आहे. आंबेडकरवादी प्रभावाने काव्यलेखन करणाऱ्यांमध्ये बाबुराव बागूल, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, ज. वि. पवार, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे इ. बरोबरच नंतरच्या पिढीमध्ये देखील आंबेडकरवादी विचारप्रभावाने काव्यनिर्मिती केली जात आहे. त्यामध्ये चोखा कांबळे - पिंपळपान, नरेशकुमार इंगळे - अंगारा, सुखराम हिवराळे - शब्दायन, प्रकाश जाधव - दस्तखत, भाऊ पंचभाई - हुंकार वादळाचे, लोकनाथ यशवंत - आता होऊन जाऊ द्या, अरुण कांबळे - अरुण कृष्णाजी कांबळे यांच्या कविता, भीमसेन देठे - होरपळ, कृष्णमेध, शरणकुमार लिंबाळे - उत्पात, राम दोतोंडे - रापी जेव्हा लेखनी बनते; गल्ली बदललेला मोर्चा, भुजंग मेश्राम - उलगुलान, अरुण काळे - रॉक गार्डन, सायरनचे शहर, महेंद्र भवरे - चिंताक्रांत, मुलखाचे रुदन, नीलकांत चव्हाण - निखारा, माधव कोंडविलकर - इटकुलेराव, धर्मराज निमसकर, बबन चहादे, इ. मो. नारनवरे, धनराज डहाट, सागर जाधव, प्रा. दामोदर मोरे, भगवान भोईर, धम्मपार रत्नाकर, प्रज्ञावंत गौतम, निशिकांत आलटे इ. बरोबरच स्त्रियांच्या मध्ये हिरा बनसोडे - फिर्यादी, ज्योती त्यांजेवार - दिशा, सुगंधा शेंडे - विरतं धुळकं, सुरेखा भगत - साक्ष, प्रज्ञा लोखंडे - अंतस्थ, मीना गजभिये - येरे येरे पावसा, प्रतिभा राजानंद - मला हवी असणारी पहाट, बेबी कांबळे - मन बोलतं, उषा अंभोरे - उगवतीचे क्षण, कमल कदम - जाब, उषाकरण आत्राम - म्होरकी, संध्या रंगारी - आघात, कुंदा गायकवाड, ज्योत्स्ना चांदगुडे, माया वासनिक, अर्चना हातेकर आदी कवी व कवयित्रींच्यावर डॉ. आंबेडकरांचा प्रभाव असलेला दिसून येतो. नामदेव ढसाळ यांच्या 'आता' या कवितेतील ओळी पहा -

*'सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला*
*आता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे*
*सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला*
*आता सूर्य फुलासारखे सुर्योन्मुख झालेच पाहिजे.''*

एकूणच दलित काव्यनिर्मितीत आलेला आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव नव्या वाङ्मयीन व जीवनविषयक मूल्यांना घेऊन येणारा आहे. याबद्दल डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, ''दलित संतप्त तरुणांच्या निर्मितीमागे फुले-आंबेडकरांच्या तत्त्वविचाराची प्रेरणा होती. धर्मांतरानंतर दलित समाजाने मोकळा श्वास घ्यायला सुरुवात केली होती. गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाने अभ्युदयाची दिशा दिली होती. दलितांच्या दृष्टीने आता अंधारयुग संपले होते. प्रकाशयुग सुरू झाले होते. शतकानुशतकाची सामाजिक गुलामगिरी म्हणजे अंधारयुगच होते. अंधार फोडूनच त्यांना प्रकाशात यायचे होते. ही प्रेरणा त्यांना डॉ. आंबेडकरांनीच दिली होती.'' (डॉ. सदा कऱ्हाडे - दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००१, पृ. ६८) डॉ. सदा कऱ्हाडे यांनी दलित कवितेच्या निर्मितीप्रेरणेचे सुयोग्य असे विश्लेषण केलेले आहे.

डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' या वृत्तपत्रांमध्ये कथा, कविता व आंबेडकरी विचारांची ध्येयवादिता शब्दबद्ध होत होती. 'जनता' या साप्ताहिकात तुकाराम अंबादास पुरोहित– प्रतिज्ञा, श्री. माधव खंडेराव बागल – देवाचा दगडच ठरला इ. सुरुवातीच्या दलित कथा प्रकाशित झाल्या. पुढे २ ऑगस्ट, १९३६ च्या 'निर्भिड'च्या अंकात कु. ज. स. मोरे, परळ या लेखिकेची 'धर्मांतर प्रेमी' ही कथा आंबेडकरवादी विचाराने लक्ष वेधून घेणारी आहे. पुढे आंबेडकरवादी विचार प्रभावाने कथालेखन करणाऱ्यांमध्ये अण्णाभाऊ साठे– खुळवाडी, चिरानगरची भुत, शंकरराव खरात – बारा बलुतेदार (१९५०) ते लिलाव (१९८४) पर्यंत एकूण ११ कथासंग्रह, बंधुमाधव मोडक – आम्हीही माणसं आहोत, बाबुराव बागूल – जेव्हा मी जात चोरली होती, मरण स्वस्त होत आहे, सूड, केशव मेश्राम – खरवड, पत्रावळ, बोजवारा इ. वामन होवाळ – बेनवाड, येळकोट, वाटा–आडवाटा, सुखराम हिवराळे – विश्व गंगेच्या काठी, अर्जुन डांगळे – बांधावरची माणसं, योगीराज वाघमारे – उद्रेक, बेगड, गुडदाणी, अमिताभ – पड, लवटा इ. बरोबरच आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव असलेले रमा पवार, अविनाश डोळस, दयानंद मस्के, डॉ. बाबुराव गायकवाड, भीमसेन देठे, उर्मिला पवार, ताराचंद खांडेकर, अरुण कांबळे, मिनाक्षी मून, बाळ आल्हाट, रविचंद्र हडसनकर, धर्मराज निसमकर, सुधाकर गायकवाड, भाऊराव खोब्रागडे, सुरेश जाधव, किशोर घोरपडे, संघमित्रा टेंभुर्णे, नामदेव ढसाळ, उत्तम कांबळे, शशिकांत तासगांवकर, दयानंद मस्के, डॉ. रघुनाथ केंगार, विजयसिंह घाडगे, विजय काकडे, योगेंद्र मेश्राम इ. कथाकारांनी समर्थ कथालेखन करून दलित समाजात व मराठी साहित्यात आंबेडकरवादी विचारांची रुजवण केलेली दिसून येते. या कथाकारांमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रत्यक्ष सहवासात राहिलेले शंकरराव खरात हे प्रगल्भ जाणिवेचे कथाकार म्हणून मान्यता पावले. त्यांचे कथालेखनातील सातत्य व आंबेडकरवादी प्रभाव याविषयीच्या व्यापकतेविषयी डॉ. प्रकाश खरात म्हणतात, ''त्यांच्या कथासृष्टीने दलित कथा समृद्ध केली. अस्पृश्य, आदिवासी, भटके अशा उपेक्षित समाजाचे दर्शन घडविले. मांग, गारुडी, बेरड, वडार, महार, पोतराज, मुरळी इ. बहिष्कृत जगणे त्यांनी कथेतून मांडले. त्यामुळे खरातांची कथा ही आदिवासी साहित्य प्रवाहाची उगमकथा ठरली आहे. सर्वसामान्य जनजीवनाचा आविष्कार असल्यामुळे जनवाद साहित्याची जननी ठरली आहे. एक अनोखे उपेक्षित जीवनदर्शन व व्यक्तिदर्शन कथेतून मांडल्यामुळे खरातांच्या कथेचे स्वरूप जीवनवादी झाले आहे. दलित कथेतील श्रेष्ठ कथाकार म्हणून त्यांचे स्थान इतिहासाने गौरवावे असे त्यांचे वाङ्मयीन दान आहे.'' (डॉ. शरणकुमार लिंबाळे (संपा.) 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह' (लेख) दलित साहित्य, डॉ. प्रकाश खरात, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००७, पृ. १२५) डॉ. प्रकाश खरात यांनी शंकरराव खरातांच्या कथालेखनातील आंबेडकरवादी विचार प्रभावाची व्यापकता सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

एकूण कविता, कथा, कादंबरी लेखन, ललित लेखन, समीक्षा, इतर वैचारिक लेखन, नाटक इ. साहित्यनिर्मितीतून आंबेडकरवादी विचारप्रभावाचा मोठा भाग येताना दिसतो. धम्मप्रवर्तन वैचारिकता डॉ. नरेंद्र जाधव, भालचंद्र मुणगेकर, म. भि. चिटणीस, शंकरराव खरात, केशव मेश्राम, लक्ष्मण माने, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, रा. ग. जाधव, भालचंद्र फडके, प्रल्हाद लुलेकर, विजय जाधव इ. लेखकांनी मोठ्या

प्रमाणात मांडली आहे. कादंबरी निर्मितीत हा आंबेडकरवादी प्रभाव जोपासण्याचे काम अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकरराव खरात, सुधाकर गायकवाड, ना. रा. शेंडे, भीमसेन देठे, हरिभाऊ पगारे, हि. गो. बनसोडे, नामदेव व्हटकर, बा. स. हाटे, ज. वि. पवार, नामदेव ढसाळ, उत्तम कांबळे, निशिकांत शेंडे, भि. शि. शिंदे, केशव मेश्राम, अशोक व्हटकर, यशवंत मनोहर, शरणकुमार लिंबाळे, नामदेव कांबळे, शशिकांत तासगांवकर, माधव कोंडविलकर, बंधुमाधव, योगेंद्र मेश्राम, निला पांढरे, सुगंधा शेंडे, सुशिला मूळ, बळवंत कांबळे, ना. ब. जाधव, रामनाथ चव्हाण, रमाकांत जाधव, एकनाथ साळवे, जी. के. ऐनापुरे, कचरू भालेराव, आ. श्री. लोखंडे, विजय काळे, दि. रा. वाघमारे, जयवंत व्हटकर, सिद्धार्थ रामटेके, विजयसिंह घाडगे इ. कादंबरीकारांनी केलेले दिसून येते.

**समारोप** : एकूण मराठी साहित्यात आंबेडकरवादी विचारांच्या प्रभावाने निर्माण झालेल्या साहित्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, विज्ञानवादी दृष्टिकोन इ. आंबेडकरवादी विचारवैशिष्ट्यांचा समावेश असलेला दिसून येतो. हा प्रभाव विधायक दृष्टीने मांडण्याचे काम वरील कलावंत व लेखकांनी केलेले दिसून येते. डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्वच इतके व्यापक होते की, त्यांच्या वैश्विक व्यक्तिमत्त्वाचा जगातल्या अनेक चळवळी व आंदोलनावर प्रभाव पडलेला आहे. आपल्याकडे स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयीन प्रवाहांवर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा कमीजास्त प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो. संविधान विचार हा आजच्या घडीला साहित्य मूल्य प्राप्त करून देणारा असून संविधान मूल्यांचा जागर साहित्याद्वारे मोठ्या प्रमाणात होत आहे. सांविधानिक साहित्य म्हणून नव्याने निर्मिती होत आहे व त्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. थोडक्यात, डॉ. आंबेडकरांच्या सर्वव्यापी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव मराठी साहित्यावर व त्यातील विविध प्रवाहांवर झाल्याचे मान्य करावे लागते.

## १.५ साहित्यकृतींच्या प्रभावातून प्रेरणा

जगामध्ये असा एखादा लेखक जन्म घेतो की त्याने लिहिलेल्या कलाकृतीला जगन्मान्यता मिळते व तीच कलाकृती इतकी प्रभावी होते की तिचाच प्रभाव नवीन साहित्यकृती निर्मितीसाठी आदर्श व प्रेरणादायी ठरतो. मराठी साहित्यामध्ये अशा अनेक साहित्यकृती आहेत, ज्यांच्या प्रभावातून साहित्यनिर्मितीला प्रेरणा मिळालेली आहे. बाबा पद्मनजी यांची मराठी साहित्यातील पहिली कादंबरी म्हणून 'यमुनापर्यटन' (१८५७) हिचा उल्लेख केला जातो. तर समस्याप्रधान कादंबरीतून विस्थापित समाजाचे वास्तव चित्र विभावरी शिरुरकर (मालतीबाई बेडेकर) यांच्या बळी (१९५०) या कादंबरीत आलेले आहे. तसेच नीतीमूल्यांचा आदर राखून माणसाने मर्यादित जीवन जगले पाहिजे असा मोलाचा संदेश देणारी 'ययाती' ही वि. स. खांडेकरांची कादंबरी अत्यंत लोकप्रिय ठरली. वरील साहित्यकृतीचा फार मोठा प्रभाव नंतरच्या साहित्यिक व साहित्यावर झालेला आहे. यातून प्रेरणा घेऊन मराठीत साहित्यनिर्मिती झालेली आहे. याविषयीचा प्रभाव अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या सामाजिक कादंबरीचा प्रभाव मराठी कादंबरीवरती मोठ्या प्रमाणात झालेला आहे. या कादंबरीबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''अद्भूत रम्य वातावरण, इतिहासातील वा पुराणातील नवलकथा यांच्या बरोबरीने ज्यांना केवळ सामाजिक म्हणता येईल अशाही कथा वा कादंबऱ्या या काळात निर्माण झालेल्या आहेत. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे येथील लोकांना आपला धर्म व आपल्या रूढी यांची तपासणी करावीशी वाटली. समाज सुधारणेच्या या चळवळीस मिशनऱ्यांच्या प्रचारामुळे अर्थातच गती मिळाली. बालविवाह, स्त्री-शिक्षण, विधवाविवाह इत्यादी प्रश्नांची उलटसुलट चर्चा होत राहिली. या पार्श्वभूमीवर मराठीतील 'यमुना पर्यटन' (१८५७) नावाची पहिली सामाजिक कादंबरी बाबा पद्मनजी यांनी लिहिली.'' (प्रा. डॉ. वसंत बिरादार - 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. १७६) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे मत योग्यच आहे. बाबा पद्मनजींनी लिहिलेल्या या पहिल्या सामाजिक कादंबरीस 'हिंदू विधवांच्या स्थितीचे निरुपण' असेही एक नाव आहे. या कादंबरीत लेखकाने हाताळलेला विषय हिंदू समाजातील विधवांच्या जीवनाचा ज्वलंत प्रश्न आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या इंग्रजी शाळेत शिकलेल्या हिंदू तरुणांनी समाजसुधारणेचा वसा घेतला व हिंदू धर्मातील विषमतेबरोबरच टाकाऊ प्रथा-परंपरांना हद्दपार करून स्त्री-पुरुष समानतेसाठी पावले उचलली. हाच विषय कादंबरीतून बाबा पद्मनजी यांनी प्रादेशिक अंगाने प्रातिनिधिक स्वरूपात हाताळलेला आहे. 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा प्रभाव स्पष्ट करताना पुढे प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''या पार्श्वभूमीवर ही कादंबरी लोकांना वास्तव वाटली असल्यास नवल नाही. याच सुमारास 'एक नास्तिक मनुष्य ख्रिस्ती झाला याविषयी 'हकीकत' (१८५८) या नावाचे एक कादंबरीसारखे पुस्तक प्रसिद्ध झाले. मुलेन्स नावाच्या एका इंग्रजी बाईच्या एका कादंबरीवरून 'फुलमनी आणि करुण' (१८५९) ही एक भाषांतरित कादंबरी प्रसिद्ध झाली. फुलमनी व प्रेमचंद हे ख्रिस्ती जोडपे व करुणा या नावाची एक संकटग्रस्त स्त्री यांची ही हकीकत. शेवटी करुणेने ख्रिस्ती धर्म स्वीकारला.'' (तत्रैव, पृ. १७७) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे विश्लेषण बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीतील आशय विषयाचा प्रभाव पुढील साहित्यनिर्मितीवर कसा पडत गेला हे सांगणारे आहे. यातील ख्रिस्ती धर्म प्रभावाचे वातावरण विनायक बाळकृष्ण दामले यांच्या 'अवलीया' (१८५९) या कादंबरीत आलेले दिसून येते. पुढे बाळबोधकर्ते विनायक कोंडदेव ओक यांच्या 'शिरस्तेदार' (१८८१) याबरोबरच 'आनंदराव' (१८८२), 'सद्गुणी सून', 'आनंदीबाई' इत्यादी रूपांतरित सामाजिक कादंबऱ्यांमधून हा प्रभाव दिसून येतो. अलीकडच्या काळात अनेक सामाजिक वास्तव दाखविणाऱ्या कादंबऱ्या आल्या. त्यामध्ये पुरुषोत्तम बोटकर यांची 'मेड इन इंडिया' ही १९८६ साली आलेली कादंबरी फार महत्त्वाची आहे. याबद्दल डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, ''मराठी कादंबरीत या स्वरूपाच्या कादंबऱ्यांचा प्रवाह थेट बाबा पद्मनजी (यमुना पर्यटन) यांच्यापासून दाखविता येतो. हरिभाऊ, केतकर यांच्या कादंबरीने हा प्रवाह समृद्ध केला. फडके, खांडेकर यांच्या रचनातंत्रात मराठी कादंबरी गुदमरत होती. त्या काळात ना. वि. कुलकर्णी, र. वा. दिघे, ना. के. महाजन यांच्या कादंबऱ्यांच्या रूपाने तो आपले अस्तित्व टिकवित होता. स्वातंत्र्योत्तर काळात हा प्रवाह अनेक दिशांनी विकसित झाला. समकालीन

महानगरी जाणिवा व्यक्त करणारी कादंबरी (भाऊ पाध्ये), नवनैतिकवादी कादंबरी (नेमाडे) ही स्वातंत्र्योत्तर काळातल्या वास्तववादी कादंबरीची अभिनव रूपे होती.'' (डॉ. रवींद्र ठाकूर / डॉ. नंदकुमार मोरे (संपा.) समीक्षा पद्धती; सिद्धांत आणि उपयोजन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०११, पृ. १२८) डॉ. रवींद्र ठाकूर यांचे मत योग्यच आहे.

हरिभाऊ आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' सारखीच विधवा स्त्रियांच्या हिंदू समाजातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडणारी आहे. बाबा पद्मनजी ख्रिस्ती झाले होते तर हरिभाऊंना हिंदू समाजामध्ये राहूनच समाजसुधारणा करावयाची असल्याने कादंबरीचा विषय जरी 'यमुना पर्यटन' कादंबरीसारखा असला तरी हरिभाऊ यमूच्या व्यक्तिमत्त्वाचा माणूस म्हणून विचार करताना कमी पडतात. त्याचे कारण हिंदू समाजातली विषम व कर्मठ बंधने एकाएकी सोडून देणे हरिभाऊंना जमलेले नाही. याबद्दल नरहर कुरुंदकर म्हणतात, ''हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीबाबत काही विधान करणे सोपे अगर सरळ नाही. मनाने हरिभाऊ समाजसुधारकांच्या एका गटाशी समरस झाले होते. एकूण जीवनाची बुद्धि-प्रामाण्यवादाच्या बैठकीवर फेरमांडणी करण्याची कल्पना त्यांना कोठवर रुचली असती हे सांगणे कठीण आहे. त्यांच्या सामाजिक कादंबरीचा मागोवा घेतला तर ते प्रामुख्याने उदारमतवादी होते इतकेच म्हणता येईल.'' (नरहर कुरुंदकर, धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र. आ. १९७१, पृ. ४ (४९) नरहर कुरुंदकर यांचे मत योग्यच आहे.

एकूण बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा प्रभाव कमी-जास्त प्रमाणात हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, साने गुरूजी, वि. स. खांडेकर, श्री. व्यं. केतकर, ना. वि. कुलकर्णी, र. वा. दिघे, ना. के. महाजन, ग. ल. ठोकळ, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, उद्धव शेळके, व्यंकटेश माडगूळकर, भाऊ पाध्ये, भालचंद्र फडके, राजन गवस, रा. रं. बोराडे, आनंद यादव, आनंद पाटील इत्यादींच्या सामाजिक कादंबरी लेखनावर कमी-अधिक प्रमाणावर झालेला दिसून येतो.

विभावरी शिरुरकर यांनी स्त्रीमनाचा वेध घेणाऱ्या आधुनिक विचारांच्या सामाजिक कादंबऱ्या लिहून मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. त्यांच्याबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''कल्पना रंजक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, ऐतिहासिक अशा बाह्य प्रकारांचे ठोकळेबाज अनुकरण वैपुल्याने होत असतानाच स्त्रीमनाच्या विविध धाग्यांचे, थोडे बंडखोर असे चित्रण कलात्मक पद्धतीने करून मराठी कादंबरीला वेगळे वळण लावले ते विभावरी शिरुरकर यांनी. ताज्या व टवटवीत असणाऱ्या कळ्यासुद्धा दुःखाचे निःश्वास सोडीत असतात, हे त्यांनी १९३३ मध्ये आपल्या 'कळ्यांचे निश्वास' या पुस्तकात दाखविले होते. १९३४ मध्ये त्यांची 'हिंदोळ्यावर' या नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली आणि सर्वत्र खळबळ उडून गेली.'' (प्रा. डॉ. वसंत बिरादार - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. २१३) प्रा. डॉ. वसंत बिरादार यांचे भाष्य बरोबर आहे. विभावरी शिरुरकरांची गाजलेली कादंबरी म्हणजे बळी (१९५०) ही होय. विभावरी शिरुरकर म्हणजेच मालतीबाई बेडेकर यांनी 'बळी' ही

कादंबरी लिहून मराठी साहित्यात आजपर्यंत कधीही न आलेले विस्थापितांचे जीवन शब्दबद्ध करून मराठीच्या कादंबरी दालनात मोलाची भर टाकलेली दिसून येते. या कादंबरीने १९५० नंतरच्या विविध लेखकांवर कमालीचा प्रभाव टाकलेला आहे. आधुनिक विचारसरणी, विज्ञाननिष्ठता व पुरोगामी विचार हे या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असलेले दिसून येते. या कादंबरीबद्दल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, ''विभावरी शिरुरकरांची आणखी एक गाजलेली कादंबरी म्हणजे 'बळी' (१९५०) ही होय. मराठी कादंबरी एका वेगळ्याच क्षेत्रात 'बळी'ने नेली. लेखिका क्रिमिनल ट्राईब सेंट्रलमध्ये नोकरीस असताना पाहिलेल्या एका नव्याच भीषण जगताचे दर्शन तिला झाले. ही कादंबरी म्हणजे एक थोर कलाकृती आहेच; पण गुन्हेगार समजले गेलेले लोक, प्रत्यक्ष गुन्हा करणारे लोक, त्यांची राहणी, त्यांची झोपडी, त्यांच्या शिव्या, त्यांचे व्यवसाय, त्यांची दैन्यावस्था इत्यादींचे हृदयभेदक व वास्तवपूर्ण चित्रण 'बळी'त आले आहे. विलक्षण विषमतेने भरलेल्या, क्रूर, आपमतलबी, निष्ठूर अशा समाजरचनेकडून 'आबा'चा बळी घेतला जातो. त्याची आई चांगुणाही वाचकांचे मन व्यथित करून टाकते. मातृत्वाची एवढी घोर विटंबना समाजात होत राहते. हे दृश्यच कादंबरीत नवे होते. यातील जीवन वास्तव भडक नाही. अनंत घरांच्या हवेल्या आणि ठेंगणी भुईसपाट झालेली दरिद्री घरे, झोपड्या यांच्यातील विलक्षण फरक विभावरी शिरुरकर (मालती बेडेकर) यांनी मोठ्या प्रत्ययकारी पद्धतीने उभा केला आहे. सर्वत्र आक्रंदन, भेसूर हसणे, कुत्र्यांची केकाटणी, भेसूर संगीत, जरत्कारू देहांचा बाजार, चोरी करणारे, खडी फोडणारे, शिव्या देणारे, मारामारी करणारे, केसांतील लिखा मारणारे, धुळीतले अन्न खाणारे, विष्ठेत, घाणीत वावरणारे, गाडगी, मडकी, लक्तरे यांच्या संसारात दिवस काढणारे, मरीआईला बकरा कापणारे, जाखाई-जोखाईचा अंगारा लावून पटकी, हिंवताप, कांजिण्या घालविणारे, पुरुषावर बलात्कार करणारी स्त्री अशी सारी एक अनोखी सृष्टी मराठीत कलात्मक जाणिवेने प्रथमच येत होती. झोपडपट्टीवरील ठरावीक पद्धतीच्या कादंबऱ्यांचा उदय अजून व्हायचा होता.'' (तत्रैव, पृ. २१४) अशी व्यापक जाणीव प्रथमतःच मराठी कादंबरीत एक स्त्री चित्रित करीत होती याचे कौतुक आहे. या प्रकारची वर्णने मराठीत साठोत्तरी साहित्य प्रवाहात आलेली आहेत. समस्याप्रधान कादंबरीतील हा महत्त्वाचा टप्पा आहे. ही व्यापकता मराठीत पुढे 'वावटळ'-१९६४, 'उगवतीचे रंग'-१९७०, 'थँक यू मिस्टर ग्लाड'-१९७५, 'डोंगर म्हातारा झाला'-१९७७, 'इंधन', 'वैतागवाडी', 'अंधारवाटा', 'चौंडकं', 'भंडार' 'भोग', 'झुलवा', 'घराणं तमासगिराचं', 'उचल्या', 'उपरा' ही दलित आत्मकथने इत्यादींमध्ये आलेली आहे. तसेच विभावरी शिरुरकर यांचा बेडरपणा स्त्री लेखिकांत आलेला दिसून येतो. 'बळी' या कादंबरीची वाङ्मयीन महात्मता सांगताना डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''पोटसमूह - पोट संस्कृतिप्रधान प्रवृत्तीत मिसळून गेलेली ही प्रवृत्ती मूळ 'यमुना पर्यटन' प्रवृत्तीचे आजचे विकसित टोक आहे. कृतिप्रधानता टिकवून ठेवणारी ही प्रवृत्ती स्वातंत्र्यपूर्व काळात रोडावली होती. जेव्हा रंजक रीतिप्रधान प्रवृत्तीलाच कलात्मक कादंबरी समजले जाई, तेव्हा विभावरी शिरुरकरांची 'बळी' (१९५०) पुढे येऊन वास्तववादाचे नवे पर्वच सुरू झाले. मराठीतली वास्तववादाची दैन्यावस्था 'बळी' नंतर संपुष्टात येणे अपरिहार्य हाते, इतकी 'बळी' ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. स्वातंत्र्योत्तर काळात लिहित असलेल्या लेखकांच्या पिढीत एकट्या विभावरी शिरुरकरच पक्व होत्या. वास्तवाचे धीट आव्हान कुठल्याही प्रकारच्या रीतिप्रधान मोहांना बळी न पडता त्यांनी स्वीकारले. 'हिंदोळ्यावर'

(१९३४) आणि 'शबरी' (१९६२) ह्या त्यांच्या कादंबऱ्याही सामाजिक समस्येचे सर्जक रूप मांडणाऱ्या पद्मनजी, ह. ना. आपटे, वा. म. जोशी, केतकर, साने गुरूजी ह्या शुद्ध परंपरेतल्या आहेत. विभावरींनी निष्ठेने जोपासलेल्या ह्या वास्तव परंपरेला जरा उशिरा - १९६० नंतर अप्रतिम बहर आल्याचे आपण पाहतोच. ह्या प्रवृत्तीतली कृतिपरता समस्येत गुरफटून तिला 'प्रचारकी' लेबल मिळण्याची भीती त्या वेळच्या सौंदर्यवादी-रूपवादी मराठी अभिरुचीत मोठीच होती. पण 'बळी' मध्ये भाषा, तपशील, तंत्रे काबूत ठेवून नीट वाट काढली आहे. न-नैतिक, तटस्थ, निरीक्षकाची दृष्टी टाळून जातीच्या चौकटीच्याही खालच्या पायरीवरचे 'बळी'तले जग सबंध हिंदू समाजाची उतरंड अत्यंत सूचकतेने हारखून टाकते. ह्यात कुठलाही आक्रस्ताळेपणा येऊ दिलेला नाही. लैंगिकता हा नित्याचा भाग असलेल्या जीवनावर झोत टाकूनही आशयरंजक होऊ दिला नाही. हे शास्त्रीय वस्तुनिष्ठ शिस्तीच्या सर्जकतेनेच शक्य होते.'' (गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर (संपा.) मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप (१९५०-१९७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८६, पृ. ४३) डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी विभावरी शिरुरकरांची वाङ्मयीन महात्मता व 'बळी' या कादंबरीचे महत्त्व, तिचा पुढील साहित्यिक व साहित्यावर पडलेला प्रभाव वरील विश्लेषणातून प्रकट केलेला दिसून येतो.

एकूण विभावरी शिरुरकर यांच्या 'बळी' या कादंबरीचा सर्वार्थाने पुढील साहित्यिक पिढीवर प्रभाव पडलेला दिसून येतो. विशेषतः स्त्रीवादी साहित्यावर तिचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. जीवनासाठी कला या विचाराला घेऊन वि. स. खाडेकरांनी ध्येयप्रवण अशा प्रकारचे कादंबरी लेखन केलेले दिसून येते. त्यांची अतिशय लोकप्रिय व गाजलेली तसेच जिला ज्ञानपीठ हे सर्वोच्च पारितोषिक मिळाले ती कादंबरी म्हणजे 'ययाती' (१९५९) ही होय. त्यांनी मोठ्या प्रमाणात कादंबरीलेखन केले आहे. गांधीवादी प्रभाव व काहीसा साम्यवादी विचारांचा प्रभाव त्यांच्या लेखनावर झालेला आहे. 'ययाती' ही कादंबरीही त्याला अपवाद नाही. या कादंबरीची कथा जरी पौराणिक असली तरी या कथेचा नवा अर्थ सांगण्याचा प्रयत्न वि. स. खांडेकर यांनी केलेला आहे. या कादंबरीबद्ल प्रा. डॉ. वसंत बिरादार म्हणतात, 'ययाती' कादंबरीमुळे खूपच खळबळ माजली. सर्व प्रकारचे मानसन्मान मिळूनही या कादंबरीत समीक्षकांकडून टीका सहन करावी लागली आहे. ययाती, देवयानी, शर्मिष्ठा या पौराणिक पात्रांच्या भोवती ही कादंबरी गुंफली गेली असली तरी तिला वर्तमानकाळातील एक मोठा सामाजिक संदर्भ आहे. हजारो वर्षे शरीराचा उपभोग घेतल्यानंतरही ययाती अतृप्त का आहे? या प्रश्नाला खांडेकरांनी उत्तर दिले आहे. मानवी जीवनाचा अर्थ, सुखाची कल्पना, मानवी नात्यातील संबंध, संसारातील प्रेम यांच्या शोधात ययातीने केलेला प्रवास खांडेकरांना वर्तमानकाळाच्या संदर्भात करावयाचा आहे. 'ययातीचे' यौवराज्यकालीन जीवन, विवाहोत्तर देवयानीच्या सहवासातील जीवन, यातच शर्मिष्ठेशी संबंध, देवयानीबरोबरचा संसार संपल्यावरही बेबंद जीवन यांचे दर्शन खांडेकरांना काळाचे भान ठेवून करायचे होते असे दिसते. स्वैराचारी, भोगजीवनात रमलेल्या ययातीच्या अखेरच्या काळात आत्मचिंतन सुरू झाले. त्याला उपरती होते. पुरु, शर्मिष्ठा यांच्या निरपेक्ष प्रेमाचा साक्षात्कार त्याला होतो. तो शेवटी वानप्रस्थाला जाण्यास निघतो. श्रद्धाशून्य, भोगवादी, लिंगपिसाट अशा आजच्या माणसाचा पौराणिक प्रतिनिधी म्हणजे

ययाती हा जीवनाचे प्रयोजन शोधण्याच्या धडधडीत आहे.'' वरील विवेचनातून प्रा. डॉ. वसंत बिरादार यांनी 'ययाती' कादंबरीचा विषय आशय सांगून वि. स. खांडेकरांनी भावी पिढ्यांना नीतिबोध व सदाचाराचा संदेश दिलेला आहे. ययाती या कादंबरीमधून, वाचकांच्या मनावर चांगला संस्कार करण्याचे काम वि. स. खांडेकर यांनी केले आहे. नरहर कुरुंदकर यांना ही मोठी रुपकथाच वाटते. गांधीवाद, समाजवाद, क्रांती, मानवता व नीतीबोध यांचा प्रभाव असलेले खांडेकरांचे लेखन रूपकात्मक स्वरूपात चित्रीत होत असते. त्यामुळे ययाती पौराणिक कथेपेक्षा प्रतीकात्मक कथा जास्त वाटते, असे नरहर कुरुंदकरांना वाटते. ज्येष्ठ समीक्षक डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ''मध्यमवर्गाची स्वप्ने, त्यांच्या आकांक्षा, त्यांचा ध्येयवाद, त्यांच्या समस्या यांचे चित्रण करणारे खांडेकर 'ययाती' मध्ये पुराणकथेला वर्तमानाचा संदर्भ देतात. साने गुरुजींच्या 'अस्तिक' या कादंबरीपेक्षा 'ययाती'चा प्रश्न वेगळा आहे. ते लिहितात, 'महाभारतातल्या मूळ कथेत आलेले ययातीचे चित्रण अतिशय प्रातिनिधिक आहे. याची जाणीव पूर्वी कधीही झाली नव्हती. इतक्या तीव्रतेने या दशकात मला झाली. 'ययाती' हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे. सुख आणि आनंद यांच्यातील फरक त्याला कळत नाही. सुख म्हणे क्षणभर मिळणारे शरीरसुख हेच चिरंतन सुख मानून ते सतत कसे मिळेल याचे तो चिंतन करीत आहे. त्याच्या भावविश्वात अन्य कुठलेही मूल्य नाही. जुनी आत्मिक मूल्ये उद्ध्वस्त झाली आहेत आणि नवीन आत्मिक मूल्ये निर्माण झालेली नाहीत, अशा संधिकाळात सर्वसाधारण मनुष्य ययातीसारखा वावरत आहे. सुखाचा आंधळा शोध हाच त्याचा धर्म होऊ पाहात आहे.'' (रा. श्री. जोग व इतर (संपा.) प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. २४५) वरील विवेचनातून 'ययाती' या कादंबरीचा मूळ उद्देश स्पष्ट होतो.

थोडक्यात वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीने सर्वंकष असा प्रभाव मराठी साहित्यावर पाडलेला दिसून येतो. लोकप्रियतेच्या बाबतीत ही कादंबरी शिखरांवर पोहोचलेली आहे. त्यानंतरच्या रणजित देसाई– स्वामी, शिवाजी सावंत – मृत्यूंजय, छावा, युगंधर इ. कादंबरींवर तिचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

## १.६ समारोप

प्रभाव व निर्मितीप्रेरणा या घटकामध्ये आपण वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा यामध्ये केशवसूत, ह. ना. आपटे व वामन मल्हार जोशी यांच्या वैचारिक प्रभावांचा अभ्यास केला. ते करत असतानाच त्यांचा पुढील साहित्यिक पिढीवर कसा प्रभाव पडला याविषयी देखील विवेचन केले. सामाजिक/राजकीय घटितांमधून प्रेरणा तसेच व्यक्तीच्या प्रभावातून प्रेरणा यामध्ये महात्मा फुले, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान व्यक्तिमत्त्वांचा साहित्यनिर्मितीवर पडलेला प्रभाव पाहिला. साहित्यकृतीच्या प्रभावातून प्रेरणा या मुद्याखाली यमुना पर्यटन, बळी व ययाती या श्रेष्ठ साहित्यकृतींचा प्रभाव पाहिला. या अभ्यासामधून असे प्रत्ययाला आले की, इंग्रज लोकांच्या प्रभावातून बदललेले भारतीय वातावरण, ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेल्या भारतीय मुलांनी घेतलेला सामाजिक सुधारणेचा विचार, स्त्री–पुरुष समतेचा विचार व आधुनिक विचार यातून निर्माण झालेले मराठी साहित्य माणसाचा विचार करणारे असून त्यावर पाश्चात्त्य साहित्यविचारांचा प्रभाव आहे. मराठी कवितेच्या प्रगल्भतेला केशवसुतांनी दिलेले योगदान बाबा पद्मनजी, ह. ना. आपटे,

वामन मल्हार जोशी, विभावरी शिरुरकर, वि. स. खांडेकर यांचा उदारमतवाद व सहानुभूतीचे धोरण याचा पुढच्या पिढीवर पडलेला प्रभाव विलक्षण आहे. महात्मा फुले यांची आमूलाग्र समाजपरिवर्तनाची सत्यशोधक चळवळ व तिचा साहित्य-निर्मितीवर पुढच्या पिढीवर पडलेला प्रभाव विचार करायला लावणारा दिसतो. तसेच डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीचा लढा, कृतिशील आंदोलने, अस्पृश्य समाजाच्या न्यायासाठी उभारलेले लढे, पत्रकारिता, उच्च कोटीच्या विद्वत्तापूर्ण सखोलतेने लिहिलेले ग्रंथ व संशोधन, भारतीय संविधानाची निर्मिती व हिंदू कोड बीलाची निर्मिती या साऱ्याच बाबींचा एकूण मराठी साहित्यावर पडलेला कमी-जास्त प्रभाव इथे पाहायला मिळाला. देशमान्य असे नेते म्हणून महात्मा गांधीचे नेतृत्व लढे, सत्याचे प्रयोग, ध्येयवादीपणा व मानवतावादी दृष्टिकोणातून व केलेले लेखन यांचा साने गुरूजी, दादा धर्माधिकारी व वि. स. खांडेकर आदी लेखकांवर पडलेला प्रभाव एकापेक्षा अनेक पिढ्यांना विचार करायला लावणारा आहे. एकूणच सामाजिक/राजकीय घटिते, व्यक्तिप्रभाव, साहित्यकृतींचा प्रभाव व या साऱ्यांच्या पाठीमागच्या वैचारिक प्रेरणा मराठी साहित्यनिर्मितीला प्रेरक ठरलेल्या आहेत.

## १.७ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

## १.८ स्वयं अध्ययन प्रश्न

### १.८.१ योग्य पर्याय निवडा.

१. केशवसुतांचा जन्म ........... येथे झाला.

(अ) कोरेगाव (ब) महाड (क) मालगुंड (ड) रत्नागिरी

२. ह. ना. आपटे यांचा जन्म ......... रोजी झाला.

(अ) ११ एप्रिल १८०५ (ब) ३ फेब्रुवारी १९९५

(क) ८ मार्च १८६४ (ड) २४ जुलै १८३७

३. महात्मा जोतिबा फुले यांनी ......... धर्म सांगितला.

(अ) ख्रिश्चन (ब) यहुदी (क) सार्वजनिक सत्य (ड) शीख

४. महात्मा गांधी यांना .......... यांनी इ.स. १८४४ मध्ये 'राष्ट्रपिता' म्हणून प्रथमतः संबोधले.

(अ) गोपाळ कृष्ण गोखले (ब) गोपळ हरि देशमुख

(क) सुभाषचंद्र बोस (ड) गोपाळ गणेश आगरकर

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला खालीलपैकी ............ नावाचा ग्रंथ आहे.

(अ) आर्टिक होम दी वेदाज (ब) व्हेअर शूद्राज

(क) माझे सत्याचे प्रयोग (ड) सार्वजनिक सत्यधर्म

**उत्तरे : (१) क (२) क (३) क (४) क (५) ब**

### १.८.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. साहित्यनिर्मिती विषयक वैचारिक प्रवाहांच्या प्रेरणा सांगून केशवसूतांचा काव्यनिर्मिती विषयक प्रभाव स्पष्ट करा.

२. महात्मा जोतिबा फुले यांच्या साहित्याचा आढावा घेऊन त्याचा मराठी साहित्यावर पडलेल्या प्रभावाचे चित्रण करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वव्यापी मानवतावादी विचारांचा मराठी साहित्यनिर्मितीवर पडलेल्या प्रभावाचे विश्लेषण करा.

### १.८.३ लघूत्तरी प्रश्न

१. सामाजिक/राजकीय घटितांचा प्रभाव व साहित्यनिर्मिती याचे साधार विवेचन करा.

२. ह. ना. आपटे यांच्या कादंबरीलेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

३. गांधीवादी विचार प्रभावाने निर्माण झालेल्या साहित्याची चिकित्सा करा.

### १.९ उपक्रम

१. केशवसूतांच्या समग्र कवितांचे अभिवाचन करून निरुपण सांगा.

२. महात्मा फुले यांच्या साहित्यकृती वाचून संक्षिप्त टिपणे काढून पुस्तिका तयार करा. किंवा तुमच्या परिसरातील सत्यशोधक चळवळींतील कार्यकर्त्यांची मुलाखत घ्या.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथांचे सामूहिक संकलन करून वाचन करा व त्यांच्या विचारांची पुस्तिका तयार करा.

### १.१० अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१. रा. श्री. जोग (संपा.) - हरपले श्रेय, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण-१८८५

२. वसंत दावतर (संपा.) - केशवसुत गाऊनी गेले, आलोचना प्रकाशन, मुंबई, दु. आ. १८९०

३. वि. स. खांडेकर (संपा. – केशवसुत, काव्य आणि कला, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ.आ. २००१

४. डॉ. बीरा पारसे – दलित कवितेतील अस्मिता, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००८

५. नरहर कुरुंदकर – धार आणि काट, देशमुख आणि कंपनी, पुणे. प्र. आ. १९७१

६. गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर (संपा. – मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप (१९५०–१९७५), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८६.

७. प्रा. डॉ. वसंत बिरादार – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. १९९९.

८. रा. श्री. जोश (संपा.) – प्रदक्षिणा (भाग पहिला) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. सा. आ.

९. गो. म. कुलकर्णी / व. दि. कुलकर्णी (संपा.– मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्र. आ. १९८८.

१०. केशव मेश्राम/उषा देशमुख (संपा.– दलित साहित्याची स्थितीगती, मुंबई विद्यापीठ आणि अनुभव पब्लिकेशन्स, मुंबई, प्र. आ. १९९७

११. भी. रा. आंबेडकर 'दलितांचे जग वेदना आणि शिष्टाई', ना. रा. शेंडे, नागपूर, १९७८, (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण, विदर्भ साहित्य संघ, १९५४).

१२. डॉ. यशवंत मनोहर – मराठी कविता आणि आधुनिकता, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९३.

१३. डॉ. योगेंद्र मेश्राम – दलित साहित्य उद्‌गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९.

१४. धनंजय कीर व स. ग. मातशे (संपा.– महात्मा फुले समग्र वाङ्मय, म. रा. सा. संस्कृती मंडळ द्वारा प्रकाशित, १९६९.

१५. डॉ. भगवान ठाकूर आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतर, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्र. आ. २००९

१६. साने गुरूजी गोष्टीरूप गांधीजी व इतर, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती २०११.

१७. गंगाधर पानतावणे, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९७६.

१८. गंगाधर पानतावणे, मूल्यवेध, अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९७४

१९. डॉ. प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., द्वि. आ. २०१२, पुनर्मुद्रण २०१४-१५-१६.

२०. डॉ. परशुराम मिमेकर (संपा.) वामनदारा कर्डक यांची गीतरचना, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. २००५

२१. डॉ. सदा कऱ्हाडे, दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००१.

२२. डॉ. शरणकुमार लिंबाळे, (संपा.) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००७.

२३. डॉ. रवींद्र ठाकूर/डॉ. नंदकुमार मोरे (संपा.) समीक्षापद्धती, सिद्धांत आणि उपयोजन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०११.

२४. प्रा. नंदकुमार साळुंके, युगपुरुष महात्मा जोतिराव फुले, ज्ञानसूर्य प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१७, पुनर्मुद्रण २०१८.

## घटक – २

# वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभाव

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

- २.३.१ वसाहतवाद
  - १. वसाहतीकरणाचा परिणाम
  - २. पाश्चात्त्य वसाहतवादी प्रभाव
  - ३. वसाहतवादाचा भारतीय विचारवंतावरील प्रभाव
  - ४. वसाहतकालीन प्रभावातील साहित्य
    - १. भाषांतरित/रूपांतरित साहित्य
    - २. समाजसुधारणा विषयक साहित्य
- २.३.२ वसाहतोत्तरवाद
  - १. एडवर्ड सईद
  - २. गायत्री चक्रवर्ती : स्पीव्हॉक
  - ३. होमी भाभा
  - ४. वसाहत्तोतरवादी संकल्पनेसाठी कारणीभूत घटक
  - ५. वसाहत्तोतरवादी सिद्धांताची लक्षणे
- २.३.३ देशीवाद
- २.३.४ एतद्देशीय परंपरांचा प्रभाव

२.४ समारोप

२.५ स्वयं अध्ययन

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.१ उद्दिष्टे

मागील घटकात आपण 'प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा' समजून घेतली. प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा यांचा सहसंबंध आपल्या लक्षात आला. वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभाव हा अभ्यास घटक अभ्यासल्यानंतर आपणास,

- पाश्चात्त्य वसाहतकालीन प्रभाव समजून घेता येईल.
- एतद्देशीय परंपरांच्या प्रभावाची माहिती मिळेल.
- देशीवादाची ओळख होईल.
- वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभावातून मराठी साहित्य कसे बदलते हे समजून घेता येईल.

## २.१ प्रस्तावना

'प्रभाव अभ्यास' या अभ्यासपत्रिकेतील 'वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभाव' हा दुसरा घटक आहे. 'प्रभाव अभ्यास' या पत्रिकेच्या पहिल्या घटकात व्यक्ती, साहित्यकृती, विचारतत्त्व आणि राजकीय/ सामाजिक घटना यांचा साहित्यनिर्मितीवर कसा प्रभाव पडतो हे आपण अभ्यासले आहे.

वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभाव या दुसऱ्या घटकामध्ये ब्रिटिश राजवटीच्या कालखंडातील मराठी साहित्य आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्य यांचा विचार करावयाचा आहे. १८०० ते १९४७ हा ब्रिटिश राजवटीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धोरण, त्यांनी व्यापारी दृष्टिकोन ठेवून केलेल्या सुधारणा आणि एतद्देशीय समाजाचे केलेले शोषण व त्यामधून ब्रिटिश वसाहतीविरोधात झालेले उठाव. महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या परंपरा, त्यांचे कार्य, टिळक युग, गांधी युग, सत्यशोधक चळवळ, मार्क्सवादी विचाराची ओळख, ब्राह्मण व ब्राह्मणेतर संबंध, ग्रामीण जीवनात झालेला बदल. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, टिळक, म. गांधी, डॉ. आंबेडकर, सावरकर यांचे वसाहतकालीन कार्य. वसाहतोत्तरकालीन विविध चळवळी, एतद्देशीय परंपरा आणि देशीवाद, या अनेकविध प्रभावात मराठी साहित्याची निर्मिती झालेली आहे.

## २.३ विषय विवेचन

मराठी साहित्य हे तत्कालीन वास्तवाचे प्रतिबिंब असते. साहित्यामध्ये समाज आणि संस्कृतीचा प्रभाव पाहावयास मिळतो. मानवी जीवन आणि मानवी जीवनातील विविध घटना, त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया, परिवर्तने ही साहित्यामधून अधोरेखित होत असतात. समाजाचा आरसा म्हणून साहित्याकडे पाहिले जाते, ते याच अर्थाने. समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व तऱ्हेच्या घटनांचा, बदलांचा प्रभाव व्यक्तीच्या जीवनावर होत असतो. साहित्य व्यक्तीनिर्मित असल्याने समाजातील घडामोडीचा प्रभाव साहित्यावर असणे स्वाभाविक असते. मग ते कोणताही काळ असो. आपणास येथे वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभावाचा विचार करावयाचा आहे.

### २.३.१ वसाहतवाद

१४५० ते १८०० आणि १८०० ते १९४५ असे वसाहतवादाचे दोन कालखंड केले जातात. पहिल्या कालखंडात वसाहतींकडे व्यापार-व्यवहार करता येतील अशी ठिकाणे म्हणून पाहिले गेले. महाराष्ट्रात १८१८ साली पेशवाई नष्ट होऊन ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाली. वसाहतवाद ही सामाजिक विकासाची प्रगत अवस्था नसून ती विकास कुंठित करणारी व्यवस्था असते. ब्रिटिशांबरोबर फक्त भांडवलशाही आली नसून वसाहतवाद देखील आला. वसाहतवादात परकीय सत्ताधारी वर्ग आणि वसाहती जनता यांच्यातील संबंध महत्त्वाचे असतात. अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था वेठीस धरून वसाहतींचे शोषण सत्ताधारी वर्गाकडून केले गेले. सत्ताधारी वर्ग परकीय होता. त्याने एतद्देशीयांना सत्तेत सहभागी करून घेतले नाही. जुनी अर्थव्यवस्था, जुनी समाजरचना यांची मोडतोड करून नवीन वसाहती अर्थव्यवस्था निर्माण केली. दुसऱ्या कालखंडात वसाहतींकडे फक्त कच्च्या मालाचे ठिकाण व पक्क्या उत्पादनाच्या विक्रीची बाजारपेठ म्हणून पाहिले गेले. वसाहतवादी कालखंडात जनतेचे शोषण मोठ्या प्रमाणात केले गेले. वसाहतवादाचा वसाहतींच्या आर्थिक, राजकीय व्यवस्थेवर व संस्कृतीवर परिणाम झाला. त्याचा तोटा मोठ्या प्रमाणात व फायदा काही थोड्या प्रमाणात होता.

'वसाहतीकरण हे वसाहतीकरण झालेल्यांना उद्‌ध्वस्त करते तसेच ते वसाहतीकरण करणाऱ्यांनाही कुजवते.' हे अल्बर्ट मेम्मी याचे वसाहतीकरणासंबंधीचे मत संक्षिप्त मराठी विश्वकोशात दिले आहे. त्यानुसार वसाहतीकरण ही एका अर्थी अमानुषीकरणाची प्रक्रिया असते. वसाहतीकरण झालेले आणि वसाहतीकरण करणारे या दोघांमध्येही अमानुषीकरणाची भावना निर्माण झालेली दिसते. वसाहतीकरण करणारे स्वतःला एतद्देशीयांपेक्षा वरचढ समजून वर्चस्व गाजवीत, जुलूम करीत, त्यांचा विरोध दडपून टाकत सत्ता प्रस्थापित करतात. वसाहतवाद्यांनी केलेल्या हिंसेमुळे एतद्देशीयांनी त्यांच्या विरोधात मुकाबला करण्यासाठी सशक्त लढा उभारला.

रामकृष्ण विश्वनाथ स्पष्ट करताना म्हणतात, ''वसाहतीकरणाची प्रक्रिया इंग्रजांचे राज्य हे इंग्रजांच्या फायद्यासाठी आहे. इंग्लंड देशातून वस्त्रे वगैरे हिंदुस्थानात येऊन त्यापासून देशाची संपदा वाढत चाललेली आहे आणि हिंदुस्थानातून हमेशा पैसा जात आहे. कंपनी सरकार मोठमोठ्या पगाराच्या व विश्वासाच्या जागा नेटिव लोकांस देत नाहीत. आपल्या मालाचा खप व्हावा म्हणून हिंदुस्थानात उत्पन्न केलेल्या मालास प्रतिबंध व त्यावर मोठमोठाले कर बसविले आहेत.''

### १. वसाहतीकरणाचा परिणाम

वसाहतीकरणाचा परिणाम हा वसाहतीकरण करणाऱ्याच्या आणि वसाहतीकरण झालेल्या अशा दोघांच्याही मनावर होतो. आपण इतरांहून श्रेष्ठ आहोत ही भावना वसाहतीकरण करणाऱ्याची असते तर आपल्यापेक्षा कोणीतरी श्रेष्ठ आहे ही कमीपणाची भावना वसाहतीकरण झालेल्यांच्या मनात असते. त्यांना आपल्यावर अन्याय होतो आहे याची जाणीव होत असते.

वसाहतवादी अर्थव्यवस्था हे ब्रिटिशकालीन राजवटीतील शेतकऱ्यांच्या असंतोषाचे कारण होते. पाश्चात्त्य शासनाने ग्रामीण अर्थव्यवस्था मोडली. त्यांनी जमिनीचा वापर वसाहती देशातील बाजारपेठेच्या विकासासाठी करून घेतला. त्यांची आर्थिक धोरणे, भूमी सारा पद्धती, प्रशासन, न्यायव्यवस्था, हस्तोद्योग बंद पाडले. त्यामुळे शेतीवर बोजा वाढला परिणामी वाढता सारा भरण्यासाठी शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्जे घ्यावी लागली. शेतकऱ्यांनी या शोषणाविरोधात उठाव केले.

वसाहतवादी वर्चस्वाखालील आदिवासींना त्यांच्या उत्पादनावर कर आणि जमिनीचा सारा द्यावा लागला. सावकारी व व्यापारी हे त्यांचे शोषण करीत असत. वसाहतवादाने अन्न, इंधन व गुरे चराईसाठी जंगलावर अवलंबून असणाऱ्या आदिवासींचे जंगलाशी असणारे नाते संपवून टाकले.

वसाहतवाद्यांकडून वसाहतिक स्थिती ही आर्थिक फायद्यापेक्षा स्वामित्व मिळविण्यासाठी टिकवली गेली. वर्चस्व लादण्यासाठी हिंसाचार केले गेले. सामान्य अधिकारी, छोटे व्यापारी यांच्यामधून वसाहतिक वंशवाद निर्माण झालेला होता. वसाहतींमध्ये राजकीय, आर्थिक, मानसिक शोषणातून असंतोष निर्माण होऊन त्या विरोधात संघर्ष करणाऱ्या चळवळी उभ्या राहिल्या. शेतकरी, कष्टकरी संघटित झाले. बुद्धिजीवी विचारवंत यांच्या संघटना उभ्या राहिल्या. सोबतच शेतकरी, आदिवासी यांचे शेतीशी, जंगलाशी असणारे नाते टिकविण्यासाठी चळवळी उभ्या राहिल्या.

**२. पाश्चात्त्य वसाहतवादी प्रभाव**

पाश्चात्त्य वसाहतवाद महाराष्ट्रात १८१८ साली पेशवाई नष्ट झाल्यानंतर सुरू झालेला आहे. इंग्रजी वसाहतवादी राजवटीचे काही टप्पे अभ्यासाच्या सोयीसाठी पाडावे लागतात. १८५७ नंतर ब्रिटिश राजवटीच्या प्रभावी परिणामातून महाराष्ट्रीयन लोकांचा बौद्धिक विकास आणि त्या अनुषंगाने राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनात बदल झाला. साहित्यिक, विचारवंत यांनी लेखनाच्या माध्यमातून तो व्यक्त केलेला आहे.

**३. वसाहतवादाचा भारतीय विचारवंतांवरील प्रभाव**

बाळशास्त्री जांभेकर, राजाराममोहन रॉय, लोकहितवादी, भास्कर पांडुरंग तर्खडकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन इ. अनेक विचारवंतांनी पाश्चात्त्य वसाहतवादाच्या प्रभावातून समाजसुधारणा विषयी लेखन केले.

बाळशास्त्री जांभेकर १८३२ साली लिहितात, 'हिंदुस्थानचा प्रदेश इंग्रजी अंमलाखाली येऊन जरी थोडीच वर्षे झाली आहेत, तरी जो अज्ञानांधकार फार दिवसापर्यंत या देशास व्यापून होता तो जाण्यास प्रारंभ झाला आहे.'

लोकहितवादी १९४७ ते १९५० या काळात लिहितात, 'आपले लोक ज्ञानसंपादन करणे हे लहान मुलांचे काम असे समजतात आणि शिकत नाहीत. ज्ञान म्हणजे इंग्रजी विद्या, ब्राह्मणविद्या अर्थशून्य आहे.

किंबहुना ब्राह्मणांजवळ विद्याच नाही. अर्थशून्य पाठांतर आहे. इंग्रजी लोकांनी विद्या फार सुधारल्या. इंग्रजांचे राज्य येथे आले त्याचे मुख्य कारण आपले अज्ञान. ज्ञानाचा अभाव या समाजाची मोठी व्याधी आहे.'

इंग्रजी राजवटीमुळे सुधारणा होते आहे; त्यामुळे ती फायद्याची आहे, असे बाळशास्त्री जांभेकर आणि लोकहितवादी यांना वाटत होते तर भास्कर पांडुरंग तर्खडकरांना ब्रिटिश सत्ता पक्षपात करणारी आणि त्यांच्या दृष्टीने फायद्याचे कायदे, न्याय खाते करीत असल्याचे दिसले.

इंग्रजी शिक्षण घेतलेला एक विशिष्ट वर्ग वसाहतकाळात निर्माण झाला होता. त्यांना शेतकऱ्यांविषयी कसलीच सहानुभूती नव्हती. तो नोकरशाहीत समाविष्ट झाला होता. बौद्धिक व्यवसाय करीत होता. तसेच खूप जमीन असलेला जमीन मालक किंवा शेतकऱ्याकडे काम करणारा असा वर्ग होता. ब्रिटिशकाळात ब्रिटिशांचे धोरण स्वीकारून त्यानुसार चाललेला एक वर्ग आणि ब्रिटिशांचे धोरण चुकीचे ठरवणारा दुसरा वर्ग उदयास आलेला होता. दोन्ही वर्गावर ब्रिटिश सत्तेचा चांगला किंवा वाईट असा प्रभाव होता.

## ४. वसाहतकालीन प्रभावातील साहित्य

ब्रिटिश वसाहतकाळात शालोपयोगी पुस्तकांचे भाषांतर इंग्रजी भाषेतून मराठीत झाले. अभिजात संस्कृत व इंग्रजी वाङ्मयाची भाषांतरे झाली. याच काळात सामाजिक व राजकीय घडामोडी घडल्या. त्यानुषंगाने विचारमंथन झाले. समाजसुधारणा विषयक साहित्याची निर्मिती झाली. यामागे वसाहत काळातील विविध बाबींचा प्रभाव होता.

### १. भाषांतरित साहित्य

१८०० ते १९७४ या कालखंडात भाषांतरित वा रूपांतरित स्वरूपाच्या साहित्याला प्रोत्साहन मिळाले. भाषांतरित साहित्यासाठी पारितोषिकांची योजनादेखील केली जात असे. ही भाषांतरे मुख्यतः इंग्रजीवरून मराठीत होती. मराठीत पुस्तके तयार करण्याचे काम सरकारने मेजर कॅण्डी यांच्याकडे सोपविलेले होते.

१. शालोपयोगी पुस्तकांचे भाषांतर – इंग्रजी भाषेतील ज्ञान मराठीत आणण्याच्या प्रेरणेतून भाषांतर कार्य सुरू झाले.

२. अभिजात संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयकृतीची भाषांतरे.

### २. समाजसुधारणाविषयक साहित्य

१८५७ पासून कथात्म लेखनात समाजसुधारणा हा मुख्य विषय आलेला दिसतो. लक्ष्मणशास्त्री हळबे, हरि नारायण आपटे, नाथ माधव, बा. सं. गडकरी यांच्या साहित्यातून स्त्रीशिक्षण, एकत्र कुटुंबपद्धती, केशवपन, पुनर्विवाह असे विषय हाताळलेले आहेत. महाराष्ट्रात त्या काळात राजकीय व सामाजिक विचारमंथन चालू होते. त्याचा प्रभाव या लेखकांवर व त्यांच्या साहित्यावर पडलेला दिसतो.

हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांमधून तत्कालीन विषय मांडलेले आहेत. 'पण लक्षात कोण घेतो?' यामध्ये केशवपन, एकत्र कुटुंबपद्धती, स्त्रीशिक्षण हे विषय आणि 'यशवंतराव खरे'मध्ये आधी समाजसुधारणा की स्वातंत्र्य हा विषय मांडलेला आहे.

नाथ माधव यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्री शिक्षण व पुनर्विवाह हे विषय मांडलेले आहेत. 'सुधारणेचा मध्यमकाळ' या बा. स. गडकरी यांच्या कादंबरीत पुनर्विवाह हा विषय हाताळलेला आहे. मराठी कविता आणि नाटकांतून देखील समाजसुधारणावादी विचारांचा प्रभाव दिसतो. विशेषतः केशवसुतांच्या कवितेत तो मोठ्या प्रमाणात जाणवतो. *नवे निशाण, तुतारी, नवा शिपाई, स्फूर्ती, निशाणाची प्रशंसा, मजुरावर उपासमारीची पाळी, अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, गोफण* या कवितांमधून जातिभेद, आर्थिक व सामाजिक विषमता याविरोधी बंड करणारा नवा क्रांतिकारी विचार व्यक्त होतो.

१९२० हे वर्ष मराठी साहित्याच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. १८५८ पासून ब्रिटिश सत्तेच्या अंमलाचे साक्षीदार असणाऱ्या टिळकांचा मृत्यू झाला आणि त्याच वर्षी गांधी युगाचा उदय झाला. आधुनिक मराठी साहित्यातील टिळक-आगरकर हे पर्व संपले. या काळातील साहित्यनिर्मिती पूर्वसुरींच्या तुलनेत मंदावलेली होती. १९२० नंतर महाराष्ट्राची राजकारणात पिछेहाट झाली. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी यांच्यापासून सुरू झालेले विचार जागृतीचे पहिले पर्व संपले होते. गांधीवादी विचारसरणीचा प्रभाव, असहकार चळवळ, आंबेडकरांची मानवमुक्तीची चळवळ व कार्य यामुळे बहुजन समाजात नवजागृती होत होती. स्वातंत्र्याची आशा आणि स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ गतिशील झाली होती. महाराष्ट्रातील लोकांना गांधीवाद, मार्क्सवाद या तत्त्वप्रणालींची ओळख होत होती. ब्रिटिश राजवटीने भारतीय लोकांच्या जीवनात झालेला सर्वांगीण बौद्धिक विकास आणि राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनातील बदल हा वसाहतकालाचा परिणाम होता.

वसाहत काळात रानडे, गोखले आणि टिळक या नेत्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील अखिल भारतीय स्वरूपाचे नेतृत्व संपले. पहिल्या युगाचा शेवट आणि दुसऱ्या युगाची सुरुवात झाली. टिळकांच्या काही अनुयायींनी महात्मा गांधींचे नेतृत्व स्वीकारले. १९१६ पासून राजकारणात सक्रीय असणाऱ्या गांधीनी सत्याग्रहाचे तत्त्व घेऊन अहिंसक सत्याग्रहाचा वापर केला. असहकारितेच्या आंदोलनाने गांधींचे नेतृत्व संपूर्ण देशाने मान्य केले. शांततामय सत्याग्रहाचा जनमानसावर बराच प्रभाव पडला. महात्मा गांधींचा यंत्रसामुग्री आणि औद्योगिककरणाला विरोध होता. औद्योगिक संस्कृती हा रोग वाढत होता. अहिंसा हे सत्याच्या शोधाचे मूळ असून ते हाती आले की सत्य सापडते, अशी गांधीजीची धारणा होती. गांधीजींच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा मराठी साहित्य आणि साहित्यिकांवर प्रभाव पडला. 'माझे रामायण' या दत्तो आप्पाजी तुळजापूरकर यांच्या कादंबरीत गांधीजींच्या सत्याग्रहाचे आणि वसाहतवादी सत्ता कशाप्रकारे काम करीत असते याचे चित्रण आले आहे. वसाहतवादाने एतद्देशीयांचा केलेला छळ, त्यांना अमानवीय, हीनतेची दिलेली वागणूक याविषयी गांधींनी आपल्या आत्मकथेत लिहिले आहे. महात्मा गांधींच्या आदेशाने आणि मार्गदर्शनातून पुण्याजवळ सह्याद्रीच्या पायथ्याशी असणाऱ्या मुळशीच्या मावळ्याचा सत्याग्रह झाला. या

सत्याग्रहाच्या प्रभावातून बाळ सीताराम मर्ढेकर यांनी 'पाणी' ही कादंबरी लिहिली. मावळ खोऱ्यातील भगतपूर गावाच्या उजव्या बाजूने कृष्णा आणि डाव्या बाजूस एक मोठा ओढा असे सह्याद्रीच्या एका त्रिकोणी कुशीत वसलेले खेडे दाखवून कादंबरीची रचना केली आहे. स्थलांतरित होणे, जमिनीपासून दुरावले जाणे, विस्थापित होणे हे सत्याग्रह करूनही थांबविता आले नाही. शहरातील उद्योग-धंद्यासाठी खेडी उद्ध्वस्त होऊन शहरे समृद्ध होतात. शेतीवाडी धरणाखाली गेल्याने तेथील लोकांना शहराकडे वळावे लागते. शेतीच्या मालकांना शहरातील गिरण्यात मजूर म्हणून राबावे लागते, असे चित्र येते.

साने गुरुजीच्या साहित्यावर गांधी विचारांचा प्रभाव होता. १८९९-१९५० या काळात जनआंदोलनात सक्रीय होते. त्यांना तुरुंगात जावे लागले होते. त्यांनी तुरुंगात 'पत्री' या कवितासंग्रहातील कविता लिहिलेल्या आहेत. त्यांनी 'पत्री'च्या चौथ्या खंडात सत्याग्रही नावाचे खंडकाव्य लिहिले आहे. त्यांच्या एकूण कवितेवर गांधी विचारांचा प्रभाव आहे. 'सत्याग्रही'मधून त्यांनी देशातील हलाखी, विषमता, शोषण, पारतंत्र्य यामुळे निर्माण झालेली स्थिती मांडली आहे. साने गुरूजींची गांधीवादावर निष्ठा असली तरी त्यांनी साम्यवादाचा प्रभाव स्वीकारलेला असल्याचे वसंत आबाजी डहाके यांनी दाखवून दिले आहे. सानेगुरूजींच्या कादंबऱ्यातून शेतकरी कामगारांचे लढे, मालक मजूर संघर्ष, समताधिष्ठित सामूहिक वसाहतीचे चित्रण आलेले आहे.

दत्तात्रय पुंडे संपादित 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य' या ग्रंथात गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभावाचा वेध घेण्यात आला आहे. या ग्रंथातील गो. म. कुलकर्णी यांच्या लेखाच्या निमित्ताने गांधी विचार आणि मराठी साहित्य यांची मीमांसा केली आहे. गांधींचे व्यक्तिमत्त्व व विचार हे मध्यमवर्गीय बौद्धिक सांस्कृतिकता डावलणारे होते. आधुनिक मराठी साहित्यव्यवहारातील कलावादी वळणाला गांधीवाद हा आघात होता. या काळात कलावादी भूमिकेसह क्रांतिकारकता जोपासणे आणि परिवर्तनाच्या चळवळीत सामील होणे हे साहित्यिकांचे कसब होते. साहित्यकृतींमध्ये गांधीवाद आला तो वरवरचा होता. साहित्यकृतीच्या गाभ्यात रंजनाची प्रेरणा क्रियाशील असल्याने गांधीवाद हा मराठी साहित्याचा प्रवाह बनलेला दिसत नाही.

वि. दा. सावकर यांच्या साहित्यावर राष्ट्रप्रेम व हिंदुत्व यांचा प्रभाव होता. मातृभूमी त्यांच्या कवितेचा मुख्य विषय होता. त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगून साहित्यनिर्मिती केली आहे. ब्रिटिश शासन हिंदुद्वेषासाठी मुसलमानांचा उपयोग करते. मुसलमानांचे हित जोपासते. सावकारांनी वसाहतवादी राज्यकर्ते जातीवादी इंगित ओळखून जातीयवादाला प्रोत्साहन देतात हे ओळखले होते.

ब्रिटिश वसाहतकाळात ग्रामजीवनाच्या संरचनेत अनेक बदल झाले. त्यामध्ये ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा वाद निर्माण झाला. शाहू छत्रपती व सत्यशोधक मंडळींना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीचा प्रश्न सोडविणे महत्त्वाचे वाटत होते. ते भटशाहीतून मुक्तता करण्यासाठी ब्रिटिश सरकारचा आश्रय घेत होते. ब्राह्मणेतर चळवळीचा जोर वाढून स्वराज्याच्या चळवळीचा जोर कमी करण्यासाठी ब्रिटिश 'फोडा आणि झोडा'

धोरणाचा अवलंब करीत होते. १९११ साली कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना होऊन सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन झाले. १९१३ साली 'दीन मित्रकार' मुकुंदराव गणपतराव पाटील यांचे 'कुळकर्णी लीलामृत' हे काव्य प्रसिद्ध झाले. हे महात्मा फुल्यांच्या 'गुलामगिरी'चे पुढचे रूप होते. 'कुळकर्णी लीलामृताचा' नायक पाटील असून त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ब्राह्मण हा पाटील व शेतकऱ्याला लुटतो अशी ग्रंथाची मांडणी आहे. कै. जोतीराव फुल्यांचे सत्यशोधक समाजाचे झाड आज बहुत वर्षे वठून गेले होते ते फिरून पालवून 'कुळकर्णी लिलामृत' हे त्याच्या बहराचे पहिले फूल असावे, असा धनंजय कीर यांनी अभिप्राय दिला आहे. 'शेटजी प्रताप' या काव्यग्रंथात मारवाडी, गुजर, सावकार हे शेतकऱ्याचे शोषण करतात हे मुकुंदराव पाटील यांनी दाखवून दिले आहे. *दीन मित्र, गरिबांचा कैवारी, भगवा झेंडा, तरुण मराठा, छत्रपती, विजयी मराठा, जागृती, प्रबोधन* इत्यादी ब्राह्मणेतर वृत्तपत्रे सुरू झाली.

१९२० ते १९३० हा कालखंड राष्ट्र, हिंदुत्व, ब्राह्मण-ब्राह्मणेतर समाजजीवन, व्यक्तिजीवन, स्त्रियांची सुधारणा, अस्पृश्यता निवारण याविषयीच्या विचारांचा आणि वादाचा होता. या कालखंडातील नियत-कालिकांतून वैचारिक लेखनाप्रमाणे कविता, कथा, कादंबऱ्याही प्रकाशित झाल्या. त्यावर त्या कालखंडातील विचारांचा प्रभाव असलेला दिसतो. डॉ. केतकरांच्या 'विद्यासेवक'मधून त्यांच्या *निःशस्त्राचे राजकारण, महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण* या वैचारिक ग्रंथाप्रमाणे, *गोंडवनातील प्रियंवदा, परागंदा, आशावादी, ब्राह्मणकन्या* ह्या कादंबऱ्या, 'रत्नाकर' मधून ना. सी. फडके यांच्या *जादूगार, दौलत* ह्या कादंबऱ्या, वा. म. जोशी यांची *सुशीलेचा देव, ज्योत्स्ना,* वि. स. खांडेकरांची *हिरवा चाफा,* 'प्रतिभा'मधून वा. म. जोश्यांची *इंदू काळे सरला भोळे* ह्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यावर त्या कालखंडातील विचारप्रवाहाचा प्रभाव असलेला दिसून येतो. १९२५ च्या 'किर्लोस्कर खबर' या मासिकात र. धों. कर्वे यांचा 'अमर्याद संतती' हा लेख प्रसिद्ध झाला होता. वाढत्या लोकसंख्येचे परिणाम आणि संतती नियमन ही काळाची गरज यावर चर्चा करणारा हा लेख होता. त्यांनी १९२७ मध्ये 'समाजस्वास्थ्य' नावाचे मासिक सुरू केले. संतती नियमन, लोकसंख्या वाढ, ब्रह्मचर्य, गर्भपात, रतिक्रिया, अश्लीलता, समलिंगी संभोग इ. विषयावरील लेखन प्रसिद्ध करून त्यांनी लोकांच्या मनातील लैंगिक विषयाबाबतचे अज्ञान व गैरसमज दूर करून त्याबाबत शास्त्रीय माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्रिटिश राजवटीने भारतीय लोकांच्या जीवनात झालेला सर्वांगीण विकास व राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनातील बदल म्हणजेच वसाहतिक कालखंडाचा परिणाम असे म्हणता येईल. एतद्देशीयांनी ब्रिटिश राजवटीचे स्वागत केले. त्यानंतर भारतीयांच्या जीवनात बदल झाला. त्यांची अंधःकारमय जीवनातून, जुलूम, बलात्कार यापासून सुटका होऊन विद्या आणि ज्ञानाच्या बळावर माणूस निर्भयपणे जगू लागला. ब्रिटिशांच्या प्रभावाने नवे साहित्यप्रकार, भाषा सुधारणा, सामाजिक पुनर्रचना, राजकीय आकांक्षा, धार्मिक चळवळी आणि आचारातील बदल या गोष्टी घडल्या. ब्रिटिश राजवटीत पारंपरिक व्यवसाय बंद पडले. लोक खेडी सोडून शहराकडे धावू लागले. भारतातील कच्चा माल परदेशात निर्यात होऊ लागला. भारतीय

बाजारपेठ ही पक्क्या मालाच्या विक्रीसाठी उपलब्ध झाली. ब्रिटिश मालाचा खप व्हावा म्हणून इंग्रजांनी हिंदुस्थानच्या मालास प्रतिबंध केला व त्यावर कर लादले गेले. शेती व हस्तउद्योगावर आधारित अर्थव्यवस्था ढासळली. देश दरिद्री अवस्थेत आला अशी अवस्था भारताची वसाहतकाळात झाली होती.

### २.३.२ वसाहतोत्तरवाद

१९९० नंतर प्रस्थापित झालेला आणि आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकतावाद, संरचनावाद, संरचनोत्तरवाद, विघटनवाद, हर्मेन्यूटिक्स, स्त्रीवाद, वसाहतवाद, देशीवाद यामधील सगळ्यात नवा व आत्ताचा वाद म्हणजे वसाहतोत्तरवाद होय. नववसाहत, उत्तरवसाहत ही वसाहत्तोतर कालखंडासाठी वापरलेली नावे आहेत. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील वसाहती नंतर स्वतंत्र होत गेल्या. तसे त्यांचे प्रश्न बदलत गेले. या नव्या आणि बदललेल्या प्रश्नांची चर्चा वसाहतोत्तर म्हणून नोंदविली गेली.

वसाहतोत्तर वादाच्या अभ्यासाचा इतिहास शंभर वर्षाचा आहे. डब्ल्यू. ई. बी. द्यू. ब्बा हे आफ्रिकी अमेरिकी विचारवंताचे लेखन विसाव्या शतकाच्या प्रारंभी प्रकाशित झालेले आहे. त्यानंतर अमेरिकेत हार्लेमची निग्रोंच्या प्रबोधनाची चळवळ झाली. नेग्रिट्यूडची निग्रोंच्या अस्मितेची चळवळ १९४०-५० च्या दशकात झाली. त्रिनिदादचा क्रिकेटपटू आणि सी.एल.आर. जेम्सचे लेखन, अल्जेरियाच्या क्रांतिकारी चळवळीत सक्रीय असलेला फॅझ फॅननचे लेखन चिनुआ अचेबेचे लेखन, रणजीत गुहांची इतिहास लेखन पद्धती आणि लॅटिन अमेरिकी कादंबरी, आफ्रिकी कविता, नाटक, कादंबरी, कॉमनवेल्थ साहित्याचा अभ्यास आणि युरोपाबाहेरचे सौंदर्यशास्त्रीय सिद्धांत यांचे पाठबळ ही वसाहतोत्तरवादाच्या सिद्धांताची व्यापक चौकट आहे.

'वसाहतीकरणापासून आतापर्यंत साम्राज्यवादी प्रक्रियांचा परिणाम झालेल्या सर्व संस्कृतींनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे वसाहतोत्तरवादी साहित्य' असे १९८९ साली प्रकाशित झालेल्या वसाहतोत्तरवादाच्या सिद्धांताची पहिल्यांदा दखल घेणाऱ्या 'द एम्पायर राईटस् बँक : थिअरी अँड प्रॅक्टिस इन पोस्टकलोनिअल लिटरेचर्स' या संपादित ग्रंथात म्हटले आहे. एडवर्ड सईद, गायत्री चक्रवर्ती स्पीव्हॉक आणि होमी भाभा या तीन अभ्यासकांनी वसाहतोत्तरवादाच्या सिद्धांताची शास्त्रशुद्ध मांडणी केली आहे. हा सिद्धांत पहिल्यांदा मांडण्याचे श्रेय चक्रवर्ती आणि भाभा यांनी सईद यांना दिले आहे. ह्या दोघांना सईद यांच्या 'ओरिएंटलिझम' या वसाहतोत्तरीय क्षेत्रातील पायाभूत पुस्तकाने प्रेरित केले आहे.

**१. एडवर्ड सईद :** एडवर्ड सईद हे मध्यपूर्वेतून अमेरिकेत स्थलांतरित होऊन स्थायिक झाले आहेत. ते इंग्रजी साहित्य आणि तौलनिक साहित्याचे प्राध्यापक असून 'ओरिएंटॅलिझम' हा त्यांचा ग्रंथ वसाहतोत्तर सिद्धांताची मांडणी करणारा आहे. या ग्रंथावर मिशेल फूको या फ्रेंच विचारवंताचा प्रभाव आहे. 'ओरिएंटलिझम' हे मध्यपूर्वेतील अरबी व इस्लामी संस्कृतीवरील भाष्य आहे. यामधून त्यांनी वसाहतोत्तरवादाच्या सिद्धांताची मांडणी केली आहे. सत्ता आणि ज्ञान यांच्या अविभाज्य संबंधातून निर्माण झालेली पाश्चिमात्यांची पूर्वे विषयीची धारणा हे त्यांच्या लेखनातील मध्यवर्ती सूत्र आहे. मात्र त्यांनी संस्कृती आणि साम्राज्यवाद यांच्यातील

अंतर्संबंधाच्या सूक्ष्मतर अभ्यासावर भर दिला आहे. त्यामुळे समाज निर्मितीची प्रक्रिया, संस्कृतीरूपांचा शोध आणि पश्चिमेत्तर जगातील सांस्कृतिकरण हे त्यांच्या लेखनात येते.

वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांच्या सहअनुभवामुळे सामायिक संस्कृतीच्या दिशेने जगाची वाटचाल होऊ लागली. आधुनिक जगाचे इतिहास एकमेकांत गुंतलेले आहेत. त्यामुळे श्रेणीव्यवस्था संपत असून एका नव्या संकरतेचा जन्म झाला आहे. तिसऱ्या जगातील बुद्धिजीवी यांचे पाश्चिमात्य महानगरातील प्रवास, स्थलांतरित किंवा देशातून हद्दपार या कारणाने असला तरी मूळ जाणिवा व पाश्चिमात्य जाणिवा अशा दुहेरी विरोधात्मक जाणिवांमुळे त्यांचा पाश्चिमात्य महानगरीय वर्चस्वाशी मुकाबला होतो. या सीमोल्लंघनाला उत्तेजन मिळाले पाहिजे. तिसऱ्या जगातील लेखकांना राष्ट्रवादाच्या भोवऱ्यातून बाहेर येण्यासाठी सीमोल्लंघनाची मदत होते.

सईद यांच्या मते कादंबरी या वाङमयप्रकाराचा उगम पश्चिमेत झाला आहे. तिचा वसाहतीकरणाशी जवळचा संबंध आहे. पाश्चिमात्यांच्या वसाहतीकरणात स्थळव्याप्ती व स्थळ नियंत्रण किंवा अवकाशव्याप्ती व अवकाश नियंत्रण या समस्या येतात. कादंबरीत अवकाशाच्या विस्तारावर आख्यान पुढे सरकते. अवकाशाचे नियंत्रण हीच कादंबरीची समस्या राहते. याचा अर्थ कादंबरीच्या प्रेरणा साम्राज्यवादात आहेत.

**२. गायत्री चक्रवर्ती : स्पीव्हॉक :**

गायत्री चक्रवर्ती यांचा स्त्रीवादावर भर आहे. त्या एकाच वेळी अनेक क्षेत्रात सक्रीय आहेत. भारतीय सब आल्टर्न अभ्यासाच्या इतिहासलेखनाचे काम करणारा गट व अल्जिरियाचा स्त्रीवादी गटाशी त्या जोडल्या आहेत. त्यांनी वसाहतोत्तरवादी लेखनाची मीमांसा तसेच महाश्वेतादेवीच्या बंगाली साहित्याचा इंग्रजी अनुवाद केला आहे. त्यांनी वसाहतोत्तरीय साहित्याची अनेक अंगाने चर्चा केली आहे. भारतातून जगभरात विखुरलेल्या व स्थायिक झालेल्या लोकांचे स्थानांतरित होण्याची कारणे आणि त्यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. काही स्वेच्छेने तर काही गुलाम म्हणून स्थानांतरित झालेले आहेत. काही बौद्धिक क्षेत्रात तर काही भौतिक सुखासाठी विकसित देशात स्थायिक आहेत. त्यामुळे तिसऱ्या जगातील लोकांचा वर्णभेदाकडे, वर्गभेदाकडे, लिंगभेदाकडे दुर्लक्ष करून सरसकट विचार करणे त्यांना चुकीचे वाटते. त्यांनी लिंगभेदावर आधारित समस्यांचा केलेला विचार वसाहतोत्तरवादी मीमांसेला वेगळे परिमाण देतो.

चक्रवर्ती यांना पहिल्या जगातील विद्याशाखीय स्त्रीवादाविषयी आस्था आहे. त्या धन बाजूचाही विचार करतात. त्यांना साम्राज्यवादामुळेच बौद्धिक जडणघडण झाल्याचे पटते. पाश्चिमात्यांच्या मर्यादा दाखविणे हा त्याच्या लेखनाचा गुणधर्म आहे. त्यांनी वसाहतोत्तर या ऐवजी 'नववसाहतीय' ही संज्ञा वापरली आहे. त्यांनी मार्क्सवादी मांडणी केली आहे. त्यांनी तळागाळातील समाजातील लोकांचा समावेश सब आल्टर्न या गटात केला आहे. त्यांनी पाश्चिमात्यांसमोर आर्थिक परावलंबनामुळे व लिंगभेदामुळे 'दुहेरी पद्धतींनी सीमांता'वर असलेला पौर्वात्य स्त्रियांचा अभ्यास मांडला. त्यांना संस्कृती केंद्रित मार्क्सवादी पद्धतीपेक्षा जुनी, पारंपरिक, राजकीय अर्थव्यवस्थेवर आधारित मार्क्सवादी पद्धती अधिक मोलाची वाटली.

त्यांच्या मते, व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व असंख्य गोष्टीवर अवलंबून असल्याने मोजक्या गोष्टींच्या आधारे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करणे अशक्य असते. व्यक्तीच्या विवेचनासाठी विखंडित आणि संहिताजन्य प्रतिकृतीचा वापर करून भारतीय हे वसाहतवादी मनोवृत्ती असल्याचे त्यांनी सिद्ध केले आहे. वसाहतवादी व्यक्तीच वसाहतवादाबद्दल लिहू शकतात ही धारणा देशी आहे. भारतीय वास्तव कळण्यासाठी स्थानिक ओळख असावीच असे नाही. पाश्चिमात्यांचा वसाहतोत्तरवादाचा सिद्धांत भारतीय संस्कृतीला लागू पडू शकतो. पाश्चिमात्य संस्कृतीतून तयार झालेल्या साहित्याला पर्याय हिंदूच्या धर्मसंकल्पनेतून मिळेल. त्यांनी अशक्यतेचा सिद्धांत सबआल्टर्न स्त्रियांची मुक्तता, नेतृत्व, त्यांचे दुःख समजून घेण्यासंदर्भात मांडला आहे. स्वेतरमध्ये घुसून त्यामध्ये 'स्व' मिसळून टाकणे ही आकांक्षा वसाहतोत्तरवादी सिद्धांताला नवे बळ देणारी आहे असे चक्रवर्तींना वाटते.

**३. होमी भाभा** : भारतीय संस्कारात वाढलेले होमी भाभा अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. त्यांनी वसाहतवाद, संस्कृती, वंश, वांशिकता, राजकीय समस्या, स्थलांतर, वसाहतोत्तरीय साहित्य यावर लेखन केलेले आहे. त्यामधून वसाहतोत्तर वादाच्या सिद्धांताला मोठे पाठबळ लाभले आहे. त्यांचे १९८० ते ८८ या काळातील लेखन वसाहतवादी विचारव्यूहाचे विश्लेषण करणारे आहे. त्यांनी इंग्रजी काळातील सांस्कृतिक देवाणघेवाणीचा इतिहास मांडला आहे. नववसाहतीय समाजातील वेगवेगळ्या समस्यांचा, वसाहतोत्तरवादाच्या आधुनिकोत्तर-वादाशी असलेल्या संघर्षमय नात्याचा शोध त्यांनी घेतला आहे. भाभांच्या लेखनावर हॅना अरेंट, मिखाइल बख्तिन, जॅक लाकान आणि रोलॉ बार्थ यांचा प्रभाव आहे.

वसाहतीकरण करणारे आणि वसाहतीत अडकलेले लोक यांच्यातील विभाजनाची क्रिया, त्यांचे परस्पर संबंध आणि सामंजस्य भाभांना महत्त्वाचे वाटते. जेते आणि जित यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्याचा ते मनोविश्लेषणात्मक पद्धतीने विचार करतात. अभिलाषा, सत्ताकांक्षा, स्वत्त्वहीन होण्याचे दुःख, भय, असुरक्षितता इत्यादी भावना जित्यांच्या संस्कृती, मूल्यव्यवस्था, नीतीव्यवस्था, आचारविचार, पोशाख पद्धती यावर लादल्या जातात. अंतर्बाह्य प्रभाव लादला जातो. त्यानंतर जित त्यांची संस्कृती स्वीकारतात. त्याचे अनुकरण करतात. या प्रक्रियेचे पुनरावृत्ती (रिपिटीशन) व जितांच्या अनुकरणशीलतेचे वर्णन अनुकृती (मिमिक्री) असे भाभा करतात. पुनरावृत्ती हा भाभांच्या वसाहतोत्तरवादी मीमांसेचा विशेष म्हणून नमूद करावा लागतो. वसाहतोत्तरीय स्थलांतरितांचे पाश्चिमात्य महानगरीय नाते, त्यांचा संस्कृती संघर्ष, वर्चस्व याचा शोध भाभा यांनी घेतला आहे. एखाद्या संस्कृतीतील लोक स्थलांतरानंतर दुसऱ्या संस्कृतीत प्रवेश करून एकात्मीकरणाची प्रक्रिया सुरू होते. ती अनुवादाचीच प्रक्रिया असते. संस्कृतीची सगळी रूपे सतत संकरतेच्या प्रक्रियेतून जात असतात.

### १. वसाहतोत्तरवादी संकल्पनेसाठी कारणीभूत घटक

वसाहतीच्या स्वातंत्र्यानंतर राजकीय स्वातंत्र्य हे स्वावलंबी होण्यासाठी सोपे आहे हा समज येणाऱ्या परिस्थितीत फोल ठरला. वसाहतीच्या वर्चस्वातून मुक्तता झाल्यानंतर त्यांच्या उत्थापनासाठी योजना आखण्यात

आल्या. वसाहतींनी व राजकीय स्वातंत्र्यानंतर स्वावलंबी होणे कठीण आहे याची जाणीव झाली. वसाहतींना वर्चस्वातून मुक्त झाल्यानंतरही पहिल्या जगातील देशावरच अवलंबून राहावे लागणे. अमेरिका व सोव्हिएट युनियनमधील शीतयुद्ध संपले. युरोपने आपली एकसंघ बाजारपेठ निर्माण करण्याची योजना केली. तिसऱ्या गटाने आर्थिक व्यवहारांसाठी स्वतंत्र संस्था उभारली. यामध्ये अकरा देशाने पुढाकार घेतला. जागतिक बाजारपेठेचा जन्म झाला. अमेरिकेने जागतिक बाजारपेठेसोबत नवी गृहगोलीय जाणीव पसरविण्यास प्रारंभ केला. अन्नधान्य, बाजारपेठ, पर्यावरण, साहित्य संस्कृती, प्रदूषण, पेट्रोल या सगळ्यांच्या प्रश्नासाठी गृहगोलीय जाणिवेला वेठीस धरले. मेंदू संगणकाचा व इंटरनेटची भाषा असणाऱ्या गृहगोलीय संस्कृतीचा उदय झाला. पृथ्वी ही एक गृहगोलीय खेडे झाले. वसाहतोत्तरवाद हा शब्द नव्या गृहगोलीय जाणिवेचा निर्देशक बनला.

**२. वसाहतोत्तरवादी सिद्धांताची लक्षणे**

राष्ट्राच्या संकल्पनेची निरर्थकता, युरोपीय केंद्राचे सीमांतीकरण, सीमोल्लंघन, मिश्रभाषा निर्मिती, संस्कृतीसंकर, कालांतरण ही काही ठळक लक्षणे सांगता येतील.

**१. राष्ट्रवादाच्या संकल्पनेची निरर्थकता** : स्थळाच्या सीमा विस्तारल्याने राष्ट्रवादाची संकल्पना फोल ठरली. बुद्धिजीवी वर्गात राष्ट्राऐवजी गृहगोलीय खेड्याचे, विश्वाचे नागरिक असणे ही धारणा वाढत गेली.

**२. युरोपीय केंद्राचे सीमांतीकरण** : वसाहतकाळात युरोपीयन साहित्य व संस्कृतीचे वर्चस्व होते. ते वसाहतोत्तरीय साहित्याने धुडकावून लावले. युरोप केंद्रिततेला आव्हान दिल्याने केंद्राचे सीमांतीकरण झाले. हे सीमांतीकरण वसाहतोत्तरीय लेखकांच्या साहित्यावरून लक्षात येते. अशा लेखकांना नोबेल पुरस्कार मिळाले. पुरस्कार न मिळालेल्या परंतु सीमांतीकरणाच्या दृष्टीने साहित्यकृती निर्माण करणारे लेखक मारिओ, वार्हान, कोली आवूनोर अशी यादी देता येते.

**३. सीमोल्लंघन** : स्थलांतरित आणि हद्दपार झालेले, पाश्चात्त्य देशात व अमेरिकेत गेलेल्या बुद्धिजीवी, वैचारिक व सर्जनात्मक साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकांनी सीमोल्लंघन केले आहे. उदा. तस्लीमा नसरीन, सलमान रश्दी.

**४. मिश्र भाषा निर्मिती** : वसाहतोत्तरवादी लेखक सीमोल्लंघन करतो. त्यावेळी संस्कृती संबंधाने त्याच्या भाषेवर होणाऱ्या परिणामामधून तो दोन भाषेच्या मिश्रणातून निर्माण होणारी कलाकृती निर्माण करतो. तिला भाषाशास्त्रात 'क्रिओल' म्हणतात.

**५. संस्कृतीसंकर** : भाषा ही संवादाचे व संस्कृतीचे संवाहक म्हणून काम करते. त्या एकमेकांवर अवलंबूनही असतात. त्यामुळे भाषिक संकरण सांस्कृतिक संकरणाला जन्म देते व संस्कृती संकरण भाषिक संकरणाला जन्म देते. यामधून संस्कृतिसंकर होत राहतो.

**६. कालांतरण** : वसाहतीकरणानंतर त्यांच्या मूल्यांना आंधळेपणाने आत्मसात केले जाते. आवश्यक त्या मूल्यांचा स्वीकार आणि वसाहतीकरणाला विरोध म्हणजेच निर्वसाहतीकरण या तीन टप्प्यांच्या पुढे निर्वसाहतीकरणाची वसाहतोत्तरीयमध्ये विलीन होण्याच्या प्रक्रियेत वसाहतींना आपल्या मुळापासून दूर गेल्याचे जाणवणे व स्थलांतराबरोबरच भूतकाळ विसरून सद्यकालावरच अवलंबून राहणे म्हणजे कालांतरण होय.

**७. काळाचा संकोच** : काळाला दुय्यम-तिय्यम स्थानांवर ठेवणे, व्यक्तीच्या मनातील काळ व बाहेरचा काळ यामध्ये फिरवाफिरव म्हणजे कालांतरण करून लिहिलेल्या साहित्यकृती या वसाहतोत्तरवादाच्या प्रभावात येतात.

### २.३.३ देशीवाद

१९६० नंतरच्या काळातील मराठी साहित्य विशिष्ट मर्यादित कक्षेत वर्ग आणि संस्कृतीच्या चाकोरीत बंदिस्त राहिले नाही. साहित्य व्यवहार शहरापुरता किंवा पांढरपेशा मध्यम वर्गापुरता न राहता विविध सामाजिक, सांस्कृतिक स्तर आणि भूसांस्कृतिक कक्षांपर्यंत पोहोचला. लेखक ज्या सामाजिक, सांस्कृतिक स्तरातील होता. तेथील वास्तव, समूहाची मानसिकता आणि जीवनमूल्ये ही प्रस्थापित साहित्य आणि सौंदर्यविचार नाकारणारी होती. या जाणिवांचे व्यवस्थापन सैद्धांतिक पातळीवर करण्याचा प्रयत्न देशीवादाच्या रूपाने झालेला आहे. साहित्याकडे पाहण्याची सांस्कृतिक व मूल्यात्मक दृष्टी देणारा देशीवाद साठोत्तरी काळाचा प्रातिनिधिक विचार आहे. तो मराठी साहित्याच्या विस्तारलेल्या भूसांस्कृतिक कक्षांचे नेमकेपणाने सैद्धांतिक आकलन होण्यास नवी दृष्टी देणारा आहे.

* **व्याख्या**

**१. डॉ. वासुदेव सावंत** : 'नव्या व्यवस्थेशी नीट जुळवून न घेता आल्याने स्वतःविषयी न्यूनगंडही निर्माण होऊ शकतो. अशा कुचंबनेमुळे आणि न्यूनगंडामुळे आजच्या या लेखकांपुढे एक प्रकारचा (Identify Crysis) उभा राहिलेला आहे. देशीवादी साहित्यसिद्धांत हा या क्रायसिसमधून जन्माला आलेला आहे. या 'क्रायसिस'मधून बाहेर पडण्यासाठी शोधलेला एक मार्ग म्हणजे देशीवाद होय. (२००१:१९०)

**२. डॉ. भालचंद्र नेमाडे** : देशी असणे याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्रायः होतो. देशी आणि देशीवाद समजून घेण्यासाठी आपल्या प्राचीन एतद्देशीय परंपरांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल. (२००१:१०८)

प्राचीन काळापासून अभिजन परंपरा आणि बहुजन परंपरा असा सांस्कृतिक स्तरभेद आहे. बहुजन परंपरा म्हणजेच लोकपरंपरा. भाषेपासून ते कलाविष्कारापर्यंत लोकपरंपरेशी, बहुजनांच्या संस्कृतीशी ज्याचा संबंध आहे ते सर्व देशी होय. या देशीपणाचा देशीवाद या संकल्पनेत अंतर्भाव आहे. देशीवाद हा बहुजन संस्कृती आणि त्या संस्कृतीने निर्माण केलेली मूल्यव्यवस्था यांना केंद्रवर्ती ठेवणारा विचार असल्याचे वासुदेव सावंत यांनी नमूद केले आहे.

संस्कृती आणि ती ज्या भौगोलिक पर्यावरणात विकसित होते. त्या संबंधावर देशीवादात भर दिला जातो. मानवी संस्कृतीत प्रत्येक संस्कृतीचे स्वतंत्र आणि स्वायत्त अस्तित्व हे तिच्या संस्कृतीच्या वेगळेपणा-वरून ठरते. हे वेगळेपण भौगोलिक पर्यावरणामुळे निर्माण झालेले असते.

देशीवादात संस्कृती या संकल्पनेला विशेष महत्त्व आहे. मानवी संस्कृतीची एकात्मता आणि प्रत्येक संस्कृतीचे वेगळेपण, मानवी संस्कृती आणि भौगोलिक पर्यावरण यांचे संबंध आणि संस्कृतीचा परस्पर संपर्क - संस्कृति संयोग हे देशीवादात महत्त्वाचे मुद्दे आहेत. मानवी संस्कृती म्हणून एकात्मता असणे आणि प्रत्येक संस्कृतीचे वेगळेपण असणे यामध्ये देशीवादात संस्कृतीच्या वेगळेपणाला अधिक महत्त्व असते. निसर्ग आणि मानव यांची एकात्मता पाहणारा दृष्टिकोन हा भारतीय संस्कृतीचा वारसा जपणारा विचार देशीवादाचा आहे. मानवी जीवनासंबंधी संतांनी दिलेला दृष्टिकोन हा देशीवादी संस्कृतीचा वारसा आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी १९८३ साली देशीवाद ही संज्ञा वापरली आहे. पण त्यापूर्वी १९६१ साली लिहिलेल्या 'निरस्तपादपे देशे : श्री. के. क्षीरसागर यांचा वादसंवाद' या लेखापासून मराठी समीक्षेत देशीवाद सुरू होतो असे अशोक बाबर यांनी 'देशीवाद' या ग्रंथात नमूद केले आहे. नेमाडे यांचे 'टीकास्वयंवर' या ग्रंथातील लेख आणि त्यांच्या कोसला (१९६३), बिढार (१९७५), जरीला (१९७७) आणि झूल (१९७९) या कादंबऱ्यांमध्ये देशीवाद असलेला दिसून येतो. देशीवादाची परंपरा 'मर्ढेकरांची कविता', सानेगुरूजींची 'श्यामची आई' या साहित्यकृतीमध्ये सापडते. गौतम बुद्ध, महानुभाव पंथ, संत नामदेव, संत तुकाराम, संत कबीर, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी अशी देशीवादी परंपरा आपणास दिसून येईल.

### २.३.४ एतद्देशीय परंपरांचा प्रभाव

एतद्देशीय परंपरा यांचा अर्थ या ठिकाणी आपणास देशी असाच घ्यावा लागतो. पण एतद्देशीय म्हणजे या देशातील भूमीशी जोडलेले असणे असा घेता येईल. डॉ. वासुदेव सावंत देशीवादी साहित्य सिद्धांताचे मूळ प्राचीन भारतीय परंपरेत शोधतात. तर भालचंद्र नेमाडे, अब्राह्मणी, अवैदिक आणि बहुजन परंपरेतील देशी प्रमाणकांचा आग्रह धरतात. ब्राह्मणी वर्चस्वाला विरोध करणाऱ्या गौतम बुद्ध-चक्रधर-महानुभाव-वारकरी या परंपरेला देशी परंपरा म्हणून घोषित करतात. हीच एतद्देशीय परंपरा असल्याचे स्पष्ट होते.

**१. गौतम बुद्ध** : गौतम बुद्ध हा अवैदिक संस्कृतीचा पुरस्कर्ता होता. त्याने वैदिक संस्कृतीला धक्का दिला. ब्राह्मणी प्रवृत्तीला विरोध करून धम्माची निर्मिती केली. चातुर्वण्यावर आधारलेले ब्राह्मण्य खोटे ठरविले. त्यांनी मानवतावादी तत्त्वज्ञानाची शिकवण देशी लोकभाषेत सर्वसामान्य लोकांना, शुद्रातीशूद्रांना दिला.

**२. चर्वाक** : चर्वाक हा प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व देणारा होता. त्याची वास्तववादी जीवनदृष्टी होती. त्याने जीवनाकडे बघण्याची आणि जगण्याची सम्यक विज्ञाननिष्ठ पद्धत अनुसरलेली होती. चार्वाक दर्शन मधून वेदापेक्षा विवेक महत्त्वाचा आहे हे त्यांनी सांगितले आहे.

**३. गुरूनानक** : गुरूनानक हे पंजाबमधील शीख धर्माचे संस्थापक म्हणून ओळखले जतात. त्यांनी श्रमावर आधारित नवनिर्मितीचा पुरस्कार केला आणि आपल्या अनुयायींना ती प्रेरणा दिली. त्यांनी पंजाबी भाषा आणि गुरूमुखी लिपी पंजाबला दिली आहे.

**४. महावीर** : महावीर हे जैन धर्माचे असून त्यांनी वैदिक संस्कृतीला धक्का दिला. त्यांनी संस्कृत भाषा नाकारून आपल्या धर्मग्रंथाची रचना अर्धमागधी भाषेत केली.

**५. संत कबीर** : संत कबीर यांनी इस्लाम आणि वैदिक यांचा समन्वय घडवून आणला आहे. ते विज्ञाननिष्ठ विचाराचे होते.

**६. संत बसवेश्वर** : संत बसवेश्वर यांनी वैदिक संस्कृतीला धक्का दिला आहे. त्यांनी परंपरेला नकार देऊन परंपरेविरुद्ध सामान्य जनतेत बंड निर्माण केले.

**७. श्रीचक्रधर** : श्रीचक्रधर हे महानुभव पंथाचे मूळ संस्थापक होते. अस्पृश्यता, जातीभेद, सामाजिक विषमता या गोष्टीला त्यांचा विरोध होता. जातीरहित समाजाची अपेक्षा करणाऱ्या चक्रधरांनी मराठी भाषा, महाराष्ट्र याविषयी प्रेम होते. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायींना महाराष्ट्र देशात रहावे, मराठीत बोलावे आणि मराठी भाषेत लिहावे अशी कडक आज्ञा केली होती. नागदेवाचार्य, म्हाइंमभट अशी महानुभावीय लेखकांनी लोकभाषेतून लोकवाङ्मयाची निर्मिती केली आहे.

**८. संत परंपरा** : ज्ञानेश्वर, तुकाराम व इतर संतांनी जातिभेद, भेदाभेद नष्ट करून समतेचा पुरस्कार केला आहे. अध्यात्माचे ज्ञान संस्कृत भाषेत होते. संस्कृत भाषा ही देवाची भाषा समजली जात होती. सर्व संतानी संस्कृत भाषेतील ज्ञान लोकभाषेत आणण्याचे प्रयत्न केले. ज्ञानेश्वरांनी गीता मराठीत रूपांतरित केली. संस्कृत भाषेला विरोध करून नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, जनाबाई, मुक्ताबाई या संतांनी मराठी भाषेत अभंग रचना केली.

संत तुकारामाच्या अभंगात देशप्रेम, भूमिप्रेम, निसर्ग असे देशीपणाचे संदर्भ येतात. त्यांनी सतराव्या शतकात मराठीला साहित्य भाषा म्हणून कळसावर विराजमान केलेले आहे. एकनाथांनी 'संस्कृत ही देवाची भाषा आहे तर मराठी काय चोरांची भाषा आहे काय?' असा सवाल केला होता. नामदेव शिंपी, सेना न्हावी, रोहिदास, चांभार, बंका महार, राखा महार, चोखा मेळा, संत सखुबाई, संत कान्होपात्रा अशा सर्व जाती-जमातींमधील स्त्री-पुरुषांनी मराठीतून अभंग रचना केली. मुसलमान समाजही या संप्रदायात सामील झाला. म्हणून अशोक बाबर देशीवाद या ग्रंथात लिहितात - ''सर्व संत परंपरा बहुजन समाजाची झाली. बहुजन समाज म्हणजे देशीवादाचा जाहीरनामा ठरला. सर्व मराठी देशी संत साहित्य या बहुजन समाजानेच समृद्ध केले असे नमूद करतात. सर्वच संतानी अस्सल देशी लोकभाषेचा वापर केला आहे. त्यांनी समतेचा पुरस्कार केला आहे.

**९. महात्मा जोतिबा फुले** : महात्मा फुले यांनी विद्या, मती, नीती गती आणि वित्त या मूल्यांना विशेष महत्त्व दिले आहे. त्यांची विचारसरणी विज्ञानवादी होती. ते वास्तवाचा पुरस्कार करतात. त्यांची 'शेतकऱ्याचा आसूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके आणि 'सत्यशोधक चळवळ' यामधून देशीवादाची मांडणी केली असल्याचे दिसून येते.

**१०. सत्यशोधक चळवळ** : महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेली सत्यशोधक चळवळ शाहू महाराजांच्या काळातील वैदिक-अवैदिक झगडा आणि त्यानंतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ अशी पुढे चालू राहिली. भास्करराव जाधव, महादेवराव डोंगरे, अण्णासाहेब लट्टे यांनी सत्याचा शोध घेण्याची महात्मा जोतिरावांची परंपरा चालू ठेवलेली होती. पेरीयार, दिनेशचंद्रसेन, भदन्त आनंद कौसल्यायन, चंद्रिकाप्रसाद जिज्ञासू, डी. डी. कोसंबी यांनी सत्यशोधक चळवळीचा विस्तार विविध भाषांमधून केला. हे सर्व देशी विचाराचे पाईक होते.

**११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सत्यशोधक परंपरेतील विचारवंत होते. त्यांचे कार्य, चळवळ आणि विचार यामधून देशीपणा दिसून येतो. त्यांनी स्वातंत्र्य-समता-न्याय ही मूल्ये स्वीकारली आहेत. बुद्धाचे विचार स्वीकारले आहेत. हिंदू धर्म संस्कृतीची त्यांनी महात्मा फुले यांच्याप्रमाणे चिकित्सा केली आहे. त्यांनी आर्थिक सत्तेच्या केंद्रिकरणाला विरोध केला. त्यांनी विकेंद्रिकरणाला महत्त्व दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाश्चात्त्य केंद्रित अर्थव्यवस्थेला विरोध करून देशी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणे हे देशीवादी असल्याचे दाखवून दिले.

**१२. महात्मा गांधी** : महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, सत्याग्रह या तत्त्वांना प्रमाण मानून असहकार, सविनय कायदेभंग ही आंदोलने केली. यामधून त्यांचा बुद्धाच्या विचारांशी संबंध दाखविता येतो. गांधींनी सत्यशोधक चळवळीतून स्वातंत्र्य लढ्यासाठी सत्याग्रह हे मूल्य स्वीकारले.

एतद्देशीय परंपरा बुद्ध ते गांधी अशी दाखविता येते. भालचंद्र नेमाडे यांच्या कोसला पासून देशीवाद मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात येताना दिसतो. 'बनगरवाडी', 'गोतावळा', 'इंधन', 'तणकट' अशा कितीतरी साहित्यकृतींची यादी देता येईल. स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात विविध नावाने निर्माण झालेले वाङ्मयीन प्रवाहात देशीवाद मोठ्या प्रमाणात दाखविता येतो.

**३. साहित्यावरील प्रभाव**

वसाहतकालीन प्रभाव हा भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील सुरू होता. १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला असला तरी वसाहती राजवटीचा प्रभाव पुढे कित्येक वर्षे राहिलेला आहे. मराठी साहित्यावर वसाहतकालीन अनेक घटनांचा परिणाम झालेला आहे. दुसऱ्या महायुद्धामुळे मानवी मूल्ये आणि श्रद्धांचा नाश झाला. भयंकर संहाराने मनुष्यातील पशुत्व अनुभवायला मिळाले. कुटुंब, समाज, नीतीमूल्ये, धर्म या मानवी जीवनाचा आधार असणाऱ्या गोष्टींवर विश्वास राहिला नाही. जुन्या श्रद्धा, मानवी स्वभाव आणि प्रत्यक्ष जीवन यातील विसंगतीचा परिणाम लेखकांवर झाला. पाश्चात्त्य वाङ्मयाचे वाचन लेखकांनी केले

व त्यातील तंत्राचा प्रभाव स्वीकारला गेला. गांधीवादी, साम्यवादी विचारांचा प्रभाव टिकून होता. १९६० नंतर मराठी साहित्यात नव्या जाणिवा दिसू लागल्या. अस्तित्ववाद, जनवाद, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, ऐतिहासिक, चरित्रात्मक, मनोविश्लेषणात्मक विचारधारा समृद्ध झाल्या. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी हे नवे प्रवाह वास्तवाचा वेध मोठ्या ताकदीने घेऊ लागले. वास्तववादी साहित्याचा काळ सुरू झाला. वासना, विकार, विकृती यांचा शोध घेण्याचा प्रयत्न होऊ लागला. थोडक्यात, वसाहतकालीन घटनांच्या परिणामातून निर्माण झालेल्या संस्कृतीतील साहित्य हे वेगवेगळ्या नावाने आणि प्रवाहांनी ओळखले जाऊ लागले.

जी. ए. कुलकर्णी यांच्या 'निळा सावळा' (१९५९), पारवा (१९६०), हिरवे रावे (१९६३), रक्तचंदन (१९६६), काजळमाया, सांजशंकुन (१९७१), पिंगळा वेळ (१९७०) या कथासंग्रहातील कथा मानवी अंतर्मनाचा व जीवनाचा अनेक स्तरांचा वेध घेणाऱ्या अनेकांगी आशय, विशाल जीवनपट, अस्तित्ववादी जीवनदृष्टी आणि नियतीवाद सांगणाऱ्या आहेत. ह्यांच्या कथा मानव-मानव, मानव-समाज, मानव-निसर्ग ह्या संबंधाचा वेध घेतात. मानव व विश्व, मानव व विश्वशक्ती यांच्यातील संघर्ष आणि अंतिम सत्याचे स्वरूप मांडणाऱ्या आहेत.

श्री. दा. पानवलकर यांच्या गजगा (१९६३), औदुंबर (१९६३), सूर्य (१९६८) ह्या कथासंग्रहातील कथा मध्यमवर्गातील ओढग्रस्तीचे जीवन, परिस्थितीशी संघर्ष करीत जगणारी माणसे यांच्या आहेत.

विजया राजाध्यक्ष यांच्या *पारंब्या, अधांतर व कमान* या कथासंग्रहातून स्त्री-पुरुषांच्या विविध भावभावनांचे चित्रण येते. दिलीप चित्रे यांच्या 'आर्फियस' या कथासंग्रहातील कथा, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक संकेताचे दडपण झुगारून अस्तित्वशोध घेणाऱ्या आहेत. तारा वनारसे यांच्या पश्चिमकडा (१९६३) या कथासंग्रहातील कथा अंतर्मनाचा वेध घेणाऱ्या आहेत. कमल देसाई यांचा 'रंग' हा कथासंग्रह व 'सूर्य' ही दीर्घकथा मनोविश्लेषणप्रधान संज्ञाप्रवाही, मुक्त तंत्राची, आत्मनिष्ठ व स्त्री मनाचा कोंडमारा मांडणारी आहे. विजय तेंडूलकर यांच्या *काचपात्रे, मेणपात्रे, गाणे* ह्या कथासंग्रहात वास्तव जगातील भोगवादाचे दर्शन घडते. विद्याधर पुंडलिक यांच्या पोपटी चौकट (१९६२) टेकडीवरची पीसे (१९६०), या कथासंग्रहातील माणसे ध्येयवादी, पापपुण्याचा विचार करणारी, चाकोरीतून बाहेर पडण्यासाठी धडपडणारी आहेत. मधु मंगेश कर्णिक यांच्या *कोकणी गऽऽ वस्ती, पारध, भुईयात्रा, मंत्र मांडवल, डोलकाठी,* तहान या कथासंग्रहात कोकणातील लोकसंस्कृती, बाराबलुतेदारी, चाकरमाणे, देवस्थाने, सणवार, उत्सव, निसर्ग असे चित्रण येते. जयवंत दळवी यांच्या *गहिवर, एदीन, जळातील मासा, आश्रम, फजितवाडा* या कथासंग्रहातील कथा कोकणच्या पार्श्वभूमीच्या आणि प्रेम या विषयावरील आहेत.

गो. नी. दांडेकर यांच्या आनंदवनभुवन (१९६१), कर्णायन (१९६२), अजून नाही जागे गोकुळ (१९६३), जैत रे जैत (१९६५), बया दार उघड (१९६६), हर हर महादेव (१९६८), दर्या भवानी (१९६९), मोगरा फुलला (१९७५), दास डोंगरी राहतो (१९७८) ह्या कादंबऱ्या व्यंकटेश माडगूळकर यांच्या वावटळ (१९६४), करुणाष्टक (१९६२), सत्तांतर (१९६२), कोवळे दिवस (१९७९) ह्या कादंबऱ्या

श्री. ना. पेंडसे यांच्या रथचक्र (१९६२), लव्हाळी (१९६६) ह्या कादंबऱ्या, वि. स. खांडेकर यांच्या ययाती, अमृतवेल (१९६४) ह्या कादंबऱ्या लोकजीवनाकडे पाहण्याची नवी जाणीव निर्माण करणाऱ्या आहेत.

बा. सी. मर्ढेकर यांच्या 'आणखी काही कविता' (१९५१) या काव्यसंग्रहात यांत्रिकता, विषमता, निर्जिवपणा, ढोंगीपणा, पुराणमतवादाचा उबग हे विषय येतात. तर त्यातील लिंग, विष्ठा, मैथुनातील झिंग, करपट ढेकर अशी रूपके नवकाव्याचा परिचय करून देणारी आहेत. शरदचंद्र मुक्तिबोध यांच्या नवी मळवाट (१९४९), 'यांत्रिक' या कवितासंग्रहात मानवतेबद्दलचा जिव्हाळा, विषमतामय अस्वस्थ जीवनातून निर्माण झालेली प्रक्षोभकता व्यक्त होते. विं. दा. करंदीकर यांच्या स्वेदगंगा (१९४९), मृदगंध (१९५४), ध्रुपद (१९५९), जातक (१९६८) या कवितासंग्रहातील कविता सामाजिक जाणिवेच्या, दीनदुबळ्यांच्या, श्रमकऱ्यांच्या कष्टाची जाणीव असणाऱ्या क्रांतीचा घोष करणाऱ्या आहेत. वसंत बापट यांच्या बिजली (१९५२), सेतू (१९५७) या कवितासंग्रहातील कविता प्रेम, देशभक्ती, सामाजिकता, निसर्गवर्णन, देशातील राजकीय व सामाजिक घटना, सामाजिक विषमता व्यक्त करणाऱ्या आहेत. आरती प्रभू यांच्या *नक्षत्रांचे देणे, दिवेलागण, जोगवा* या कवितासंग्रहातील कविता निसर्गचित्रे व वास्तवापलीकडचा शोध घेणाऱ्या आहेत. पु. शि. रेगे यांच्या *हिमसेक, दोला, गंधरेखा, पुष्कळा* या काव्यसंग्रहातील कवितांमधील प्रेम, आत्मकेंद्रित स्वरूपाचे आहे. त्यांच्या कवितेत दुर्बोधता आलेली दिसून येते. मंगेश पाडगांवकर यांच्या धारानृत्य (१९५०), जिप्सी (१९५३), छोरी (१९५७) या कवितासंग्रहातील कविता दीन, दलित, शोषित, पीडित यांच्याबद्दल जिव्हाळा असणाऱ्या आहेत. निसर्गप्रतिमांतून त्याची प्रेमभावना व्यक्त होते. त्यांना सामाजिक विषमतेबद्दल चीड आहे. त्यांच्या कवितेतून निसर्ग प्रेम व मानवी प्रेम व्यक्त होते. कवी ग्रेस यांच्या *संध्याकाळच्या कविता, राजपुत्र आणि डार्लिंग, चंद्रमाधवीचे प्रदेश* यामधील कविता आर्तता आणि दुःख याचा विविध पातळ्यांवर आविष्कार करणाऱ्या आहेत. त्यांचे अनुभवविश्व वाचकांना अनुभूतीच्या पलीकडे घेऊन जाते. त्यांच्या कवितेतून दुःखाबरोबर रतिभावनाही व्यक्त होते.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य असे वाङ्मयीन प्रवाह वसाहत-कालीन प्रभावाच्या काळात निर्माण झाले. त्या त्या साहित्य प्रवाहाची मूल्ये त्या साहित्यातून व्यक्त झालेली दिसतात. द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केलेले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांचा 'माणदेशी माणसं' हा कथासंग्रह ग्रामीण जीवनातील व्यक्तींची जीवनचित्रं उभे करणारा आहे. द. मा. मिरासदार यांचे *बापाची पेंड, हुबेहुब* हे कथासंग्रह, शंकर पाटील यांचे *वळीव, भेटीगाठी, धिंड, ऊन, वावरी शेंग, खुळ्याची चावडी, ताजमहल, सरपंच* हे कथासंग्रह ग्रामीण चित्रण करणारे म्हणून महत्त्वाचे आहेत. या काळात शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, रणजित देसाई यांनीही कथालेखन केलेले आहे.

लेखकांनी ग्रामीण कथेच्या बरोबरीने ग्रामीण कादंबरीत वास्तव ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. अण्णाभाऊ साठे, रणजीत देसाई, मधु मंगेश कर्णिक, अशोक व्हटकर यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण घडविणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

आनंद यादव यांची 'गोतावळा', रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' या ग्रामीण वास्तव चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांनी ग्रामीण जीवनातील गुंतागुंत उलगडून दाखविली आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या केवड्याचं कणीस (१९६३), माकडीचा माळ (१९६३), आवडी (१९६३), वैर (१९६४), रानगंगा (१९६५), मास्तर (१९६६), वारणेचा वाघ (१९६८) या कादंबऱ्यातून ग्रामीण माणसांमधील वैर, त्यांच्यातील संघर्ष, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती यांचे चित्रण आलेले आहे. उद्धव शेळके यांच्या धग (१९६०) या कादंबरीतून कष्ट करून जगणाऱ्या वऱ्हाड प्रांतातील-खेड्यातील कुटुंबाचे दर्शन घडते. शंकर पाटील यांच्या टारफुला (१९६४) या कादंबरीतून ग्रामीण भागातील हुकूमशाही प्रवृत्तीचे चित्रण पाहावयास मिळते. महादेव मोरे यांच्या पाव्हणा (१९६६), पनोती (१९६९), बळी (१९७२), वस्ती (१९७५), अडगार (१९७८), ह. मो. मराठे यांची 'काळेशार पाणी', अशोक व्हटकर यांची मेलेलं पाणी (१९८२), रणजित देसाई यांची बारी (१९५९), उत्तम बंडू तुपे यांची खाई (१९६६), 'काट्यावरची पोर', रंगनाथ पठारे यांची 'रथ' (१९८४), हमीद दलवाई यांची इंधन (१९६५), मधु मंगेश कर्णिक यांच्या 'देवकी', 'माहिमची खाडी' (१९६९), मनोहर मल्हार यांची माणूस (१९६३) ह्या कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील माणसे, निसर्ग, प्राणीजीवन यांच्यासह ग्रामीण वास्तवाचे चित्रण करतात.

ग्रामीण जीवनावर काव्यलेखन करणारे कवी म्हणून आनंद यादव यांचा उल्लेख केला जातो. त्यांचे हिरवे जग (१९६०), मळ्याची माती (१९७८), मायलेकरं (१९८९) हे काव्यसंग्रह ग्रामीण जीवनाची स्वानुभूती अस्सल रूपात सादर करणारे आहेत. आनंद यादव यांच्या कवितेत निसर्ग, शेतीजीवन, प्रेमजीवन, शेतकरी, दारिद्र्य, शेतकऱ्याचे कौटुंबिक जीवन म्हणजेच शेतकरी आणि सभोवतालचे ग्रामीण विश्व केंद्रित झालेले आहे. ना. धों. महानोर यांच्या रानातल्या कविता (१९६७), *वही, पावसाळी कविता, अजिंठा, प्रार्थना, दयाघना, पळसखेडची गाणी* हे काव्यसंग्रह खेड्यातील वास्तव जीवन, शेताशी जोडलेले ऋणानुबंध, खेड्यातील निसर्ग व प्रतिमा यांच्यासह अस्सल ग्रामीण बोलीत मांडलेल्या आहेत.

दलित जीवनाचे चित्रण कथेच्या माध्यमातून करणारे अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल हे महत्त्वाचे लेखक आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या *खुळवाडी, बरबाद्या कंजारी, आवडी फरारी, रानवेल, कृष्णाकाठच्या कथा, भानामती, लाडी, जिवंत काडतूस, मास्तर, गुऱ्हाळ, गजाआड* या कथासंग्रहातील कथातून दलित, शोषित पीडित माणसाचे जीवन, त्यांची दुःखे अन्यायग्रस्तता मांडलेली आहे. त्यांनी दलित जीवनानुभवातून कथालेखन केले आहे. 'जे जीवन जगलो, पाहिले, अनुभवले तेच मी आज लिहिले आहे' असे 'खुळंवाडी' कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊंनी लिहिलेले आहे. शंकरराव खरात यांच्या बारा बलुतेदार (१९५९), सांगावा (१९६२), टिटवीचा फेरा (१९६३) या कथासंग्रहात दलित

जीवनातील दारिद्र्य, उपासमार, हलाखीचे जीवन, त्यांना मिळणारी तुच्छतेची वागणूक, अन्याय आणि दुःख यांचे वास्तव चित्रण येते. त्यांच्या कथेत भुकेसाठी नाडलेल्या दलितांचे अस्वस्थ चित्रण, उच्चवर्णीयांकडून दलितांचा होणारा छळ, हिंदूधर्मातील रूढी-परंपरा व वतनदारी आणि जातीनुसार ग्रामरचनेला विरोध दिसून येतो. बाबुराव बागल यांच्या जेव्हा मी जात चोरली होती (१९६३), मरण स्वस्त होत आहे (१९६८) या कथासंग्रहात दलित व शोषित माणसांचे भीषण वास्तव चित्रित केलेले आहेत. बागुलांनी नव्या जाणिवेतून कथा लिहिल्या आहेत. वसाहतोत्तर काळातही दलितांची स्थिती बदलली नाही. त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार थांबले नाहीत. सांस्कृतिक, सामाजिक व मानसिक स्थिती बदलली नाही. या परिवर्तनाची उपेक्षा मांडणारी बागुलांची कथा मराठी दलित साहित्यात वेगळ्या ठरल्या आहेत. योगेंद्र मेश्राम यांच्या 'रक्ताळलेली लक्तरे' (१९८०) या काव्यसंग्रहातील कथा या दलित, उपेक्षितांचे जीवन चित्रण करणाऱ्या आहेत. केशव मेश्राम यांच्या 'खरवड' या कथासंग्रहात मुंबईच्या बकाल, कुरूप वास्तवाचे चित्रण पहावयास मिळते. अर्जुन डांगळे यांच्या 'ही बांधावरची माणसे' या कथासंग्रहात दलितांवरील अत्याचार, वाईट चालीरिती, शोषण, ढोंगी प्रवृत्ती दाखविलेल्या आहेत. अमिताभ यांची 'पड', वामन होवाळ यांची 'बेनवाड', योगीराज वाघमारे यांच्या 'उद्रेक', 'बेगड', 'गुडदानी', माधव कोंडविलकर व भास्कर चंदनशीव यांच्या कथांमधून अस्पृश्यता, अन्याय अत्याचार यांचे चित्र पहावयास मिळते.

दलित कादंबरी लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये सशक्तपणे कादंबरी लेखन करणारे अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात हे दोन लेखक आहेत. शंकरराव खरात यांच्या हातभट्टी (१९७०), गावचा टिनोपॉल गुरुजी (१९७१), मी मुक्त, मी मुक्त (१९७१), झोपडपट्टी (१९७३), मामलेदार गेस्ट हाऊस (१९७४) यामधून उपेक्षितांचे जीवन, झोपडपट्टीत जगणे, अस्पृश्यांना सहन कराव्या लागणाऱ्या अवहेलना चित्रित केलेल्या आहेत. नामदेव ढसाळ यांची *'हाडकी हडवळा'*, हरिभाऊ पगारे यांची *'युगप्रवर्तक, कालिंदी'*, ज. वि. पवार यांची *'बलिदान'*, हिं. गो. बनसोडे यांची *'मुक्तीसंग्राम'* या कादंबऱ्यांवर आंबेडकरी विचाराचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामधून हिंदू-बौद्ध संघर्ष याचे दर्शन घडते.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि लढा' या मूलमंत्राच्या परिणामातून दलितांच्या पहिल्या पिढीने शिक्षण घेतले. सामाजिक, आर्थिक विषमता, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यांच्याविषयी त्यांच्यामध्ये निर्माण झालेल्या अस्वस्थतेचा भावनिक उद्रेक, विद्रोही साहित्याच्या रूपाने झाला. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पडसाद दलित साहित्यात पडलेले दिसतात. दलित कविता ही दलितांच्या चळवळीतून निर्माण झालेली आहे. दलित कविता ही शोषितांच्या अपमानाचे, अन्याय अत्याचाराचे दुःख व्यक्त करते.

नारायण सुर्वे यांचे *ऐसा गा मी ब्रह्म, माझे विद्यापीठ जाहीरनामा, सनद* हे काव्यसंग्रह आहेत. नारायण सुर्वे कामगार जीवनातील प्रत्यक्ष अनुभव मांडणारे, शोषितांचे, वंचितांचे जग काव्यातून व्यक्त करतात. केशव मेश्राम यांचे *उत्खनन, जुगलबंदी, कृतकपुत्र, अकस्मात* हे काव्यसंग्रह आहेत. त्यांच्या कवितेत

दलितांची वेदना येते. ते व्यवस्थेविरुद्ध बंड करतात. वामन निंबाळकर यांचे *गावकुसाबाहेरील कविता, महायुद्ध* हे कवितासंग्रह आहेत. त्यांचे दलित जीवनातील उत्कट अनुभव, गावकुसाबाहेरील विदारक दुःख व्यक्त होते. त्र्यंबक सपकाळे याचा 'सुरुंग' हा काव्यसंग्रह आहे. स्वतः भोगलेले अन्याय, दुःख त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. दया पवार यांच्या *कोंडवाडा* या कवितासंग्रहात विषमतेतून निर्माण झालेल्या विद्रोही जाणिवा व्यक्त होतात. अर्जुन डांगळे यांचा *छावणी हालते आहे,* ज. वि. पवार यांचा *नाकेबंदी,* नामदेव ढसाळ यांचे *गोलपीठा, मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले, गांडू बगीचा, या सत्तेत जीव रमत नाही, प्रियदर्शिनी-आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र* हे कवितासंग्रह आहेत. त्यांची कविता दलित जाणिवेच्या दुःखाला नवा आकार देणारी आहे. जातीयता, विषमता, रूढी, धर्म, संस्कृती यावर ती हल्ले करते. यशवंत मनोहर यांच्या *उत्थानगुंफा, जीवनायन* कवितासंग्रहातून नकार, विद्रोह, मानवता प्रकट होते. त्यामधून मार्क्स, फुले, आंबेडकर यांना अभिप्रेत समाजरचनेचा आदर्श व्यक्त होतो. हिरा बनसोडे यांचे *पौर्णिमा, फिर्याद, फिनिक्स,* ज्योती लांजेवार यांच्या *दिशा, शब्द निळे, आभाळ, अजून वादळ उठले नाही* इत्यादी कविता संग्रहातून दलित स्त्रीच्या व्यथा, वेदना आणि तिचा विद्रोह व्यक्त होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारक्रांतीनंतर आत्मभान आलेल्या व्यक्तीने आपली व आपल्या समाजाची करुण कहाणी आत्मकथनांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपली व्यथा, वेदना, दुःखाला कारणीभूत असणाऱ्या व्यवस्थेचा शोध घेतला. वसाहतोत्तरीय कालखंडात दया पवार यांचे बलुतं (१९७८), प्र. ई. सोनकांबळे यांचे आठवणीचे पक्षी (१९७९), माधव कोंडविलकर यांचे मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे (१९७७), लक्ष्मण माने यांचे उपरा (१९८०), उत्तम बंडू तुपे यांचे काट्यावरची पोरं (१९८०), शंकरराव खरात यांचे तराळ अंतराळ (१९८१), कुमुद पावडे यांचे अंतःस्फोट (१९८१), दादासाहेब मोरे यांचे गबाळ (१९८३), मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' (१९८४), रुस्तुम अचलखांब यांचे गावकी (१९८३), शरणकुमार लिंबाळे यांचे अक्करमाशी (१९८४), शांताबाई कांबळे यांचे 'माज्या जल्माची चित्तरकथा' इ. आत्मकथनातून जात अनुभवातून येणारी व्यथा वेदना मांडलेली आहे. त्यामधून वसाहतोत्तरीय काळातही जातीय अन्याय, अत्याचार चालूच होते यांचे दर्शन घडते.

वसाहत काळाच्या प्रभावाने बदललेली सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थिती, शैक्षणिक प्रगती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यातून स्त्रियांना आपल्यावरील अन्याय, दुय्यम वागणूक, अबलापण यांची जाणीव झाली. स्त्रियांचे प्रश्न, शोषण, स्वातंत्र्य याविषयीचे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणून ओळखले गेले. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री मुक्तीचा विचार मांडणारे साहित्य आहे.

आशा बगे यांच्या मारवा (१९८४), अत्तर (१९८६), पूजा (१९८५) या कथासंग्रहातील कथांमध्ये स्त्रीची मानसिक स्पंदने, पुरुष व्यवस्थेत तिची होणारी कोंडी मांडलेली आहे. सानिया यांच्या 'दिशा घराच्या' (१९९१), शोध (१९८०), खिडक्या (१९८९), प्रतिति (१९८९), ओळख (१९९२), वलय (१९९७), प्रणय (१९९५) या कथासंग्रहात पती-पत्नी, आई-मुलगी, मामा-भाची या नात्यातील गुंतागुंत आणि

मानसिक ताणतणाव मांडले आहेत. मेघना पेठे यांच्या हंस अकेला (१९९७), आंधळ्याच्या गायी (२०००) या कथासंग्रहातून पुरुषप्रधान व्यवस्थेतील ढोंग, क्रौर्य, दुःख याचे चित्रण आलेले आहे. प्रतिमा इंगोले यांचे लेक भुईची, हिरवे स्वप्न (१९९४), हजारी बेलपान (१९९४) या कथासंग्रहातून ग्रामीण स्त्री, तिचा सासुरवास, काबाडकष्ट, हालअपेष्टा, नवऱ्याचा धाक यांचे चित्रण येते. विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, वसुंधरा पटवर्धन, ह्या लेखिकांनी स्त्रीवादी दृष्टीने कथालेखन केले आहे.

ज्योत्स्ना देवधर, कमल देसाई यांनी स्त्री जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ज्योत्स्ना देवधर यांनी 'घर गंगेच्या काठी' (१९६७), कल्याणी (१९६९), चुकामुक (१९७०), कुंवरजी (१९७१), पुतळा (१९७६), कमल देसाई यांनी रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग (१९५९), काळासूर्य (१९६८) हॅट घालणारी बाई (१९७०) या कादंबऱ्यातून वसाहतोत्तरकालीन संसाराचे चित्र, मानवी जीवनातील अंतर्मनाचे विश्लेषण केले आहे.

'स्त्री'चा स्वतंत्र माणूस म्हणून विचार वसाहतोत्तर काळात होऊ लागला. तिचे कौटुंबिक स्थान, सामाजिक दर्जा, शोषण याचा स्त्रीवादी भूमिकेतून मल्लिका अमरशेख, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, नीरजा, अश्विनी घोंगडे, शैला सायनाकर यांनी कवितालेखन केले आहे.

## २.४ समारोप

वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभाव या घटकांचा अभ्यास केल्यानंतर १४५० ते १९४५ असा जागतिक वसाहतकालीन कालखंड असल्याचे लक्षात येते. यामध्ये १८०० ते १९४५ या कालखंडात जनतेचे शोषण मोठ्या प्रमाणात झाले. वसाहतीकडे फक्त कच्च्या मालाचे ठिकाण व पक्क्या उत्पादनाच्या विक्रीची बाजारपेठ म्हणून पाहिले गेले. वसाहतीकरणाचा परिणाम आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक घटकावर झाला. वसाहतीकरण करणाऱ्या व वसाहतीकरण झालेल्या दोन्हीही घटकांवर त्यांचे पडसाद दिसले. ग्रामीण अर्थव्यवस्था मोडली. हस्तोद्योग थांबले. आदिवासींचे जंगलाशी असणारे नाते संपले. शेतकरी, कष्टकरी, आदिवासी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आणि संघटना व चळवळी उभ्या राहिल्या. वसाहतवादाच्या प्रभावातून भारतीय विचारवंतानी समाजसुधारणाविषयक लेखन केले. त्यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, राजा राममोहन रॉय, लोकहितवादी भास्कर पांडुरंग तर्खडकर यांचा उल्लेख करता येतो. १८०० ते १९७४ या कालखंडात भाषांतरीत साहित्याची निर्मिती होण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले. लक्ष्मणशास्त्री हळबे, हरि नारायण आपटे, नाथ माधव, बां. स. गडकरी यांच्या साहित्यातून स्त्री शिक्षण, एकत्र कुटुंबपद्धती, केशवपन, बालविवाह प्रतिबंध, पुनर्विवाह यांसारखे विषय हाताळले गेले. १९१६ पासून राजकारणात सक्रीय असणारे आणि सत्याग्रहाचा संघर्षासाठी वापर करणारे महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव अनेक साहित्यिकांच्या साहित्यात दिसून येतो. याच कालखंडात वि. दा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याचा प्रभाव पडत होता. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर समाजजीवन, स्त्रियांची सुधारणा, अस्पृश्यता निवारण, राष्ट्रप्रेम, हिंदूत्व याविषयीच्या विचारांचा आणि वादांचा हा कालखंड होता. या वैचारिकतेतूनच अनेक कथा, कविता, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत.

वसाहतकालीन प्रभाव म्हणजेच ब्रिटिश राजवट असे मोघमपणे म्हणता येईल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिश राजवट संपली असे असले तरी त्या वसाहतकालाचा प्रभाव १९८०-९० पर्यंत जनमानसावर होता. पाश्चिमात्यांच्या वसाहतवादी वर्चस्वामुळे मूळची बहुजन संस्कृती लोप पावत होती. त्यामधून बाहेर पडण्यासाठी शोधलेल्या मार्गातून देशीवाद निर्माण झाला. देशीवादाची मांडणी डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी १९८० मध्ये केली असली तरी देशी, देशीयता याविषयी त्यांनी त्यांच्या कोसला, जरीला, झूल या कादंबऱ्यांतून व 'निरस्तपादपे देशेः श्री. के. क्षीरसागर यांचा वादसंवाद' या त्यांच्या १९६१ साली लिहिलेल्या लेखापासून होते. देशीवादाची परंपरा मर्ढेकरांच्या कवितेत, सानेगुरूजींच्या 'श्यामची आई' मध्येही दाखविता येते.

एतद्देशीय परंपरांचा विचार करताना गौतम बुद्ध, चार्वाक, महावीर, गुरूनानक, चक्रधर, महानुभावीय संप्रदाय, संत परंपरा, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, म. जोतीबा फुले, सत्यशोधक चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या प्रभावातून निर्माण झालेले साहित्य असा एक विस्तीर्ण पट असलेला दिसतो. प्राचीन एतद्देशीय परंपरांचा आढावा घेतल्यांनतर देशी आणि देशीवाद समजणे सोपे होते. देशी असणे हे त्या-त्या भूमीशी जोडलेले असते. नव्या व्यवस्था निर्माण होतात तेव्हा त्यांच्याशी जुळवून घेणे कठीण होते. एकप्रकारे कुचंबणा होते असे वाटते यामधून बाहेर पडण्यासाठी केलेल्या प्रयत्नातून देशीवाद निर्माण झालेला आपणास दिसून येतो. मराठी साहित्यात १९६० नंतर तो मोठ्या प्रमाणात आलेला आहे.

एकंदरीत, वसाहतकालीन व वसाहतोत्तर प्रभावात साहित्य निर्मिती झालेली आहे. बदलत्या काळानुसार साहित्यात त्या-त्या काळातील विविध बाबींचा प्रभाव पडलेला आहे. तो राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच प्रकारचा आहे.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न

### (अ) योग्य पर्याय निवडा.

१. ............ अभ्यासाचा इतिहास शंभर वर्षाचा आहे.

(अ) वसाहतलकालीन (ब) वसाहतवादाचा (क) वसाहतोत्तरवादाचा

२. जेते आणि जीत यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्याचा ............ हे मनोविश्लेषणात्मक विचार करतात.

(अ) गायत्री चक्रवर्ती (ब) होमी भाभा (क) एडवर्ड सईद

३. राष्ट्राच्या संकल्पनेशी निरर्थकता, युरोपीन केंद्राचे सीमांतीकरण, सीमोल्लंघन, मिश्रभाषानिर्मिती, संस्कृतीसंकर आणि कालांतरण ही ............ सिद्धांताची लक्षणे आहेत.

(अ) वसाहतकालीन (ब) वसाहतोत्तरवादी (क) देशीवादी

४. देशीवादात ............ या संकल्पनेला विशेष महत्त्व आहे.

(अ) परंपरा (ब) साहित्य (क) व्यवहार (ड) संस्कृती

५. भालचंद्र नेमाडे यांनी १९८३ साली ............ ही संज्ञा वापरली आहे.

(अ) देशीवाद (ब) देशी (क) देशीयता (ड) वसाहतवाद

६. वसाहतीकरण हे वसाहतीकरण झालेल्यांना ............ तसेच ते वसाहतीकरण करणाऱ्यांनाही कुजवते असे अल्बर्ट मेम्मी यांनी म्हटले आहे.

(अ) मोठे करते (ब) संपविते (क) थांबविते (ड) उद्ध्वस्त करते

७. इंग्रजी शिक्षण घेतलेला एक विशिष्ट वर्ग वसाहतकाळात निर्माण झाला होता. त्यांना ............ कसलीच सहानुभूती नव्हती.

(अ) नोकरांविषयी (ब) शेतकऱ्यांविषयी (क) समाजाविषयी (ड) स्त्रियांविषयी

८. वसाहतकाळात रानडे, गोखले आणि ............ या नेत्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील अखिल भारतीय स्वरूपाचे नेतृत्व संपले.

(अ) जीना (ब) सावरकर (क) टिळक (ड) गांधी

९. गायत्री चक्रवर्ती यांचा भर ............ आहे.

(अ) स्त्रीवादावर (ब) मनोविश्लेषणावर

(क) तौलनिक साहित्यावर (ड) वास्तववादावर

१०. वसाहतोत्तरवादाचा सिद्धांत पहिल्यांदा मांडण्याचे श्रेय ............ यांना दिले जाते.

(अ) होमी भाभा (ब) गायत्री चक्रवर्ती (क) एडवर्ड सईद (ड) स्पीव्हॉक

**उत्तरे : (अ) योग्य पर्याय**

१. (क) वसाहतोत्तरवादाच्या २. (ब) होमी भाभा ३. (ब) वसाहतोत्तरवादी

४. (ड) संस्कृती ५. (अ) देशीवाद ६. (ड) उद्ध्वस्त करते

७. (ब) शेतकऱ्यांविषयी ८. (क) टिळक ९. (अ) स्त्रीवादावर

१०. (क) एडवर्ड सईद

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. वसाहतकालीन स्थिती सांगून वसाहतकालीन साहित्यनिर्मितीची सविस्तर चर्चा करा.

२. देशीवादाची ओळख करून देऊन एतद्देशीय परंपरेचा आढावा घ्या.

**(क) लघुत्तरी प्रश्न**

१. वसाहतोत्तरवादाची संकल्पना स्पष्ट करून वसाहतोत्तरवादी सिद्धांताची चर्चा करा.

२. वसाहतवादाच्या प्रभावातून भारतीय विचारवंतांनी केलेल्या साहित्य निर्मितीची चर्चा करा.

३. वसाहतकालीन प्रभाव आणि वसाहतोत्तर प्रभाव यांच्यातील वेगळेपण स्पष्ट करा.

## २.६ अधिक वाचन : संदर्भ


१. नेमाडे भालचंद्र : टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१.

२. गणोरकर प्रभा व इतर (संपा.) – संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००४.

३. जाधव मनोहर (संपा.) – समीक्षेतील नव्या संकल्पना, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१.

४. खोले विलास (संपा.) – गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००२.

५. बापट वसंत – तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९८१.

६. पाटील आनंद – तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.

७. बाबर अशोक – देशीवाद, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००५.


## २.७ पूरक वाचन


१. भोळे भा. ल. – एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड १ व २), साहित्य अकादमी.

२. भोळे भा. ल. – विसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड १ व २) साहित्य अकादमी.

# घटक – ३
# रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ सुनीत (सॉनेट) , गझल, हायकू

३.२.२ अभंग या रचनाप्रकाराचा आधुनिक कवितेवरील प्रभाव
(म. फुल्यांचे अखंड, माधव ज्युलिअन, गोविंदाग्रज, मर्ढेकर, करंदीकर यांचे अभंग)

३.३ समारोप

३.४ सरावासाठी प्रश्न

३.५ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाद्वारे आपल्याला आधुनिक कालखंडातील मराठी साहित्यावरील प्रभावांच्या अनुरोधाने अभ्यास करावयाचा आहे, त्याअंतर्गत आपल्याला :

१) आधुनिक मराठी कवितेतील विविध प्रभाव अभ्यासायचे आहेत. ज्यामध्ये आधुनिक मराठी कवितेवरील सुनीत, गझल, हायकू या परकीय साहित्यामधून आलेल्या व कालांतराने आधुनिक मराठी कवितेचे अभिन्न अंग बनलेल्या रचनाप्रकारांचा आपल्याला परिचय होणार आहे.

२) कादंबरी या नव्या साहित्यप्रकाराच्या परिचयामुळे आधुनिक मराठी कवितेच्या स्वरूपावर नेमका कोणता प्रभाव पडला ते समजणार आहे.

३) मध्ययुगीन साहित्यातील अभंग या अत्यंत लोकप्रिय रचनाप्रकाराचा आधुनिक कवितेवरील प्रभाव लक्षात येणार आहे.

४) मराठी रंगभूमीवरील लोककला, पारशी रंगभूमी आणि पाश्चात्त्य नाट्यप्रवाहांचा प्रभाव आपण शिकणार आहोत.

## ३.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, या घटकामध्ये आपल्याला मराठी साहित्यावरील विविध रचनाप्रकारांच्या प्रभावाचा अभ्यास करावयाचा आहे. स्थूलमानाने मराठी साहित्याचे प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन असे तीन कालखंड पडतात. अर्वाचीन किंवा आधुनिक कालखंड इ. स. सनाच्या १८ व्या शतकापासून गृहीत धरलेला आहे. कारण १८ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच इंग्रजी सत्तेचा पाया बळकट होऊन तिचा सर्वंकष विस्तार झालेला आपल्याला पहायला मिळतो. या कालखंडात मराठी संस्कृती व पर्यायाने मराठी साहित्य इंग्रजी साहित्याच्या परिशीलनाने प्रभावित झालेले दिसते. मराठी साहित्यप्रकार जसे आधुनिकतेच्या व इंग्रजी संस्कृतीच्या परिणामाने प्रभावित झाले त्याच प्रमाणे काही साहित्य प्रकार इंग्रजपूर्व पारंपरिक साहित्याने सुद्धा प्रभावित झालेले दिसतात. या घटकामध्ये आपण अशाच काही साहित्य प्रकारांचा अभ्यास करणार आहोत. सोनेट किंवा सुनीत हा काव्यप्रकार जरी बाराव्या शतकापासून उदयाला आला असला तरी मराठी साहित्यातील सुनीते सोळाव्या किंवा सतराव्या शतकातील इंग्रजी सुनीतांनी प्रभावित झालेली आहेत. गझल हा काव्यरचना प्रकार अठराव्या शतकातील उर्दूच्या प्रभावातून निर्माण झालेला आहे. तर अभंग ही प्राचीन मराठीतील मुख्य काव्यरचना असली तरी नवकवींना सुद्धा या छंदातून रचना करण्याचा मोह आवरलेला नाही. आधुनिक कालखंडातील कादंबरी सारखा कल्पित गद्य वाङ्मयप्रकार मराठीत रुजल्यानंतर मराठीतील काव्य परंपरेवर पडलेला प्रभाव असो किंवा लोककलांच्या द्वारे जनमानसात रुजलेला नाटकासारखा प्रयोगक्षम साहित्य प्रकार असो, या साहित्याप्रकारांच्या सद्य स्वरूपावरील प्रभावांचा अभ्यास या घटकामध्ये आपण करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

कोणतीही साहित्यकृती ही विवक्षित समाजाची अपत्य असते. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. वस्तूतः कोणत्याही एखाद्या भाषिक समाजात जेव्हा साहित्याची वाढ होत असते, किंवा नवीन साहित्यप्रकार रुजत असतात त्यावेळी त्या त्या भाषिक समाजात उपस्थित असणाऱ्या समकालीन साहित्यप्रवाहांचा, विचारांचा, तत्त्वप्रणालींचा, सामाजिक व राजकीय विचारांचा प्रभाव त्या साहित्यकृतींच्या निर्मितीवर पडलेला असतो. किंबहुना त्याद्वारे काही वेळा संपूर्णतः नवे असे वाङ्मय प्रकार अस्तित्वात येतात. आधुनिक कालखंडात म्हणजेच इ. स. च्या १९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच मराठी साहित्याने आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही पातळ्यांवर अनेक बदल अनुभवले आहेत. इंग्रजी राजवट महाराष्ट्रात स्थिरावत असताना शिक्षण, साहित्य, राजकारण, धर्मचिकित्सा, समाजसुधारणा अशा अनेक गोष्टींमध्ये वसाहतिक मानसिकतेमुळे बदल घडत होते आणि याचा प्रत्यक्ष परिणाम साहित्याच्या स्वरूपावरती होत होता. साहित्यातील प्रत्येक घटक या बदलत्या परिस्थितीच्या प्रभावाखाली येत होता. काव्याच्या बाबतीत इंग्रजी कवितेच्या

आकलनातून सॉनेटसारखा रचनाबंध सुनीताचे रूप घेऊन अवतरत होता. अरबी फारसी भाषेच्या संपर्कातून गझल या काव्यप्रकाराची वैशिष्ट्ये मराठी कवींना खुणावू लागली होती. हायकू हा जपानी भाषेतील निसर्गचित्रण असणारा काव्यप्रकार आपणही हाताळावा व कमीत कमी शब्दात आल्या भावना व्यक्त करण्याची किमया साधते का? ते पहावे असे अनेक कवींना वाटू लागले होते. तर आध्यात्मिक अनुभवांना व्यक्त करणारा अभंगासारखा लोकप्रिय व आकलनसुलभ काव्यप्रकार नवकाव्यातील गुंतागुंतीच्या व संमिश्र भावना व्यक्त करण्यासाठी नवकवितेलाही आपला वाटू लागला होता. आधुनिक नाट्य वाङ्मयाचा प्रारंभ याच कालखंडात झाला आहे. काव्य आणि नाट्य या वाङ्मय प्रकारांवरील प्रभावानुरोधाच्या अनुषंगाने विचार करताना असे जाणवते की केवळ पाश्चात्त्य प्रभावच साहित्यावर पडलेला नाही तर आपल्या परंपरेतील वाङ्मयीन संस्कारांचा प्रभावही या साहित्यावर आहे. मराठी नाटक जसे पारशी रंगभूमीने प्रभावित झाले त्याचप्रमाणे आपल्या लोककलेतील व लोकनाट्यातील प्रभावही आधुनिक कालखंडात टिकून राहिलेला दिसतो.

## ३.२.१ सुनीत (सॉनेट), गझल, हायकू

### ३.२.१.१ सुनीत (सॉनेट)

सुनीत भावकवितेचा एक प्रकार. इंग्रजीतील सॉनेट ह्या काव्यप्रकाराचा सुनीत हा मराठी अवतार आहे. सॉनेट या इंग्रजी काव्यप्रकाराचे मूळ इटालियन सोनेत्तो (छोटे गीत) या गीतप्रकारात असून, हे गीत वाद्यसाथीसह गायले जाते. तेराव्या शतकात इटलीतील सिसिलियन काव्य संप्रदायातील कवींनी हा काव्यप्रकार निर्माण केला. जाकोमो दा लेंतीनो (Giacomo da Lentini / Jacopo da Lentini सु. ११९५-१२४०) हा या काव्यप्रकाराचा जनक मानला जातो. त्याने सुमारे पंचवीस सुनीते रचली व हा काव्यप्रकार सफाईने हाताळून त्याचे तंत्र पूर्णत्वास नेले. चौदाव्या शतकात दान्ते (१२६५-१३२१) व पीत्रार्क (१३०४- ७४) या कवींनी सुनीत या काव्यप्रकाराला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. विशेषतः पीत्रार्कने (Petrarch) सुनीतरचनेचा नवा प्रकार निर्माण करून तो पूर्णत्वाला नेला. त्याच्या Canzoniere या भावगीत-संग्रहात त्याची ३१७ सुनीते आहेत. पीत्रार्कपद्धतीच्या सुनीतरचनेचे अनुकरण मोठ्या प्रमाणात केवळ इटलीतच नव्हे, तर पोर्तुगाल, फ्रान्स, स्पेन, इंग्लंड या देशांतही झाले. सोळाव्या शतकात इंग्रजी काव्यात इटालियन सोनेत्तोचा सॉनेट हा इंग्रजी अवतार मुख्यत्वे सर टॉमस वायट (Sir Thomas Wyatt -1503 - 11 October 1542) आणि अर्ल ऑफ हेन्री हॉवर्ड सरी, (Henry Howard, Earl of Surrey -1516/1517 - 19 January 1547) या दोन कवींच्या प्रयत्नांतून उदयाला आला. पीत्रार्कची इटालियन सुनीते वायटने इंग्रजीत अनुवादिली व हा काव्यप्रकार इंग्रजीत आणला. सरीने इटालियन सुनीताच्या रचनाबंधात काही अंतर्गत बदल करून त्याला इंग्रजी वळण दिले. सरीच्या मृत्यूनंतर सॉंग्ज अँड सॉनेट्स हे त्याच्या गीतांचे व सुनीतांचे संकलन रिचर्ड टॉटल या प्रकाशकाने प्रसिद्ध केले (१५५७); त्यात वायट याचीही काही सुनीते आहेत. टॉटल्स मिसेलनी ह्या नावाने ते विशेष प्रसिद्ध आहे. सरीची नेटकी, नितळ सुनीत रचना इंग्रजी सुनीताच्या विकासात महत्त्वाची ठरली. यातून सुनीतांच्या रचनाबंधाच्या दोन पद्धती विकसित झाल्या. मिल्टन

(१६०८– ७४) आणि शेक्सपिअर (१५६४–१६१६) हे या दोन रचनापद्धतींचे मुख्य पुरस्कर्ते मानले जातात. मिल्टनने इटालियन वा पीत्रार्क रचनापद्धतीचा अवलंब केला; तर शेक्सपिअरने सरीने रूढ केलेला सुनीताचा रचनाबंध वापरून स्वतःची सुनीते लिहिली. शिवाय सुनीत या रचनाबंधाच्या विषयाची व्याप्तीही या दोघा कवींनी वाढवली. त्यामुळे सुनीत हा रचनाबंध पूर्वीच्या सुनीतांप्रमाणे केवळ प्रणयभावनेच्या आविष्कारापुरताच मर्यादित राहिला नाही. उदा. मिल्टनने राजकीय व धार्मिक विषयांवर सुनीते लिहिली. तसेच त्याने स्वतःच्या अंधत्वासारख्या व्यक्तिगत अनुभूतींवरही सुनीते लिहिली, तर जॉन डन (१५७२– १६३१) या इंग्रज कवीने धार्मिक सुनीते लिहिली. उत्तरोत्तर या काव्यप्रकाराच्या विषयांची व्याप्ती वाढतच गेली. काव्यमाध्यमातून व्यक्त होऊ शकणारे जवळजवळ सर्व विषय सुनीतरचनांतून **पाश्चात्त्य** कवींनी हाताळले. भावगर्भ व चिंतनशील, तसेच क्षणिक भावानुभूतींची आणि शाश्वत विषयांचीही अभिव्यक्ती सुनीतरचनेतून होत गेलेली दिसून येते. एकोणिसाव्या शतकातील एलिझाबेथ ब्राउनिंग (१८०६–६१) या कवयित्रीची सुनीते इंग्रजी साहित्यात विशेष प्रसिद्ध आहेत. सॉनेट्स फ्रॉम द पोर्तुगीज (१८४७) या तिच्या सुनीत संग्रहात एकूण ४४ सुनीते अंतर्भूत असून, तिचा पती रॉबर्ट ब्राउनिंग विषयीच्या तिच्या उत्कट प्रेमाची अभिव्यक्ती त्यांत आढळते. डँटी ग्रेबिएल रोसेटी (१८२८– ८२) या इंग्रज कवीची बॅलड्स अँड सॉनेट्स (१८८१) या संग्रहातील सुनीतेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. द हाउस ऑफ लाइफ (१८७६) ही त्याची सुनीतमाला उत्कट प्रणयभावनेच्या आविष्काराच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय रचना मानली जाते. विसाव्या शतकातील या काव्यप्रकाराचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून रायनर मारीआ रिल्के (१८७५–१९२६) या जर्मन भावकवीच्या डी सोनेट आन ओर्फेउस (German <https://en.wikipedia.org/wiki/Germanšlanguage>: Die Sonette an Orpheus 1923); (इं. भा. सॉनेट्स टू ऑर्फीअस, १९४६) The Sonnets to Orpheus या सुनीतसंग्रहाचा निर्देश करता येईल. सारांश, पाश्चात्त्य काव्य वाङ्मयात सुनीत हा एक लोकप्रिय, प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण असा काव्यप्रकार मानला जातो. जवळजवळ पाच शतकांच्या प्रदीर्घ कालखंडातील ज्येष्ठ व प्रमुख पाश्चात्त्य कवींना या काव्यप्रकाराचे आवाहन व आकर्षण सतत खुणावत राहिले आहे.

सुनीत हा चौदा ओळींचा रचनाबंध असतो. त्यासाठी आयँबिक पेंटॅमिटर हे वृत्त इंग्रजीत वापरले जाते. इटालियन वा पीत्रार्क–रचनापद्धतीत ह्या चौदा ओळी आठ व सहा अशा विभागल्या जातात. अष्टकात (ऑक्टेव्ह) दोन चतुष्पद्या व नंतरच्या सहा ओळींत (सेस्टेट) दोन त्रिपद्या असतात. पहिल्या आठ ओळींत एखादी समस्या मांडली जाते; एखादा प्रश्न उपस्थित केला जातो; किंवा कसला तरी भावनिक ताण प्रकट केला जातो. नंतरच्या सहा ओळींत त्या समस्येची सोडवणूक केली जाते. प्रश्नाचे उत्तर दिले जाते वा भावनिक ताण सैल केला जातो. ह्याला कलाटणी (टर्न) म्हणतात. सुनीतामध्ये यमकांचाही विशिष्ट पद्धतीचा क्रम असतो. इटालियन रचनापद्धतीत हा क्रम पहिल्या आठ ओळींसाठी अ ब ब अ अ ब ब अ (र ल ल र र ल ल र) आणि नंतरच्या सहा ओळींसाठी क ड इ क ड इ, क ड क क ड क किंवा क ड इ ड क इ (ल व श ल व श, ल व ल ल व ल, ल व श व ल श) असा असतो. शेक्सपिअर वा अन्य इंग्रजी पद्धतीच्या सुनीतरचनेत सुनीतामधल्या चौदा ओळींची विभागणी बारा व दोन अशी असते. पहिल्या बारा ओळींत ज्या विचाराचा,

भावनेचा वा कल्पनेचा परिपोष करीत आणला असेल, त्याला शेवटच्या दोन ओळींत कलाटणी दिली जाते. शेक्सपिअर पद्धतीच्या सुनीतरचनेत यमकांचा क्रम अ ब अ ब क ड क ड इ फ इ फ ग ग (र ल र ल ल व ल व श ष श ष स स) असा असतो.

सुनीताच्या १४ ओळींची विभागणी कशीही असली, तरी अर्थदृष्ट्या सुनीताचे दोन भाग सघन वा भरीव असतात. सुनीताचे अर्थदृष्ट्या महत्त्व ह्या घनतेमध्ये वा गांभीर्यामध्ये असते.

मराठी सुनीतरचनेचा पाया केशवसुतांनी (१८६६-१९०५) घातला. त्यांनी चौदा ओळींच्या ह्या रचनाप्रकाराला चतुर्दशक असे नाव दिले. 'मयूरासन आणि ताजमहाल' हे त्यांचे पहिले स्वतंत्र सुनीत (१८९२) होय.

उदा.

कामे दोन सुरेस त्या नृपवरे केली : मयूरासनी
ज्या तो बैसुनी शोभला, प्रथम ते-सा कोटि ज्या लागले,
राजे ज्यापुढते जुळुनि अपुल्या हस्तद्वया वाकले,
झाले कंपित, तत्करी शीर असे येऊनिया हे मनी
प्रेमे मंदिरही तसे निजसखीसाठी त्ये लावुनी
कोटी तीनच त्या गभीर यमुनातीरावरी बांधिले,
चोरे आसन त्या दुरी पळविले, स्मर्तव्य की जाहले !
आहे अद्भुत तो महाल तेथे उभा राहुनी !

केशवसुतांनीच इंग्रजी सोनेटचा मराठी अवतार घडवून आणला ही गोष्ट आता मान्य झाली आहे. या दृष्टीने त्यांचे बरेच दिवस प्रयत्न चालले होते. इंग्रजी सुनितांची भाषांतरे करणे हा त्यातील एक भाग झाला. त्यात शेक्सपिअरची तीन, ड्रमंडची दोन, मिसेस ब्राउनिंगचे एक, अशी सुनीते व लिलीची सुनीतसदृश्य अशी एक अशा काही कविता येतात. भाषांतरे करताना त्यांनी रचनेचे काही प्रयोग करून पाहिले. कित्येक सुनीतांतून शेवटल्या द्विपदीला त्या कवितेतच पण स्वतंत्र स्थान असते. ते व्यक्त करण्याकरिता शार्दूलविक्रीडिताच्या तीन श्लोकांतील बारा ओळींनंतर एक इंद्रवशेचा श्लोक कामान्धत्व या शेक्सपिअरच्या सुनीताच्या भाषांतरात घालून पाहिला, ड्रमंडच्या एका सुनीताच्या अनुवादात उपजातीचा श्लोक घालून पाहिला, व दुसऱ्या सुनीतानुवादात अनुष्टुभ छंदाचा श्लोक घातला. त्यामुळे अपेक्षित परिणाम न साधल्यामुळे तसेच गांभीर्य व लांबी या दृष्टीने त्यांनी शार्दूलविक्रीडिताचा चरण वापरला. मिसेस ब्राऊनिंगच्या सुनीताकरिता केशवकरणी या अधिक गेय वृत्ताचाही उपयोग करून पाहिला. कवी भा. रा. तांबे (१८७४-१९४१) यांनीही काही सुनीते लिहिली. गोविंदाग्रज, बालकवी आणि बी ह्या कवींनीही काही सुनीतरचना केल्या. मात्र सुनीताचा विशेष पुरस्कार आणि निर्मिती रविकिरण मंडळातील कवींनी केली. रविकिरण मंडळातील एक प्रमुख कवी माधव जूलियन (१८९४-१९३९) यांची १०१ सुनीते त्यांच्या तुटलेले दुवे (१९३८) या संग्रहात एकत्रित केलेली आहेत. उदा.

होशी यौवनमत्त मूर्ख तरुणा, होऊल दुर्लौकिक
याची भीति न तूज, त्यांत ऊलटा वाटे तुला गौरव.
केव्हा लोकमतास भीत पुजुनी हातीं न ये ध्येय तें
देशी यास्तव तू झुगारुनि तया आधीच वार्यावर.

१९४० नंतर सुनीतरचनेचे प्रमाण मराठी काव्यात कमी होत गेले.

सुनीतासाठी मराठीत शार्दूलविक्रीडित हेच वृत्त अधिक प्रचलित होते. ह्या वृत्ताचा वापर सुनीतलेखनासाठी मराठीमध्ये सर्वाधिक केला गेला. सॉनेटला प्रतिशब्द म्हणून सुनीत हा शब्द रविकिरण मंडळातील श्री. बा. रानडे व माधव ज्यूलियन या कवींनी रुढ केला. त्याआधी श्री. नी. चापेकर यांनी त्यासाठी स्वनितक असा शब्द सुचविला होता. त्याचप्रमाणे चतुर्दशपदी, गीतिका, स्वनित ही नावेही सुनीतरचनेसाठी सुचविली गेली; परंतु सुनीत हा शब्द सॉनेट ह्या शब्दाशी नाददृष्ट्या जास्त जवळचा आणि सुनीतामधील विशिष्ट सुविहित अर्थरचना व्यक्त करणारा म्हणून, तसेच सुनीतांची विपुल रचना करणाऱ्या रविकिरण मंडळाच्या पुरस्कारामुळे रुढ झाला असावा.

शेक्सपिअर पद्धतीच्या सुनीतरचनेत बारा व दोन अशी १४ ओळींची जी अर्थदृष्ट्या विभागणी होत असे. तीत पहिल्या बारा ओळींत ज्या विचाराचा परिपोष करीत आणला असेल, त्याला शेवटच्या दोन ओळींत कलाटणी देणे कठीण होते. ती परिणामकारक व्हायची, तर विशेष चमत्कृती वा विरोध आणणे आवश्यक असते. हे अनेक वेळा अशक्य होत असल्याने पहिल्या बारा ओळींतील अर्थाचेच पुनर्वचन विशेष आकर्षक अशा सूत्रीने करावे लागते. उदा. केशवसुतांचे 'आम्ही कोण' हे सुप्रसिद्ध सुनीत. त्यात पहिल्या भागात कवींची थोरवी सांगितल्यानंतर शेवटच्या दोन ओळींत तोच विचार अधिक प्रभावीपणे आणि अभिनिवेशाने मांडला आहे :

आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे।
आम्हाला वगळा-विकेल कवडीमोलावरी हे जिणे।।

१९६० च्या सुमारास मराठी नवकवितेत विंदा करंदीकर यांनी मुक्तसुनीते लिहून या काव्यप्रकारात प्रयोगशीलता व नावीन्य आणले. त्यांनी तेरा व पंधरा ओळींची सुनीतरचना केली; शिवाय त्यात वृत्त व यमकातील संगतीही पाळली नाही. मुक्तछंदातील स्वातंत्र्य व पसरटपणाला आवर घालणारी बंदिस्त रचना ही या मुक्त सुनीतांची वैशिष्ट्ये होत. त्यांनी 'आज प्रार्थना प्राणाऐवजी' हे तेरा ओळींचे तर 'हिमालयाएवढ्या मातीच्या ढिगावर' हे पंधरा ओळींचे सुनीत लिहिले.

उदा. हिमालयाएवढ्या मातीच्या ढिगावर हिंदी महासागराइतकें
रक्त ओतलेत तरी नाही उगवणार चिमूटभर हिरवें गवत,
असें म्हणणारा एक भ्रमिष्ट राहातो मुंबईमध्ये एका आडगल्लीत.
त्या गल्लीतली कुत्री भुंकली तरी तो थरकांपतो अनामिक भीतीनें,
जातो लघवीला. भ्रमिष्ट म्हणण्यापेक्षा भ्याडच म्हणा त्याला.

सुनीत या काव्यप्रकाराचा मूळ गाभा कायम ठेवून केलेला प्रयोगशील रचनात्मक विस्तार असे या मुक्त सुनीतांचे स्वरूप होते. दिलीप चित्रे यांनीही काही मुक्त सुनीते लिहिली. पुढे विलास सारंग यांनी प्रति-सुनीते लिहून प्रयोगशीलतेची आणखी एक दिशा सूचित केली.

### ३.२.१.२ गझल

गझल या शब्दाचे मूळ रूप हे अरबी असले, तरी गझल या काव्यप्रकाराचे जन्मस्थान मात्र अरबस्तान नाही, तर इराण हे आहे. अरबांनी सातव्या शतकात इराण जिंकल्यावर 'खम्रीयात' ह्या अरबी मद्यगीताचे व 'कसिदा' ह्या फारसी स्तुतीकाव्याचे इराणीमध्ये एकत्रीकरण केले व त्यातून तेथील फारसी भाषेत गझल हा नवीनच काव्यप्रकार नवव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्मास आला. भारतात मुसलमानांचे व त्यापाठोपाठ सूफी साधू संतांचे आगमन झाले आणि त्यांच्या बरोबरीनेच गझल या फारसी भाषेतील काव्यप्रकाराचेही बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आगमन झाले. फारसीतील गझलेच्या वाढत्या प्रभावामुळे बाल्यावस्थेत असणाऱ्या उर्दू भाषेतही सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात गझलेने प्रवेश केला आणि अल्पावधीतच ती उर्दूची सम्राज्ञीही बनली. मराठीतील अगदी सुरुवातीचे गझलकार म्हणून अमृतराय व मोरोपंत यांच्याकडे पाहिले जाते. 'जगव्यापका हरीला नाही कसे म्हणावे ?' ही अमृतरायांची गझल मराठीतील पहिली उपलब्ध गझल होय. इ.स. १७२९ च्या आसपासची ही गझल मराठी गझलेचा आरंभबिंदू मानली पाहिजे असे अविनाश कांबळे आपल्या 'गझलरंग' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात. अमृतरायांनंतर मोरोपंतांच्या नावावर 'रसने! न राघवाच्या थोडी यशांत गोडी' व 'हृदया ! बरें विचारी नाम स्मरें, न तापें' ह्या दोन गझला आढळतात. यावरून अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठीतील गझलेचे आगमन हे झाले असे म्हणता येते.

गझल या काव्यप्रकाराची मराठीतील वाटचाल पाहण्यापूर्वी गझल या काव्यप्रकाराची वैशिष्ट्ये समजावून घेऊ. -

गझल हा एक तंत्रानुसारी काव्यप्रकार आहे. प्रत्येक काव्यप्रकाराचे स्वतःचे म्हणून एक तंत्र असते. हे तंत्र कृत्रिमपणा, निर्जीवपणा येऊ न देता हाताळणे महत्त्वाचे असते. काही काव्याप्रकारांचे तंत्र लवचीक व बदलते असते. अशा काव्यात प्रयोगशीलतेला अधिक वाव असतो. काही काव्यप्रकारातील तंत्रे मात्र न बदलणारी व ताठर स्वरुपाची असतात, साहजिकच तेथे प्रयोगशीलतेला कमी वाव असतो. शिवाय प्रयोगशीलतेचा वापर करताना फार सावधगिरी बाळगावी लागते. कारण अशा काव्यप्रकाराचे सौंदर्य व

सामर्थ्य हे बरेचसे त्याच्या तंत्रावरच अवलंबून असते. गझल तंत्रामध्ये प्रामुख्याने वृत्त, द्विपदी व एकयमकीपणा ह्यांच्या विशिष्टत्वाचा विचार केंद्रस्थानी आहे.

**गझलची व्याख्या :**

गझल या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ सुखन अज माशूक गुफ्तन अथवा महबूबासे बातें करना – म्हणजे प्रेयसीसमवेत प्रेमाच्या गुजगोष्टी करणे – असा दिलेला आढळतो. परंतु ग़ज़लेचे स्वरूप पाहता कोणतीही गझल अशी संभाषणाच्या स्वरूपात रचलेली आढळत नाही.

पर्शियन भाषेतील ग़ज़ाल या शब्दाचा अर्थ हरीण असा आहे. इंग्रजी भाषेतही याच शब्दावरून गॅझेल (Gazel) हा शब्द प्रचलित झाला आहे. हरणाच्या पाडसाला ग़ज़ाला म्हणतात. हरीण या शब्दातच हालचालीतील लालित्य आणि मूर्तिमंत नाजूक सौंदर्य ही कल्पना अभिप्रेत असल्यामुळेच कदाचित अत्यंत नाजूक हळव्या भावनांचा आविष्कार करणाऱ्या या काव्यप्रकाराला गझल हे नाव दिले गेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

विसाव्या शतकातील एक श्रेष्ठ शायर डॉ. रघुपती सहाय फ़िराक़ गोरखपुरी यांच्या लिखाणात आढळणारी अत्यंत हृदयंगम कल्पना पर्शियन भाषेतील सर्वात जुना शब्दकोश सिराजुल-लुगत (सिराज यांचा शब्दकोश, तेरावे शतक) या ग्रंथात आढळते. पारधी मागे लागल्यामुळे प्राण वाचवण्यासाठी हरीण रानात सैरावैरा धावत सुटते. पळता पळता दुर्दैवाने त्याची शिंगे झाडांच्या फांद्यांमध्ये अडकतात. अशा अवस्थेत ते बिचारे मोठ्या कष्टाने तिरकी नजर करून मागे पाहते, तो पारधी अगदी जवळ येऊन ठेपलेला असतो. आता साक्षात मृत्यूच डोळ्यांसमोर दिसत असताना त्या असहाय हरणाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागतात. त्या अश्रूंना जर शब्दरूप लाभले, किंवा त्या ग़ज़ालाच्या मुखातून काही आर्तवाणी उमटली, तर ते उद्‌गार म्हणजेच ग़ज़ल.

गजल हे एक वृत्तबद्ध काव्य आहे. त्यात बेशिस्तपणे लिहिणे अमान्य आहे. गजलेतील प्रत्येक शेरातील प्रत्येक ओळीच्या मात्रा समानच असतात. गजल गणवृत्तात अथवा मात्रावृत्तात रचली जाते.

वृत्ताचे तीन प्रकार पडतात.

१. प्रत्येक ओळीतील शब्दांच्या एकूण मात्रा जर समान भरत असतील तर ते लिखाण वृत्तबद्ध आहे. – मात्रावृत्त !

२. प्रत्येक ओळीतील लघू व गुरू अक्षरांचा क्रम समान आहे ते वृत्तबद्ध लिखाण आहे. – गणवृत्त !

३. प्रत्येक ओळीतील अक्षरांची संख्या जर समान असेल तर ते अक्षरछंदातील लिखाण आहे. – अक्षरछंद !

गज़ल अक्षरछंदात लिहिली जात नाही.

जेव्हा आपण गज़लेच्या प्रत्येक ओळीत लघू व गुरू अक्षरे ठरावीक क्रमानेच लिहितो तेव्हा आपोआपच प्रत्येक ओळीच्या मात्रा समान भरतात. याला अक्षरगणवृत्त किंवा केवळ गणवृत्त असे म्हणतात. अशा वृत्ताचा वापर केल्यास मात्रा मोजत बसाव्या लागत नाहीत. परंतु काही वेळा गज़ल अक्षरगणवृत्तात न लिहूनही तिच्या प्रत्येक ओळीच्या मात्रा समान भरतात. म्हणजे, लघू व गुरू अक्षरांचा क्रम ओळीओळीत वेगवेगळा घेऊनही प्रत्येक ओळीच्या मात्रा समान असू शकतात. त्याला मात्रावृत्त असे म्हणतात.

एकंदर :

१. गज़लेतील प्रत्येक ओळीच्या मात्रा समान आल्याच पाहिजेत.

२. गज़ल कधीही अक्षरछंदात लिहिली जात नाही. गज़लेतील ओळीतील अक्षरांची संख्या महत्त्वाची नाही.

३. अक्षरगणवृत्तात गज़ल लिहिल्यास आपोआप सर्व ओळीतील मात्रा समान येतातच.

४. मात्रावृत्तात गज़ल लिहिल्यास अक्षरांचा क्रम जरी ओळी-ओळीत वेगवेगळा आला तरी मात्रांची संख्या समानच असायला हवी.

गज़ल कधीही वृत्ताबाहेर (गणवृत्ताबाहेर किंवा मात्रावृत्ताबाहेर ) लिहिली जाऊ शकत नाही. असमान मात्रा असलेल्या ओळी किंवा अक्षरगणवृत्तातील लघू-गुरू अक्षरांचा क्रम न पाळणारी गज़ल ही गज़ल नसते.

गझल साठी वापरली जाणारी वृत्ते - वर्षानुवर्षे कवी अनेक वृत्ते सातत्याने उपयोजत आले आहेत. वृत्त म्हणजे लघू व गुरू अक्षरांनी ठरावीक क्रमाने एखाद्या ओळीत येणे. आपण लघू अक्षरासाठी ल हे अक्षर तर गुरू अक्षरासाठी गा हे अक्षर घेऊ. सर्वप्रथम आपण गज़लकारांकडून वारंवार वापरले जाणारे व अतिशय सोपे असे आनंदकंद वृत्त तपासू :

वर म्हंटलेच आहे की लघू अक्षरासाठी ल तर गुरू अक्षरासाठी गा हे अक्षर आपण गृहीत धरणार आहोत.

आनंदकंद मधे ल व गा या अक्षरांचा क्रम खालीलप्रमाणे येतो. (क्रमाखाली अनुक्रमे अक्षरांच्या मात्रा व एक उदाहरणादाखल ओळही लिहिलेली आहे.)

गा गा ल गा ल गा गा .... गा गा ल गा ल गा गा

२ २ १ २ १ २ २ २ २ १ २ १ २ २ = २४ मात्रा

का ही त री च तू ही हो ते स पा व सा ने =

(काहीतरीच तूही होतेस पावसाने)

वृत्त – मंजुघोषा

गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा

पा हि जे हो ते कु णी रा गा व णा रे

२ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २= २१ मात्रा

वृत्त – कालगंगा

गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा

व्य क्त व्हा वे वा ट ले की ले ख णी स र सा व ते

२ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ १ २ = २६ मात्रा

वृत्त – व्योमगंगा

गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा

आ ठ वा वा का ळ ते व्हा पा सु नी मी मी च आ हे

२ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ = २८ मात्रा

वृत्त – वियद्गंगा

ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा

कु णा ला हे ह वे आ हे कु णा ला ते ह वे आ हे

१ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ = २८ मात्रा

वृत्त – मंदाकिनी

गा गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा

ते वा ग णे सा धे सु धे ते बो ल णे गो डा त ले

२ २ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ १ २ = २८ मात्रा

वृत्त – मृगाक्षी

ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा

म ला वा टा य चे ये शी ल सु द्धा

१ २ २ २ १ २ २ २ १ २ २ = १९ मात्रा

वृत्त - भुजंगप्रयास

ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा गा

कु णा चे भ ले व्हा य चे को ण जा णे

१ २ २ १ २ २ १ २ २ १ २ २ = २० मात्रा

वृत्त - सती जलौघवेगा

ल गा ल गा गा ल गा ल गा गा ल गा ल गा गा

कु णी च के ले न से ल ते मी क रू न जा वे

१ २ १ २ २ १ २ १ २ २ १ २ १ २ २= २४ मात्रा

वृत्त - हिरण्यकेशी

ल गा ल गा गा ल गा ल गा गा ल गा ल गा गा ल गा ल गा गा

ख रे च आ हे ति चे ति ने ही ब रे च के ले ति च्या प री ने

१ २ १ २ २ १ २ १ २ २ १ २ १ २ २ १ २ १ २ २ = ३२ मात्रा

वृत्त - राधा

गा ल गा गा गा ल गा गा गा ल गा गा गा

का य हो ते का य झा ले आ प ले ना ते

२ १ २ २ २ १ २ २ २ १ २ २ २ = २३ मात्रा

वृत्त - साशंक

गा गा ल ल गा गा गा .... गा गा ल ल गा गा गा

का ही द श के त्या चे....... पा ल्हा ळ क शा सा ठी

२ २ १ १ २ २ २ .... २ २ १ १ २ २ २ = २४ मात्रा

वृत्त - सुमंदारमाला

ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा गा ल गा

कु ठे ती कु ठे मी कु ठे तो ज मा ना कु णा ला अ ता हा क मा रा य ची

१ २ २ १ २ २ १ २ २ १ २ २ १ २ २ १ २ २ १ २ २ १ २

याखेरीज स्रग्विणी, लज्जिता, विधाता, मालिबाला, पादाकुलक, कलिंदनंदिनी, चामर व भामिनी यासारखी वृत्ते गझल लेखनात वापरली जातात.

मराठीत पटवर्धनांनी गझलला जातीवृत्त दिले. पण मूळ उर्दू गजलांमध्ये अक्षरगणांनासुद्धा महत्त्व आहे. त्यामुळे गझल ही अक्षरवृतात योग्य की जातीवृत्तात? हा प्रश्न निर्माण होतो. आजची मराठी गझल ही दोन्ही बंधने न मानता ती केवळ मात्रा मानते. मान्यवर गझलकारांनी समान अक्षरसंख्या व समान मात्रासंख्या मानून गझलरचना केली आहे. उदाहरणार्थ–

माझ्या हृदयात तूच राणी
नाही घडणार बेइमानी
ठेवू किती दीस गूज चित्ती
ये आज अखेर आणीबाणी

– माधव ज्यूलियन

या गझलमध्ये प्रत्येक चरणात १० अक्षरे असून त्यांची मात्रासंख्या १६ आहे.

गेलो निघून दूर पुन्हा आढळेल कां?
माझा कराल शोध परी सांपडेल कां?
झाला किती उशीर ...किती लोटली युगे
आता मला स्मराल परी मी असेन कां?

– सुरेश भट

येथे १४ अक्षरसंख्या असून मात्रासंख्या २२ आहे.

भिऊनी चाललो तुझ्यासंगे
पिऊनी चाललो तुझ्यासंगे
भवती घोष हिंस्त्र चक्रांचे
दबुनी चाललो तुझ्यासंगे

– मंगेश पाडगावकर

येथे अक्षरसंख्या १० असून मात्रासंख्या १६ आहे.

डोळ्यात पाहतो मी, आरास चांदण्यांची
देहास होय भारी, आरास बांधण्याची
कांती तवंग प्याली, आरक्त कोंदणाची
कां पाकळी फुलांची, फुलपंख पापण्यांची

– संजीव

येथे अक्षरसंख्या १४ असून मात्रासंख्या २४ आहे.

या गझलांकडे  पाहिले की दिसून येते की, या कवींनी समान अक्षरसंख्या व समान मात्रासंख्या हे बंधन पाळले आहे. एवढेच नव्हे तर अक्षरांचा लगक्रमही सांभाळला आहे, म्हणजे अक्षरांचे लघुगुरू एकाच क्रमाने आले आहेत. त्याचबरोबर अक्षरे व मात्रा यांचा खंडही पाडून त्या चरणामध्ये एक प्रकारचा क्रम सांभाळला आहे.

वृत्ते म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून लघू व गुरू अक्षरांचा ठरावीक क्रम आहे. वृत्ते आपली आपणही बनवता येतात. मात्र, शक्यतो शेवटी गुरू अक्षर असलेली वृत्ते व अर्थातच लयीत / ठेक्यात उच्चारता येणारी वृत्ते चांगली वाटतात. हजारो वृत्तांची माहिती माधवराव पटवर्धनांनी त्यांच्या छंदोरचना या जाडजूड पुस्तकात दिलेली आहे. त्यात आठ वेळा लघू व नंतर दोन गुरू वगैरे अशा स्वरुपाची वृत्ते व त्यांतील कवितांची उदाहरणेही आहेत. मात्र, अशी वृत्ते गज़लेत वापरायला अवघड पडतात. याचे कारण आठ वेळा लघू अक्षरे एकामागोमाग घेणे हे गज़लेसारख्या काव्यप्रकारासाठी दुष्कर आहे.

**गज़लतंत्र**

गज़ल ही अनेक स्वतंत्र, मात्र किमान पाच, दोन दोन ओळींच्या कवितांची एक गज़लतंत्रातील मालिका असते, ज्यात आशय हा जीवनानुभूतींवर अवलंबून असतो.

द्विपदी किंवा शेर – शेर म्हणजे दोन ओळी. गज़लेतील कुठल्याही (एकाच शेराच्या) दोन ओळी गज़लेतून बाहेर काढून लिहिल्या व एखाद्याला वाचायला सांगितल्या तर त्याला त्यातून पूर्ण अर्थ उमगायलाच हवा. या दोन ओळींचा अर्थ अजिबात इतर दोन ओळींवर अवलंबून असलेला नसावा. गज़लेतील प्रत्येक शेर हा आशयाबाबत पूर्ण स्वतंत्रच असला पाहिजे. गज़लेतील प्रत्येक द्विपदी ही एक संपूर्ण व स्वतंत्र कविता असते. शेरातील पहिल्या ओळीला उर्दूमधे 'उला मिसरा' तर दुसऱ्या ओळीला 'सानी मिसरा' म्हणतात. मिसरा म्हणजे ओळीसाठी असलेला उर्दू शब्द. मराठीत ओळ म्हणता येते.

**मतला –** गज़लेच्या पहिल्या द्विपदीस उर्दूमधे 'मतला' असे म्हणतात. मराठीतही तसेच म्हणायला काही हरकत नसावी. मतला हा शेर गज़लेतील इतर सर्व शेरांहून एकाच बाबतीत वेगळा असतो. मतल्याच्या

दोन्ही ओळींमध्ये काफ़िया व रदीफ़ येतात. पुढच्या प्रत्येक शेराच्या फ़क्त दुसऱ्याच ओळीमधे ते आले तरी चालतात. पुढच्या प्रत्येक शेराच्या प्रत्येक ओळीमध्ये आले तरीही चालू शकतात. मात्र मतल्यात दोन्ही ओळीत यावेच लागतात तसे इतर शेरांमधे प्रत्येक ओळीत यावेच लागतात असे नाही.

**रदीफ़ –** रदीफ़ या शब्दाला मराठीत अंत्ययमक असे म्हणतात. गज़लेत काफ़िया व रदीफ़ अशी दोन यमके असू शकतात. त्यातील काफ़िया अपरिहार्य असून त्याला यमक असे म्हणतात तर रदीफ़ ला अंत्ययमक असे म्हणतात. रदीफ़ या शब्दाचा अर्थ आहे उंटावरील स्वाराच्या मागे बसलेली स्त्री. एखादा स्वार अविवाहित असला तरी उंटावर एकटा बसू शकतो. पण स्वाराशिवाय स्त्री एकटीच उंटावर बसत नाही. रदीफ़ म्हणजे गज़लेतील मतल्याच्या प्रत्येक ओळीच्या शेवटी व त्यानंतरच्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीच्या शेवटी येणारे अक्षर / शब्द / शब्दसमूह.

रदीफ़ नसलेल्या गज़लेला गैरमुर्रद्दफ़ गज़ल असे म्हणतात. रदीफ़ असलेल्या व रदीफ़ नसलेल्या दोन्ही गज़ला तितक्याच महत्त्वाच्या असतात. रदीफ़वर दर्जा अवलंबून नसतो.

**काफ़िया –** रदीफ़ असलेल्या गज़लेच्या मतल्यात दोन्ही ओळीत रदीफ़च्या आधी येणारा व पुढील शेरांमध्ये दुसऱ्या ओळीत रदीफ़च्या आधी येणारा सुटा शब्द , ज्यातील शेवटचे किमान एक अक्षर समान असून त्या आधीची अक्षरे भिन्न असतात, म्हणजे काफ़िया. ज्या गज़लेला रदीफ़ नाही त्या गज़लेतील मतल्याच्या दोन्ही ओळींच्या शेवटी येणारा सुटा शब्द , ज्यातील शेवटचे किमान एक अक्षर समान असून त्या आधीची अक्षरे भिन्न असतात, जो पुढील प्रत्येक शेरातील दुसऱ्या ओळीत येतोच तो काफ़िया!

काफ़िया हा गज़लेतील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. काफ़िया नसेल तर गज़ल ही रचना गज़लच ठरू शकत नाही. काफ़ियाची उदाहरणे –

जसे : आधार, बाजार, ठार, वार, बेजार, धार – यात आर हा उच्चार समान आहे.

तसेच : वादळ, जळ, काजळ, मळ, हळहळ – यातील अळ हा उच्चार समान आहे.

**अलामत** : काफ़ियातील शेवटून समान असलेल्या अक्षरांआधी जे अक्षर येते त्याचा स्वर म्हणजे अलामत!

**मुसलसल आणि गैरमुसलसल गझल** : पूर्वीच्या काळी गझलचे सर्व शेर एकाच विषयावरचे असायचे. नंतर नंतर मूळ विषयाशी फटकून वागणा-या शेरांची संख्या गझलमध्ये वाढत गेली. अशा गझलांची संख्या एवढी वाढली की शेवटी व्याख्येला बदलावे लागले. गझलमध्ये प्रत्येक शेरचा संबंध अगोदरच्या वा नंतरच्या शेरांशी असतोच असे नाही (म्हणजेच असूही शकतो) – अशी सकारात्मक व्याख्या, नंतर मात्र प्रत्येक शेर स्वतंत्रच असला पाहिजे, त्यांचा एकमेकांशी संबंध असता कामा नये अशी संपूर्ण नकारात्मक झाली. एकाच विषयावर सर्व शेर असलेल्या गझलला मुसलसल गझल आणि विषय-वैविध्य असलेल्या गझलला गैरमुसलसल गझल असे म्हणतात.

**गझलची मराठीतील वाटचाल –**

इ.स. सन १७२९ च्या सुमारास अमृतरायांच्या 'जगव्यापका हरीला नाहीं कसे म्हणावे ?' ह्या पदाच्या रूपाने गझलेचे मराठीत आगमन झाल्या पासून आता अडीचशेहून जास्त वर्षे तिची मराठीतील वाटचाल चालू आहे. या वाटचालीत काही ठळक टप्पे दिसून येतात. इ.स. १७२९ ते १८०० हा पहिला टप्पा मानला तर अमृतराय यांची एक व मोरोपंतांच्या दोन अशा केवळ तीनच गझला या टप्प्यात दिसतात. मुळात अमृतराय व मोरोपंत यांनी गझला लिहिल्या आहेत हे सत्यच १९२० पर्यंत कोणाला माहीत नव्हते. माधव ज्यूलियन यांनी या गझला त्यांच्यातील दोषांसह लोकांपुढे आणल्या.

१८०० ते १९२० या टप्प्यावर संख्यात्मक आणि गुणात्मक ह्या दोन्ही दृष्टीने अत्यंत नगण्य अशी गझल दिसते. एकयमकीपणा व गझलवृत्त असे एखाददुसरे लक्षण तिच्यात आढळते. संतकवी माणिकप्रभू यांच्या पदरचनेत एकयमकीपणा सांभाळणारी एकूण अठरा पदे आढळतात. १८७० ते १९२० या कालखंडात म.मो.कुंटे, केशवसुत, बालकवी, रे. ना.वा.टिळक व भा.रा. तांबे या पाच प्रमुख कवींनी आपल्या काही कविता भुजंगप्रयात, पंचचामर, वियद्गंगा व विबुधप्रिया अशा गझलवृत्तांमधून रचलेल्या दिसतात. या कालखंडातील काव्यवाङ्मयात गझल नगण्य असली तरी संगीत नाटके व राष्ट्रीय मेळे या तत्कालीन लोकप्रिय कला प्रकारांमध्ये मात्र ती अधिक प्रमाणात दिसते. अण्णासाहेब किर्लोस्कर , गो.ब. देवल, वा.ना. डोंगरे, माधवराव पाटणकर, श्री. कृ . कोल्हटकर, शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, वि.सी. गुर्जर आणि रा. ग. गडकरी या नाटककारांच्या संगीत नाटकांमधून गझल आढळून येते.

इ.स. सन १९२० ते १९४० हा मराठी गझलेचा टप्पा रविकिरण मंडळाच्या नावाने ओळखला जातो. रविकिरण मंडळातील माधव ज्यूलियन, गिरीश व यशवंत या तीन प्रमुख कवींनी हा काव्यप्रकार विपुल प्रमाणात हाताळलेला आहे. माधव ज्यूलियन हे स्वतः अरबी, फारसी या भाषांचे पंडित असल्याने त्या भाषांमधील गझलेचा त्यांना दीर्घ काळापासून परिचय होता. गझलेचे तंत्र त्यांना पूर्णपणे ज्ञात होते. त्यामुळे पुढे गझलेची जी काही बरी- वाईट वाटचाल झाली तिला बऱ्याच अंशी माधव ज्यूलिअन कारणीभूत आहेत. १९२० पूर्वीच्या मराठी गझलेच्या उणिवा लक्षात आल्याने त्या दूर करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन इ.स.सन १९१९-२० पासून माधव ज्यूलिअन गझलरचना व गझलपुरस्कार करू लागले. परंतु माधव ज्यूलियन यांनी भावकविता व गझल ह्यांच्यामधील साम्य भेद लक्षात न घेता दोहोंना एकच मानले व नेहमीच्या भावकवितेच्या दृष्टीने गझलेचे मूल्यमापन केले. त्यामुळे त्यांना एका द्विपदीचा दुसऱ्या द्विपदिशी संबंध नसणे व एकयमकीपणा ह्या गझलेच्या प्राणभूत बाबीच दोषार्ह म्हणून त्या त्यांनी स्वतःच्या गझलरचनेत कधी स्वीकारल्या, तर कधी नाकारल्या. धरसोडीचे हे धोरण त्यांनी इतर कवींनाही अवलंबण्यास जाहीरपणे सांगितले. गझलेच्या मूळ तंत्रासंदर्भात त्यांची ह्या धरसोडीच्या भूमिकेमुळे त्यांची स्वतःची बरीचशी गझल ही तंत्रशुद्ध न होता केवळ अरबी फारसी वृत्तातील नेहमीची भावकविताच होऊ शकली. उदा.

जीव तुझा लोभला माझ्यावरी रे शोभना
या ऋणाची विस्मृती ती ना कधी होवो मना !
का मुळी कोणी करावे प्रेम एखाद्यावरी ?
हे तुझे सौजन्य, पाणी आणिते या लोचना
शक्तिच्या राज्यांत सक्ती शोभते, शोभो तिथे !
प्रीतिला स्वातंत्र्य आधी पाहिजे, का होय ना ?
आपुल्यामध्ये पडू दे शैलराजी सह्य ही
भेटती दूरांतरे सप्रेम कृष्णा-कोयना !
चाललो एका दिशेने थोडके का हे असे ?
सागरी एकाच भेटू अंतकाली मोहना !

माधव ज्यूलियनांच्या गज्जलांच्या अनुषंगाने मराठी कवितेत प्रेमाचा प्रथमच धीटपूर्वक आविष्कार होऊ शकला. पूर्वी कधी न आढळलेली विशिष्ट प्रकारची प्रियकर-प्रेयसींची जोडी व तिची तितकीच वैशिष्ट्यपूर्ण प्रेमभावना ही माधव ज्यूलियनांच्या गज्जलांची मराठी कवितेला मिळालेली देणगी होय. केशवसुत, गोविंदाग्रज ह्यांच्यानंतर मराठी कवितेत निर्माण झालेली कोंडी फोडण्यामध्ये माधव ज्यूलियनांच्या प्रयोगशीलतेचा, प्रयोगशीलतेमधून केलेल्या गझल या काव्यप्रकारामधील काव्यरचनेचा, ह्या काव्य-प्रकाराच्या शास्त्रशुद्ध माहितीचा, त्या अनुषंगाने मराठीत आलेल्या अरबी फारसी अक्षरगणवृत्तांचा मोठाच वाटा आहे. सर्वात प्रथम माधव ज्यूलियनांनीच मराठी काव्यक्षेत्रात गझल हा स्वतंत्र काव्यप्रकार आहे, ही स्पष्ट जाणीव करून दिली. मराठीत माधव ज्यूलियनांच्या काळी सुरुवातीला गझल या काव्य प्रकाराला खूप विरोध करण्यात करण्यात आला. माधव ज्यूलियनांनी आपल्या खात्रीपूर्वक माहितीच्या आधारे खंडनमंडनात्मक लेख लिहून हा विरोध जर मोडून काढला नसता, तर मराठी गझलेची वाटचाल पुढे झाली नसती. ह्यावरून माधव ज्यूलियनांच्या गझलरचनेहून त्यांचे गझलकार्य कितीतरी अधिक पटीने महत्त्वाचे आहे हे स्पष्ट होते.

माधव ज्यूलियनांच्या बरोबर रविकिरण मंडळातील गिरीश व यशवंत या दोन कवींनी तसेच मंडळाबाहेरील भा.रा. तांबे, दे. ल. महाजन, दु. आ. तिवारी, आनंदराव टेकाडे, केशवकुमार, वि. वा. भिडे, काव्यविहारी, कुमुदबांधव, अनंत काणेकर, व भ. श्री. पंडित यांनी गझलरचना केल्याचे दिसून येते. यापैकी अनेक कवींवर ठळकपणे माधव ज्यूलियनांच्या गझलरचनेचा प्रभाव दिसून येतो. यापैकी भ. श्री. पंडितांच्या काव्यातून गझलरचनेचे तंत्र आत्मसात केलेली चांगली गझल वाचल्याचे समाधान वाचकांना प्राप्त होते. तर आत्मचिंतनपर गझलांमध्ये गिरीश व यशवंत यांनी उल्लेखनीय लेखन केलेले दिसते. यावरून हे लक्षात येते की, इ.स. सन १९२० ते १९४० हा काळ मराठी गझलेला अनुकूल असाच होता.

१९४० ते १९६५ हा टप्पा मराठी गझलेचा ओहोटीचा काळ होय. इ.स. सन १९३५ नंतर रविकिरण मंडळाचे नावीन्य संपुष्टात आले. त्यांच्या कार्याचाही प्रभाव कमीकमी होत गेला. १९३९ मध्ये माधव ज्यूलियनांचे निधन झाले व एका परीने मराठी गझल पोरकी झाली. या कालावधीमध्ये आनंदराव टेकाडे, गिरीश, यशवंत, काव्यविहारी, केशवकुमार, कुमुदबांधव, भ.श्री. पंडित, कुसुमाग्रज, बोरकर, वा. रा. कांत, काळेले, कृ. ब. निकुंब, ना.घ. देशपांडे, शांता शेळके, संजीवनी मराठे, राजा बढे, विंदा करंदीकर, वसंत बापट व दि.पु. चित्रे ह्या जुन्या, नव्या व काही अतिनव्या कवींनी गझल रचना केलेली दिसते. परंतु संख्येने व गुणवत्तेनेही ही रचना फार नजरेत भरण्याजोगी नाही. ही गझलरचना ह्या सर्व कवींच्या एकूण काव्यरचनेतील एक छोटासा असा भाग होता.शिवाय त्यांनी आपल्या गझलरचनेतून गझल या काव्यप्रकाराचे स्वत्त्व आणि सत्त्व जपण्याचा प्रयत्न केल्याचे जाणवत नाही. ह्या काळातील बहुतेक गझल ही नेहमीच्या भावकवितेच्या-भावगीताच्या स्वरूपात अवतरलेली दिसते. फरक अरबी, फारसी वृत्तांपुरताच राहिला त्यामुळे ह्या गझलेची स्वतंत्र दखल कवी, समीक्षक व रसिक ह्यांना घ्यावीशी वाटली नाही.

मराठी गझलेच्या पिछेहाटीस ह्या काळातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतीक परिस्थितीचाही हातभार लागलेला आहे. दुसऱ्या महायुद्धाने प्रस्थापित मानवी मूल्यांना तडे गेले. विज्ञानयुगामागोमाग तंत्रयुग अवतरले, गांधीजींच्या नेतृत्वाखाली प्रखर संघर्ष करून भारताने स्वातंत्र्य मिळविले पण त्याच वेळी भारत पाक अशी फाळणी स्वीकारावी लागली. त्यातून हिंदू मुस्लीम दंगली उसळल्या. गांधीजींची हत्या करण्यात आली. या सर्व जागतिक व राष्ट्रीय घटनांमुळे भारतीयांना, महाराष्ट्रीयांना वास्तवतेचे प्रखर भान आले. सामाजिक जाणिवा वाढीस लागल्या. आधीच्या स्वछंदवादी प्रवृत्तीची जागा वास्तववादी प्रवृत्तीने घेतली. ह्या परिस्थितीच्या रेट्यातून नवकाव्य उदयास आले. व त्याचा प्रभाव १९६५ पर्यंत चढता वाढता राहिला. त्यामुळे एकूणच काव्य व्यवहाराच्या मूल्यकल्पनेत आमूलाग्र बदल होत गेले. कवितेला एकेका बंधनातून मुक्त करण्याचा नवकाव्याचा प्रयत्न सफल होत गेल्यामुळे परंपरागत प्रतिष्ठित काव्यप्रकार मागे पडत गेले. साहजिकच अनेक बंधनांनी युक्त असलेला गझल हा काव्यप्रकारही त्याला अपवाद राहिला नाही. मराठी गझलेची ही पीछेहाट लक्षात घेऊन इ.स. १९५३ साली वि. द. घाटे ह्यांनी, तर इ. स. १९६७ साली रा. श्री. जोग ह्यांनी गझल हा काव्यप्रकार मराठीतून लुप्तप्राय झाला, अशा आशयाचे उद्गार काढलेले आढळतात. मराठीतील गझल लुप्तप्राय झाली हे खरे असले तरी ती लुप्त मात्र झाली नाही. म्हणूनच १९६५ पर्यंतच्या काळातील मराठी गझलेने गझल हा काव्यप्रकार प्रतिकूल परिस्थितीतही मराठीत टिकवून ठेवण्याचे कार्य अप्रत्यक्षपणे केले, असे निश्चितपणे म्हणता येते.

मराठी गझलेच्या वाटचालीतील सर्वात अलीकडचा टप्पा इ. स. सन १९६५ ते आजपर्यंत होय. १९६०-६५ च्या सुमारास सुरेश भटांच्या रूपाने माधव ज्यूलियनपद्धतीच्या गझलपेक्षा वेगळी गझल सातत्यपूर्वक, निष्ठापूर्वक, तंत्रशुद्धतेकडे दुर्लक्ष न करता लिहिणारा एक समर्थ गझलकार मराठी कवितेला मिळाला. माधव ज्यूलियनपद्धतीपेक्षा सुरेश भटांनी अवलंबलेल्या पद्धतीने गझल रचना केल्यास ती, अधिक

आकर्षक, प्रभावी व यशस्वी होते असे लक्षात येत गेल्यामुळे काही जुने कवी व बरेच नवे कवी सुरेश भट पद्धतीने आपली गझल लिहू लागले. समीक्षकांनी व रसिकांनीही या नव्या गझलेचे स्वागत केले. त्यामुळे मराठीत आधीच्या माधव ज्यूलियनपद्धतीच्या गझल बरोबरच सुरेश भटपद्धतीचीही गझल अस्तित्वात आली.

या काळात यशवंत, कुसुमाग्रज, बोरकर, कृ. ब. निकुंब, ना.घ. देशपांडे, शांता शेळके, संजीवनी मराठे, राजा बढे, विंदा करंदीकर, वसंत बापट या कवींनी माधव ज्यूलियनपद्धतीचीच गझल लिहिलेली दिसते.तसेच नव्याने ह्या काळात अनिल, संजीव, मंगेश पाडगावकर, आरती प्रभू, शंकर रामाणी, गंगाधर महांबरे, योगेश्वर अभ्यंकर, राजा महाजन, किशोर पाठक, कल्याण इनामदार, अशोक भाट्ये, रे. भ. भारस्वाडकर व मधु जामकर ह्या काही जुन्या व नव्या कवींनी गझलरचना केलेली दिसते.

नवकाव्याच्या विविध संदर्भात ज्यांचा आवर्जून उल्लेख केला जातो, त्या अनिल, करंदीकर व चित्रे ह्या तिघा कवींनी जी गझलरचना केलेली आहे, तिच्यामागे त्यांची प्रयोगशील प्रवृत्ती असल्याचे जाणवते. परंतु या प्रयोगात त्यांना फारसे यश लाभले नसल्याने त्यांनी पुढे गझलरचना थांबवलेली दिसते. गझलेला प्रतिमाबहुल भाषा व नवकाव्यात असते तशी दुर्बोधता ह्यांचे ओझे सोसवत नाही असे दिसते. कमी अधिक उणिवांचा विचार बाजूला ठेवून त्यातल्या त्यात यशस्वी गझलरचना करणाऱ्या कवींमध्ये अनिल, बोरकर, ना. घ. देशपांडे, शांता शेळके, करंदीकर, पाडगावकर व अशोक भाट्ये ह्यांचीच नावे प्रामुख्याने पुढे येतात. पाडगावकरांनी विपुल गझलरचना केलेली दिसते. परंतु वृतांचे विविध प्रकार व परंपरासंमत रचना ह्या दोन बंधनांपेक्षा अन्य बंधन आपण मानणार नाही अशी भूमिका घेतल्यामुळे त्यांच्या गझल (१९८१) या ८५ गझलांच्या काव्यसंग्रहात खऱ्याखुऱ्या गझला फार कमी आढळतात.

सुरेश भटांच्या गझलरचनेमध्ये माधव ज्यूलियनपद्धतीची गझल अजिबात डोकावत नाही कारण सुरेश भट गझलरचनेकडे उर्दू भाषिक मित्रांच्या सहवासामुळे वळले. उर्दू कविसंमेलनांचे श्रवण, उर्दूच्या जाणकारांशी वेळोवेळी केलेल्या चर्चा, अरबी-फारसी-उर्दू ग्रंथांचे वाचन ही त्यांच्या गझलरचने मागील कारणे आहेत. सुरेश भटांची पहिली गझल १९५४ मधील आहे. जी फारशी तंत्रशुद्ध नाही. गझल या काव्यप्रकारातील सात कवितांचा समावेश असलेला त्यांचा 'रुपगंधा' हा पहिला काव्यसंग्रह १९६१ मधील आहे. तर त्यांनी आपल्या गझलरचनेला जाणीवपूर्वक सुरुवात १९६३-६४ पासून केलेली दिसते. सुरेश भटांच्या 'रुपगंधा' (१९६१), 'रंग माझा वेगळा' (१९७४) व 'एल्गार' (१९८३) ह्या तीन काव्यसंग्रहातील गझलांची संख्या १३० आहे. भटांची बहुतेक गझल 'जदीद गझल' (आधुनिक किंवा नवमतवादी गझल) या प्रकारात मोडणारी आहे. गझलमध्ये विविध वृत्तांची निर्दोषपणे योजना करण्यामध्ये माधव ज्युलियनांच्या खालोखाल भटांचा क्रम लागतो. मराठी प्रेमकवितेत ज्या अर्थाने गोविंदाग्रज, तांबे, माधव ज्यूलियन ह्यांच्या प्रेम कवितेला आपापले म्हणून एक वेगळेपण आहे, त्याच अर्थाने भटांच्या गझलेच्या स्वरूपातील प्रेम कवितेलाही आपले म्हणून एक वेगळेपण खासच आहे. भटांच्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या गझलांमधून तुकारामांचा फटकळपणा, कुसुमाग्रजांचा ध्येयवेडेपणा व नारायण सुर्व्यांचा थेट जाऊन भिडण्याचा धारदारपणा ह्या तिन्हीचे एक विलक्षण मिश्रण प्रत्ययास येते. भटांच्या सर्वच गझलांमधून आढळून येणारा एक विलोभनीय विशेष चिंतनशीलता हा

होय. विशेषतः त्यांच्या आत्मचिंतनपर गझलांमध्ये या विशेषाचे अधिक अस्तित्व जाणवते. त्यामुळे रसिकमन अस्वस्थ तर होतेच, परंतु अंतर्मुखही होते. भटांचे वैशिष्ट्य असे की गझलचे गझलपण अबाधित ठेवूनच त्यांनी तिला मराठीपण दिले आहे. मराठी गझलेत उर्दू-हिंदी शब्द व कल्पना ह्यांचा अधूनमधून वापर केल्याने ती अधिक अस्सल होते असा चुकीचा समज बळावत चालला असताना भटांच्या गझलेचे आगमन झाले व तिने गझल हा काव्यप्रकार त्याच्या मूळ तंत्रासह मराठीत रुजू शकतो ही शक्यता निर्माण केली व ती प्रत्यक्षातही आणली. त्यामुळे गझलेचा पूर्ण आनंद मराठी गझल देत नाही असे म्हणून उर्दू गझलेकडे वळलेला जो मराठी रसिकवर्ग होता, तो भटांनी आपल्या गझलेने परत मराठी गझलेकडे वळवला असे म्हणता येते.

### गझल वृत्त व वृत्ती यांची एकरूपता

गझल हा केवळ एक पद्य प्रकार नसून तो एक काव्यप्रकारही आहे. आशय व अभिव्यक्ती यांच्या एकरूपतेतून गझलची एक वैशिष्ट्यपूर्ण अशी रचना बनली आहे. अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना सर्व कवींना साधते असे नाही. गझलचे रचनातंत्र सांभाळून अनेकांनी गझल लिहिण्याचा प्रयत्न केला असला तरी सर्वांची रचना गझल बनलेली नाही. आरती प्रभूंनी रचनातंत्र न सांभाळल्याने त्यांच्या 'नक्षत्रांचे देणे' मधील कवितांना गझला म्हणणे अवघड आहे तर गंगाधर महाम्बरे यांनी रचनातंत्र सांभाळले तरी त्यांच्या कवितांमध्ये गझलवृत्ती नसल्याने त्यांनाही गझला म्हणणे अवघड आहे.

गझलच्या या विशिष्ट प्रवृत्तीमुळेच पु.ल.देशपांडे यांनी गझलबद्दल एक महत्त्वाचे निवेदन केले आहे. ते म्हणतात, गझल हे केवळ एक वृत्त नसून ती एक वृत्ती आहे. (पु. ल. देशपांडे - प्रस्तावना, रंग माझा वेगळा) गझलकाव्याचे मर्मच त्यांनी या विधानातून सांगितले आहे. गझलची वृत्ती नसता केवळ गझलवृत्तात कविता केली तर ती निर्जीव, कृत्रिम बनते; म्हणून गझलरचनेत वृत्ताएवढेच वृत्तीलाही महत्त्व आहे. गझलवृत्ती ही गझलवृत्ताचा आत्मा आहे. म्हणून उमर खय्यामच्या 'फिर्याद' या ग्रंथात प्रा. क्षीरसागरांनी गझलगायक श्री. रामूभय्या दाते यांचे उद्गार दिले आहेत. गझल ही जीवनाकडे पाहण्याची एक दृष्टी आहे आणि स्वतः प्रा. क्षीरसागर यांनीही म्हटले आहे की, गझल हा गायनाचा एक प्रकार म्हणून इतर गायनाहून जसा वेगळा आहे, तितकाच तो काव्याचा प्रकार म्हणून इतर काव्याहून वेगळा आहे. कविप्रवृत्तीशी गझलचा विषय इतका निगडित असतो की त्याला आत्मनिष्ठेचेच रूप प्राप्त होते. अर्थात केवळ आत्मनिष्ठा हे गझलचे वैशिष्ट्य नव्हे तर एका विशिष्ट प्रवृत्तीच्या कवीची आत्मनिष्ठा असा त्याचा अर्थ आहे.

### आत्मप्रेम

गझलकाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो आत्मप्रेमी असतो. त्याचे स्वतःवर प्रेम असते, स्वतःबद्दल अभिमान असतो. अर्थात त्याचा हा अभिमान म्हणजे अहंकार नव्हे, आत्मप्रौढी नव्हे तर स्वतःचे सामर्थ्य, कर्तृत्व, भावना, विचार यामुळे त्याच्यात एक प्रकारची मस्त कलंदर वृत्ती निर्माण झालेली असते. डॉ. सुधीर रसाळ यांच्या शब्दात सांगायचे तर स्वतःच्या अस्तित्वाचे तीव्र भान हे गझलमधील संवेदनशीलतेचे एक अंग होय. उदा.

आयुष्य बेचिराख, तरीही मजेत मी
आली व्यथा कवेत, व्यथेच्या कवेत मी

– सुरेश भट

आत्मा विकून माझा केला कधी न सौदा
माझीच अहंता आता पिऊन घेतो

– मंगेश पाडगावकर

कैफात राहिलो मी, पर्वा नसे कुणाची
परि एक याद आहे, त्याने दिल्या ऋणाची

– संजीव

**जीवनप्रेम**

गझलकार आत्मप्रेमी असतो तसा तो जीवनप्रेमीही असतो. स्वतःप्रमाणे जीवनावरही तो उत्कटपणे प्रेम करतो. जीवनाचा तो उपासक असतो, पूजक असतो. कलावंत व जग यांच्यात एक विरोध असतो. एका बाजूला भयानक वास्तव व दुसऱ्या बाजूला त्याविरुद्ध खंबीरपणे उभा असलेला कवी; एका बाजूला निराशेचा सूर व दुसऱ्या बाजूला आशावादाचा पुकारा असे एक द्वंद्व गजलकाव्यात असते. उदा.

वाटेवर काटे वेचीत चाललो
वाटले जसा फुलाफुलात चाललो

– अनिल

भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले

– सुरेश भट

**संघर्षप्रियता**

आत्मप्रेम व जीवनासक्ती यांमुळे कविमनाचा जगाशी संघर्ष चालतो. कविमन भावूक, संवेदनशील, सौंदर्यप्रेमी, आशावादी, स्वप्नाळू तर वास्तवातील जग हे रुक्ष, कठोर व आव्हान देणारे असते. दुष्ट व्यक्ती, प्रतिकूल परिस्थिती व क्रूर नियती मानवाला नेहमीच आव्हाने देतात, त्याची स्वप्ने उद्ध्वस्त करतात, त्याच्या आशाआकांक्षांचा चुराडा करतात. कलावंताचे स्वप्नील जग आणि वास्तवातील कठोर जग यांतील विसंवाद सनातन आहे. या विसंवादातून संघर्ष निर्माण होतो. या संघर्षातून मग एखादा महात्मा, एखादा विचारवंत वा एखादा कलावंत निर्माण होतो. गझलचे भावविश्व हे अशा संघर्षाचे असते. उदा.

हे असे आहे तरी हे असे असणार नाही
दिवस आमुचा येत आहे तो घरी बसणार नाही
आजचे आमुचे पराभव पचवितो आम्ही उद्यास्तव
विजय तो कसला उरावर जखम जो करणार नाही

– सुरेश भट

आयुष्य पेटताना ओठात सूर होता
हे सोसणे सुराला माझ्या प्रमाण आहे
हे खरी की खूप माझे हाल झाले
ना कधी गाणे परी बेताल झाले

– मंगेश पाडगावकर

**सौंदर्यप्रेम**

गझलकार हा सौंदर्यप्रेमी असतो. परंतु या सौंदर्याचा साक्षात्कार त्याला स्त्री रूपात होतो. गझलमध्ये प्रेम भावनेला स्थान का मिळाले, महत्त्व कां प्राप्त झाले त्याचे उत्तर त्याच्या या प्रवृत्तीत सापडते. गझलमधील प्रेम भावना लौकिक असतेच, पण काही वेळा ती रूपकात्मक, प्रतीकात्मक असते. अनेक संतकवींनी भक्तिभाव प्रेमभावनेतूनच व्यक्त केला आहे. गझलकवी हे ऐहिक जीवनात रममाण होणारे, ऐहिकतेचा उपभोग घेणारे इहवादी होते. त्यामुळे स्त्री, स्त्रीसौंदर्य, प्रेम, शृंगार यांचा त्यांनी उत्कटतेने आविष्कार केला. उदा.

सतेज काळे टपोर डोळे
दिसावयाला गरीब भोळे
अता लबाडी स्मरून याची
हुताशनी मी अखंड पोळे

– माधव ज्यूलियन

ओठ अजुनी बंद का रे ? श्वासही मधुमंद कां रे ?
बोल शेजेच्या फुलांवर तु असा रुसलास कां रे ?
उसळती हृदयात माझ्या अमृताच्या धुंद लाटा
तू किनाऱ्यासारखा पण कोरडा उरलास का रे ?

– सुरेश भट

**विफलतेतील उदात्तता**

गझल शृंगारात रंगते तशी विरहातही. विरहभावनेत प्रेमाला खरी लज्जत येते. विरहभावनेचे एक उत्कट

रूप म्हणजे प्रेमभंग. प्रेमभंगात प्रेमकाव्य रंगते. मेंदी चिरडली की अधिक रंगते, त्याप्रमाणे प्रेमकाव्यही विरहवणव्यात होरपळताना बहरते ! हा एक अजब न्याय आहे. दुःखाची गाणी ही मधुरतम गाणी असतात असे जे म्हटले जाते ते याच अर्थाने. उर्दू काव्यात या दर्दने खूप रूपे घेतली आहेत. गझलने दर्दला (दुःखाला) आत्मसात केले आहे . प्रेमविरहाच्या या दुःखाचा आविष्कार अशा व्यापक पातळीवर झाला आहे की गझल ही प्रेमाविषयीच नव्हे तर सबंध जीवनाच्या विफलतेविषयीचे चिरंतन सत्य सांगते. उदा.

मृत्यु ज्याला जन्म त्याला ठेविलेला मागुनी
ही निराशेतील आशा कां नये स्वान्ती धरू ?

– माधव ज्यूलियन

दिवस हे जाती कसे अन् ऋतु असे छळतात का ?
विसरतो आहे तुला पण आसवे ढळतात का?
निसटुनी आयुष्य गेले त्या तुझ्या पदरासवे
पण मुक्या रक्तात सारे अर्थ मग जुळतात का ?
कुंद ह्या वेळी तुझ्याविण प्राण बघ मंदावला
मग असे भवती अचानक दीप हे जळतात कां?

– सुरेश भट

**मदिरासक्ती**

गझलकाव्यात मद्य, मद्यशाला, मधुबाला व मद्यपी यांची सुंदर व रसभरीत वर्णने आल्याने प्रेमाइतकेच मद्यप्रेमालाही महत्त्व आलेले आहे. मदिरा व मदिराक्षी हे गझल कवींचे जणू आत्मीयतेचे विषय आहेत. मद्य ही गझलकाव्यातील एक अर्थपूर्ण प्रतिमा आहे. मद्याच्या रूपकातून तर कधी प्रतिमेतून गझलकवींनी जीवनातील नश्वरता, क्षणभंगुरता, ढोंगीपणा, कठोरता, कर्मठपणा यांचा उपहास केला तर कधी जीवनाचे सौंदर्य, माहात्म्य, प्रेमाची धुंदी यांचे रसभरीत वर्णन केले आहे. उदा.

उठ साकी ! दे भरोनी वारुणीचा एक पेला
रात्र ती गेली सरोनी, मित्र ये व्योमी उदेला
लाज, भीती मोकलोनी बसलो ओसाड कोनी
ओरडो काहीहि कोनी, लौकिकाला जीव मेला
गा दिवाणातील गाणी, वाहू दे वाणी दिवाणी
झोकतो मी मद्यपेला, हुंग तूही पुष्पझेला

– माधव ज्यूलियन

गझल हे दरबारी काव्य असले अन् रंजकता हे त्याचे मूल्य असले तरी ते उथळ किंवा बहिर्मुख असत नाही. गझलमध्ये सखोल व अंतर्मुख जीवनचिंतन असते. जीवनात येणाऱ्या विविध अनुभवांच्या वेळी कवीच्या मनात सुखदुःखाचे आशा- निराशांचे जे उत्कट भाव जागृत होतात, त्या भावना उत्कट रूपात गझलमध्ये अभिव्यक्त केलेल्या असतात. अशा अभिव्यक्तीत उत्कट भावनेबरोबर सखोल जीवनचिंतन असते, जीवनभाष्य असते. उदा.

आजचे अमुचे पराभव पचवतो आम्ही उद्यास्तव
विजय तो कसला उरावर जखम जो करणार नाही

– सुरेश भट

वाटेवर काटे वेचीत चाललो
वाटले जसा फुलाफुलात चाललो
चुकली तालात चाल लागला जीवास बोल
ढळलेला तोल सावरीत चाललो

– अनिल

उन्मत्त श्वापदांची आली वरात आली
जिंकुनी राजरस्ते घुसुनी घरात आली
जमले थव्याथव्यांनी तांडे समर्थकांचे
लाचार गांडुळांची भक्ती भरास आली
मुर्दाड नागड्यांचा हा चालला तमाशा
ज्योती खुडून साऱ्या ही काळरात्र आली

– मंगेश पाडगावकर

### ३.२.१.३ हायकू

हायकू हा जपानमधील लोकप्रिय काव्यप्रकार आहे. त्याला सुमारे पाचशे वर्षांची परंपरा आहे. या काव्यप्रकाराचे मूळ जपानमधील 'काताउता' या काव्य प्रकारात सापडते. एक मार्मिक प्रश्न आणि त्याला दिलेले एक मार्मिक उत्तर हे दोन्ही मिळून काताउता हा काव्यप्रकार बनतो. ह्यातील पहिल्या तीन ओळींच्या उद्गारातून 'हायकू' या काव्यप्रकाराची कल्पना आणि रचनेचा ढंग उदयास आला.

'काताउता' ह्या काव्यप्रकारानंतर 'तांका' हा एक नवा काव्यप्रकार निर्माण झाला. यामधून बहुधा ऋतूंशी संबंधित अशा तरल आणि नाजूक भावना पाच ओळीत व्यक्त केलेल्या असत.

'तांका' ह्या काव्यप्रकारामागून 'रेंगा' हा काव्यप्रकार लिहिला जाऊ लागला. याचा पूर्वार्ध तीन ओळींचा आणि उत्तरार्ध दोन ओळींचा असे स्वरूप होते. ह्या कवितेत पूर्वार्ध एका कवीने लिहिलेला असे तर उत्तरार्ध दुसरा कवी लिहित असे. 'रेंगा' हा काव्यप्रकार पुढे फार लोकप्रिय झाला. एका कवीच्या प्रश्नाला एकामागून एक असे अनेक कवी उत्तरे देऊ लागले. दोन दोन ओळींची उत्तरे वाढता वाढता 'रेंगा' साखळीसारखा लांबट जाऊ लागला. तरीपण त्यात पहिल्या तीन ओळींचे महत्त्व कायम राहिले. त्या पहिल्या तीन ओळींनाच हायकू म्हटले जाऊ लागले. पुढे रेंगामधून 'हाईकाई' नावाचा आणखी एक काव्यप्रकार उदयाला आला. तांका, रेंगा आणि हाईकाई ह्या तीनही काव्यप्रकारातील पहिल्या तीन ओळींना, म्हणजेच 'होक्कूला' पुढे असामान्य महत्त्व प्राप्त झाले. या तीन ओळींनीच स्वतंत्र काव्यप्रकाराचे रूप धारण केले. पंधराव्या शतकात होक्कूला हायकू हे अभिधान प्राप्त झाले.

बाशो, बुसन आणि इस्सा या तीन कवींमुळे हायकूला दर्जा आणि लोकप्रियता मिळाली. त्यांच्यामागून शिकी, सुरुकी, ओनित्सुरा, सोसेकी असे अनेक उल्लेखनीय कवी होऊन गेले. आजही जपानमधील हायकूची लोकप्रियता कायम आहे. त्यात नव्या विचारांची व नव्या अनुभूतींची भर पडत आहे. अनेक सुंदर हायकूंचे इंग्रजी अनुवादाचे संग्रह प्रकाशित झाल्याने ह्या काव्य प्रकाराने आज जगमान्यता मिळवली आहे.

**हायकूचे स्वरूप :**

हायकू म्हणजे तीन ओळींची जपानी कविता. या तीन ओळींच्या कवितेत सर्वसाधारणपणे निसर्गाचे चितारण असते. पण प्रत्येक हायकू निसर्गातील घटनेशी संबंधित असतोच असे नाही. परंतु जपानी काव्याच्या संकेताप्रमाणे निसर्गातील घटनेशी जेव्हा हायकू संबंधित असतो तेव्हा तो त्याच्या अस्सल स्वरूपात आपल्याला भेटतो. निसर्गातले एखादे दृश्य किंवा निसर्गात अकस्मात घडलेली एखादी नाट्यपूर्ण घटना कवी बघतो आणि अचानक त्या दृश्याशी किंवा घटनेशी त्याच्या अंतर्मनाची तार जुळून जाते.जागृत जाणिवेच्या त्या विशिष्ट क्षणाची नोंद कवी हायकूमध्ये करतो.

यशस्वी हायकूरचनेसाठी अनुभव ग्रहण करण्याची क्षमता आवश्यक आहे. आयुष्यात पूर्वी घेतलेल्या अनुभवाचा सुप्त साठा कवीजवळ नसेल तर तो निसर्गातील अर्थपूर्ण घटना अचूक पकडू शकणार नाही. त्याच्या अंतःकरणातील भावपूर्णता आणि बाहेरील घटना ह्यांची अचानक एकतानता जुळून येते. तेव्हाच हायकू निर्माण होण्याची शक्यता असते. कवी आपला भाव दृश्याच्या मांडणीतून अभिव्यक्त करतो. हायकू लिहिताना कवीने समोरच्या दृश्यातून येणारा भाव पकडावा लागतो. त्या दृश्यावर त्याने स्वतःचा अनुभव लादून चालत नाही. निसर्गातील घटनेतून कवीला जाणवलेल्या अनुभवाच्या अस्सलपणावर हायकूचे यश अवलंबून असते. नुसते दृश्य म्हणजे हायकू नव्हे तर त्या दृश्यातून कवीला जाणवलेला विशिष्ट अर्थ म्हणजे हायकू होय.

ज्या घटनेतून हा हायकू निर्माण होतो त्या घटनेच्या पोटात दडलेले स्पंदन हे अधिक महत्त्वाचे आहे. ते जीवन-स्पंदन जाणवण्याची अंतर्दृष्टी कवीजवळ हवी. कवीला पकडून ठेवण्याची जी ताकद त्या दृश्यात आहे ती ताकद त्याला वाचकालाही जाणवून देता आली पाहिजे. त्यातच हायकू रचनेचे कौशल्य असते. हायकू लिहिताना कवीने स्वतःच्या भावना उघडपणे बोलून दाखवायच्या नसतात. निसर्गातील जी वस्तू किंवा घटना त्याच्या भावना जागृत करण्यास निमित्त होते, कवी ती वस्तूच बनतो. त्या वस्तूचीच हायकूत अशी मांडणी करतो की, त्या मांडणीत त्याच्या भावना अचूक येतात. भावविवशतेला हायकूत स्थान नसते. आत्मकेंद्रितता हायकूला वर्ज्य आहे.

'हायकू' हा एक बंदिस्त काव्यप्रकार आहे. शब्दांना हायकूत फार महत्त्व आहे. कवीने निवडलेल्या शब्दांचे नेमकेपण हायकूरचनेत फार महत्त्वाचे असते. त्या शब्दांना अनुक्रम महत्त्वाचा असतो. प्रत्येक हायकूच्या मध्ये कुठेतरी अचूक कलाटणीचा बिंदू असतो. त्या बिंदूपाशी येताच कवी क्षणभर विराम घेतो आणि मग अचानक हायकूला वेगळे, वैचारिक आणि अर्थपूर्ण वळण देतो. या कलाटणीमुळेच हायकू एकदम अर्थपूर्ण आणि प्रभावी होतो. या विरामाने  वैचारिक दृष्ट्या हायकूचे दोन भाग पडतात, पण विरामानेच ते सांधलेही जातात. त्यामुळे हायकू बंदिस्त होतो. हायकूत शब्दांच्या निवडीला आणि बांधणीला विशेष महत्त्व असते. जपानी भाषा ही उच्चारप्रधान भाषा आहे. उच्चाराप्रमाणे एका शब्दाची दोन किंवा तीन गटात विभागणी होऊ शकते. जपानी हायकूत तीन ओळीत पहिल्या ओळीमध्ये पाच, दुसऱ्या ओळीत सात आणि तिसऱ्या ओळीमध्ये पुन्हा पाच असे शब्दांचे उच्चाराप्रमाणे गट पाडलेले असतात. त्याला शब्दावयव म्हणतात. यमक पहिल्या आणि तिसऱ्या किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत येते. शिरीष पै यांनी हायकू या काव्यप्रकाराचे विवेचन केनेथ सुदा यांच्या 'द जॅपनीज हायकू' या पुस्तकाधारे केले आहे. त्यांनी हायकूची तुलना एखाद्या सुंदर चित्राशी केलेली आहे. एखाद्या चित्रात जसे सामर्थ्य असते तसेच बऱ्याच  अंशी हायकूत असते.चित्र बघताक्षणीच त्यातील सौंदर्याचा आपल्याला साक्षात्कार होतो. चांगला हायकू वाचल्यानंतर जवळ जवळ हीच प्रक्रिया घडून येते. हायकूमध्ये कवीने स्वतःचे भाष्य करायचे नसते, तर मोजक्या अशा दृश्यांच्या माध्यमांतून आपल्या भावनांना हलवून सोडायचे असते. हायकू वाचल्यानंतर रसिकांना जो आनंद होतो त्याचे तर्कशुद्ध असे काही कारण देता येत नाही. तो आनंद तात्काळ होणारा आणि साक्षात्कारी स्वरूपाचा असतो. हायकूतून कवीने निर्माण केलेले चित्र स्वतःच इतके बोलके असते की त्यातील सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी कवी कुठलीही विशेषणे वापरून आपल्या मनावर उमटलेल्या मूळ चित्राच्या प्रतिबिंबाला धक्का देऊ इच्छित नाही. चित्राच्या स्पष्टीकरणासाठी रूपके आणि उपमा ह्यांचाही वापर कवी करीत नाही, तर ते काम स्वतः चित्रालाच करू देतो. चित्र आनंददायक असो किंवा दुःखदायक चित्रकाराला ते समजावून सांगावे लागत नाही, हायकूसुद्धा असाच असतो. हायकू लिहिणारा कवी वस्तूंच्या वर्णनातून नव्हे तर मांडणीतून आपल्यावर हायकूतील सौंदर्याचा प्रभाव पाडत असतो. उत्तम हायकू लिहिता येण्यासाठी कवीला हायकूवृत्ती जोपासावी लागते. हायकूवृत्ती म्हणजे अनुभवासाठी अनुभव घेण्याची वृत्ती. व्यक्ती वस्तूमध्ये केवळ वस्तूसाठी रस घेते तेव्हाच हायकूवृत्ती निर्माण होते.

**मराठी भाषेतील हायकू रचना**

मराठी काव्यात हायकू हा काव्यप्रकार शिरीष पै यांनी प्रथम आणला. त्यांचे 'ध्रुवा', 'हायकू', 'हायकूंचे दिवस', 'माझे हायकू', 'मनातले हायकू', 'पुन्हा हायकू' हे हायकूसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. शिरीष पै या मराठी भाषेतील आद्य हायकूकार आहेत. त्यांच्या हायकूपासून प्रेरणा घेऊन अनेक कवींनी हायकू लिहिले. महाराष्ट्राने या नव्या काव्यप्रकाराचे स्वागत केल्याचे शिरीष पै यांनी मनातील हायकू या काव्यसंग्रहाच्या मनोगतात म्हटले आहे. शिरीष पै यांच्यानंतर अनेक कवी हायकू या काव्यरचनेकडे वळले. ऋचा गोडबोले, वृंदा लिमये, मनोहर तोडणकर, पूजा मलुष्टे, बाळ राणे, मेघना साने, राजन पोळ, महमूद सारंग, श्याम खरे व माया धुप्पड या कवींनी आपली हायकूरचना प्रकाशित केली आहे. या सर्व हायकूकारांच्या काव्यसंग्रहाला शिरीष पै यांनीच प्रस्तावना दिलेली आहे.

शिरीष पै यांची हायकूरचना, काही उदाहरणे :

१. रंध्रारंध्रात झाडाच्या
कली फुलूनीया आली
अशी फुले अशी फुले
फांदी फांदी डवरली

२. घननीळ काळोखात
घर लागले बुडाया
गेली बुजून कधीच
पिंपळाची दीर्घ छाया

३. सुख वाटेना जिवाला
काही केल्या काही केल्या
सांजवेळेस सावल्या
दूर दूर लोपलेल्या

४. सुकत सुकत पिवळं पान
फांदीवरून खाली गळलं
एका फुलाला सारं कळलं

५. मन रमवायला गुणगुणते

आठवतात त्या अर्ध्या ओळी

मूळची गाणी हरवून गेली

### ३.२.२ अभंग

हा खास प्राचीन मराठी साहित्यातून विकसित झालेला काव्यप्रकार आहे. गेली सात शतके अभंग मराठी वाङ्मयात रूढ आहे. ग्रामीण आणि नागर या समाजाच्या दोन्ही वर्गांच्या तो परिचयाचा आहे. विशेषतः ग्रामीण जनमानसावर त्याने सखोल परिणाम केला आहे. रचना लवचिक असल्यामुळे तो धावत्या चालीवर गाता येतो तसाच तो रागदारीत देखील खुलतो. अभंग हा एक वृत्त-छंदही आहे. प्रामुख्याने आध्यात्मिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी वारकरी संप्रदायातील संतांनी या काव्यप्रकाराचा व छंदाचा प्रथम उपयोग केला. संत नामदेव,संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ इ संतमेळ्याचे विठ्ठलभक्तीपर काव्य प्रामुख्याने अभंग स्वरूपातच आहे. छंद म्हणून अभंगाचे दोन प्रमुख प्रकार पडतात. एक मोठा अभंग व दुसरा लहान अभंग. मोठ्या अभंगात प्रत्येक चरणाचे चार खंड पडतात. पहिल्या तीन खंडात प्रत्येकी सहा अक्षरे असतात. तर शेवटच्या खंडात चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणखंडाच्या शेवटी यमक जुळविलेले असते. तर शेवटचा खंड चरणाला पूर्णत्व देणारा असतो.

उदा. सुंदर ते ध्यान। उभे विटेवरी।। कर कटेवरी। ठेवोनिया।।

तर लहान अभंगात प्रत्येकी आठ अक्षरांचे दोन चरणखंड असतात. व शेवटी यमक जुळवलेले असते. उदा. जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।

अक्षरसंख्येचे बंधन नेहमीच काटेकोरपणे पाळले जाते असे नाही. उच्चारानुसार कमीजास्त अक्षरेही वापरली जातात. १३ व्या शतकातील नामदेव-ज्ञानेश्वरांपासून १७ व्या शतकातील निळोबांपर्यंत अनेक संतांनी प्रचंड अभंगरचना केली आहे. असे असले तरी संत तुकाराम यांनीच या काव्यप्रकाराला सर्वाधिक उंचीवर नेले. कधीही भंग न पावणारा तो अभंग असेही अभंगाचे माहात्म्य सांगितले जाते. आधुनिक काळातही केशवसुतांपासून मर्ढेकर-करंदीकर व त्यापुढच्या पिढीतील दिलीप चित्रे व अरुण कोलटकरांपर्यंत अनेक कवींनी अभंग हा काव्यप्रकार हाताळला आहे. अभंगाचे वृत्त वापरून सामाजिक सुधारणेची व सत्यधर्माची शिकवण देणाऱ्या महात्मा जोतिबा फुले यांनी अखंड लिहिले. तेही अभंगाचेच वेगळे रूप होय. प्रत्येकांनी आपापल्या परीने सर्वांसाठी भक्तीमार्ग या माध्यमातून खुले करून दिले.

**अभंगाचे मूळ** : अभंग या छंदाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न अनेक विद्वानांनी केला आहे.

● संस्कृत अनुष्टुभ छंदात पांगारकरांना अभंग व ओवी यांचे मूळ दिसले.

● अपभ्रंशकालीन लोकगीतसदृश कवनांतून ओवी-अभंग विकास पावले असे ना. ग. जोशी यांचे मत आहे.

● मराठीत अपभ्रंश भाषेतील षट्पदीपासून अभंग आणि ओवी हे छंद आले असे ह. द. वेलणकर यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या मते षट्पदीचे अर्थ हा ओवीचा मूलाधार. म्हणून ओवी साडेतीन चरणी. सर्व अपभ्रंश वृत्ते तालगेय आहेत. अभंगाचे हे वैशिष्ट्य राहिले आहे.

● महानुभव संप्रदायात अभंग या शब्दाला समाप्तीमुद्रा असे म्हटले आहे. (लीळाचरित्र ४२४.)

● इतिहासाचार्य राजवाडे यांनी अभंगांचे (१) प्रतिष्ठा (२) उष्णिग (३) सुप्रतिष्ठा (४) बृहती (५) जगती असे काही भेद सांगितले आहेत.

● **अभंगाची गीतप्रधानता** : भजन कीर्तनात अभंग गावयाचा असल्याने तो गीतप्रधान आहे याबद्दल संतकवींच्या मनात कोणताही संदेह नाही , उदा.

गायनाचे रंगी शक्ति अद्‌भूत हे अंगी । हें तो देणें तुमचे देवा
घ्यावी अखंडित सेवा, अंगी प्रेमाचे भरतें । नेणें उतार चढते ।
तुका म्हणे वाणी, परम अमृताची खाणी ।। (तुका.१०८)

अभंगाची कळा नाही मी नेणत असे सांगूनही नामदेवांनी अभंगाचे लक्षण दिले आहे. या लक्षणानुसार अभंग दोन प्रकारचा ठरतो. यासच ना. ग. जोशी लहान व मोठा अभंग मानून देवद्वार व देवीवर असे अनुक्रमे त्याचे नामकरण करतात. देवाचिये द्वारी उभा क्षणभरी हा संत ज्ञानदेवांचा अभंग देवद्वार जातीचा असून नामदेवांचा पुढील अभंग देवीवर छंदात बसतो.

खवळलो आता न भिये रे तुज
सांडिली रे लाज लौकिकाची ।। (नाम १३८३)

मराठी भाषेतील सर्व अभंग वाङ्मय या दोन अभंगप्रकारात रचलेले आहे. एका कवीने एका जातीचा अभंग रचला असे मात्र झाले नाही. अभंग उदात्त जीवनाचे आणि नीतीमूल्यांचे संस्कार मराठी मनावर करण्याचे कार्य सातत्याने करीत आला आहे.

**आधुनिक मराठी कवितेवर अभंगरचनेचा प्रभाव** : अभंग या काव्य प्रकाराद्वारे समूहाला आवाहन करता येते. स्फुट भावनाविष्काराप्रमाणेच आख्यानांचा कथात्मक घाट घेऊन लोकरंजनातून भक्तिचा प्रसारही अभंगरचनेतून करता येतो. कीर्तन परंपरेतून अभंग जनसामान्यांच्या मनापर्यंत पोहोचला. अभंगांची बहुरुपकता, गेयता आणि नित्य-नूतनता यामुळे आधुनिक कालखंडातील अनेक कवींना काव्याचा हा रचनाप्रकार

आपल्या भावाभिव्यक्तीसाठी महत्त्वाचा वाटला यात आश्चर्य नाही, स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुद्धा अनेक प्रथितयश कवींनी अभंग स्वरूपात कविता केली आहे. संत तुकारामांच्या अभंगातील आत्माविष्कार, सडेतोडपणा व निर्भीडता, काव्यपंक्तीना आलेले सुभाषितांचे मोल आणि त्याचा जनसामान्यांवरील प्रभाव यामुळे महात्मा जोतीराव फुले यांनीही अभंग सदृश अखंड या नावाने रचना केली. तुकारामांच्या शैलीची अनेक वैशिष्ट्ये आपल्याला फुलेंच्या अखंडातून दिसतात. या कालखंडात सत्यशोधक चळवळ आणि अभंग यांचा धागा जुळलेला दिसतो. फुल्यांनी दलित कवितेचा विद्रोही मूलमंत्र दिलेला आहे. महात्मा फुलेंनी अभंग लिहिले. परंतु वारकरी संतांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी स्वतंत्र व परखड होती. त्यांनी बुवाबाजी, कर्मकांड, धार्मिक ढोंग, शोषण याविरुद्ध आवाज उठवला. आपल्या अखंडामधून महात्मा फुल्यांनी भाषाविषयक, निर्मिक विषयक, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, दंभाचा निषेध, पत्ररूप अखंड, मानवी स्त्रीपुरुष, सज्जनांची लक्षणे, आत्मपरिक्षण, नीती, समाधान, सहिष्णुता, सद्सद्विवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकृत्यदक्षता, भटाची वाणी, महंमद, कुळबीणीची व्यथा, अंधश्रद्धा या नव्या विषयावर रोखठोक लेखन केले. उदाहरणार्थ –

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी ।। त्याचे भय मनी ।। धरा सर्व ।।१।।
न्यायाने वस्तुंचा उपभोग घ्यावा ।। आनंद करावा ।। भांडू नये ।।२।।
धर्मराज्य भेद मानवा नसावें ।। सत्याने वर्तावे ।। ईशासाठी ।।३।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों ।। आर्यास सांगतो ।। जोती म्हणे ।।४।।
प्राणिमात्रा सोई सुख करण्यास ।। निर्मी पर्जन्यास ।। नद्यांसह ।।१।।
त्यांचे सर्व पाणी वेगाने वाहती ।। आर्ये कुरापती ।। तिर्थे केली ।।२।।
दाढी दोई वेण्या मुढ भाररीती ।। भट करिताती ।। द्रव्यलूटा ।।३।।
आर्यानी कल्पीली थोतांडे ।।ही सारी ।। दर्गे सर्वोपरी ।। जोती म्हणे ।।४।।
जप अनुष्ठानें पाऊस पाडीती ।। आर्य कां मरती ।। जाळवीण ।।१।।
जळांत बुडता गटांगळ्या खाती ।। प्राणास मुक्ती ।। तळी वसें ।।२।।
फुगुनीयां वर जळी तरंगती ।। मजा ते दाविती ।। मृत्युलोकी ।।३।।
अज्ञानी शुद्रात भुदेव बनती ।। भिक्षा कां मागती ।। जोती म्हणे ।।४।।
एक सुर्य सर्वा प्रकाशास देतो ।। उद्योगा लावितो ।। प्राणीमात्रा ।।१।।
मानवासहीत प्राण्यांचे जीवन ।। सर्वांचे पोषण तोच करी ।।२।।
सर्वा सूख देई जनकाच्या परी ।। नच धरी दूरी ।। कोणी एका ।।३।।
मानवांचा धर्म एकच असावा ।। सत्यांने वर्तावा ।। जोती म्हणे ।।४।।

महात्मा फुलेंचे अभंग रचनादृष्ट्या सफाईदारपणे अवतरले आहेत. विचारप्राबल्य असले तरी त्यातील काव्य हरवलेले नाही. अभंगांत रचनेचा गोडवा आहे. शब्दसौष्ठवात गेयता आहे. मार्मिक कल्पनाशक्ती, खंडन-मंडनामुळे त्यांच्या अभंगांचे वेगळेपण जपले गेले आहे. महात्मा जोतिबा फुल्यांसह सावित्रीबाई फुल्यांनीही अभंग या रचनेचा आधार घेतलेला दिसतो. उदा.

नांगर धरती । शेती जे करती ।

मठ्ठ ते असती । मानू म्हणे ।। १ ।।

करू नका शेती । सांगे मनुस्मृती ।

धर्माज्ञा करती । ब्राह्मणास ।। २ ।।

शूद्र जन्म घेती । पूर्वीची पापे ती ।

जन्मी या फेडती । शूद्र सारे ।।३ ।।

विषम रचती । समाजाची रीती ।

धूर्तांची ही नीती । अमानव ।। ४ ।।

कृष्णराव भालेकर वारकरी परंपरेत वाढलेले परंतु नव्या विचारांनी अभंग व अखंड रचना करणारे सत्यशोधकी खंद्दे अभंगकार आहेत. शेतकऱ्यांचे व मजुरांचे अज्ञान, विद्या, उपदेश इ. विचारांवर त्यांनी हितोपदेशपर अभंग रचले. महात्मा फुल्यांशी मतभेद झाल्यानंतर आपल्या विचारंचे वेगळेपण जपण्यासाठी त्यांनी अखंड रचना केली. ही रचना अभंगापेक्षा कल्पक असल्यामुळे वेगळी ठरते. २४ पंक्तींचा एक श्रीखंड होतो. कृष्ण म्हणे या नावाने भालेकरांनी अभंग रचना केली आहे. गोपाळबाबा वलंगकर यांनीही श्रीखंड रचनेतून दलितांच्या व्यथा, दुःख मांडले. सत्यशोधक समाजातील कृष्णराव भालेकर आणि गोपाळबाबा वलंगकर यांनी बहुजन मुक्तीसाठी अभंग, अखंड आणि श्रीखंड लेखन केले.ज्यातून दलित, ग्रामीण कवितेची बीजे रोवली गेली.

प्रेमाचे शाहीर म्हणवणाऱ्या गोविंदाग्रजांनी 'अनामिकाचे अभंग' लिहिले. केशवसुत संप्रदायापैकी अभंग लेखन करणारे हे कवी आहेत. त्यांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख अंग अभंग लेखन नाही. त्यांना वारकरी परंपरेचा वारसा होता. त्यांनी हे अभंग लीनतेच्या भावनेतून लिहिले आहेत. त्यांनी नामस्मरण माहत्म्य, पश्चाताप, भक्ती, इ. विषय सूक्ष्मपणे अभंगात वर्णन केले आहेत. उदा.

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायण तुझे पायी ।। १ ।।

गणांमात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ।। २ ।।

विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन - कामाठी मांडिली हे ।। ३ ।।

साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धीतीत नाम तुझें ।। ४ ।।

म्हणे दद जें जें मनीं मुखीं आलें । तें तें येथे झालें ब्रह्मार्पण ।। ५ ।।

या काळात प्रभाव गाजवणाऱ्या केशवसुतांनी तुरळक अभंग लिहिलेले दिसतात. ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या रेव्ह. ना. वा. टिळकांनी केलेली अभंग रचना हे या कालखंडातील अभंगरचनेचे वेगळेपण आहे. त्यांनी ख्रिस्ती धर्माचे अनुसरण व प्रसार केला. त्यांनी ख्रिस्ती लोकांच्या मराठी भाषेत परिवर्तन घडवून आणले. त्यांची अभंगरचना भक्तीरस प्रधान आहे. संतांच्या प्रवृत्तीप्रमाणेच 'दास म्हणे' या नावाने त्यांनी अभंग लेखन केले. इ.स. १९२० ते १९४५ या कालखंडात मराठीतील भा. रा. तांबे, चंद्रशेखर, यशवंत, गिरीश, पु.शि. रेगे, अनिल इत्यादी मान्यवर कवींच्या काव्यलेखनाला प्रारंभ झाला. त्यापैकी बा. भ. बोरकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, माधव ज्यूलिअन या कवींनी अभंग या काव्यप्रकारामध्ये लेखन केले आहे. सौंदर्यात्मक जाणिवेची कविता लिहिणाऱ्या बा. भ. बोरकरांनी काव्याच्या अनेक छंदांमध्ये लेखन केले आहे. त्यांचे अभंग संख्येने कमी पण वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांच्या अभंगांतून ज्ञानेश्वरांची महती, संतांची महती, संतांची अद्वैत भक्ती, संतमहात्म्य, आत्मज्ञान, विठ्ठलभक्ती इ. विषय आले आहेत. बोरकरांच्या अभंगांमधून अलौकिक प्रेमाबरोबरच लौकिक प्रेम व्यक्त होते. त्यांच्या अभंगांमधून निसर्ग, संगीत, प्रेम यांचा संगम झालेला दिसतो. ऐहिक प्रेमाची महती ते वर्णन करतात. प्रेयसीचे प्रेम, पत्नीचे प्रेम, स्त्रीची सर्जनशीलता, वैयक्तिक प्रेम, सार्वत्रिक प्रेम, निसर्गातील प्रेम इ. विविधतापूर्ण प्रेमभावना अभंगातून व्यक्त करणारे बोरकर हे पहिले कवी आहेत. उदा. निर्गुण, असीम, अनंत शक्तीला वंदन करताना ते म्हणतात –

अनंता तुला कोण पाहू शके?
तुला गातसा वेद झाले मुके.
मतीमंद अंधा कसा तू दिसे ?
तुझी रूपतृष्णा मनाला असे.
तुझा ठाव कोठे कळेना जरी,
गमे मानसा चातुरी माधुरी.
तरूवल्लरींना भुकी मी पुसे,
तुम्हा निर्मिता देव कोठे वसे ?

त्यांच्या कवितेत भक्ती, सात्विकता यांचा मुक्त भावाविष्कार होतो. त्याचे श्रेय ते ज्ञानेश्वरीला देतात. ते म्हणतात, 'ज्ञानेश्वरी अकराव्या वर्षी माझ्या हातात आली अजूनही मी ती वाचत आहे, तेव्हा सारे श्रेय त्या मायमाउलीचे.' ज्ञानदेवभक्त बोरकर ज्ञानदेव समाधीचा करुण प्रसंग रंगवताना म्हणतात,

ज्ञानदेव गेले तेव्हा कोसळली भिंत
वेद झाले रानभरी गोंधळले संत
ज्ञानदेव गेले तेव्हा ढळला निवृत्ती
आसवांच्या डोही झाली विझू विझू ज्योती

ज्ञानदेव गेला तेव्हा तडा विटे गेला

बाप रखमा देविवरु कटीत वाकला

माधव ज्युलियन या मराठीतील अत्यंत प्रयोगशील कवीने विविध काव्यप्रकारांमध्ये लेखन केलेले आहे. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील दुःखातून 'हाकाटी' हे अभंग लेखन झाले आहे. प्रेम हा त्यांच्या अभंगांचा विषय आहे. जीवनातीत निराशा, विफलता त्यांना यातून पांडुरंग तारुण नेईल हा आशावाद आहे. जीवनातील व्यवहारी तत्त्वज्ञान त्यांच्या अभंगांमधून येते. या अभंगांमध्ये भाविकाचे गुण आहेत. उदा.

कशासाठी ? कोणासाठी ?

चाले अन्तरीं हाकाटी.

हृदयींची आस आस.

चूर झाली सावकाश.

प्रीतिकिर्तीचे डोलारे

गेले कोसळून सारे.

जनतेचा जो भुकेला

तिने केला अर्धा मेला.

झाली जिवाची चाळण,

धीर चालला गळून

बण्डखोर तारुण्याचें

रक्त नसोनसीं नाचे;

परी क्षीण माझ्या मनीं

आस कोठे सञ्जीवनी ? १

इ.स.सन १९४५ ते १९६० या कालखंडात मानवी मूल्यांमध्ये विसंगती निर्माण झाली. मानसिक संघर्ष निर्माण झाला. हा कालखंड नवकाव्याचा आहे. या काळात कविता प्रयोगशील झाली. औद्योगीकरणामुळे नव्या समस्या निर्माण झाल्या. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठयावर होता. यंत्रयुगाची वाढ झाली. या काळातील अभंग लेखन राष्ट्रवादाच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर झालेले आहे. या कालखंडावर प्रभाव असणारे कवी म्हणजे बा. सी. मर्ढेकर होत. इंग्लंड मधील पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी युद्धकालीन अभंग लिहिले. या अभंगांनी मराठी कवितेत अनेक प्रश्न निर्माण केले. ते अभंगांकडे संतांच्या अभिव्यक्तीचा समर्थ

आविष्कार म्हणून पाहतात. त्यांनी विज्ञानाचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांची कविता मानव हा श्रेष्ठ असून त्याच्या बुद्धीच्या जोरावर तो विश्वाचे कोडे उलगडू शकतो हा आशावाद मांडते. तसेच मानवी जीवनातील एकाकीपणा, उदासीनता, जीवनातील वास्तवता, यांत्रिकता, व्यवहारी जीवन, अस्तिकतेचे द्वंद्व, परमशक्तीचा ध्यास, वांझोटी वैज्ञानिक प्रगती, ज्ञान आणि वासना, सामान्य माणसाचे शोषण, धर्मद्वेष, सर्वधर्मसमभाव, मुंबई नगरी, मानवाची मुंग्यांसारखी अवस्था, विज्ञानाची संहारकता या विषयांनी त्यांच्या अभंग रचनेला व्यापक जीवनजाणिवेचे परिमाण दिले आहे. उदा.

सकाळी उठोनी । चहा-कॉफी घ्यावी,
तशीच गाठावी। विज-गाड़ी।।
दाती तृण घ्यावे । हुजूर म्हणून;
दुपारी भोजन। हेची सार्थ ।।
संध्याकाळ होता । भूक लागे तरी,
पोराबाळांवरी । ओकू नये।।
निद्रेच्या खोपटी । काळजीची बिळे,
होणार वाटोळे। होईल ते ।।
कुण्याच्या पायाचा । काही असो गुण;
आपुली आपण। बिडी प्यावी।।
जिथे निघे धूर। तेथे आहे अग्नी;
आम्ही जमदग्नी । प्रेतरुपी।।

मर्ढेकरांनंतर विंदा करंदीकरांनी साम्यवादी जाणिवेतून ‘आततायी अभंग’ लिहिले. त्यांच्या अभंगलेखनातून प्रयोगशीलता व चिंतनशीलता हे विशेष दिसतात. त्यांच्या अभंगांचे शोषणाचे चित्रण, सत्याचा शोध, नीती-अनीती, जीवनातील विसंगतींचे दर्शन घडवणे हे प्रयोजन आहे. आवेशपूर्ण निर्भीड शैलीला उपहास व उपरोध यांची जोड आहे. त्यांच्या अभंगातून मानवी जीवनातील भयानकता, यंत्रवत जीवन, मूल्यव्यवस्था, विश्व आणि मानव, कामगार आणि श्रमजीवी, आस्तिकता, नास्तिकता हे विषय पोटतिडिकेने आले आहेत. या अभंगात देवाच्या विरोधी सूर आहे. माणूस हा देवापेक्षा श्रेष्ठ होऊ शकतो हा आशावाद आहे. शेवटी मानवता ही महत्त्वाची आहे. अभंग विज्ञानवादी आहेत. पायथागोरस, न्यूटन, आईनस्टाईन, पाश्चर, इ. शास्त्रज्ञांचे गुणगान त्यातून येते. भोंदू गुरूचा उपहास करतात. मानवाचे अंती एकच गोत्र आहे हे त्यांचे सूत्र आहे. त्यांचे सारे मागणे मानवासाठी आहे. करंदीकरांचे विज्ञान अध्यात्मिक नाही. अभंग सडेतोड, फटकळ, उत्कट, विडंबनात्मक, उपरोधपूर्ण, योजनाबद्ध आहेत. उदा.

मानवाचे अंती एक गोत्र
मिसिसिपीमध्ये मिसळू दे गंगा;
ऱ्हाईनमध्ये 'नंगा' करो स्नान.
सिंधुसाठी झुरो आमेझान थोर'
कांगो बंडखोर टेम्स साठी
नाईलच्या काठी 'रॉकी' करो संध्या;
संस्कृती अन वंध्या नष्ट होवो.
व्होल्गाचे ते पाणी वाहू दे गंगेत
लाभो निग्रो रेत पांढरीला
माझा हिमाचल धरो अंतर्पट
लग्नासाठी भट वेद्रष्टा !
रक्तारक्तातील कोसळोत भिंती
मानवाचे अंती एक गोत्र
छप्पन भाषांचा केलासे गौरव
तोची ज्ञानदेव जन्मा येवो.
जागृतांनो फेका प्राणांच्या अक्षता
ऐसा योग आता पुन्हा नाही !

## ३.३ समारोप

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाद्वारे आपण मराठी साहित्याच्या आधुनिक कालखंडातील प्रभावाच्या अनुरोधाने काही अभ्यास केला आहे. आधुनिक मराठी साहित्य निर्मितीच्या मागे जे वाङ्मयीन प्रभाव आहेत त्यांचा आढावा आपण घेतला. या आढाव्या दरम्यान आपणास जाणवले की आपण काही साहित्यप्रकार जणू आपल्या मातीत रुजवले आहेत इतके की त्यांचे परकीयपण आपण विसरलो आहोत. काही साहित्यप्रकारात आपल्या भाषेच्या काही उणिवाही आपल्या लक्षात आल्या आहेत.

१) आधुनिक मराठी कवितेवरील विविध प्रभाव अभ्यासले आहेत, ज्यामध्ये आधुनिक मराठी कवितेवरील सुनीत, गझल, हायकू या परकीय भाषांमधून आलेल्या व कालांतराने आधुनिक मराठी कवितेचे अभिन्न अंग बनलेल्या रचनाप्रकारांचा आपल्याला परिचय झालेला आहे.

२) अभंग या मध्ययुगीन मराठीत अत्यंत लोकप्रिय रचनाप्रकाराचा आधुनिक कवितेवरील प्रभाव आपल्याला समजला.

### ३.४ सरावासाठी प्रश्न

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. इंग्रजीतील 'सॉनेट' ह्या काव्यप्रकाराचा मराठीतील अवतार कोणत्या काव्यप्रकाराला म्हटले जाते ?

२. 'मयूरासन आणि ताजमहाल' ही कविता कोणी लिहिली आहे?

४. गझल या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ कोणता ?

५. हायकू या काव्यप्रकाराचे मूळ जपानमधील कोणत्या काव्य प्रकारात सापडते ?

६. मर्ढेकरांनंतर साम्यवादी जाणिवेतून 'आततायी अभंग' कोणी लिहिले ?

७. इंग्लंडमधील पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर युद्धकालीन अभंग कोणी लिहिले ?

८. 'अनामिकाचे अभंग' लिहिणाऱ्या कवीचे नाव काय?

**२. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मराठीतील सुनीत या काव्यरचनेचा आढावा घ्या.

२. गझल ही संकल्पना स्पष्ट करून माधव ज्यूलिअन यांचे गझलरचनेतील योगदान स्पष्ट करा.

३. हायकू या काव्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगून शिरीष पै यांचे योगदान स्पष्ट करा.

**पूरक वाचन :**

१. मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद – तारा भवाळकर

२. गझल : रंग आणि गंध – प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ

३. गज्जलांजली – डॉ. माधव पटवर्धन

४. ओवी ते लावणी – श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

५. मराठी गझल : अर्धशतकाचा प्रवास – संपा. राम पंडित

६. पौराणिक नाट्यसृष्टी – सौ. शकुंतला लिमये

७. हायकूंचे दिवस – शिरीष पै

८. मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड ४ था, महाराष्ट्र साहित्य परिषद

९. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास – डॉ. प्र. न. जोशी

१०. झपूर्झा – संपा. प्रा. वि. म. कुलकर्णी, प्रा. गो. म. कुलकर्णी

११. मर्ढेकरांची कविता – बा. सी. मर्ढेकर

१२. महात्मा फुले यांची कविता – संपा. डॉ. दादा मोरे

१३. जातक – विंदा करंदीकर

## घटक – ४

# प्रभाव चिकित्सा

## ( शेक्सपिअर व इब्सेन यांचा मराठी नाटकावरील प्रभाव, भालचंद्र नेमाडे यांचा मराठी कादंबरीवरील प्रभाव, नामदेव ढसाळ यांचा मराठी कवितेवरील प्रभाव )

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ विल्यम शेक्सपिअर यांचा मराठी नाटकावरील प्रभाव

४.२.२ हेन्रिक इब्सेन यांचा मराठी नाटकावरील प्रभाव

४.२.३ भालचंद्र नेमाडे यांचा मराठी कादंबरीवरील प्रभाव

४.२.४ नामदेव ढसाळ यांचा मराठी कवितेवरील प्रभाव

४.३ समारोप

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ

### ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला –

- प्रभावाची संकल्पना आणि त्याचे स्वरूप समजेल.
- पाश्चिमात्य नाटककार विल्यम शेक्सपिअर आणि हेन्रिक इब्सेन यांचा व त्यांच्या नाटकांचा परिचय होईल.
- विल्यम शेक्सपिअर आणि हेन्रिक इब्सेन यांच्या नाटकांचा मराठी नाटकांवर पडलला प्रभाव जाणून घेता येईल.

- भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीचा परिचय तसेच त्यांचा मराठी कादंबरीवरील प्रभाव पाहता येईल.
- नामदेव ढसाळ यांच्या कवितेची ओळख करून घेऊन ढसाळांच्या कवितेचा मराठी कवितेवर पडलेला प्रभाव तपासता येईल.

## ४.१ प्रस्तावना

प्रत्येक लेखकावर प्रभावक्षेत्राचा परिणाम होत असतो. प्रभाव क्षेत्र देशी किंवा परदेशी असू शकते. देशी प्रभावक्षेत्रामध्ये देशी परंपरा, संस्कृती, समाजजीवन तसेच देशीयतेचे भान असणारे लेखक यांचा समावेश होतो. कोणत्याही प्रभावक्षेत्राचा परिणाम लेखकावर व त्याच्या साहित्यकृतीवर होऊ शकतो. काही लेखक विदेशी प्रभावक्षेत्रातून प्रेरणा घेऊन साहित्यकृतीची निर्मिती करताना दिसतात. विदेशी प्रभावक्षेत्रातून प्रेरणा घेऊन लेखन करणारे लेखक देशी प्रभावक्षेत्राला विसरून परकीय जीवनजाणिवांच्या आहारी जातात. त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतीतील उसनवारी व उचलेगिरी स्पष्टपणे दिसून येते. काही लेखकांवर विदेशी प्रभावक्षेत्राचा परिणाम असतो; परंतु त्यांच्या लेखन प्रेरणा देशी प्रभावक्षेत्रातल्या असतात. साहजिकच, त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतीला व्यापक मूल्याधिष्ठित बैठक प्राप्त होते.

प्रभाव आणि अनुकरण यातील फरकही आपल्याला समजून घेतला पाहिजे. इतर लेखकांचा प्रभाव आणि संस्कार सर्वच पातळीवर पचवून एखादा लेखक आपल्या लेखनाची स्वतंत्रपणे छाप सोडू शकतो आणि लेखक म्हणून नव्या स्वतंत्र अस्तित्वाने नावारूपाला येतो. म्हणून प्रभाव आणि संस्कार पचवण्याची क्षमता असणे तितकेच गरजेचे असते. अन्यथा तो केवळ इतर लेखकांचे अनुकरण करण्यातच स्वतःला धन्य मानेल. असा लेखक लेखक न राहता केवळ कारकून ठरेल. प्रभाव स्वीकारणे गैर नक्कीच नाही. पण अत्यंत डोळसपणे स्वीकारणे गरजेचे असते. अंधानुकरणाने प्रभाव स्वीकारताही येत नाही आणि पचवताही येत नाही.

प्रस्तुत घटकात आपण प्रभाव म्हणजे काय ? याचा विस्तृत परामर्श घेऊन इंग्लंडमधील नाटककार विल्यम शेक्सपिअर आणि नॉर्वेजीअन नाटककार हेन्रिक इब्सेन यांच्या नाटकांचा मराठी रंगभूमीवर पडलेला प्रभाव पाहणार आहोत. आतापर्यंत जगातील कोणाचाच इतका प्रभाव पडला नसेल तितका विल्यम शेक्सपिअर या नाटककाराचा केवळ मराठी रंगभूमीवरच नव्हे तर जगातील जवळ जवळ सर्वच रंगभूमीवर पडला आहे. शेक्सपिअरच्या खालोखाल हेन्रिक इब्सेनचे नाव घेतले जाते. आधुनिक मराठी रंगभूमीची जडण-घडण केवळ इब्सेन प्रभावामुळे झाली आहे. या दोन्ही नाटककारांच्या परिचयाबरोबर त्यांच्या नाटकांचा मराठी नाटकांवर कसा आणि कोणत्या स्वरूपात प्रभाव पडला आहे हे आपण विस्ताराने पाहणार आहोत.

भालचंद्र नेमाडे यांच्या कोसला या कादंबरीने मराठी कादंबरीच्या क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती केली आहे. सर्वच पातळीवर नेमाडेंच्या लेखनवृत्तीचा प्रभाव मराठी कादंबरीकारांवर पडला आहे. १९६० नंतर नामदेव ढसाळ यांनी आपल्या अनवट काव्य शैलीने एकूणच मराठी कवितेला मुळापासून हादरवून सोडले आणि मराठी कवितेची दिशाच बदलून टाकली. ढसाळांच्या अनवट काव्य शैलीचा, अनोख्या प्रतिकांचा आणि प्रतिभेचा १९६० नंतरच्या मराठी कवींवर जो प्रभाव पडला याचाही परामर्श आपण या घटकात घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

प्रभाव म्हणजे सामर्थ्य, शक्ती असा अर्थ आपल्याला शब्दकोशामध्ये पाहायला मिळतो. बुद्धिबळ, चारित्रिक विशेषता आदि के परिणाम स्वरूप पडनेवाला असर (उदा. नैतिक प्रभाव, आदी) प्रभाव चांगला आणि वाईट असा दोन्ही प्रकारचा असू शकतो. उदा. व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव, विचारांचा प्रभाव, भाषेचा प्रभाव, सौंदर्याचा प्रभाव, वातावरणाचा प्रभाव, चित्रपटाचा प्रभाव, औषधांचा प्रभाव, तसेच घटना-प्रसंगांचा प्रभाव अशा अनेक घटकांचा प्रभाव एखाद्यावर होत असतो. तसे पाहिल्यास प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या प्रभावाने कार्य करीत असते.

विशिष्ट भाषिक क्षेत्रातील साहित्यिक, अन्य भाषिक क्षेत्रातील साहित्याच्या आणि साहित्यिकांच्या प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे संपर्कात येतो. त्यावेळी तो त्या साहित्याचा किंवा साहित्यिकांचा जाणीवपूर्वक स्वीकार करतो. त्यांचा प्रभावही स्वीकारतो. ही सहज आणि तितकीच नैसर्गिक प्रक्रिया आहे. एखाद्या साहित्याचा आणि साहित्यिकाचा प्रभाव स्वीकारणे हे कमीपणाचे अथवा दुबळेपणाचे लक्षण असते, असे समजण्याची गरज नाही. त्याच बरोबर प्रभाव स्वीकारतो याचा अर्थ तो साहित्याची अथवा साहित्यिकाची उसनवार अथवा नक्कल करतो, असाही होत नाही. हे खरे की, प्रभाव स्वीकारणाऱ्यांवर परकेपणाचा आरोप होतो. पराभूत वृत्तीचे आणि न्यूनगंडाने पछाडलेले इतरांच्या प्रभावाखाली राहतात, असे मानले जाते. पण यामध्ये तथ्य नाही. साहित्यक्षेत्रात आदान-प्रदान होत असते आणि साहित्यक्षेत्राच्या समृद्धीसाठी ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. साहजिकच प्रभावशीलता साहित्य समृद्धीसाठी विधायकच ठरते.

नवोदित साहित्यिक आपल्या साहित्यिक विकासासाठी विकसित साहित्यिकांचा अथवा साहित्याचा प्रभाव स्वीकारत असतो. अशी पुष्कळ उदाहरणे देता येतील. प्रभाव स्वीकारणे हे साहित्यिकाच्या आणि संपूर्ण साहित्यविश्वाच्या दृष्टीने अपरिहार्य आणि स्वागतार्ह बाब आहे. आपल्या साहित्यक्षेत्रातील विकासासाठी हेतूपुरस्सर प्रभाव स्वीकारणे गैर होत नाही.

प्रभाव केवळ एकाच प्रकारचा असतो असे नाही आणि साहित्याच्या सर्वच अंगांना जाणवतोच असा नाही. अंशतः प्रभाव स्वीकारल्याचीही अनेक उदाहरणे देता येतील. एखादा साहित्यिक एखाद्या साहित्याचा किंवा साहित्यिकाच्या रचनाबंधाचा प्रभाव स्वीकारू शकतो. तसाच तो आशय आणि अभिव्यक्तीपर्यंतही मर्यादित असू शकतो. साम्युअल बेकेटच्या 'वेटिंग फॉर गोदो'तील नाट्याचा प्रभाव पुढे अनेकांनी स्वीकारलेला आहे. अभिजातवाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद यांचाही प्रभाव अनेक साहित्यिकांनी स्वीकारला आहे. साहित्यक्षेत्रात प्रभाव केवळ साहित्याचा आणि साहित्यिकांचाच पडू शकतो असे नाही तर विचारवंतांचा आणि त्यांच्या वैचारिक परंपरेचाही पडू शकतो. उदा. मार्क्सवादी विचारांचा प्रभाव जगातील बहुतांशी साहित्यिकांवर पडलेला दिसून येतो. औद्योगिकरण, यांत्रिकीकरण, जागतिकीकरण यांचाही प्रभाव साहित्यिकांवर होत असतो. एखाद्या घटना-प्रसंगांच्या परिणामांचा प्रभावही साहित्यिकांवर जाणवतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पडझडीचा प्रभाव बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेवर जाणवतो.

भारतातील अनेक साहित्यिकांनी पाश्चिमात्य साहित्यिकांचा आणि साहित्याचा प्रभाव स्वीकारला आहे. शेक्सपिअर, मोलीयर, टॉलस्टॉय, बर्नार्ड शॉ, हेमिंग्वे, ईलियट, शेली, किड्स, इब्सेन इत्यादी अनेक साहित्यिकांचा आणि त्यांच्या साहित्याचा प्रभाव भारतीय साहित्यिकांवर पडलेला आहे – हे जेवढे सत्य आहे तेवढेच भारतातील तत्त्वज्ञानाचा, उपनिषदांसारख्या पौराणिक साहित्याचा पाश्चिमात्य साहित्यिकांच्यावर प्रभाव पडलेला दिसून येतो. दोन्ही बाजूने ही प्रक्रिया होत असते.

केवळ पाश्चिमात्य साहित्याचा आणि साहित्यिकांचा प्रभाव स्वीकारला जातो, असे नाही. भारतातील इतर भाषिक साहित्याचा आणि साहित्यिकांचाच प्रभाव अन्य भाषेतील साहित्यिक मान्य करतात. कालीदासाच्या अनेक नाटकांचा प्रभाव भारतातील अन्य भाषिक साहित्यिकांवर आपल्याला जाणवून येतो. गिरीश कर्नाडांच्या हयवदन नाटकाच्या प्रभावातून विजय तेंडुलकरांनी घाशिराम कोतवाल हे नाटक लिहिले आहे. एकाच भाषिक क्षेत्रातील साहित्याचा आणि साहित्यिकांचाही प्रभाव स्वीकारला जातो. तसेच वयाच्या दृष्टीने कनिष्ठ साहित्यिक ज्येष्ठ साहित्यिकांचाच प्रभाव स्वीकारतात असे नाही तर समकालीन साहित्यिकही एकमेकांचा प्रभाव स्वीकारतात. नामदेव ढसाळांच्यावर त्यांच्या समकालीन असलेल्या दिलीप चित्रेंचा प्रभाव जाणवतो.

प्रस्तुत प्रकरणात पाश्चिमात्य नाटककार विल्यम शेक्सपिअर आणि हेन्रिक इब्सेन यांचा मराठी नाटकावर पडलेला प्रभाव पाहण्याबरोबरच मराठी कादंबरीकार भालचंद्र नेमाडे आणि दलित कवी नामदेव ढसाळ यांचा मराठी कादंबरी आणि कवितेवर पडलेला प्रभाव पाहणार आहोत.

### ४.२.१ विल्यम शेक्सपिअर आणि हेन्रिक इब्सेन यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव

विल्यम शेक्सपिअर हा महान नाटककार जागतिक रंगभूमीच्या इतिहासात होऊन गेला. गेली चारशे वर्षांहून अधिक काळ त्याने जगातील सर्वच रंगभूमी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नाटकांनी प्रभावित करून टाकली आहे. त्याच्यासारखा नाटककार दुसरा होणे शक्य नाही पण त्याच्या तोडीचे नाटककार नक्कीच निर्माण झाले. त्याच्यामध्ये एक महत्त्वाचे नाव म्हणजे हेन्रिक इब्सेन. इब्सेन हा नॉर्वेजीयन नाटककार. त्याच्या स्वतंत्र नाट्यतंत्राच्या प्रभावाने जवळ जवळ सर्वच रंगभूमी प्रभावित झाली आहे. वास्तववादी नाटकांची रचना इब्सेननेच सुरू केली. जे इब्सेनी तंत्र म्हणून परिचित आहे. अशा या दोन्ही महान नाटककारांच्या प्रभावाने मराठी रंगभूमीही प्रभावीत झाली आहे. अशा विल्यम शेक्सपिअर आणि हेन्रिक इब्सेन यांची ओळख आणि त्यांच्या नाटकांचा मराठी रंगभूमीवर पडलेला प्रभाव समजून घेऊ.

#### पाश्चिमात्य नाटककार आणि मराठी रंगभूमी

मराठी रंगभूमीच्या सुरुवातीच्या काळाचा विचार केल्यानंतर असे आढळून येते की, किर्लोस्कर-देवल पर्यंतची मराठी रंगभूमी ही लोकरंगभूमीने प्रेरित होती. विष्णुदासांनी एका विशिष्ट लोकप्रकाराला विधीमुक्त करून मराठीतले पहिले नाटक सादर केले असे म्हटले जाते. त्याचबरोबर किर्लोस्कर-देवलांनी पाश्चिमीकरणाच्या रेट्यातही लोकपरंपरेचे भान काही प्रमाणात राखले हे नाकारता येत नाही. पण त्यानंतरची रंगभूमी (अपवाद संगीत स्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी-लेखक माधवराव जोशी) पूर्णपणे

पाश्चिमात्यांच्या अनुकरणात गुरफटली. सुरुवातीच्या मराठी रंगभूमीची अवस्था वा. ल. कुलकर्णी यांनी वर्णीत केली आहे. मराठी रंगभूमी जेव्हा केव्हा जन्मास येऊ लागली तेव्हा तिने एक हात संस्कृतचा धरला होता तर दुसरा हात इंग्रजीचा धरला होता. तिचे दोन्ही हात प्रारंभीच असे अडकले गेल्यामुळे वर उल्लेख केलेल्या खऱ्या अस्सल मराठी रंगभूमीचा हात धरावयाला तिच्याजवळ हातच उरला नव्हता. पुढे तिने धरलेल्या संस्कृत रंगभूमीचाही हात सुटला व ती केवळ इंग्रजीच्या मदतीनेच वाटचाल करू लागली. (मराठी नाटक आणि रंगभूमी, संपा. वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३)

सुरुवातीला मराठी रंगभूमीवर फार्सच्या निमित्ताने पाश्चिमात्य प्रभावाने चंचूप्रवेश केला. हा चंचूप्रवेश वाढत जाऊन पुढे पूर्णपणे पाश्चिमात्य प्रभावानेच मराठी नाटके सादर झालीत. हा बुकीश नाटकांचा कालखंड म्हणून ओळखला जतो.

महाराष्ट्राला पाश्चिमात्य नाटककारांचा परिचय होण्याचे आणखी एक कारण घडले आणि ते म्हणजे 'दक्षिणा प्राईज कमिटी'. आपलं सांस्कृतिक साम्राज्य अबाधित राहण्यासाठी आपल्या वाङ्मयाचा प्रसार मोठ्या प्रमाणात भारतात होणे आवश्यक होते. पुणे आणि मुंबई ही दोन शहरं सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठरल्याने या शहरात इंग्रजी वाङ्मय मराठीत मोठ्या प्रमाणात अनुवादित व्हावं या हेतूने दक्षिणा प्राईज कमिटीची स्थापना करण्यात आली. उत्कृष्ट अनुवादित साहित्याला बक्षिसे मिळू लागलीत. पैशाच्या लोभाने अनेक सुशिक्षितांनी मोठ्या प्रमाणात इंग्रजी वाङ्मयाचा मराठी अनुवाद करायला सुरुवात केली. इंग्रजी नाटके मराठीत येण्याचे आणखी एक कारण घडलं ते म्हणजे, ब्रिटिशांनी मुंबईत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पहिले नाट्यगृह बांधले. त्यानंतर मुंबई हेच ब्रिटिशांचे राजकीय, सांस्कृतिक चळवळीचे केंद्र बनले आणि मेकॉलेच्या म्हणण्यानुसार कला, नीतिमूल्ये, वाङ्मय आणि कायदे यांचे कधीही नष्ट न होणारे साम्राज्य स्थिर झाले व इथूनच मराठी रंगभूमी इंग्रजांच्या विशेषतः शेक्सपिअरच्या नाटकांनी प्रभावित झाल्याचे दिसून येते व ज्याला पाश्चिमात्यांचा प्रभाव म्हणता येईल अशी मराठी नाटके सादर होऊ लागली.

मराठी संगीत नाटकांना आपण सुवर्णकाळ म्हणतो; ती संगीत नाटकेही पाश्चिमात्य प्रभावातून सुटली नाहीत. मूळ आशय-विषय पाश्चिमात्य आणि वरील आवरण मराठी परंपरेचं, मराठी संगीताचं, अशा काही विचित्र पद्धतीतून मराठी नाटके सादर झाली. किर्लोस्कर आणि देवल ही संगीत नाटकातील महत्त्वाची नावे, पण किर्लोस्करांचं 'शाकुंतल' हे 'सिंबेलाईन' या नाटकाच्या प्रभावातून सादर झालेले नाटक आहे हे नाकारता येत नाही. देवलांचं 'संशयकल्लोळ' मोलियरच्या 'गानारेल' या नाटकाच्या प्रभावातून साकार झालेलं आहे. 'फाल्गुनराव हा मूळचा विलायतीच' असे देवल सांगतात. याबरोबरच या नाटकाला ऑर्थर मर्फीच्या 'ऑल इन द राँग' या फार्सचीही जोड आहे. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावातून साकार झालेलं नाटक शोधायचे झाले तर 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकाकडे पाहावे लागते. वि. ज. किर्तने यांनी इंग्रजी पदवी प्राप्तीनंतर हे नाटक लिहिले आहे. पाश्चात्त्य शोकनाट्याचे मराठीकरण करण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रयोग

होता. थोरले माधवरावची संरचना चार अंकी व अनेक दृश्यात्मक असून ती प्रसिद्ध इंग्रजी नाटककार शेक्सपिअरच्या शोकनाट्य संकल्पनेशी जैविक नाते स्पष्ट करते. याच दरम्यान टॉमस सर्दन या नाटककाराच्या 'द फेटल मॅरेज' या शोकांतिकेचे 'दुर्गा' या नावाने नाटक रंगभूमीवर सादर झाले आहे.

एकूणच मराठी रंगभूमीवरील पाश्चिमात्य प्रभावाची कारणे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्वरूपाची आहेत.

## विल्यम शेक्सपिअर

विल्यम शेक्सपिअर या अद्वितीय नाटककाराची मोहिनी आजही जगातील जनसमूहावर दिसून येते. जगातील बहुतांशी देशात त्याच्या चरित्रावर आणि साहित्यावर चर्चा घडून येते. जगातील कोणत्याही लेखकाबद्दल इतके अव्याहत लेखन आतापर्यंत तरी झाले नाही आणि पुढेही होण्याची शक्यता कमी आहे. इतरांवर आपला प्रभाव टाकणारा शेक्सपिअर सारखा साहित्य-कलावंत गेल्या चारशे वर्षांत झाला नाही. गेली चारशे वर्षे सातत्याने जगातील अनेकांना शेक्सपिअरनी, त्याच्या नाटकांनी आणि त्याच्या नाटकातील व्यक्तिरेखांनी प्रभावित करून टाकले आहे. जगातील अपवादात्मक अशी आश्चर्यचकित करून टाकणारी ही गोष्ट आहे. शेक्सपिअर आणि त्याच्या नाटकाबद्दल जगातील सर्वच भाषांमधून सातत्याने लिखाण होत असते. जगातल्या सगळ्याच महत्त्वाच्या प्रतिष्ठित ग्रंथालयात शेक्सपिअर वाचायला मिळतोच मिळतो. त्याच्या नाटकाची सर्वच भाषेत भाषांतरे झाली आहेत हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्याच्या नाटकावर सातशेहून अधिक सिनेमे झाले आहेत. कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. शेक्सपिअरने निव्वळ नाटककारांनाच नाही तर कवी, लेखक, कलावंत, सिनेमा दिग्दर्शक, विचारवंत, संशोधक, शिक्षक-प्राध्यापक एवढेच नाही तर फ्रॉईडसारख्या मानसशास्त्रीय तत्त्ववेत्यांनाही प्रभावित करून सोडले आहे. फ्रॉईड त्याच्या थिअरीसाठी शेक्सपिअरच्या नाटकातील व्यक्तिरेखांचा आधार घेत असे. शेक्सपिअरचा प्रभाव इतका दिसून येतो की, युरॅनसच्या २७ उपग्रहांपैकी बऱ्याच उपग्रहांना त्याच्या नाटकातली व्यक्तिरेखांची नावे दिली आहेत.

अशा शेक्सपिअरचे सुसंगत चरित्र मात्र सापडत नाही. १७०९ साली निकलस रो ह्याने शेक्सपिअरच्या नाटकाची आवृत्ती प्रसिद्ध केली. त्यामध्ये शेक्सपिअरच्या चरित्राचे संक्षित टिपणही जोडले आहे. पण ते चरित्रही ऐकीव माहितीच्या आधावरच आहे. यानुसार इंग्लंडमधील वॉरिक परगण्याच्या दक्षिण भागातल्या स्ट्रॅटफर्ड-ऑन-एव्हन ह्या गावातल्या संपन्न आणि प्रतिष्ठित घराण्यात विल्यम शेक्सपिअर याचा जन्म झाला. जॉन आणि मेरी शेक्सपिअर या दांपत्याला एकूण आठ अपत्ये झाली. त्यापैकी विल्यम शेक्सपिअर हे त्यांचे तिसरे अपत्य. २६ एप्रिल १५६४ साली त्याचा बाप्तिस्मा झाल्याची नोंद स्ट्रॅटस्फर्ड मधील चर्चच्या दफ्तरी आहे. यावरून त्याचा जन्म तीन दिवसांपूर्वी म्हणजे २३ एप्रि ल रोजी झाला असे समजण्यात येते. आणि त्याच तारखेला म्हणजे २३ एप्रिल १६१६ साली तो मत्यू पावला.

शेक्सपिअर व त्याच्या अनेक नाटकांनी अनेकांवर प्रभाव टाकला आहे, हे एक जगातील अनेक सत्यांपैकी एक सार्वजनिक सत्य. पण खुद्द शेक्सपिअरवर १५८० च्या दरम्यान नाटके लिहिणाऱ्या टॉमस किड,

ख्रिस्टफर मार्लो आणि जॉन लिली या नाटककारांच्या नाट्यलेखनाचा प्रभाव होता. ख्रिस्टफर मार्लोचे 'टम्बुर्लेन' या नाटकांमुळेच शेक्सपिअर नाट्यलेखनाकडे वळला असे म्हटले जाते. त्याच्या जगप्रसिद्ध 'हॅम्लेट' आणि 'टायटस अँड्रोनिकस' या नाटकांवर टॉमस किडच्या 'दी स्पॅनिश ट्रॅजेडी' या नाटकाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. तर शेक्सपिअरच्या 'अ मिडसमर नाईटस् ड्रिम', 'अॅज यू लाईक इट', 'ट्वेल्थ नाईट' या नाटकांवर जॉन लिली या नाटककारांच्या नाट्यलेखनाचा प्रभाव दिसून येतो. याबरोबर त्यावेळचे लेखक होमर, सिसेरो, व्हर्जिल प्लुटार्क आदींच्या लेखनाचा आणि त्यावेळच्या प्रचलित दंतकथा, पुराणकथांचा प्रभाव जाणवतो.

शेक्सपिअरने सुखांतिकांपासून ते शोकांतिकांपर्यंत एकूण सदतीस नाटके लिहिली. अटळ नियती आणि नियतीने निर्माण केलेल्या परिस्थितीत मानवी जीवनाची झालेली ससेहोलपट हे शेक्सपिअरच्या शोकनाट्याच्या केंद्रस्थानी आहे. नियतीपुढे माणसाचा दारूण पराभव का व्हावा ? या चिंतनातूनच त्याने शोकनाट्ये लिहिली. अटळ दुःखमय आणि वेदनादायी परिस्थितीतही माणसाचं माणूसपण जपण्याचा प्रयत्न शेक्सपिअरने आपल्या शोकनाट्यातून केला आहे. तर मानवी जीवन अधिक सुखी आणि सुसंपन्न व्हावं त्यासाठी नवी जीवनमूल्ये शोधण्यासाठी त्याने सुखात्मिक नाटके लिहिली. या सुखांतिकामध्ये 'द कॉमेडी ऑफ एरर्स', 'द टेमिंग ऑफ द श्रु', 'ए मिड समर नाईट्स ड्रिम' आदी नाटकांचा समावेश होतो. तर 'रोमिओ अँड ज्युलिएट', 'हॅम्लेट', 'ज्युलियस सीझर', 'मॅकबेथ', 'ऑथेल्लो', 'किंग लिअर आणि अँटनी' आणि 'क्लिओपात्रा' ही जगातील सर्वोत्कृष्ट शोकांतिक नाटके लिहिली आहेत.

'जो उत्तम शोकांतिका लिहू शकतो, तोच उत्तम सुखांतिकाही लिहू शकत असला पाहिजे' हा सॉक्रेटिस आणि प्लोटो यांनी मांडलेला विचार फारच थोड्या लेखकांच्या बाबतीत खरा ठरला. त्यामध्ये शेक्सपिअरचा अग्रक्रमाने समावेश करावा लागेल.

शेक्सपिअरची जडण-घडण ग्रामीण भागात झाल्याने बोली भाषेची लवचिकता त्याला निसर्गतः प्राप्त झाली होती. तसेच लोकसाहित्याचा प्रभाव लहानपणापासूनच असल्याने त्याच्या नाटकात राजे, राण्या, पऱ्या, चेटकिणी, भूते याबरोबर सर्वसामान्य शेतमजूर, चर्मकार, विणकर इत्यादी व्यक्तिरेखा येतात. शेक्सपिअरने इंग्रजी साहित्याचा दर्जा उंचावलाच पण त्याचबरोबर इंग्रजी भाषेला शेकडो नवीन शब्द पुरवून भाषा समृद्ध केली. अनेक दृष्टीने शेक्सपिअरचे ऋण आपल्याला मान्य करावे लागते. त्यांची शोकनाटके काव्यमय भाषेत आहेत. अर्थात काव्याची आतषबाजी आणि आपल्याकडे किती काव्य प्रतिभा आहे जगाला दाखवून देण्यासाठी त्याने आपल्या व्यक्तिरेखांच्या तोंडी काव्यमय भाषा दिली नाही, तर मानवी मनाचा शोध घेताना त्याच्या असे लक्षात आले की, मानवी मनाचे तलस्पर्शी भाव काव्यातूनच अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त होऊ शकतात. या जाणिवेतूनच त्याने आपली शोकनाटके काव्यमय भाषेतून लिहिली.

## शेक्सपिअर आणि त्यांची नाटके

शेक्सपिअरने शोकात्मिक आणि सुखात्मिक स्वरूपात एकूण सदतीस नाटके लिहिली आहेत. या ठिकाणी त्यांच्या सर्व नाटकांचा ऊहापोह न करता काही प्रमुख नाटकांचा विचार केला आहे.

### द कॉमेडी ऑफ एरर्स

'द कॉमेडी ऑफ एरर्स' हे सुखात्मिकेतील सर्वोत्कृष्ट नाटक. समान दिसणाऱ्या दोन-दोन जुळ्यांची लहानपणी ताटातूट होते आणि तरुणपणात ते एकत्र येतात. एक मालक आणि दुसरा नोकर अशी समान दिसणारी जोडी जेव्हा एकत्र येतात तेव्हा कोण कुणाचा मालक आणि कोण कुणाचा नोकर हे न समजल्यामुळे मजेशीर गोंधळ उडतो.

### रोमिओ अँड ज्युलिएट

'रोमिओ अँड ज्युलिएट' ही इटालीयन प्रेमकथा. या कथेवर आधारित विल्यम पेंटरनी 'पॅलेस ऑफ प्लेझर' हे गद्यनाटक १५६७ साली लिहिले होते. यावरूनच शेक्सपिअरने 'रोमिओ अँड ज्युलिएट' हे नाटक रचले. रोमिओ आणि ज्युलिएट या दोघांच्या घराण्यामधील पिढीजात वैर. पण दोघांचे एकमेकांवर उत्कट प्रेम आणि प्रेमासाठी त्यांनी स्वीकारलेला मृत्यू. त्यानंतर दोघांच्या आई-वडिलांनी घराण्यातील मिटवलेले वैर. कथेतील हा पैलू शेक्सपिअरला भावला आणि त्याने यावर नाटक लिहिले. शेक्सपिअरला माणसांना जोडणारे प्रेम आणि माणसांना तोडणारा द्वेष यांच्यातला संघर्ष दाखवायचा होता आणि शेवटी प्रेमाचा झालेला विजय दाखवायचा होता. या हेतूने प्रेरित होऊन त्याने हे नाटक रचले व ते कमालीचे यशस्वी झाले. केवळ पाच दिवसाचे हे नाटक. साहजिक कथेला आपोआप वेग मिळाला व ते प्रेक्षकांना उत्कंठा वाढविणारे ठरले. प्रेमीयुगुलांची ही शोकांतिका शेक्सपिअरच्या लेखनशैलीमुळे संपूर्ण जगात अजरामर ठरली.

### हॅम्लेट

हॅम्लेट हे शेक्सपिअरचं सर्वात जास्त गाजलेलं आणि चर्चीलं गेलेलं नाटक. यापूर्वी शेक्सपिरने 'Titus Andronicus' हे नाटक लिहिलं होतं. पण फारच रक्तरंजित आणि प्रक्षोभक स्वरूपाचं असल्याने ते यशस्वी झाले नाही. पण माणसाची सूड प्रवृत्ती शेक्सपिअरच्या डोक्यातून जात नव्हती. पुढे सूडप्रवृत्त माणसाच्या मनाचा आणि त्याच्या नीतिमूल्यांचा शोध घेताना त्याला हॅम्लेट सुचले आणि अ‍ॅम्लेथ या पुराणकथेवरून त्याने हॅम्लेट हे नाटक लिहिले. एक दर्जेदार लोकप्रिय शोकांतिका म्हणून या नाटकाकडे पाहिले जाते. नाटकातील नाटक हा नवा प्रयोगही शेक्सपिअरने या नाटकाच्या माध्यमातून केलेला दिसून येतो. 'मर्डर ऑफ गोंझॅगो' हे नाटक हॅम्लेट आपल्या चुलत्यापुढे सादर करतो व आपल्या बापाचा खून त्यानेच केला आहे हे अप्रत्यक्षपणे सुचवू पाहतो.

साहजिकच या नाटकावर आत्तापर्यंत सगळ्यात जास्त लिहिलं आणि बोललं गेलं आहे. 'टू बी ऑर नॉट टू बी' हे हॅम्लेटचं स्वगत प्रचंड गाजले. तसेच 'Frailty, thy name is women' (दुर्बलते तुझंच

नाव स्त्री) यासारखे संवाद इंग्रजी भाषेत लोकप्रिय वाक्‌प्रचार झालीत. जगातील अनेक भाषांमध्ये या नाटकाचे भाषांतर झाले आहे.

**ज्युलिअस सीझर**

'ज्युलिअस सीझर' हे नाटक १५९९ साली रंगमंचावर आले. त्यावर्षी घडलेल्या आणि साऱ्या इंग्लंडला अस्वस्थ करून टाकणाऱ्या घटनांची पार्श्वभूमीवर हे नाटक शेक्सपिअरने लिहिले आहे. 'सत्तेसाठी संघर्ष' हे नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. कर्तव्यनिष्ठ आणि कर्तबगार अशा सत्ताधिशाला सिंहासनावरून खाली खेचल्यानंतर सबंध राष्ट्राचे कसे नुकसान होते हे या नाटकातून तीव्रपणे दिसून येते. अमानवी सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर शेक्सपिअरने मानवी स्वभावाची वृत्ती-प्रवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे आणि यातच शेक्सपिअरचे मोठेपण लक्षात येते.

शेक्सपिअरचे संवाद हे केवळ नाटकापुरतेच मर्यादित राहत नाहीत. तर ते वैश्विक होतात. व्यक्तिरेखांबरोबर संवादांनाही व्यवहारातील दाखल्यांचे स्वरूप प्राप्त होते. उदाहरणार्थ, या नाटकातील 'You too Brutus'. हा संवाद विश्वासघातकीपणाचे निदर्शक ठरला आहे. कोणत्याही विश्वासघातकी माणसाला 'ब्रुटस्' असे म्हटले जाते. 'सर्व दिशांना दया दाखवून ब्रुटस् माझी हत्याच करणार असेल तर मीही सीझर होणार नसतो'. या ग्रेसच्या कवितच्या ओळी याच निदर्शकातून आल्या आहेत.

शेक्सपिअरने ब्रुटस्‌च्या माध्यमातून स्वतःच्या विरोधात उभे राहणाऱ्या माणसाचे चित्र समर्थपणे रेखाटले आहे. या नाटकातील ब्रुटस् हे खलपात्र. पण शेक्सपिअर ते तसे रंगवत नाही. सीझरची हत्या करणारा ब्रुटस् दुष्ट नाही तर तो हळवा आहे. वस्तुस्थितीपासून तो अनभिज्ञ आहे, एवढंच.

**मॅकबेथ**

'मॅकबेथ' हे शेक्सपिअरचं २८ प्रवेश असलेलं पण लांबीने छोटं ठरलेलं नाटक. एक उत्तम पण लहान शोकांतिका म्हणून हे नाटक ओळखले जाते. १६०६ साली ते रंगमंचावर आले. इंग्लंडची राणी एलिझाबेथच्या निधनानंतर स्कॉटलंडचा राजा जेम्स हा इंग्लंड आणि स्कॉटलंडचाही राजा झाला. त्याचा भूताखेतांवर प्रचंड विश्वास होता. या कारणाने त्याचे ऑक्सफर्ड विद्यापीठात तीन विद्यार्थ्यांनी चेटकिणीच्या पेहराव्यात सामोरे येऊन स्वागत केले होते. याच जेम्सच्या पार्श्वभूमीवर शेक्सपिअरने 'मॅकबेथ' हे नाटक लिहिले आहे. यात राजा जेम्सच्या चेटुक विद्याविरोधी मताचा हिरीरीने पुरस्कार केला आहे. पण आपण म्हणजे राजा हा देवाचा अंश असतो या जेम्ससारख्या राजाच्या धारणेमुळे केवळ दुःखच कसे वाट्याला येऊ शकते याचे प्रभावी चित्रण या नाटकात शेक्सपिअरने केले आहे. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे मॅकबेथसारख्या माणसाचं भलेपण जितक्या स्पष्टपणे दाखवतो त्याचप्रमाणे माणसातला हिडीसपणाही तितक्याच रोखठोकपणे मांडतो. या बरोबरच राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळे एक स्त्री किती दुष्ट, क्रूर आणि कठोरपणे वागू शकते हे या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे.

**ऑथेल्लो**

गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तीला शोकांत नाटकाचा नायक करण्याची इच्छा शेक्सपिअरला होती. याच दरम्यान त्याला सिंथिओ नावाच्या एका इटालियन लेखकाचे लॅटिन भाषेतील शंभर नीतिकथांचे पुस्तक वाचायला मिळाले आणि त्याला हवा असलेला दुष्ट प्रवृत्ती नायक सापडला. हा आफ्रिकन मूर जमातीचा कृष्णवर्णीय. शेक्सपिअरने त्याचे ऑथेल्लो असे नामकरण केले. आपल्या कर्तृत्वाने त्याने गोऱ्या फलटणीचे सेनापतीपद मिळवलेले असते आणि यामुळे डेस्डिमोना ही उच्चकुलीन गौरवर्णीय तरुणी त्याच्याशी लग्न करते. पण मुळात दुष्ट प्रवृत्तीचा असलेला ऑथेल्लो नोकराच्या सांगण्यावरून आपल्या गौरवर्णीय पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतो आणि तिचा खून करतो असे ढोबळ स्वरूपाचे कथानक. पण कृष्णवर्णीय आणि गौरवर्णीय या दोन संघर्षाची पार्श्वभूमीमुळे या नाटकाला वेगळे परिमाण प्राप्त करून देते.

**किंगलिअर**

शेक्सपिअरच्या कारकिर्दीत 'किंगलिअर' या नाटकाचे एक वेगळे स्थान आहे. एका सार्वभौम राजाची कौटुंबिक पातळीवर झालेली दारुण शोकांतिका या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. मानवी जीवनाची अतिदारुण शोकांतिका म्हणून 'किंगलिअर' या नाटकाकडे पाहावे लागते. आपल्या जीवाभावाच्या व्यक्तीचा चेहरा कल्पना करणार नाही इतका विपरित आहे, हे लक्षात आल्यावर एखाद्याच्या दुःखाला, वेदनेला अंत उरत नाही आणि मग तो भ्रमिष्ट होतो आणि मग मानवी जीवनाची अतीदारुण शोकांतिकेकडे वाटचाल सुरू होते, हे शेक्सपिअरला दाखवायचे आहे. पोटच्या मुलीने अपेक्षाभंग केल्यानंतर ठार वेडा झालेला म्हातारा म्हणजे किंगलिअर. नाटकाचा प्रभाव अधिक व्यापक आणि गडद करण्यासाठी शेक्सपिअरने राजा लिअरच्या दुःखाबरोबर पोटच्या पोराकडून जीवनातून उठला गेलेला ग्लॉस्टर या उमरावाची कर्मकहाणीही मांडली आहे. एक भव्य शोकांतिका आणि एक भव्य नाटक म्हणून 'किंगलिअर'चा गौरव केला जातो.

**शेक्सपिअरच्या नाटकांचा मराठी नाटकांवर पडलेला प्रभाव**

भारतीय शिक्षणात शेक्सपिअरच्या नाटकांना सुरुवातीपासून स्थान होतं. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास या पहिल्या तीन विद्यापीठांच्या स्थापनेनंतर तर शेक्सपिअर भारतीय शिक्षणाच्या केंद्रस्थानी राहिला. १९३५ साली लॉर्ड मेकॉलेच्या शिफारशीनुसार इंग्रजी माध्यमातून शिक्षण सक्तीचे करण्यात आले. ब्रिटिशांना कारकून तयार करण्यासाठी इंग्रजी शिक्षण देणे क्रमप्राप्त होते. याबाबत मेकॉलेची भूमिका स्पष्ट होती. ते लिहितात... ''आपण आणि आपण ज्यांच्यावर राज्य करतो ती लाखो लोकं, यांच्यात दुभाषा म्हणून काम करेल, संवाद चालू ठेवू शकेल असा वर्ग तयार करणे ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. असा वर्ग जो त्याच्या रक्ताने व रंगाने भारतीय असेल, पण त्याची आवडनिवड, मते, नीतिमूल्ये आणि बुद्धी इंग्रजी असेल.'' पुढे असा वर्ग तयारही झाला आणि या अभ्यासक्रमात शेक्सपिअरच्या नाटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवरच नव्हे तर अगदी सनदी नोकरशाहीच्या परीक्षेतसुद्धा शेक्सपिअरच्या नाटकांचा समावेश केला. साहजिकच भारतीय उपखंडावर शेक्सपिअरचा प्रभाव पडला.

याच दरम्यान मुंबईत नाट्यगृहे बांधण्यात आली. या नाट्यगृहातून परदेशी नाटक कंपन्यानी शेक्सपिअरच्या नाटकांचे काही प्रयोग केले. तत्पूर्वी शेक्सपिअर वाङ्मयाच्यारूपाने महाराष्ट्राला परिचित झाला होता. शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' नाटकाचे १८६७ साली महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी भाषांतर केले. शेक्सपिअरच्या नाटकाचे हे मराठीतील पहिले भाषांतर. पुढे शेक्सपिअरच्या नाटकांची भाषांतरे आणि रूपांतरे करण्याची चढाओढच लागली.

'कॉमेडी ऑफ एरर्स' या नाटकावरून आ. वि. पाटकरांनी १८७६ साली मराठीत 'भुरळ' अथवा 'ईश्वरीकृत लपंडाव' हे नाटक लिहिले. तसेच ब. रा. प्रधानांचं 'भ्रांतिकृत चमत्कार', शामराव ओक यांचं 'गड्या आपला गाव बरा' अशी नाटके निर्माण झालीत. तर गुलजार दिग्दर्शित 'अंगुर' हा हिंदी सिनेमाही आला होता.

'रोमिओ अँड ज्युलिएट' या नाटकाचे मराठीत आत्तापर्यंत 'संगीत ताराविलास' (दत्तात्रय केसरकर), 'संगीत शशिकला' आणि 'रत्नपाल' (नारायण कानिटकर), 'प्रतापराव आणि मंजुळा' (एकनाथ मुसळे), 'संगीत शालिन' (तुकाराम जावजी), 'रोमिओ ज्युलिएट' (मंगेश पाडगांवकर), 'मोहनतारा', 'संगीत तारा विलास' आणि 'प्रेमाचा कळस' (खंडेराव बेलसरे) अशी जवळ जवळ अनेक भाषांतरे आणि रूपांतरे झाली आहेत. तर जगाच्या पातळीवर सहा दर्जेदार सिनेमे निघाले आहेत. अलीकडे 'राम लीला' हा हिंदी चित्रपट 'रोमिओ ज्युलिएट' या नाटकाच्या प्रभावातून निर्माण झाला आहे. या नाटकाचा प्रभाव केवळ साहित्य आणि कलेच्या पातळीवरच झाला असे नाही तर तो मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय पातळीवरही झाला आहे.

'हॅम्लेट'वरून गोपाळ गणेश आगरकरांनी 'विकारविलसित' हे नाटक लिहिले आहे. 'वीरसेन' हे गोविंद वासुदेव कानिटकर, नानासाहेब जोगांनी 'हॅम्लेट'चे गद्यस्वरूपात नाट्यरूपांतर केले आहे. त्यात नानासाहेब फाटक हॅम्लेटची खूप छान भूमिका करायचे. याबरोबर हिंमत बहाद्दूर (आनंद बर्वे) हॅम्लेट या नावाने अनुक्रमे भा. द. खरे, परशुराम देशपांडे, प्रभाकर देशपांडे तर अलीकडे सुमीत राघवन यांनी हॅम्लेटचा प्रयोग केला आहे. गांधी चित्रपटात पहिल्या बॅरॉन आयर्विनची भूमिका साकारणारे जॉन गिलगुड यांनी रंगविलेला हॅम्लेट जगातील सर्वोत्तम मानला जातो. आत्तापर्यंत हॅम्लेट या नाटकावर सहा सिनेमे निर्माण झाले. १९४८ साली तयार झालेल्या चित्रपटाला ऑस्करही मिळाले आहे. विशाल भारद्वाज दिग्दर्शित 'हैदर' हा एक चित्रपट हॅम्लेटवर आधारित आहे.

'मॅकबेथ'वरून मराठीत 'डाकिणी विलास' (ल. ना. जोशी), 'मानाजीराव' (शिवराम परांजपे) तर वि. वा. शिरवाडकरांनी 'राजमुकूट' या नावांनी 'मॅकबेथ'चं रूपांतर केले आहे. अलीकडे अजय आरोसक यांनी हॅम्लेटचे रूपांतर केले आहे. विशाल भारद्वाज याने या नाटकावर 'मकबूल' हा चित्रपट बनवला आहे.

'ज्युलियस सीझर' या नाटकाचे मराठीत काशिनाथ नातू यांनी १८७२ साली 'विजयसिंह' या नावाने भाषांतर केले आहे. तर 'ज्युलियस सीझर' या नावाने अनुक्रमे रामकृष्ण पावसकर, खंडेराव बेलसरे, मा. ना. कुलकर्णी, अनंत कुलकर्णी, भा. द. खेर आणि मंगेश पाडगांवकर यांनी भाषांतर केले आहे.

'किंगलिअर' या नाटकाचे मराठीत शंकर मोरो रानडे यांनी १८८१ साली 'अतिपीडचरित्र' तसेच 'कन्यापरीक्षण' (गो. स. मोरे), 'विकारविहार' (ल. ना. जोशी), 'सम्राट सिंह' (प्र. के. अत्रे १९७३) तर १९७४ रोजी 'राजा लिअर' या नावाने विंदा करंदीकरांनी भाषांतर केले आहे.

वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' नाटकाचे कथानक शेक्सपिअरच्या 'किंगलिअर' नाटकाच्या कथानकाशी समांतर पद्धतीने जाते. किंगलिअर एका राजाची शोकांतिका ठरते तर नटसम्राट एका नटाची शोकांतिका ठरते. नटसम्राटमध्ये अनेक स्वगतं आहेत. जे सरळ सरळ किंगलिअरमधील स्वगताचे रूपांतर वाटावे इतके साम्य जाणवते. गाभा तोच अभिव्यक्ती वेगळ्या धाटणीची.

.... सारं जग सापासारखं उलटल्यावर राजा लिअर काय म्हणाला होता – आठवतंय? (उठतो आणि लिअरच्या आविर्भावात म्हणतो....

– हे स्वर्गस्थ शक्तींनो,

द्या खडकाची अभेद्यता माझ्या मनाला

मला हवं आहे सामर्थ्य सहन करण्याचं

फक्त सहन करण्याचं

(नटसम्राट : वि. वा. शिरवाडकर)

कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांच्यावरही इतरांसारखा शेक्सपिअरचा प्रभाव होता. १८९३ साली त्यांनी 'सवाई माधवरावाचा मृत्यू' हे स्वतंत्र नाटक लिहिले. पण या नाटकावर शेक्सपिअरच्या नाटकातील हॅम्लेट आणि इयागो (ऑथेल्लो नाटकातील खलनायक) या दोन व्यक्तिरेखांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. राम गणेश गडकरी यांच्यावर शेक्सपिअरच्या नाटकांचा प्रभाव होता. गंगाधर गाडगीळ ज्याला मराठीतील सर्वोत्तम शोकात्मिका म्हणतात ते त्या 'एकच प्याला' या नाटकावर शेक्सपिअरच्या शोकनाट्याचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. वसंत कानेटकरही शेक्सपिअरच्या प्रभावातून सुटले नाहीत. त्यांच्या 'वेड्याचे घर उन्हात' नाटकावर शेक्सपिअरच्या नाटकातील व्यक्तिरेखांचा प्रभाव दिसून येतो. तर 'गगनभेदी' या नाटकात तर किंगलिअर, हॅम्लेट आणि ऑथेल्लो यांची एकत्रित शोकांतिका आहे.

अलीकडेच शेक्सपिअरच्या 'ए मीड समर ड्रीम नाईटस्' या नाटकाचे 'ऐन वसंतात अर्ध्या रात्री' या नावाने नाटक रंगभूमीवर आले. राजीव नाईक यांनी त्याचे रूपांतर केले होते. तर दिग्दर्शक विजय केंकरे होते. त्याचबरोबर याच नाटकाची मध्यवर्ती कल्पना घेऊन 'जादू तेरी नजर' या नावाने रत्नाकर मतकरी यांनी रूपांतर केले आहे.

**समारोप**

एकूणच सर्व पाश्चिमात्य नाटककारांच्या तुलनेत शेक्सपिअर आणि त्याच्या नाटकाचा प्रभाव आपल्याला जास्त आढळून येतो. मराठीतील बहुतांशी नाटककारांना शेक्सपिअरच्या नाटकांची भुरळ पडलेली दिसून येते. केवळ नाटककारच नव्हे तर कादंबरीकार, कवी मानसोपचार तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलावंत, चित्रपट दिग्दर्शक इत्यादी अनेकांना शेक्सपिअरने प्रभावीत केले आहे.

## ४.२.२ हेन्रिक इब्सेन

शेक्सपिअरच्या तोडीचा नाटककार म्हटले गेले तो म्हणजे नॉर्वेचा प्रसिद्ध नाटककार हेन्रिक योहान इब्सेन. शेक्सपिअरच्या बरोबरीने इब्सेनचे नाव गौरवाने घेतले जाते. अर्वाचीन मराठी नाटकाशी आणि साहित्याशी इब्सेनचे अतूट नाते आहे. आधुनिक रंगभूमीच्या शिल्पकाराचे सारे श्रेय इब्सेनला दिले जाते. त्याच्या नाटकाने त्यावेळी मरगळ आलेल्या पाश्चिमात्य रंगभूमीला नवी टवटवी आणली. म्हणूनच त्याला आधुनिक नाटकाचा जनक म्हटले जाते. इब्सेन आणि त्याच्या नाटकांनी सामाजिक गरजांपेक्षा माणसाला काय वाटते याला अधिक महत्त्व दिले. माणसांची सद्सद्विवेकबुद्धी आणि त्याची इच्छा–आकांक्षा इब्सेनने आपल्या नाटकातून अधोरेखित केली. समाज काय म्हणतो यापेक्षा माणसाने आपल्याला पटेल असे वागले पाहिजे या नवनैतिक मूल्यांचा त्याने आपल्या नाटकातून विशेष पुरस्कार केला. फ्रॉईडच्याही आधी त्याने मुक्त जीवन पद्धतीचा आग्रह धरला होता. १८८० च्या नॉर्वेतील राजकीय संघर्षाचा आणि स्थित्यंतराचा परिणाम इब्सेन आणि त्याच्या नाटकावर दिसून येतो. तत्कालीन डॅनिश कवी ॲडम योलेनश्लेगर, कथालेखक मॉरित्स हान्सेन तसेच योहान वालहावेन, कामिला कोलेत आणि डॅनिश तत्त्वज्ञ स्योरेन किर्केगार यांच्या अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव इब्सेन वर झालेला दिसून येतो. रोमँटिक विचारातून जीवनाच्या गंभीर व खऱ्याखुऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष होऊ शकते या जाणिवेतून इब्सेन याने आपल्या नाटकाचे वास्तववादी पातळीवर लिखाण केले आहे.

इब्सेनचा जन्म २० मार्च, १८२८ साली नॉर्वे देशातील स्केअन या जंगलानी वेढलेल्या काहीशा हिंस्र आणि रानटी गावात झाला. त्यावेळी नॉर्वे हा देश डेन्मार्क आणि स्वीडनच्या अधिपत्याखाली होता. त्याची कौटुंबिक स्थिती अत्यंत बिकट होती. संपूर्ण घराणं कर्जबाजारी झाले होते. इब्सेनने आपले शालेय शिक्षण कसेबसे पूर्ण केले. त्यानंतर चरितार्थ चालविण्यासाठी एका औषध विक्रेत्याकडे कामाला लागला. पण त्यात तो रमला नाही. अशा गर्तेतून पुढे १८५० पासून तो विद्यापीठात पुढील शिक्षणासाठी गेला. आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी सुरुवातीला कविता लिहिल्या. काही गद्य व पद्य नाटके लिहिली. यामध्ये कॅटेलीन, सेंट जॉन्स नाईट, दी वॉरियर्स बॅरो, दी फीस्ट ऑफ सोल्हॉग या नाटकांचा समावेश आहे. ही सारी नाटके प्रचंड अपयशी ठरली. पण तो खचला नाही. पोटापाण्यासाठी त्याने नाट्यगृहात नाटकाचा सेट लावण्यापासून वेशभूषेपर्यंत पडेल ती कामे केली, एवढेच नाही तर नाटकाची तिकीटे फाडण्याचेही काम केले.

१८६४ साली त्याने लिहिलेल्या 'दी प्रिटेंडर्स' या नाटकाच्या प्रयोगामुळे त्याला पहिल्यांदा यश मिळाले. या नाटकाची संहिता त्याने पुस्तकाच्या रूपानेही प्रसिद्ध केली. त्याच्याही हजारो प्रती हातोहात खपल्या आणि बघता बघता तो प्रसिद्धीच्या लाटेवर आरूढ झाला. त्यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही. त्यानंतर

१८६६ आणि ६७ मध्ये त्याची 'ब्रांद' आणि 'पीयर गिंट' प्रकाशित झाली. 'ब्रांद' नाटकावरून वाद निर्माण झाले आणि त्यावर खूप चर्चाही झाली. पारंपरिक जुनाट संकल्पना उद्ध्वस्त करायला लावत नव्या आधुनिक जीवनशैलीचा आणि प्रागतिक विचारांचा आग्रह धरायला लावणारे नाटक. या नाटकाने इब्सेनला अगदी नॉर्वेच्या बाहेरही खूपच लोकप्रियता मिळवून दिली. पुढे पिलर्स ऑफ सोसायटी (१८७७), ए डॉल हाऊस (१८७९) आणि घोस्टस् (१८८१), ॲन एनिमी ऑफ दि पिपल (१८८२) या नाटकांनी इब्सेन जगप्रसिद्ध झाला.

**इब्सेन आणि त्यांची नाटके**

इब्सेननी एकूण २५ नाटके लिहिली. त्यांच्या सगळ्या नाटकांचा ऊहापोह करता येणार नाही. म्हणून त्याच्या काही प्रमुख नाटकांचा परिचय करून घेऊ.

**दि पिलर्स ऑफ सोसायटी**

आधुनिक नाटकाची सुरुवात या नाटकाने झाली असे मानले जाते. 'दि पिलर्स ऑफ सोसायटी' (समाजाचे आधारस्तंभ) या नाटकात ग्रिमस्टा गावातील लब्धप्रतिष्ठित लोकांचे छक्के-पंजे यांचे सुंदर चित्रण केले आहे. १८७७ साली हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकापासून इब्सेनची 'आधुनिक नाटककार' म्हणून ओळख निर्माण झाली.

**ए डॉल हाऊस**

'ए डॉल हाऊस'मधून पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रीची दडपणूक आणि तिच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आहे. नाटकाच्या शेवटी एका निर्णायक टप्प्यावर नाटकाची नायिका नोरा पुरुषप्रधानतेचे दडपण झुगारून स्वतःचा शोध घेण्यासाठी बाहेर पडते. हे इब्सेनची स्त्रीवादी भूमिका, कामिला कालेत या लेखिकेने 'दि शेरीप्स डॉक्टर' ही स्त्रियांचे समाजातील स्थान या विषयावर कादंबरी लिहिली होती. या कादंबरीचा प्रभाव या नाटकावर स्पष्ट दिसून येतो. इतर नाटकांच्या तुलनेत 'ए डॉल हाऊस' या नाटकाचे संपूर्ण जगभरात सर्वाधिक प्रयोग झालेत. या नाटकाची हस्तलिखित प्रत युनेस्कोनं 'मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर' म्हणून जपून ठेवली आहे.

**घोस्टस्**

इब्सेनचे वादळी नाटक म्हणून याचा उल्लेख केला जातो. या नाटकावर अनेक समिक्षकांनी टीका केली होती. नाटकातील आल्विंग या स्त्री व्यक्तिरेखेच्या माध्यमातून इब्सेनने अनैतिक लैंगिकतेची तरफदारी केली आहे असे टीकाकारांचे म्हणणे होते. या नाटकाचे प्रयोग अनेक ठिकाणी बंद पाडण्यात आले. पण विरोधाभास असा की, या नाटकाचा पहिला प्रयोग शिकागोत १८८२ साली झाला. त्यावेळी त्याचे जोरदार स्वागत झाले. पण खुद्द नॉर्वेत एक-दोघांनी या नाटकाचे समर्थन केले पण बहुतांशी व्यक्तींनी या नाटकावर पर्यायाने इब्सेनवर टीकेची झोड उठवली.

## ॲन एनिमी ऑफ दि पिपल

समाजातील बदलत चाललेल्या नीतिमूल्यांवर इब्सेन या नाटकातून मार्मिक भाष्य केले आहे. इब्सेन यांचे खूप गाजलेले हे पाच अंकी नाटक विषय राजकारणाचा असूनही अगदी तटस्थ मांडणी असणारे हे नाटक आहे. डॉ. स्टॉकमन आणि त्यांचा थोरला भाऊ पीटर स्टॉकमन ऊर्फ द बर्गोमास्टर यांच्यातील नैतीक आणि सामाजिक मुद्यांवर प्रखर भाष्य करत जाणारे हे नाटक आहे. या दोन्ही सख्ख्या भावांतील संघर्षाभोवती संपूर्ण नाटक फिरत राहते. विषय आहे दुषित पाण्याचा आणि शुद्ध पाणी नागरिकांना पोहोचण्यासाठी नगरपरिषदेने काय काय करावे हे डॉ स्टॉकमन सांगतात पण थोरला भाऊ हा पक्का राजकारणी. तो खुर्ची म्हणजेच सत्ता टिकविण्यासाठी संपूर्ण जनमत आपल्या बाजूला वळवून स्वतःच्या सख्ख्या भावाला कसा रस्त्यावर आणतो याचे दर्शन यात आहे. स्वार्थी राजकारण्यांना नाती-गोती नसतात हेच खरं. या नाटकातील वादविवाद, सामाजिक समस्या आणि सामाजिक प्रश्नांचा व्यक्तिगत जीवनावर होणारा गंभीर परिणाम प्रभावीपणे मांडला गेलाय. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे वर्तमानपत्र, तोही कसा विकला जातो, हेही पाहण्यासारखं आहे.

दि पिलर्स ऑफ सोसायटी, ए डॉल हाऊस आणि घोस्टस् हीच नाटके सर्वात जास्त गाजली. विशेषतः ए डॉल हाऊस हे नाटक आणि या नाटकाचा प्रभाव जगातील अनेक कलावंत व साहित्यिकांवरही झाला. जागतिक पातळीवर इब्सेनच्या खंडकाव्यावर आणि नाटकांवर चित्रपट निर्माण झाले. व्हिक्टर स्योस्रोम याने इब्सेनच्या तेऱ्ये विगेन या खंडकाव्यावर १९१६ साली एक चित्रपट केला. त्याच्या गाजलेल्या ए डॉल हाऊस वर इंग्लंड व अमेरिकेत चित्रपट निर्माण झाले. जर्मनीत हेद्दा गाब्लरवर मून ने चित्रपट तयार केला. वाइल्ड डक वर हान्स गायसेनड्योफर आणि टँकर्ड इब्सेन याने नॉर्वेत चित्रपट बनविला. आधुनिक नाटकाचा जनक आणि आधुनिक शोकनाट्याचा प्रवर्तक अशा बिरुदावल्या लाभल्या त्या याच नाटकामुळे. एवढंच नाही तर नोबेल पारितोषिकाचं नामांकनही मिळाले. पण नोबेल काही मिळाले नाही.

## इब्सेन आणि मराठी रंगभूमी

महाराष्ट्राला इब्सेनची ओळख शेक्सपिअर आणि मोलिएर यांच्या नंतर बऱ्याच काळाने झाली. मुळात इब्सेन इंग्लंडमध्येच उशिराने पोहोचला. साहजिकच इंग्रजीमधून अनुवाद झालेली इब्सेनची नाटके महाराष्ट्रात पोहचायला बराच कालावधी लागला. शेक्सपिअर इंग्रजीतून लिहिणारा. मोलिएर फ्रेंच भाषेतून लिहीत. पण त्याची नाटके इंग्रजीत रूपांतरित लवकर झाल्याने शेक्सपिअर बरोबर तोही महाराष्ट्रात लवकर पोहोचला. इब्सेनची नाटके इंग्रजीत रूपांतरित झाल्यानंतर महाराष्ट्राला परिचित झाली. त्यावेळी महाराष्ट्राच्या दृष्टीने ब्रिटिश आमदानीचा सुरुवातीचा काळ. सर्वसामान्य शिक्षित वर्ग इंग्रजी भाषा आणि वाङ्मयाने प्रभावित झालेला होता. तत्कालीन पांढरपेशी मराठी समाजाला पौराणिक आणि ऐतिहासिक संगीत नाटकांच्या जोडीला शेक्सपिअर-मोलिएर यांच्या नाटकांनी वेड लावले होते. अशा पार्श्वभूमीवर इब्सेनचा परिचय महाराष्ट्राला २०व्या शतकाच्या सुरुवातीला झाला. १८८९ साली इब्सेनच्या एकसष्टीच्या निमित्ताने आर्चच्या शॅरिंग्टन या ब्रिटीश कंपनीने 'ए डॉल्स हाऊस' आणि इतर नाटकांचे प्रयोग इजिप्त, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि भारतात केले.

२५ फेब्रुवारी, १८९२ रोजी ए डॉल्स हाऊसचा प्रयोग मुंबईत झाल्याची नोंद टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकात सापडते. त्यानंतर इब्सेन महाराष्ट्राला परिचित होत गेला. पण त्याच्या नाटकांचा मराठी नाटकावरील हा प्रभाव २०व्या शतकात दिसतो.

साधारण १९२० ते १९४७ हा कालखंड भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील काळ. या काळातच इब्सेन आणि त्याचा शिष्य बर्नाड शॉ यांचा प्रभाव पडायला सुरुवात झाली. गांधीयुगामुळे एक समाजवादी पार्श्वभूमी तयार झाली होती. मार्क्ससाठी जसे पोषक वातावरण तयार झाले होते तसेच वातावरण इब्सेन-शॉ या जोडगोळीसाठीही तयार झाले. इब्सेनच्या सर्वच नाटकांचा प्रभाव दिसून येत नाही. तर त्याची मधली नाटके म्हणून समजली गेलेली 'पिलर्स ऑफ सोसायटी', 'ए डॉल हाऊस', 'घोस्टस्' आणि 'एनिमी ऑफ दि पिपल' आदी नाटकांचा विशेष प्रभाव जाणवतो. इब्सेनचे (वास्तववादी सामाजिक कथानक आणि व्यक्तिरेखा, तीन अंकी, ठराविक प्रवेश, बॉक्स सेट इ.) नाट्यतंत्राचा प्रभाव व इब्सेनच्या प्रत्यक्ष नाटकांचा प्रभाव असे दोन भाग आपल्याला मराठी नाटकांच्या बाबतीत दिसून येतात.)

सुरुवातीला इब्सेनच्या नाटकाच्या प्रभावाऐवजी त्याच्या नाट्यतंत्राचा प्रभाव मराठी नाटकांवर दिसून आला. इब्सेनी नाट्यतंत्रानी प्रभावित झालेले पहिले नाटक म्हणून वा. वा. भोळे यांच्या 'सरलादेवी' या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. या नाटकाचे इब्सेनी तंत्र केवळ स्ट्रक्चरी स्वरूपाचे नव्हते म्हणजे अंक व प्रवेशाची रचना तर रिस्ट्रॉस्पेक्टीव म्हणजे वर्तमानकालीन घटना-प्रसंगातून भूतकाळाची उलघड हे तंत्र सरला देवी या नाटकातून भोळेनी स्वीकारले आहे. अर्थात भोळेनी हे इब्सेनी तंत्र मी नकळत वापरल्याचे सांगतात. १९३३ साली इब्सेन आणि बर्नाड शॉची नाटके मराठीत आणून वास्तववादी नवरंगभूमी संदर्भात क्रांती करण्याच्या हेतूने श्री. वि. वर्तक, के. ना. काळे, अनंत काणेकर, त्र्यं. सी. कारखानीस, पार्श्वनाथ आळतेकर, केशवराव भोळे, पद्मावती वर्तक, ज्योत्स्ना वर्तक इत्यादींनी नाट्यमन्वतर संस्थेची स्थापना केली. 'आंधळ्याची शाळा' हे पहिले नाटक त्यांनी रंगमंचावर आणले. गंमतीची गोष्ट अशी की, हे नाटक इब्सेनचे रूपांतर नव्हते तर इब्सेनच्या नाटकानी प्रभावित झालेल्या स्कॅण्डिनेव्हियन नाटककार ब्योर्नसनच्या 'गॉण्टलेट'चे रूपांतर होते. इब्सेनी नाट्यतंत्राचा एक भाग म्हणजे बॉक्ससेटचा वापर. मराठीत पहिल्यांना बॉक्ससेट या नाटकाच्या निमित्ताने वापरायला सुरुवात झाली. या नाटकात इब्सेन आणि शॉ चा पुतळाही ठेवण्यात आला होता. आम्ही इब्सेन-शॉ ने प्रभावित आहोत हेच नाट्यमन्वतरला सुचवायचे होते. पुढे वर्तकांनी 'वायकिंग्ज ऑल हेल्गेलॅण्ड'चे 'तक्षशीला' या नावाने रूपांतर केले. पण याला फारसे यश लाभले नाही. त्यानंतर वर्तकांनी रूपांतराचे काम सोडून दिले. याचा परिणाम नाट्यमन्वतर फुटण्यावर झाला व इब्सेन थिएटर मराठीत आणण्याचे प्रयत्नही संपुष्टात आले.

१९३३ साली अनंत काणेकर यांनी 'ए डॉल्स हाऊस'चे 'घरकुल' या नावाने रूपांतर केले. पण त्यावेळी त्याचा प्रयोगही झाला नाही आणि ते पुस्तक रूपानेही बाहेर आले नाही. घरकुल प्रसिद्ध झाले ते साधारण एकेचाळीस साली.

इब्सेनची नाटके मराठीत आणण्याचे प्रयत्न नाट्यमन्वतरने मध्येच सोडून दिले असले तरी प्र. के. अत्रेनी हे प्रयत्न पुढे चालवलेले दिसून येतात. 'ए डॉल्स हाऊस', 'घोस्टस्' या नाटकाचे अनुक्रमे 'घराबाहेर व उद्याचा संसार' या नावाने प्र. के. अत्रे यांनी अनुवाद केला. इब्सेनच्या 'ए डॉल हाऊस'मध्ये नायिका नोरा शेवटी घर सोडून निघून जाते. अत्रेनी या नाटकात नायिका घर सोडताना गळ्यातील मंगळसूत्र तोडते असे दाखवले होते. पण या कारणाने प्रसिद्ध नट बालगंधर्वांनी या नाटकात काम करण्यास नकार दिल्याचे म्हटले जाते. संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यात वाढलेले प्रेक्षक हे स्वीकारणार नाहीत या उद्देशाने अत्रे यांनी बदल करून घराबाहेर मधील नायिका निर्मला शेवटी गळ्यातील मंगळसूत्र न तोडता घर सोडून जाते पण आपल्या मुलांचे पुढे कसे होईल या चिंतेने परतही येते. म्हणजे अत्रेंनी इब्सेनचे केवळ बाह्य तंत्रच स्वीकारले. सुटाबुटातील व्यक्तिरेखा, पडद्यांऐवजी सेटची मांडणी इत्यादी. पण इब्सेनी नाटकांचा गाभा स्वीकारला नाही. भारतीय पारंपरिक चौकटीतच इब्सेनची मांडणी केलेली आढळून येते.

'उद्याचा संसार'मध्ये 'घोस्टस्'चा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. 'घोस्टस्'मधील सलूनचे टॉवरवरून उडी मारून आत्महत्या करणे आणि 'उद्याचा संसार'मधील करुणेची घराच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या करणे अशी साम्यस्थळे घोस्टस्च्या प्रभावातून आलेल्या आहेत. पण बाह्यतंत्रावर जरी इब्सेनचा प्रभाव असला तरी अंतरंग मात्र गडकरी वळणाचेच आहे. इब्सेनच्या व्यक्तिरेखा आधुनिक मूल्यांचा स्वीकार करून समाजाविरुद्ध संघर्ष करतात. यात यांचा पराभव होता म्हणून त्यांची शोकांतिका होते. पण अत्रेंच्या व्यक्तिरेखा आधुनिक मूल्यांचा स्वीकार करून समाजाविरुद्ध संघर्ष करत नाहीत. तर पारंपरिक मूल्य व्यवस्थेला शरण जातात. त्यामुळे त्यांची शोकांतिका होत नाही. स्पष्ट बोलायचे तर या दोन्ही नाटकांमधून अत्रेंनी पारंपरिक हिंदू मूल्यांचाच पुरस्कार केला आहे. नवे विचार आणि जुनी मूल्य मानणाऱ्या नव्या-जुन्या पिढीतील दोघांनाही सांभाळण्याची अत्रेंची कसरत मात्र कौतुकास्पद आहे.

भा. वि. तथा मामा वरेरकर हे स्वतःला इब्सेनचे भक्त समजत होते. पण अत्रे यांच्या प्रमाणे त्यांनीही इब्सेन आंधळेपणानीच स्वीकारला. तुरुंगाच्या दारात, करग्रहण, नवा खेळ, सोन्याचा कळस, उडती पाखरे या काही नाटकांवर इब्सेनच्या नाटकांचा प्रभाव जाणवतो. उदाहरणार्थ, तीन अंकी, एक प्रवेशी, सामाजिक समस्या - हुंडाबळी, कामगारांचे प्रश्न, सामाजिक विषमता इत्यादी. वरेरकरांच्या व्यक्तिरेखा स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या बंडखोर, समाजवादी विचार मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. पण वरेरकरांचा पिंड शोकात्म नाटकाशी जुळणारा नसल्याने ते इब्सेनच्या गाभ्याला भिडू शकले नाहीत पण त्यांनी 'उडती पाखरे'मध्ये इब्सेनी वैशिष्ट्ये आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यांनी ए डॉल्स हाऊसचे 'खेळघर' आणि वाईल्ड डकचे 'वनहंसी'ची नाट्यरूपांतरे प्रेक्षणीय नसली तरी वाचनीय होती. एक मात्र नक्की इब्सेन मराठी माणसांमध्ये जिवंत ठेवण्याचे काम इतरांपेक्षा वरेरकरांनी केले आहे, हे नाकारता येत नाही.

'ए डॉल हाऊस'ची अनेक रूपांतरे झालीत. मो. ग. रांगणेकर यांच्या 'कुलवधू'वर ए डॉल्स हाऊसचा प्रभाव आहे. कुलवधू खूपच लोकप्रिय ठरले. पण त्यांनी केवळच नाटक इब्सेनच्या प्रभावातून लिहिले.

ए डॉल्स हाऊसचे आणखीन एक रूपांतर आर. आर. अष्टेकरांनी केल्याची नोंद सापडते. अहमदनगरमध्ये याचे प्रयोग झालेत. छोट्या शहरांमध्ये इब्सेनविषयीचे कुतूहल अष्टेकरांनी त्यांच्या नाटकामधून जागवले. गो. के. भटांनी 'गृहदाह' या नावाने ए डॉल्स हाऊसचे रूपांतर केले आणि त्याचे १०-१२ प्रयोग झाल्याचीही नोंद पहावयास मिळते. या नाटकाचे वैशिष्ट्ये म्हणजे नायिका घर सोडत नाही तर नायिकेचा नवरा घर सोडून जातो असे दाखवले आहे. पण पुन्हा सामोपचाराने ते एकत्र येतात व संसार करू लागतात असा गोड शेवट या नाटकाचा आहे. ह. वि. देसाई यांनी घोस्टस्चे 'जळतं शरीर' या नावाने रूपांतर केले. पण याचा प्रयोग झाला नाही. तर नानासाहेब खाडीलकरांनी 'एनिमी ऑफ दि पिपल'चे 'लोकांचा वैरी' या नावाने रूपांतर केले आहे. याचा प्रयोग सांगलीतील देवल क्लबने केला होता.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इब्सेनचा प्रभाव आपल्याला असा दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर आदी इब्सेनचा प्रत्यक्ष प्रभाव स्वीकारला नसला तरी तीन अंकी, सामाजिक नाट्यतंत्राचा ते प्रभाव ते टाळू शकले नाहीत.

१९६० साली ह. रा. महाजन यांनी 'एनिमी ऑफ पिपल'चे 'परि तू जागा चुकलासी' या नावाने रूपांतर केले. १९६३ च्या दरम्यान सदानंद रेगे यांनी 'ब्रान्द' चा अनुवाद केला. त्यानंतर त्यांनी 'पेअर ग्यूट'चाही अनुवाद केला. हे दोन्ही अनुवाद सरस व प्रभावी आहेत. १९७४ साली अशोक शहाणे यांनी एनिमी ऑफ दि पिपलचे 'कोंडी' या नावाने रूपांतर केले आणि विशेष म्हणजे हे रूपांतर त्यांनी शंभू मित्राच्या 'दशचक्र' या रूपांतरावरून केले आहे. इंडियन नॅशनल थिएटर (आय.एन.टी.) या संस्थेने ते रंगमंचावर आणले होते. अगदी अलीकडे शिवाजी विद्यापीठ, ललित कला केंद्राने 'ॲन एनिमी ऑफ दि पिपल'चा अनुवाद करून ते रंगमंचावर सादर केले आहे. असे इब्सेनच्या अनेक अनुवादित आणि रूपांतरित नाटकाचे प्रयोग विविध ठिकाणी झाले आहेत. आणि पुढेही होत राहतील.

**समारोप**

अशा पद्धतीने इब्सेनच्या नाटकांचा मराठी नाटकांवर वरील स्वरूपात प्रभाव पडल्याचे आपल्याला पाहायला मिळते. शेक्सपिअरच्या नाटकाने ज्या पद्धतीने मराठी नाटकावर प्रभाव टाकला त्याप्रमाणे जरी इब्सेनच्या नाटकांनी टाकला नाही, हे वास्तव आहे. याचे कारण इब्सेनी बाह्यांगेच मराठी नाटककारांनी उचललीत; पण अंतरंग त्यांना शेवटपर्यंत सापडले नाही असे म्हणण्यापेक्षा इब्सेनच्या नाटकातील अंतरंग मराठी नाटककारांनी नीटपणे समजून घेतले नाही. त्यामुळे इब्सेनी नाट्यतंत्र म्हणजे बाह्यांग तेवढे स्वीकारले पण गाभा मात्र स्वीकारता आला नाही. गाभ्याला भिडण्याची क्षमता मराठीतल्या कोणत्याही नाटककाराकडे नसावी किंवा भारतीय संस्कृतीच्या परिप्रेक्षाचा विचार करता कोणी इब्सेनी नाटकाच्या गाभ्याला भिडण्याचे धाडस दाखवले नाही, असे म्हणावे लागेल. त्यामुळे इब्सेनचा मराठी नाटकावर अयशस्वीपणे प्रभाव पडला, असे म्हणावे लागेल. असे असले तरी तीन अंकी रचना, वास्तववादी कथानक आणि बॉक्ससेट सारख्या नाट्यतंत्रानी मराठी रंगभूमी आजही प्रभावित आहे.

इब्सेनच्या नाटकाचा मराठी नाटकांवर जो काही प्रभाव आणि परिणाम झाला तो जरी पुरेसा खोल आणि समाधानकारक नसला तरी मूलभूत स्वरूपाचा नक्की होता. जेणे करून मराठी नाटक काहीसे बदलून गेले. मराठी नाटकाने एक वेगळी दिशा घेतली. तीन अंकी सामाजिक नाटक ही देणगी इब्सेनचीच आहे.

### ४.२.३ भालचंद्र नेमाडे

भालचंद्र नेमाडे हे मराठी साहित्यातील अग्रगण्य लेखक आहेत. त्यांनी कविता, कादंबरी आणि समीक्षा हे तिन्ही वाङ्मय प्रकार समर्थपणे हाताळलेले आहेत. त्यांचा पुढील पिढीवर विशेष प्रभाव आहे. विशेषतः १९६० नंतरच्या नवकविता व नवकथेवर नेमाड्यांच्या लेखनाचा आणि वाङ्मयीन भूमिकेचा विशेष प्रभाव जाणवतो. साहजिकच भालचंद्र नेमाडे हे साठोत्तरी साहित्यिकांच्या पिढीचे अग्रणी ठरतात.

भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यविषयक भूमिकांवर देशी-विदेशी विचारांचा प्रभाव आहेत. त्यांच्यावर सॉलिंजर, शेक्सपिअर, कामू, सार्त्र यांच्या साहित्याचा विशेष प्रभाव जाणवतो. स्वतः नेमाडे आपल्या मुलाखतीमधून कबूल करतात की, ''वाचन म्हणून माझ्यावर इंग्लंडबाहेरील गाजलेल्या युरोपियन आणि अमेरिकन पुस्तकांचा जास्त परिणाम झाला असावा.'' (भालचंद्र नेमाडे, मुलाखत)

नेमाड्यांच्या 'कोसला' मधून हा प्रभावाचा परिणाम विशेषत्वाने जाणवून येतो. १९६३ साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीने कादंबरीचा पारंपरिक आकृतिबंध (फॉर्म), तसेच रूढ संकेतांना जाणीवपूर्वक छेद दिल्याचे दिसून येते. कादंबरीचे संपूर्ण रूप नावीन्यपूर्ण होते. त्यामुळे अनेकांना ती पाश्चिमात्य वाङ्मयीन घटकांच्या प्रभावातून निर्माण झालेली वाटली आणि असे वाटणे साहजिकच होते. कोसला प्रकाशित झाल्या-नंतर अनेक समीक्षकांनी स्टर्नच्या 'ट्रिस्टम शेंडी'ची आठवण झाल्याचे म्हटले आहे. तर त्यातील पांडुरंग सांगवीकराचे जे. डी. सॅलिंगजर यांच्या 'द कॅचर इन दि राय'मधील नायक होल्डेन कॅल्फिल्ड यांच्याशी साधर्म्य असल्याचे जाणवले. होल्डेन कॉल्फिल्ड आणि पांडुरंग सांगवीकर यांच्यामध्ये बरेच साम्य आहे. दोघांचाही समाजाकडे आणि लैंगिक व्यवहाराकडे बघण्याचा दृष्टिकोन सारखाच वाटतो. ज्या ज्या गोष्टींचा होल्डेन कॉलफिल्डला वैताग येतो त्याच गोष्टींचा पांडुरंग सांगवीकरलाही वैताग येतो. होल्डेन कॉलफ्लिड वैतागांना 'फोनी' म्हणतो तर पांडुरंग 'भंकस' असे म्हणतो. अर्थात या दोघांमध्ये साम्यस्थळे असणे हा तत्कालीन युगशैलीचा परिणाम असल्याचे म्हटले जाते. नेमाडेंच्या कोसलावर सॅलिंजर यांच्या 'द कॅचर इन दि राय'चा प्रभाव असला तरी 'कॅचर इन दि राय' ही कादंबरी कोसलाची प्रेरणास्रोत नक्कीच नाही. वर म्हटल्याप्रमाणे तो केवळ तत्कालीन युगशैलीचा परिणाम आहे.

'कोसला'मधील भविष्यातून भूतकाळाकडे पाहण्याचे तंत्र सार्त्रच्या एका नाटकातून प्रभावित झाल्याचे प्रसिद्ध समीक्षक गंगाधर पाटील दाखवून देतात. कोसलावर शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' आणि 'मॅकबेथ'चा प्रभाव दिसून येतो, असे अशोक केळकरांनी नमूद केले आहे. उदाहरणार्थ, 'कोसला'तील पिशाच्च सृष्टी, रात्री न झोपण्याच्या सवयी, जन्म-मृत्यूचे चिंतन इत्यादींवर शेक्सपिअरच्या नाटकांमधील नायकांचा प्रभाव दिसून येतो. विलास सारंग 'कोसला'वर परकीय वाङ्मयाचा असलेला प्रभाव दर्शवताना काम्यूच्या साहित्यकृतीचा

दाखला देतात. काम्यूच्या कॅलिग्यूला आपली बहीण मेल्यावर जो साक्षात्कार होतो तोच साक्षात्कार पांडुरंग सांगवीकरला आपली बहीण मनी मरण पावल्यावर होतो.

त्यानंतरच्या 'बिढार', 'जरीला' आणि 'झूल' या कादंबऱ्यांचा रूपबंध बॅलझॅकच्या 'द ह्यूमन कॉमेडी'शी नाते सांगतो. तसेच या कादंबऱ्या डेस्टोवस्कीच्या प्रभाव परंपरेतून निर्माण झाल्या आहेत हेही दिसून येते. अर्थात आपल्या साहित्यकृतींवर आवडत्या लेखकाचा कळत-नकळतपणे प्रभाव होतच असतो. नेमाडेंच्या कादंबरीतील चांगदेव पाटील स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची आणि आपल्या नवनैतिकतेची जपणूक करीत राहतील असतो. नेमाडेंच्या कादंबरीतील अस्तित्ववादावर सोरेन किर्केगार्डच्या विचार-मंथनाचा प्रभाव आहे. पण नेमाडे किर्केगार्डच्या अस्तित्ववादाला भारतीय अध्यात्माची जोड देतात. त्यामुळे नेमाडे यांच्या कादंबऱ्यातील अस्तित्वादाला अस्सल देशीय रूप प्राप्त होते. नेमाडेंच्या तिन्ही कादंबरीचा नायक असलेल्या चांगदेव पाटलाला स्थळ, काळाचे तीव्र भान आहे. १८व्या शतकात इंग्लंडमध्ये लिहिलेल्या पिकारेस्क स्वरूपाच्या कादंबऱ्यातील लेखन वैशिष्ट्यांचा प्रभाव आहे. फिल्डींगची 'टॉम जोन्स' ही अशाच पिकारेस्क स्वरूपाची कादंबरी आहे. पिकारेस्क म्हणजे फिरस्ता. नेमाडेंनी कादंबरीचा रूपबंध, तंत्रशैली आणि अभिव्यक्ती पाश्चिमात्य साहित्यिकांच्या प्रभावातून स्वीकारली आहे. नेमाडे हा सारा प्रभाव भारतीय विचार परंपरेत व्यक्त करतात व त्याला अस्सल देशीय रूप देतात. महानुभाव गद्य, तुकोबाचे अभंग, महात्मा फुल्यांचे गद्य, वारकरी परंपरेची आविष्कार शैली, प्राचीन संस्कृती-परंपरा अशा अनेक मूल्यांचा त्यांच्या साहित्यकृतीतून आविष्कार होतो.

आपल्या मुलाखतीत भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''इंग्रजीतील लहानमोठे लेखक वाचावे लागल्यामुळे स्वाभाविकतः जेवढा परिणाम झाला असेल तेवढाच. व्यक्तिशः माझे सर्वात आवडते लेखक डोटोवस्की, काफ्का, होमर आणि शेक्सपिअर आहेत. शिवाय देशोदेशीच्या लोककथा, परिकथा, भयकथाही वारंवार वाचणं मला आवडतं. पण तरीही रामायण, महाभारताची सर नाहीच.'' (भालचंद्र नेमाडे, मुलाखत १) नेमाडेंनी सांगितल्यानुसार त्यांच्या साहित्यलेखनावर देशीविदेशी साहित्याचा प्रभाव मर्यादित स्वरूपाचा आहे. हा प्रभाव तंत्र आणि शैली एवढ्यापुरताच मर्यादित आहे. त्यांच्या साहित्यकृतीतील अंतरंगावर मात्र पूर्णपणे देशीय परंपरा, संस्कृती आणि भारतीय समाजजीवनचाच प्रभाव आढळून येतो. त्यांच्या कादंबरीतील नायक आणि इतर व्यक्तिरेखा इथल्या मूळ मातीशी इमान राखून चिवटपणे उभारलेल्या दिसतात. हे नेमाडेंच्या साहित्याचे वैशिष्ट्य होय.

एकूणच नेमाडेंच्या साहित्य प्रवासात परकीय वाङ्मयाचे स्वरूप वरीलप्रमाणे आहे. नेमाड्यांनी परकीय वाङ्मयातील अवास्तव घटकांचा भाग जाणीवपूर्वक टाळलेला आहे आणि देशीय जीवनजाणिवांचा आविष्कार आपल्या साहित्यातून विशेषतः कादंबऱ्यातून केला आहे. नेमाड्यांनी परकीय वाङ्मय तंत्राचा प्रभाव आत्मसात करून पूर्णपणे देशीय मूल्यांचा आविष्कार आपल्या साहित्यातून जाणीवपूर्वक व तितक्याच गंभीरपणे केला आहे, असे स्पष्टपणे म्हणता येते.

**भालचंद्र नेमाडे आणि त्यांच्या कादंबऱ्यांचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव**

भालचंद्र नेमाडेंची 'कोसला' प्रसिद्ध झाली आणि मराठी साहित्यात खळबळ उडाली. कारण कोसलाने मराठी कादंबरीची संकल्पनाच अंतर्बाह्य बदलून टाकली होती. रूढ कादंबरी संकल्पनेला नेमाडेंनी छेद दिला आहे. या निमित्ताने नेमाडेंनी सलग कथानक, आरंभ-मध्य-शेवट तसेच नायक-नायिका यांना पूर्ण फाटा देत कादंबरीची नवी संकल्पना रुजवली. भालचंद्र नेमाडे आणि कोसला या दोहोंचा फार मोठा प्रभाव मराठीतील साठीनंतरच्या कादंबरी आणि कादंबरीकार यांच्यावर पडल्याचा दिसून येतो. असे ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी नमूद केले आहे.

भाऊ पाध्येंची 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर' (१९६७), 'होमसिक ब्रिगेड' (१९७४), व. ह. पिटके यांची 'शिदोरी' (१९७७), प्रभाकर सिरास लिखित 'निळे कमळ' (१९७९), किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' (१९७४), ए. वि. जोशी यांची 'काळोखाचे अंग', कमल देसाई यांची 'रात्रंदिन आम्हा', श्री. ना. पेंडसे यांची 'लव्हाळी', राजन गवस यांची 'कळप', किशोर सानप यांची 'पांगुळगाडा', रंगनाथ पठरे यांची 'ताम्रपट', 'चक्रव्यूह', 'दिवे गेलेले दिवस' इत्यादी कादंबरीकारांवर आणि कादंबरीवर नेमाडेंचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर' ही भाऊ पाध्येंची कादंबरी कोसलाच्या प्रभावातून लिहिली गेली असल्याचे आढळून येते. अनिरुद्ध हा चांगला वकिली व्यवसाय करणारा, मुळातच श्रीमंत असणारा तरुण आहे. सुंदर बायको असणे ही त्याच्या वैभवात भर घालणारी बाजू होय. पण नेमक्या याच गोष्टीला तो कंटाळतो. तो कोसलातील पांडुरंगसारखा निष्क्रिय नाही. त्याला काही तरी भव्यदिव्य करायचे आहे. पण त्याला ते करता येत नाही आणि शेवटी पांडुरंगसारखी निराशा पदरी येते. इतके साम्य दोन्ही कादंबरीतील नायकांबाबत आढळते. म्हणूनच आलोचनातील समीक्षक अनिरुद्धला 'कोसला'तील पांडुरंगचा संसारी अवतार मानतात.

'कोसला'मधील पंचवीस वर्षाचा पांडुरंग सांगवीकर आपल्या हातून काहीच घडले नाही आणि घडणार नाही या जाणिवेतून पराभूत आणि परात्मभावनेने शेवटी गावाकडे येऊन कायमचा राहतो. ''उदाहरणार्थ काही झालं तरी हे आपल्याला खुंट्यावर आणून वगैरे बांधतीलच. मग नेमकं अगोदरच खुंट्यावर येऊन उभं राह्यलेलं बरं..'' हा पांडुरंगचा परात्मभाव. कोसलाचा हा प्रभाव राजन गवस यांच्या 'कळप' या कादंबरीवर आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर स्पष्टपणे जाणवतो. रघू चिलमी हाही तरुण शेवटी पांडुरंग सांगवीकरासारखाच आहे. 'कोसला'मधील पांडुरंगचे रात्री-बेरात्री वेताळाच्या टेकडीवर किंवा रानोमाळ भटकणे, परीक्षांमधील निरर्थकता, जगण्यातले एकाकीपण, कळपमधील रघूच्या बाबतीतही आहे. शेवटी रघूही पांडूरंगसारखा समाजापासून आणि स्वतःपासूनही अलग पडतो. आपले आयुष्य म्हणजे एक प्रकारचा निरर्थक आणि वांझ वैतागच वाटतो. दिलासा देणारे आशावादी असं काहीच सभोवती दिसत नाही आणि आपणही काहीच करू शकत नाही ही निराशा त्याला घेरते. आणि शेवटी तो आपले सारे लिखाण आणि कविता जाळून टाकतो आणि त्या जाळाने गरम झालेल्या पाण्यात स्वच्छ आंघोळ करून अंतर्बाह्य निर्मळ होतो. आपल्या

कविता जाळणे ही त्याची निरर्थकतेसंबंधीची अंतीम प्रक्रिया असते. हा एक प्रकारचा परात्मभावच होय. नेमाडेंनी ही परात्मता कोसलामध्ये व्यक्त केली आहे.

अगदी कोसलाच्या अर्पणपत्रिकेचाही प्रभाव कळप वर जाणवतो. नेमाडेंनी कोसला कादंबरी 'शंभरातील नव्याण्णव लोकांना' अर्पण केली आहे तर राजन गवस यांनी 'साठीत जन्मलेल्या आणि ऐंशीत चेहरा हरवलेल्यांना' अर्पण केली आहे. भाषेला ज्याप्रमाणे नेमाडे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम न मानता मानवी वर्तन व्यवहारावर प्रकाश टाकणारे मुलभूत साधन मानतात त्याचप्रमाणे गवस भाषेबाबत सजग आहेत. गवस भाषेतून मानवी व्यवहारातील विसंगतीवर तिरकस भाष्य करताना दिसतात. त्यांनी कळप मधील भाषा खूपच वैशिष्ट्यपूर्ण रूपाने वापरली आहे आणि एक महत्त्वाचा भाग म्हणजे राजन गवस नेमाडेंप्रमाणे नैतिक भूमिका घेताना दिसतात. तसेच नेमाडेंसारखी मार्क्सवादी भूमिका न घेता देशीयतेच्या तत्त्वाला अनुसरून मानवी व्यवहारात 'जात' केंद्रभूत मानतात. राजन गवस यांच्या 'कळप' बरोबर 'तणकट' मध्येही जात केंद्रस्थानी आहे.

रंगनाथ पठारे यांच्या लेखनावर नेमाडेंच्या अस्तित्वभानाचा आणि एकूणच सर्व प्रकारच्या वाङ्मयीन जाणिवांचे खोलवर संस्कार झाले आहेत. १९८० च्या दशकात पठारेंनी नेमाडेंचे निव्वळ अंधानुकरण न करता त्यांचा प्रभाव पचवून आपले स्वतंत्र असे लेखक म्हणून अस्तित्व सिद्ध केले आहे. 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर सांगवीसारख्या खानदेशातील छोट्याशा गावातून शिकायला पुण्यासारख्या शहरात येतो, तर 'बिढार' आणि त्यानंतरच्या कादंबऱ्यातील चांगदेव पाटील मुंबईच्या महानगरीत शिकून पुढे अनेक अर्धनागर ठिकाणी नोकरी करतो. रंगनाथ पठारे यांच्या 'चक्रव्यूह'मधील प्राध्यापक ग्रामीण परिसरातून टिचर फेलोशीप घेऊन संशोधनासाठी पुणे विद्यापीठात येतो. 'दिवे गेलेले दिवस'मध्ये अर्धनागर गावाचा परिसर येतो. नेमाडेंच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांप्रमाणे पठारे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील पण उच्चविद्याविभूषित आहेत. ते ग्रामीण जीवनाचे संस्कार पचवून आधुनिक मूल्यांचा स्वीकार व पुरस्कार करतात. तसेच नेमाडेंची नवनैतिकता पठारेंच्या व्यक्तिरेखा पाळतात. एकूणच नेमाडे-पठारे यांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केलेली तात्त्विक जाणीव वेगळी आणि आधुनिक स्वरूपाची होती.

याबरोबरच जयवंत दळवी यांची 'स्वगत', त्र्यं. वि. सरदेशमुखांची 'बखर एका राजाची', मनोहर शहाणे यांची 'पुत्र' ह्या कादंबऱ्या कोसलाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या आहेत. या कादंबऱ्यातील नायक अनुक्रमे शिवा, राजा आणि अच्युत यांच्यात आणि कोसलातील पांडुरंग सांगवीकर यांच्यात बरेच साम्य आढळते.

**समारोप**

एकूणच 'कोसला' नंतर भालचंद्र नेमाडे यांचा प्रभाव मराठीतील अनेक कादंबरीकारांवर पडलेला दिसून येतो. यामध्ये भाऊ पाध्ये, त्र्यं. वि. सरदेशमुख, व. ह. पिटके, श्री. ना. पेंडसे, किरण नगरकर, रंगनाथ पठारे, किशोर सानप, राजन गवस इत्यादी अनेकांवर नेमाडेंच्या लेखनप्रवृत्तीचा प्रभाव जाणवतो. 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'होमसिक ब्रिगेड', 'शिदोरी', 'निळे कमळ', 'ताम्रपट', 'सात सक्कं त्रेचाळीस', 'काळोखाचे

अंग', 'रात्रंदिन आम्हा', 'लव्हाळी', 'कळप', 'पांगुळवाडा', 'ताम्रपट', 'चक्रव्यूह', 'दिवे गेलेले दिवस' इत्यादी कादंबरीवर कोसलाचा पर्यायाने भालचंद्र नेमाडेंचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

**दलित साहित्य आणि नामदेव ढसाळ**

१९६० नंतर दलित साहित्याची निर्मिती झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित साहित्याची निर्मिती ही खूप मोठी सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय घटना आहे. समाजातील बहुजन वर्गात विशेषतः दलित वर्गाला सांस्कृतिक आत्मभान येण्याचे हे लक्षण मानले पाहिजे. सत्त्व गमावून बसलेल्या दलितांना नवे आत्मभान या दलित साहित्याने दिले. साहित्य जेव्हा चळवळीचे रूप धारण करते तेव्हा तिला ठोस अशी वैचारिक पार्श्वभूमी असते. इथल्या विषम समाजव्यवस्थेने निर्माण केलेले अमानवी प्रश्न, त्याविरुद्धचा विद्रोह आणि बाबासाहेबांचे वैचारिक अधिष्ठान पचवून नव्या समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी केलेली रचनात्मक कृती यातूनच ही चळवळ आकाराला आली. कथा, कविता, कादंबरी, वैचारिक लेखन, आत्मकथन या सर्वच पातळीवर दलित साहित्याने मुसंडी मारलेली दिसते. आजपर्यंत अज्ञानात राहिलेले, दुर्लक्षित राहिलेले वंचितांचे विश्व, त्यांच्यावर झालेला हजारो वर्षांचा अन्याय, अत्याचार एखाद्या ज्वालामुखीप्रमाणे स्वतःच्या कोषात आत्ममग्न असलेल्या समाजावर जेव्हा येऊन धडकला तेव्हा कथित पांढरपेशी समाज मुळासकट हादरला.

## ४.२.४ नामदेव ढसाळ

दलित साहित्याने सर्वच साहित्यप्रकार यशस्वीपणे हाताळले. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन, समीक्षा इत्यादी प्रकारांमध्ये कविता आणि आत्मकथन यांना खूपच प्रसिद्धी मिळाली आणि त्यावर चर्चा झाली. नारायण सुर्वे, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार, योगेंद्र मेश्राम इत्यादी कवींबरोबर नामदेव ढसाळ हेही एक महत्त्वाचे नाव होय. नामदेव ढसाळांच्या कवितेने संपूर्ण मराठी साहित्य विश्वाला प्रचंड धक्का दिला. आत्तापर्यंत आत्ममग्न मध्यमवर्गीय जीवन जाणिवेत जगणाऱ्यांना खडबडून जागे केले. ढसाळांच्या कवितेने मराठी कवितेला नव्या अनवट भाषाशैलीची, नव्या शब्द-वाक्प्रचारांची, नव्या प्रतीकांची आणि प्रतिभांची देण दिली आहे. एकूणच ढसाळांच्या कवितेने मराठीच नव्हे, भारतीय साहित्य दालन समृद्ध केले आहे. जागतिक वाङ्मयात ज्याची गौरवाने नोंद घेतली जाते.

१९६० नंतरच्या मराठी कवितेवर ज्यांनी आपला ठोस असा प्रभाव टाकला आहे त्यात नामदेव ढसाळांचा अग्रक्रमाने निर्देश करावा लागतो. त्यांच्या कवितेतील अनोख्या आणि आत्तापर्यंत अपरिचित असलेल्या अनुभवविश्वाने संपूर्ण मराठी साहित्याला हादरवून सोडले आहे. अभिव्यक्तीतील प्रयोगशीलता आणि भाषेतील आक्रमकपणामुळे ढसाळ आणि त्यांची कविता मराठी काव्य प्रवासातील एक 'माईल्स स्टोन' ठरली आहे. मराठी कवितेचे दालन समृद्ध करण्यात ढसाळांच्या कवितेचे योगदान महत्त्वाचे राहिलेले आहे.

१५ फेब्रुवारी, १९४९ रोजी नामदेव ढसाळ यांचा पुणे जिल्हा, खेड तालुक्यातील पूर या खेडेगावात जन्म झाला. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची आणि हालाखीची असल्याने पोट भरण्यासाठी ढसाळांचे वडील

मुंबईला आले. मुंबईतील उंच-उंच इमारती, श्रीमंत आणि दुसऱ्या बाजूला झोपडपट्टीसारख्या बकाल वस्त्या, तिथे दारिद्र्य, घाण, मवाले-गुंड, वेश्या, दलाल हे सारे पाहत नामदेव ढसाळ मोठे होत गेले. सुरुवातीला पोटापाण्यासाठी टॅक्सी चालवली. या साऱ्याचा परिणाम संवेदनशील मनावर होत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर मार्क्स, लेनिन, माओ इत्यादी विचारवंतांचे वाचन. यातून सामाजिक चळवळींची वाटचाल सुरू झाली त्याच बरोबर कविता, स्तंभलेखन सुरूच होते.

नामदेव ढसाळ यांनी २९ मे, १९७२ साली दलित पँथरची स्थापना केली. दलित पँथर ही अमेरिकेतील ब्लॅक पँथरच्या प्रभावातून निर्माण झालेली संघटना. साहजिकच ढसाळांच्यावर ब्लॅक पँथरचा आणि त्यातून निर्माण झालेल्या ब्लॅक लिटरेचरचा प्रभाव पडलेला दिसून येतो. याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभावही दिसून येतो.

गोलपिठा (१९७३), गांडू बगीचा (१९७४), मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हालवला (१९७५), प्रियदर्शनी : आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पान (१९७६), तुही इत्ता कंची (१९८१), खेळ (१९८३), या सत्तेत जीव रमत नाही (१९९५), तुझे बोट धरून चाललो आहे मी, निर्वाणानंतरची पीडा, मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे (२००५), मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे इत्यादी त्यांचे महत्त्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. हाडकी हाडवळ, निगेटिव्ह स्पेस, उजेडताच काळी दुनिया या कादंबऱ्या. अंधार यात्रा हे नाटक. सर्व काही समष्टीसाठी, बुद्ध धर्म काही शेष प्रश्न, आंबेडकरी चळवळ, आंधळे शतक, दलित पँथर : एक संघर्ष हे चिंतनपर ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १५ जानेवारी २०१४ रोजी वयाच्या चौसष्टाव्या वर्षी निधन झाले.

**ढसाळांची कविता**

माझ्या भाषेचा उत्सव होऊ दे जगद्व्याळ
दिगंत होऊ दे माझ्या शब्दांनी
माणसांसभोवतालचे रटाळ विश्व

१९६० नंतरच्या मराठी कवितेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रयोगशील लेखनाने मराठी कवितेला नवे आयाम प्राप्त करून दिले. प्रमाण मराठी भाषेची प्रचंड प्रमाणात मोडतोड करून नवे शब्द, नवे वाक्प्रचार आणि नव्या अनवट प्रतीकांनी उदा. लिक झालेला सूर्य इ. मराठी कवितेचे दालन समृद्ध केले. लोकभाषेचे सामर्थ्य ढसाळांनी पहिल्यांदा मराठी साहित्याला दाखवून दिले.

जगात सर्वत्र वर्गीय व्यवस्था आढळते. भारतात वर्गीय व्यवस्थेबरोबर जातीय व्यवस्थाही आहे. या जातीय व्यवस्थेचे भयावह परिणाम चातुर्वर्ण्याच्या खालच्या पायरीवर असणाऱ्या शूद्र म्हणजे अलीकडच्या दलित समाजाला भोगावे लागले. नामदेव ढसाळ हे अशाच समाजाचे प्रतिनिधी होत. जातीयतेचे चटके ढसाळांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सोसले आहेत. जातीयतेच्या अपमानित जाणिवेबरोबरच मुंबईसारख्या महानगरीय

जीवनातील बकालपणा, वेश्यांचे किळसवाणे जगणे हे ढसाळ यांच्या कवितेचे एक महत्त्वाचे संदर्भबिंदू आहेत. त्यांच्या सुरुवातीच्या कवितासंग्रहापासून महानगराची विशिष्ट रूपे व्यक्त झाली आहेत. शोषित सर्वहारावर्गाचे विश्व, त्यातील ताणे-बाणे, वेश्या-दलाल आणि गिऱ्हाईकांचे घृणास्पद व्यवहार ढसाळांची कविता साक्षात करते. ढसाळांची संवेदना नव्याने आकारास आलेल्या महानगरीय जीवन जाणिवांनी व्याप्त आहे. ढसाळांची कविता बाजार, दुकानदारी, ग्राहकमूल्य, जीवघेणी स्पर्धा अधोरेखित करते. ढसाळांची कविता जातीयता आणि महानगरीय जीवन जाणिवेतील दाहकता व्यक्त करतेच पण त्याच बरोबर बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी तत्त्वज्ञानाचाही पुरस्कार करते. हे ढसाळांच्या कवितेतील अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य होय. ज्या युगकर्त्या महामानवांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, मनुष्यत्वाचा सन्मान केला, त्या महामानवाबद्दल ढसाळांच्या मनात अपार कृतज्ञताभाव आहे. तो त्यांनी अत्यंत निष्ठेने आणि नम्रतेने व्यक्त केला आहे.

ढसाळांची कविता माणसाला सर्वप्रकारच्या शोषणातून मुक्त करण्याचे स्वप्न पाहते आणि त्यासाठी सर्वंकष विद्रोह करायला सज्ज करते. ढसाळांची कविता माणसाच्या मुक्तीचे गीत गाते.

हे सारे विश्वव्यापी गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनाम वेळी फुटू द्यावे, रिचू द्यावे
नंतर उरल्या सुरल्यानी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये
काळा गोरा म्हणू नये
तू क्षत्रिय, तू वैश्य, तू शूद्र असे हिणवू नये
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून
त्याच्या कुशीत गुण्यागोविंदाने राहावे
चंद्र सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी खरवंडून खावा
माणसावरच सुक्त रचावे
माणसाने गाणे गावे माणसाचे

साहजिकच ढसाळांची कविता ही कविता न राहता चळवळीचे रूप धारण करते. ढसाळांच्या कवितेतील आक्रमकता, चिंतनात्मकता आणि भाषेतील रांगडी शैली थेट संत तुकोबाच्या अभंगाशी नाते सांगते. कवितेतील अभिव्यक्ती मात्र खास ढसाळांचीच आहे. पुढे ही ढसाळांची अभिव्यक्ती परंपरा अनेकांनी स्वीकारली.

**नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा प्रभाव**

१९६० नंतरच्या मराठी कवितेच्या क्षेत्रात नामदेव ढसाळ यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रयोगशीलतेने मराठी

कवितेला नवे आयाम प्राप्त करून दिले. प्रमाण मराठी भाषेची प्रचंड प्रमाणात मोडतोड करून नवे शब्द, नवे वाक्प्रचार आणि नव्या अनवट प्रतीकांनी मराठी कवितेचे दालन समृद्ध केले. लोकभाषेचे सामर्थ्य ढसाळांनी पहिल्यांदा मराठी साहित्याला दाखवून दिले. ढसाळांनी केवळ दलित कविताच नव्हे तर संपूर्ण मराठी कविताच ढवळून काढली. त्र्यंबक सपकाळे, वामन निंबाळकर, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे इत्यादी कवींवर नामदेव ढसाळांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवून येतो.

नामदेव ढसाळ यांचा प्रभाव ज्यांनी स्वीकारला आणि ताकदीने पचवला त्यामध्ये त्र्यंबक सपकाळे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. केशव मेश्राम 'ढसाळांच्या दिंडीत शोभावा असा परिपूर्ण कवी म्हणजे त्र्यंबक सपकाळे' असा सार्थ उल्लेख करतात. 'सुरूंग' हा त्यांचा कविता संग्रह होय.

हे संस्कृतप्रिय देशा
तुला माझे नागवेपण झाकता आले नाही.

नामदेव ढसाळांसारखीच त्यांची भाषा अत्यंत साधी-सोपी पण तितकीच जहाल आणि थेट आहे. ते केवळ दोनच ओळींतून भारताच्या महान संस्कृतीचे धिंडवडे काढतात. 'हे भाग्य मात्र तुम्हास लाभणार आहे', ही कविताही त्यादृष्टीने पाहण्यासारखी आहे.

पुरेत तुमची शब्दांच्या जाळ्यातील
मायावी भारूडे बृहस्पती आणि वाचस्पतींनो
रेडा इथला वेदांती झाला
मैलोगणती दूर ठेवले अक्षरशत्रू बनवून आम्हाला
गाढव इथले गंगाजळ प्याले
अश्रू पिऊन आम्ही तडपत राहिलो
त्याची खंत वाटली नाही

या कवितेमध्ये हजारो इंगळ्या एकावेळी डसाव्या आणि वेदनेचा आगडोंब उसळून यावा, अशा पद्धतीची प्रतीकांची मांडणी आहे. त्याला अनुरूप अशी भाषा थेट ढसाळांशी नाते सांगते.

तुझी लोकशाही पोरगी आता मॅच्युअर झाली आहे
तिच्या पहिल्या मुलासाठी मी आलेलो आहे

सपकाळे यांच्या कवितेत विविधता आणि संपन्नता आहे. त्यांची अभिव्यक्तीची शैली थेट ढसाळांच्या परंपरेशी नाते सांगते. सपकाळ ढसाळांचा प्रभाव मान्य करतात.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेने प्रभावित होऊन कविता लिहिणारे कवी म्हणजे प्रल्हाद चेंदवणकर होय. 'ऑडिट' हा त्यांचा एक समर्थ कविता संग्रह. ढसाळांच्या काव्यप्रवृत्तींचा प्रभाव शोधायचा असेल तर त्यांची 'प्रकाशाच्या किरणांना' ही कविता आदर्श ठरू शकते.

प्रकाशाच्या किरणांना खरोखर शहाणपण
सुचत असेल तर
त्यांनी बेधडक आमच्या झोपडीत शिरावं
....उद्याच्या सूर्याचं बाळंतपण आमच्यासाठी केलं
तर तिला चोळीबांगडी करण्याचं
सत्कार्यही आमच्याच घराघरात होईल

चेंदवणकरांच्या काही मोजक्याच कविता सोडल्या तर बाकीच्या कविता केवळ भाषेतील जोमदारपणाच अधिक अधोरेखित करतात. ढसाळांनी केवळ भाषेसोबत आशयाच्या पातळीवरही प्रचंड मोडतोड केली. ते चेंदवणकरांना शक्य झाले नाही. पण ढसाळांच्या प्रभावाने लिहिणारा कवी म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो.

## ४.३ समारोप

एकूणच या घटकात आपण प्रभावाची संकल्पना आणि स्वरूप समजावून घेतले. एखाद्या लेखकाचा प्रभाव स्वीकारण्यात कमीपणाचे लक्षण नसते हे आपण पाहिले. प्रभाव स्वीकारणे म्हणजे त्या लेखकाच्या लेखन शैलीचे अनुकरण करणे नव्हे. प्रभाव आणि अनुकरण यांच्यात फरक केला नाही तरी एखादा लेखक इतर लेखकांचे केवळ अनुकरण करत राहण्याचा धोका वाढू शकतो. साहजिकच त्याचे लेखकपण शिल्लक राहत नाही. पण एकूणच प्रभाव स्वीकारण्याने एखाद्या भाषेतील साहित्यक्षेत्र समृद्ध होते, यात शंका नाही.

सर्वच पाश्चिमात्य नाटककारांच्या तुलनेत विल्यम शेक्सपिअरच्या नाटकाचा प्रभाव आपल्याला जास्त आढळून येतो. मराठीतील बहुतांशी सर्वच नाटककारांना शेक्सपिअरच्या नाटकांची भुरळ पडलेली दिसून येते. शेक्सपिअरच्या नाटकांची भाषांतरे आणि रूपांतरे आजही होत आहेत. यातून शेक्सपिअर आणि त्याच्या नाटकांच्या प्रभावाचा प्रत्यय येतो. केवळ नाटककारच नव्हे तर कादंबरीकार, कवी, मानसोपचार तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलावंत, चित्रपट दिग्दर्शक इत्यादी अनेकांना शेक्सपिअरने प्रभावित केले आहे.

हेन्रिक इब्सेनच्या प्रभावाचे स्वरूपही असेच आहे. पण शेक्सपिअरच्या नाटकाने ज्या पद्धतीने मराठी नाटकावर प्रभाव टाकला त्याप्रमाणे इब्सेनच्या नाटकांनी टाकला नाही, हे वास्तव आहे. याचे कारण इब्सेनच्या नाटकातील अंतरंग मराठी नाटककारांनी नीटपणे समजून घेतले नाही. त्यामुळे इब्सेनी नाट्यतंत्रातील बाह्यांग तेवढे स्वीकारले गेले. परंतु त्याचा गाभा मात्र स्वीकारता आला नाही. गाभ्याला भिडण्याची क्षमता मराठीतल्या कोणत्याही नाटककाराकडे नसावी किंवा भारतीय संस्कृतीच्या परिप्रेक्षाचा विचार करता कोणी इब्सेनी नाटकाच्या गाभ्याला भिडण्याचे धाडस दाखवले नाही, असे म्हणावे लागेल. त्यामुळे इब्सेनचा मराठी नाटकावर अयशस्वीपणे प्रभाव पडला, असेच म्हणावे लागते.

भालचंद्र नेमाडे आणि नामदेव ढसाळ मराठी साहित्यातील दोन दिग्गज होत. भालचंद्र नेमाडे हे कादंबरी आणि नामदेव ढसाळ हे कविता या वाङ्मय क्षेत्रात सर्वश्रेष्ठ होत. नेमाडे यांनी मराठी कादंबरीला दिलेले योगदान वेगळ्या भाषेत सांगण्याची गरज नाही, इतके ते सर्वश्रुत आहे. साहजिकच नेमाडे यांचा प्रभाव मराठी कादंबरीकारांवर खूपच पडला आहे, ही वस्तुस्थिती नजरेआड करता येणे अशक्य आहे.

'कोसला' नंतर भालचंद्र नेमाडे यांचा प्रभाव मराठीतील अनेक कादंबरीकारांवर पडलेला दिसून येतो. यामध्ये भाऊ पाध्ये, त्र्यं. वि. सरदेशमुख, व. ह. पिटके, श्री. ना. पेंडसे, किरण नगरकर, रंगनाथ पठारे, किशोर सानप, राजन गवस इत्यादी अनेकांवर नेमाडेंच्या लेखनप्रवृत्तीचा प्रभाव जाणवतो. बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर, होमसिक ब्रिगेड, शिदोरी, निळे कमळ, ताम्रपट, सात सक्कं त्रेचाळीस, काळोखाचे अंग, रात्रंदिन आम्हा, लव्हाळी, कळप, पांगुळवाडा, ताम्रपट, चक्रव्यूह, दिवे गेलेले दिवस इत्यादी कादंबऱ्यांवर कोसलाचा पर्यायाने भालचंद्र नेमाडेंचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

### स्वयं अध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ........ ही नामदेव ढसाळांची कादंबरी आहे.

(अ) गांडू बगीचा (ब) खेळ (क) हाडकी हाडवळ (ड) तुही इंत्ता कंची

२. ........ हा भालचंद्र नेमाडे यांचा कवितासंग्रह आहे.

(अ) जरीला (ब) मेलडी (क) बिढार (ड) झूल

३. विल्यम शेक्सपिअर यांनी सुखात्मिका आणि शोकांतिका अशी मिळून एकूण ........... नाटके लिहिली आहेत.

(अ) २८ (ब) ३२ (क) ४१ (ड) ३७

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विल्यम शेक्सपिअरचा जन्म कोणत्या देशात झाला ?

२. भालचंद्र नेमाडे यांची गाजलेली कादंबरी कोणती ?

३. नामदेव ढसाळ यांचा पहिला कविता संग्रह कोणता ?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. हाडकी हाडवळ     २. मेलडी     ३. ३७

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इंग्लंड     २. कोसला     ३. गोलपिठा

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ : योग्य पर्याय निवडा.**

१. हेन्रिक इब्सेन यांचा जन्म ............. या देशात झाला.

(अ) पोलंड     (ब) नॉर्वे

(क) इंग्लंड     (ड) फ्रान्स

२. १९६७ साली ऑथेल्लो या नाटकाचे मराठी भाषांतर ............. यांनी केले.

(अ) महादेवशास्त्री कोल्हटकर     (ब) आ. वि. पाटकर

(क) शामराव ओक     (ड) महादेवशास्त्री जोशी

३. शेक्सपिअरचे ............. हे नाटक सुखात्मिक नाटक म्हणून ओळखले जाते.

(अ) ए मिड समर नाईटस्     (ब) मॅकबेथ

(क) रोमिओ ज्युलिएट     (ड) हॅम्लेट

४. ............. या नाटकाने हेन्रिक इब्सेनला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळाली.

(अ) ॲन एनिमी ऑफ दि पिपल     (ब) ए पिलर्स ऑफ सोसायटी

(क) ए डॉल्स हाऊस     (ड) घोस्टस्

५. नेमाडे आपल्या साहित्यकृतीतून ............. आविष्कार करताना दिसतात.

(अ) देशीय मूल्यांचा     (ब) विदेशी मूल्यांचा

(क) वसाहतवादी मूल्यांचा     (ड) समाजवादी मूल्यांचा

**प्र. २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विल्यम शेक्सपिअरचे 'कॉमेडी ऑफ एरर्स' हे नाटक सुखात्मिक आहे की शोकात्मिक ?

२. विंदा करंदीकरांनी शेक्सपिअरच्या कोणत्या नाटकाचे भाषांतर केले आहे ?

३. वसंत कानेटकर यांचे 'गगनभेदी' हे नाटक शेक्सपिअरच्या कोणत्या तीन शोकांत्मिक नाटकाचे एकत्रिकरण आहे ?

४. वि. वा. शिरवाडकरांनी यांच्या 'नटसम्राट' या नाटकावर शेक्सपिअरच्या कोणत्या नाटकाचा प्रभाव आहे ?

५. हेन्रिक इब्सेनच्या 'ए डॉल हाऊस' या नाटकावरून आचार्य अत्रे यांनी कोणते नाटक लिहिले ?

**प्र. ३ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रभाव म्हणजे काय ? हे विशद करून विल्यम शेक्सपिअर यांच्या नाटकाचा मराठी नाटकावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

२. हेन्रिक इब्सेन यांच्या नाटकांचा मराठी नाटकांवर पडलेल्या प्रभावाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भालचंद्र नेमाडे यांचा मराठी कादंबरीवर पडलेल्या प्रभावाचे स्वरूप स्पष्ट करा.

**प्र. ४ : लघुत्तरी प्रश्न**

१. हेन्रिक इब्सेन यांचा परिचय करून द्या.

२. विल्यम शेक्सपिअर यांच्या शोकात्मिक नाटकांचा परिचय करून द्या.

३. नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे वेगळेपण विशद करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ

१. मराठी रंगभूमीच्या तीस रात्री (तीन खंड) – मकरंद साठे

२. शेक्सपिअरची शोकनाट्ये – परशुराम देशपांडे

३. राजमुकूट (मॅकबेथ) – वि. वा. शिरवाडकर

४. भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी – किशोर सानप

५. निळी पहाट – रा. ग. जाधव